
म. ग्रं. सं. ठाणें
निबंध

# ...ची कथा आणि व्यथा



REFBK-0013101

ना. ह. पालकर

# मंदिरांची कथा आणि व्यथा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32307 वि: निबंध
क्रमांक 9226 नों. दि. 90MEN

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. 93909

लेखक

नारायण हरि पालकर

REFBK-0013101
REFBK-0013101

मूल्य : चार रुपये

प्रकाशक :
ह. स. पालकर
आवास, जिल्हा कुलाबा

☆ ☆

सर्वाधिकार लेखकाधीन

☆ ☆

प्रथमावृत्ति :
दत्तजयन्ती, शके १८८५
८८

☆ ☆

मुद्रक :
य. गो. जोशी, बी. ए. (ऑ.)
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें २

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| हा उपक्रम कशासाठीं ? | १ |
| मंदिरांची कुलकथा | ८ |
| मूर्तिपूजेचें रहस्य | २७ |
| मंदिरांतील पुजारी | ३८ |
| मंदिरांतील समर्पण | ४८ |
| उपेक्षित देवळेंच देवळें | ६६ |
| मंदिरें प्रभावी कशीं होतील ? | ७४ |
| निवांत वनराजींतील मंदिरें | ८९ |
| उत्सव - जत्रा - यात्रा | ९७ |
| देवळांत जातांना | ११७ |
| मंदिरांत प्रवेश कोणाला ? | १२८ |
| कांहीं जिव्हाळ्याचे प्रश्न | १४४ |
| मूर्तिभंजन केव्हां थांबेल ? | १५८ |

* * *

इंग्रजी सत्तेचें उच्चाटन झाल्यावर ज्यांनीं श्रीसोमनाथाच्या
मंदिराचा पुनरुद्धार करून राष्ट्रीय अपमानाचीं दीर्घकालीन
शल्यें काढून टाकण्याचा श्रीगणेशा केला त्या

स्वर्गीय सरदार वल्लभभाई पटेल

ह्यांच्या स्मृतीस

सादर समर्पण.

—लेखक

# मनोगत

'मंदिरांची कथा आणि व्यथा' हें पुस्तक आज वाचकांच्या हातांत देण्याचा योग येत आहे. वास्तविक हें पुस्तक दोन वर्षांपूर्वी लिहून काढलें. पण नेमकी त्याच वेळीं मंदिरांच्या विश्वस्त निधींचा विचार करण्यासाठीं भारत सरकारनें एक समिति नियुक्त केली. त्या समितीचें नेतृत्व डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांच्यासारख्या विचारवंत व नामवंत व्यक्तीकडे होतें. त्यामुळें त्या समितीचें प्रतिवृत्त हातीं पडेपर्यंत पुस्तक प्रकाशित करणें युक्त वाटलें नाहीं. अर्थात् अशी वाट पाहिल्यानें गेल्या दोन वर्षांत मूळ लिखाणांत कांहीं पालट करण्याची व नवीन भर घालण्याची मला संधि मिळाली व आजच्या स्वरूपांत तें प्रसिद्ध करतां आलें.

मंदिरें हीं समाजांतील प्रमुख संस्कारकेंद्रें होत. त्यांच्या प्रभावाचें हें आत्मीयतेनें व समाजहित-दृष्टीनें केलेलें परीक्षण आहे. मंदिरांचा उदय, उत्कर्ष व सद्यःस्थिति यांचें परीक्षण करून मंदिरांच्या भवितव्यावर प्रकाश टाकण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न आहे. यांतील विवेचनाला अनेक विद्वानांच्या ग्रंथांचा आधार मला मिळाला असला, तरी त्यांतील प्रमुख विचारसूत्रें हीं मीं स्वतःच्या निरीक्षणांतून अधिकाधिक पारखून घेतलीं आहेत. पाहिलेल्या, वाचलेल्या व ऐकलेल्या अशा तिन्ही गोष्टींचा उपयोग करून ही व्यथित करणारी मंदिरांची कथा लिहिली आहे. ही कथा वाचून मंदिर-संस्थेंतील लांच्छनास्पद गोष्टी नष्ट करण्याची व चारित्र्य-संवर्धनाला उपयुक्त ठरणाऱ्या गोष्टी परिपुष्ट करण्याची सर्वांना प्रेरणा व्हावी, हीच माझी अपेक्षा आहे.

ही 'मंदिरांची कथा आणि व्यथा' मुद्रित होऊन लोकांसमोर येण्याला माझ्या दोघां मित्रांचा लोभ प्रामुख्यानें कारणीभूत झालेला आहे. एक श्री. त्रिं. वि. तथा बापूराव भिडे व दुसरे श्री. ह. वि. तथा बापूराव दात्ये. हें खरें असलें तरी या माझ्या पुस्तकाला श्रद्धेय प्राचार्य श्री. शं. वा तथा सोनोपंत दांडेकर यांचा पुरस्कार मिळाला, हा मी मोठा सुयोग समजतों. गेल्या तीस-चाळीस वर्षांत ज्यांनीं कीर्तन-प्रवचनांच्या द्वारां सहस्रावधि मंदिरांच्या प्राकारांत लक्षावधि लोकांचे सद्भाव जागविले, त्यांचा त्या क्षेत्रांतील अधिकार काय

सांगावा? अशा थोर अधिकारी व्यक्तीच्या पुरस्कारानें मीं घडविलेल्या वाङ्मय-मूर्तींत जणू प्राणप्रतिष्ठा केली आहे, असें मला वाटतें. जवळ जवळ गेलें वर्षभर ते आजारी असून वाचण्या-लिहिण्याचा त्रास त्यांना सहन होण्यासारखा नाहीं. अशाहि स्थितींत त्यांनीं या पुस्तकाला पुरस्कार लिहून मला ऋणी करून ठेविलें आहे. पण त्यांच्यासारख्यांचा ऋणी राहण्यांतहि काय कमी आनंद आहे?

पुणें,
दत्तजयन्ती : शके १८८५

**ना. ह. पालकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................... दि: ..............
क्रमांक ....17466.... के दि ----------

## पुरस्कार

'मंदिरें' हा भारतीयांचा अमोल ठेवा आहे. आणि म्हणूनच बहुसंख्य भारतवासीयांच्या अंतःकरणांत 'देव आणि देवालयें' ह्यांच्यासंबंधीं श्रद्धा व जिव्हाळा यांना स्थान असल्याचें आढळून येतें. श्री. नारायण हरि पालकर ह्यांचा प्रस्तुतचा ग्रंथ या द्वयींतूनच निर्माण झाला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

श्री. पालकर ह्यांची श्रद्धा व त्यांना वाटणारा जिव्हाळा, हीं दोन्ही डोळस असल्यानें, त्यांनीं आपल्या या कथेंतून 'मंदिरसंस्थे'चा मागोवा, तिचें भवितव्य, इत्यादींचा विचार साकल्यानें व बारकाईनें करण्याचा यत्न केलेला आहे, हें सुज्ञ वाचकांच्या लक्षांत येईलच. मंदिर-संस्थेचा इतिहास, अथवा लेखकाच्याच शब्दांत सांगावयाचें झाल्यास 'मंदिरसंस्थेची कथा आणि व्यथा' या विषयाकडे अद्याप जाणत्या लेखकांचें म्हणावें तितकें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. तेव्हां ह्याहि दृष्टीनें प्रस्तुत लेखकाचा हा उपक्रम कौतुकास्पदच म्हणावा लागेल.

संस्था म्हटली कीं, तिचा 'इतिहास' हा आलाच आणि इतिहास म्हणतांच त्यांत कालनिर्णय, भरभराट, ऱ्हास, भवितव्य, इत्यादि गोष्टींचा विचार हा ओघानेंच येतो. लेखकानें अर्थातच या कथेंत वरील सर्व अंगांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न परिश्रमपूर्वक केला आहे, हें चटकन् ध्यानांत येण्यासारखें आहे. मंदिरांमध्यें समाजावर टिकाऊ व उत्तम संस्कार करण्याची किमया व सामर्थ्य आहे, याची लेखकास जाणीव आहे, आणि म्हणूनच या 'संस्कृतिक्षम केंद्रा'ची (मंदिराची) 'कथा आणि व्यथा' लेखक आत्मीयतेनें सांगत असल्याचें आढळून येईल. मंदिरसंस्थेचा मागोवा घेत असतांना, वैदिकधर्मीयांनीं 'मूर्तिपूजा' ही बौद्धांपासून घेतली नाहीं, तर ती जवळ जवळ वैदिक संस्कृतीइतकीच पुरातन आहे, हें लेखकानें सप्रमाण सिद्ध केलें आहे. मंदिरसंस्थेच्या भरभराटीचा पाया "मानवाची श्रद्धेकडे असणारी स्वाभाविक ओढ" यांतच आहे, असें म्हणतां येईल. याच श्रद्धेला जेव्हां

राजाश्रय, दानशूरत्व, पंथाभिमान, इत्यादींची जोड जसजशी मिळत गेली, तसतशी देवळांच्या व देवतांच्या संख्येंत व ऐश्वर्यांत वाढ होत गेली आणि या संस्थेचा 'वेल' सबंध भारतवर्षावर लवकरच गेला. श्री. पालकर ह्यांनीं देवळांची शिरगणति व त्यांची संपत्ति इत्यादींसंबंधीं दिलेले आंकडे सर्वसाधारणपणें मान्य होण्यास प्रत्यवाय नसावा.

मंदिरसंस्थेचा विचार हा प्रामुख्यानें मंदिरांतील देवतांशीं निगडित असाच असावयास हवा. ह्या दृष्टीनें 'मूर्तिपूजारहस्य' हें प्रकरण अधिक मननीय वाटेल. 'देव वा दैवतें' हीं जरी अनेक असलीं तरी त्या सर्वांतून एकाच 'जगच्चालकशक्ती'चें दर्शन घडावें, हा त्यामागील मुख्य हेतु होय. पाषाण वांकवून त्यांतून अद्‌भुत सौंदर्याकृति निर्माण करणें, ह्यांतून कलेचा साक्षात्कार तर होतोच, पण त्याहिपेक्षां अशा या साकार सौंदर्यांतून आपणांस 'अतर्क्य' अशा परमात्मशक्तीचाहि वेध अधिक लीलया घेतां येतो. मूर्ति ही पाषाणाची असो वा धातूची असो, मूर्तिपूजकाचें तें एक सोपें व परिणामकारक असें माध्यम असतें आणि त्याद्वारां तो अनंत अशा परमात्मवस्तूशीं एकरूप होण्याचा प्रयत्न करीत असतो.

मूर्तिपूजेचे कडवे विरोधकहि असल्याच कोणत्या तरी माध्यमाचा अवलंब करीत असतांना दिसतात. मूर्तिपूजेला विरोध करणाऱ्या कांहीं पंथीयांना तर मूर्तिपूजेचीच सरळ सरळ कांस धरावी लागली; आणि ज्या पंथीयांनीं ( उदा. आर्यसमाज, प्रार्थनासमाज, इत्यादि ) मूर्तिपूजेचा स्वीकार करण्याचें नाकारलें, त्यांची स्थिति केवळ "आग्रहोचि उरे" अशी झालेली दिसते, हें लेखकानें इतिहासाच्या आधारें स्पष्ट केलें आहे.

मूर्तिपूजेंतूनच प्रायः शिल्पकला, नृत्य, गायन, वादन, इत्यादि कलांचा उद्‌भव झाला असावा, हें लेखकाचें मत ग्राह्य वाटतें.

मंदिरसंस्थेची प्राचीनता व भरभराट ह्यांतूनच त्या संस्थेस कांहीं व्यथाहि जडल्याचें अवलोकनास येतें. तेव्हां या व्यथांचा विचार हाहि तितकाच महत्त्वाचा ठरतो. साहजिकच लेखकानें या व्यथांची योग्य ती चिकित्सा केलेली आहे. परंतु, केवळ 'व्यथा' दाखवून लेखक थांबलेला नाहीं, तर त्यांच्या निवारणार्थ कोणते प्रयत्न करावयास हवेत, हेंहि त्यानें मोठया आस्थेनें सांगितलें आहे. राजकीय स्वातंत्र्याचा

अभाव, पुजारीवर्गाची लोभी वृत्ति, अंधश्रद्धा इ. गोष्टी या व्यथांना कारणीभूत आहेत, असें लेखकानें आपलें प्रांजल मत दिलें आहे. मंदिरांच्या आंतबाहेर 'खटकणाऱ्या' वरील व इतर कांहीं अशाच स्वरूपाच्या उणीवा दूर केल्या जाव्या, ह्या दृष्टीनें लेखकानें कांहीं विधायक सूचनाहि केल्या आहेत. देवकारणांत 'राजकारण' नसावें, पुजारीवर्गाचा बौद्धिक व आर्थिक दर्जा सुधारण्याचे प्रयत्न व्हावेत, मंदिरांतील व्यवहारांवर योग्य त्या देखरेखीचा अंकुश हवा, इत्यादि सूचना विचारार्ह वाटतात.

अशा पुस्तकांत थोडी पुनरुक्ति व स्वमतांचें प्रतिपादन सांपडणें शक्य आहे व तसें तें यांतहि आहे; पण एकंदरींत मंदिरांची कथा सरस व सुरस उतरली आहे, असेंच म्हणावें लागेल.

सामान्यतः न हाताळल्या जाणाऱ्या पण मानवी संस्कृतीच्या दृष्टीनें ज्याला महत्त्व आहे अशा विचारानें भरलेलें हें पुस्तक लिहून मराठी वाङ्मयांत श्री. पालकर यांनीं मौलिक भर घातली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याबद्दल त्यांचें अभिनंदन.

मंदिरसंस्थेचें माहात्म्य लक्षांत घेऊन त्या संस्थेस जडलेल्या 'व्यथा' दूर करण्याचा प्रयत्न प्रत्येकानें आपापल्या परीनें केल्यास प्रस्तुतच्या पुस्तकाचा हेतु बऱ्याच अंशानें साध्य होईल, असा विश्वास वाटतो.

मुंबई
कार्तिक शु. १, शके १८८७

**शं. वा. दांडेकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.
अनुक्रम ३५३०७ दि: १ नोव्हें.
क्रमांक ९२८६ १०/७/६६
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 93909

प्रकरण १

# हा उपक्रम कशासाठीं ?

बऱ्याच शतकांच्या पडत्या काळानंतर आपलें राष्ट्र आतांच कोठें वर येत आहे. हिंदुस्थानच्या पवित्र भूमीला असे अनुकूल दिवस लाभत असतांना तिच्या वायव्य व ईशान्य भागांतील राष्ट्रीय जीवन संपूर्णतः नष्ट करण्यांत आल्याचें अत्यंत व्यथित करणारें दृश्य आपल्या पिढीला पाहावें लागलें आहे. सिंध, पुष्पपूर ( वायव्य सीमाप्रांत ), अर्धा अधिक पंजाब व बंगाल या भागांत यापुढें हिंदूंचें नांव-निशाण पुन्हां उमटूं द्यावयाचें नाहीं, या निश्चयानें तेथील मुसलमान राज्यकर्ते व्यवहार करतांना दिसत आहेत. या धोरणाचा परिपाक म्हणून तिकडील आपल्या पवित्र मंदिरांचें अक्षरशः गोठे व तबेले बनविण्यांत आले आहेत !

पण गेल्या सहस्त्र वर्षांत, बोलून चालून आक्रमक म्हणून भारतात आलेल्या मुसलमानांनीं, कुटिल इंग्रजी राजनीतीच्या प्रभावी आशीर्वादानें, आत्मविस्मृत हिंदूंच्या आत्मघातकी व भोळ्या व्यवहाराचा लाभ घेऊन, भारतांत स्वतःचें आसन कांहीं भागांत स्थिर करण्यांत यश मिळविलें यांत नवल नाहीं. तसेंच आपल्याकडील राजा हरिश्चंद्रानें 'सत्यवादि'त्वाचें आपलें स्वत्व टिकविण्यांत भूषण मानावें त्याप्रमाणें 'बुत्‌शिकन' म्हणजे 'मूर्तिभंजक' असें बिरुद

आपल्या नांवामागें झळकविण्यांत ज्या मुसलमानांना कृतकृत्यता वाटत आली आहे त्यांनीं, विनासायास हातीं पडलेल्या प्रदेशांतील देवळांचे गोठे बनवावेत यांत आश्चर्य कसलें ? पण 'इंडिया याने भारत' म्हणून उल्लेखिण्यांत येणाऱ्या आपल्या स्वतंत्र भारतांतीलहि एकूण जीवन व श्रद्धाकेंद्रें हीं पूर्वींपेक्षांहि अधिक विस्कळित व कळाहीन दिसावींत ही गोष्ट मात्र स्वाभिमानी व विवेकी मनाला चिंतनीय व अत्यंत वेदना देणारी आहे.

आजच्या ढासळत्या राष्ट्रीय जीवनासंबंधीं व कळाहीन बनलेल्या आपल्या श्रद्धाकेंद्रांसंबंधीं समर्थन करणारा वा सावरून घेणारा युक्तिवाद कोणी सहज करूं शकेल. तो असा कीं, 'एखाद्या वाहनाची गति रोधण्यासाठीं कळ दाबली वा खटका ओढला, तरी कांहीं काळ तें वाहन थोडेंसें पुढें जातें व मग प्रत्यक्ष थांबतें. त्याप्रमाणें आपल्या राष्ट्राच्या घसरत्या गाड्याची इ. स. १९४७ मध्यें गतिरोधासाठीं कळ दाबली गेल्यावरहि त्यावेळेपेक्षां थोडी अधिक घसरगुंडी झालेली आहे.' हा युक्तिवाद क्षणभर समाधानकारक वाटला तरी वस्तुस्थितीकडे बारकाईनें ध्यान देणाऱ्या कोणालाहि तो पटणार नाहीं. कारण घसरगुंडी हलके हलके कमी होत होत ती थांबण्याचें व चढाईला प्रारंभ होण्याचें सुचिन्ह जनमनांत व दैनंदिन व्यवहारांत उमटलेलें दिसत नाहीं. एखाद्या राष्ट्राची अधोगति रोखून त्याला प्रगतीच्या व उन्नतीच्या मार्गावर नेण्यासाठीं ज्या प्रकारच्या ध्येयनिष्ठ, समर्थ आणि सुसंघटित कार्यकर्त्यांची आवश्यकता असते त्यांचीच उणीव आज सर्वांत अधिक जाणवत आहे, हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. ही तीव्रतेनें भासणारी उणीव तांतडीनें दूर करावयाची असेल तर समाजावर अखंड सुसंस्कार करण्याची यंत्रणा जीवनाच्या सर्व क्षेत्रांत मोठ्या कुशलतेनें निर्माण केली पाहिजे. ज्या ज्या संस्कारांतून गलित समाजांतील स्वाभिमान प्रज्वलित होत असेल, औदासीन्य सोडून बिकट परि-स्थितीला कलाटणी देण्यासाठीं चढाई करण्याची इच्छा बळावत असेल आणि व्यक्तीव्यक्तींतील सुप्त शक्ति जागृत नि विकसित करून, कर्तृत्वाचें, तारुण्याचें आणि चैतन्याचें नवयुग निर्माण करण्याची आकांक्षा पंख उभारून भरारूं लागत असेल, त्या त्या संस्कारांची उपासना आज योजनापूर्वक करण्याची आवश्यकता आहे.

दोन हातांनीं जशी टाळी वाजावी किंवा दोन ओठांच्या सहकार्यांतून जसा

शब्द उमटावा त्याप्रमाणें संस्कारहि दोन गोष्टींची सुयोग्य योजना होण्यावरच अवलंबून असतो. संस्कार करणारी प्रभावी व्यक्ति किंवा शक्ति आणि संस्कारानुकूल असे, संस्कार करून घेणाऱ्या व्यक्तीचें वा समष्टीचें भावुक व सश्रद्ध मन संस्कार करणारी व्यक्ति वा शक्ति ही स्वाती नक्षत्रांतील मेघाप्रमाणें जशी दिव्य जीवनसंपन्न पाहिजे, त्याचप्रमाणें ज्यांवर संस्कार व्हावयाचा त्यांच्या मनाचा शिंपला हा त्या मेघाच्या कृपावृष्टीकडे तोंड करून उघडलेला असला पाहिजे. तेव्हांच सुसंस्काराचा पाणीदार नि टपोरा मोती प्राप्त होऊं शकतो. सुसंस्कारित मन हें राजमुद्रा ठसठशीतपणें उमटलेल्या नाण्यासारखें असतें. तें नाणें व्यवहारांत कोठेंहि अव्हेरलें जात नाहीं. कोणतीहि परिस्थिति प्राप्त झाली तरी लवमात्र न डगमगतां निश्चितपणें ' चालूं शकेल ' अशी प्रतिष्ठा व शक्ति मनाला प्राप्त होण्यासाठीं प्रभावी संस्कारांच्या ठशामध्यें नाण्याच्या धातूप्रमाणें मऊ होऊन सद्गुणांनीं मंडित होण्याची सिद्धता ठेवावीच लागते. ह्यासाठींच समाजावर सुसंस्कार करणाऱ्या शक्तींचा जसा शोध करावा लागेल, तशीच त्या शक्तींना आत्मसात् करण्याची तीव्र उत्सुकताहि लोकांत वाढवावी लागेल. ह्या दोन गोष्टींतील यशावरच समाजजीवनाची अधोगति थांबविण्याचें व त्या जीवनाला विजयोन्मुख करून उन्नत करण्याचें महत्कार्य निर्भर आहे.

समाजावर सुसंस्कार प्रामुख्यानें ज्यामुळें होऊं शकतात अशा प्रभावशाली शक्तींचा निर्देश करावयाचा झाल्यास त्यांत पुरातन व विद्यमान महापुरुष; चारित्र्यसंपन्न आईवडील; संत-महंत व कर्मयोगी विचारवंत यांचें विदग्ध वाङ्मय; देवाच्या मूर्ति, पादुका, स्मारकें, समाधि-मंदिरें आणि तीर्थक्षेत्रें यांचें सश्रद्ध दर्शन; प्रेमळ, कर्तृत्ववान् मित्रांचा सहवास; उत्तम भाषणें, भजनें, कीर्तनें व प्रवचनें यांचें श्रवण आदि गोष्टींचा अंतर्भाव करावा लागेल. या संस्कार करणाऱ्या शक्तींची गांठ जेव्हां, प्रगतीसाठीं भुकेलेल्या व्यक्तींच्या मनाकडून घेतली जाते, तेव्हां त्यांच्या विचारांत नि आचारांत हलके हलके चैतन्य व ओज संचरूं लागतें. या संस्कार करणाऱ्या शक्तींपैकीं महापुरुष, माता-पिता, मित्र, वक्ते नि कीर्तनकार यांचा लाभ सर्वांना कांहीं प्रमाणांत होऊं शकतो; पण मूर्ति, पादुका, तीर्थक्षेत्रें यांसारख्या प्रतीकात्मक गोष्टी ह्या मात्र सर्वांना सर्वत्र व सर्वकाळ उपलब्ध होऊं शकतात. सुबोध व उच्च स्तराचे गद्य-पद्य ग्रंथ हेहि संस्कारांच्या दृष्टीनें ' नित्यसिद्ध ' याच कोटींत बसतात.

मात्र प्रतीकें व वाङ्मय यांच्या परिणामकारकतेंत थोडें अंतर आहे. प्रतीकें व प्रतिमा यांचा आशय परंपरेनें वाङ्मयाच्या माध्यमांतून लोकांच्या हृदयांत जागवावा, तेव्हांच त्या मूक प्रतीकांच्या दर्शनांतून तो आशय त्या प्रतीकांतील दिव्यत्व घेऊन, दर्शन घेणाऱ्याकडे परावर्तित होतो. उलट वाङ्मय हें वाचकांशीं वा श्रोत्यांशीं लगेच हितगूज करूं लागतें. ह्यासाठीं एक उदाहरण देण्यासारखें आहे. कांहीं वर्षांपूर्वी लंडनमध्यें एका इमारतीसाठीं पाया खणत असतां तेथें एक सूर्याची पुरातन मूर्ति मिळाली. तेव्हां तेथील वृत्तपत्रांतून त्या मूर्तीचीं छायाचित्रें प्रसिद्ध झालीं व पूर्वी केव्हां तरी इंग्लंडमध्यें मूर्तिपूजा रूढ होती, ह्याचा आणखी एक पुरावा उपलब्ध झाल्याचा आनंद तेथील संशोधकांना झालेला दिसला. पण त्या मूर्तीच्या दर्शनानें तेथील लोकांच्या अंतःकरणांत तेजस्वी सूर्यनारायणाविषयींचा भक्तिभाव उचंबळून आला असें मुळींच घडलें नाहीं. कारण त्या देवतेच्यासंबंधींचा दिव्य भाव वा आशय हा ख्रिश्चन धर्माच्या प्रसारामुळें लोकांच्या मनांत उरलाच नव्हता. उलट समर्थ रामदासांना अंगापुराजवळ कृष्णा नदीच्या डोहांत श्रीरामाची मूर्ति मिळतांच तिच्या पुनःप्रस्थापनेसाठीं चाफळ खोऱ्यांत केवढा महोत्सव झाला! संत तुकारामांचे पूर्वज विश्वंभरबुवा यांना देहूच्या आंबेबनांत जमीन खणतांना विठ्ठलमूर्ति मिळाली, तेव्हांहि तेथें भक्तीचा आनंदी आनंद असाच भरून उरला असेल. असें होणें हें स्वाभाविक होतें. कारण दोघांच्याहि काळांत मंदिरांतील कीर्तनांतून धनुर्धारी रामाच्या पराक्रम-कथा नि कानडा विठ्ठलाच्या बाललीला सर्वसामान्य जनतेला अवगत झाल्या होत्या. त्यामुळेंच अंगापुरांत व देहूच्या आंबराईत मूर्ति मिळतांच श्रीरामाच्या व श्रीकृष्णाच्या चरित्रांतील दिव्यत्वाचा आठव होऊन उधानलेल्या समुद्राप्रमाणें तेथील लोकांच्या भक्तिभावना उचंबळून आल्या होत्या.

मात्र जेव्हां प्रतीकाचा आशय व्यक्तीच्या मनांत जागा असतो, तेव्हां त्या व्यक्तीवर त्या प्रतीकाच्या दर्शनानें विलक्षण परिणाम होत असतो. शब्दरूपानें कानावर पडलेली गोष्ट मनावर अवश्य परिणाम करते. पण तीच गोष्ट प्रत्यक्ष डोळ्यांसमोर घडली तर तिचा परिणामकारक ठसा मनावर अधिक स्पष्टपणें उमटल्यावांचून राहात नाहीं. एखादा वक्ता वा कीर्तनकार बोलत असतां, अफाट समुदायाला त्याचें बोलणें ध्वनिक्षेपकामुळें स्पष्ट ऐकूं येतें; पण

प्रत्येकाला आपल्या स्थानावरून प्रत्यक्ष दर्शन घडतेंच असें नाहीं. अशा वेळीं वक्त्याला प्रत्यक्ष पाहावें या उत्कंठेनें गर्दीतून घुसत पुढें सरकण्याचा कसा प्रयत्न होतो व तें न जमल्यास जागच्या जागीं पाय उंचावून वा उडी मारून त्याला पाहाण्याची श्रोत्यांत कशी चुळबूळ होते. याचा प्रत्येकालाच, केव्हां ना केव्हां तरी अनुभव आलेला असतो. शब्दरूपांतील आशयाला प्रतिमेनें व प्रतीकानें भरीवपणा येतो एवढेंच नव्हे तर त्या आशयाला अधिक टिकाऊ-पणा प्राप्त होतो. केवळ शब्दांतील आशय हा फिका उडून जाणारा रंग मानला तर प्रतीकाधिष्ठित आशय हा गडद पक्क्या रंगासारखा टिकाऊ असतो, असें म्हणणें युक्त दिसेल. प्रतीकें व वाङ्मय यांची सुयोग्य सांगड हिंदुस्थानां-तील मंदिर-संस्थेंत घातली गेली व त्यामुळेंच तिची परिणामकारकता सहस्रा-वधि वर्षें आपण अनुभवीत आहोंत.

आज आपल्या देशांत सुमारें ५५८०८९ खेडीं व ३०१८ नगरें आहेत. सामान्यतः प्रत्येक खेड्यांत चार-दोन देवळें तरी असतातच. काशी, नासिक, पंढरपूर, मदुरा, रामेश्वर अशा सुविख्यात तीर्थक्षेत्रांतून व इतर नगरांतून देवळांची संख्या शेंकड्यांनीं मोजावी लागते. माणसांच्या संख्येप्रमाणें सबंध देशांतील देवालयांची व त्यांतील मूर्तींची गणति अद्यापि झाल्याचें ऐकिवांत नाहीं. पण खेडीं व नगरें यांची वरील संख्या ध्यानीं घेतां, आपल्या देशांत लहान-मोठ्या मंदिरांची संख्या ३०।४० लक्षांवर तरी जाईल व मूर्तींची संख्या ही तर कांहीं कोटींच्या वर असल्याचें मान्य करावें लागेल. नाहीं तरी आपल्या समाजांत देव हे तेहतीस कोटी आहेत असें मानलें जातें. मुळांत 'कोटी' म्हणजे प्रकार असा अर्थ असला तरी सर्वसामान्य समाजांत, तो अर्थ जाऊन देव हे संख्येनेंच ३३ कोटी असल्याची कल्पना रूढ झाली आहे. या कल्पनेंतील ३३ आंकडा हा मूर्तींच्या संबंधांत सोडून द्यावा लागला तरी 'कोटी' ही संख्या मात्र अतिशयोक्तीच्या कोटींत ढकलतां येणार नाहीं! अर्थात् ४४ कोटी जनसंख्या असणाऱ्या भारतासारख्या अति प्राचीन परंपरा असणाऱ्या देशांत मूर्तींची संख्या कोटीच्या घरांत जावी यांत आश्चर्य कसलें!

सामान्यपणें कोणत्याहि गांवांत शिरल्यावर आकाशांत उंच चढत गेलेले देवळांचे कळस हेच आपलें लक्ष वेधून घेतात. पूर्वीं तर असा दंडक पाळला जाई कीं, मंदिरापेक्षां गांवांतील कोणतेंहि घर हें उंच असूं नये. जर आहे त्यापेक्षां

आपलें घर उंच करण्याची कोणा धनाढ्य माणसाला इच्छा झाली तर प्रथमतः जवळील मंदिराचें शिखर उंचवून मगच तो आपल्या घरावर मजले चढवी. अर्थात् विश्वचालकाविषयींच्या भक्तिभावनेंतून, आपल्या घराहून सरस असें आलय म्हणजे मंदिर देवासाठीं असावें असें भक्ताला स्वाभाविकपणेंच वाटतें व त्यांतूनच हा दंडक मानला जाई. त्यामुळें कांहीं वेळां राजांच्या प्रासादा-पेक्षांहि त्यांच्या कुलदैवतांचीं मंदिरें भव्य व उत्तुंग व त्यांचें शिल्प हें अनेक पटीनें श्रेष्ठ असे. शेंकडों वर्षांपूर्वींच्या राजांनीं, धनाढ्यांनीं व भक्तांनीं उभारलेलीं मंदिरें हीं आपल्या ऐश्वर्यासह आजपर्यंत उभीं आहेत. पण त्यांच्या राज-वाड्यांचे अवशेष मात्र कोठें कोठें थोडे उरले आहेत, तर कोठें तेहि नाहींत, अशी स्थिति आढळते. सिंहगडाजवळील पानशेतचें धरण फुटून पुण्यांत नुकताच महापुरानें जो प्रलय केला, त्यांत पेशवाईतील थोरामोठ्यांचे भले चौसोपी वाडेहि वाहून गेले. पण नदीच्या तटाशीं भिडून असणाऱ्या मंदिरां-पैकीं ओंकारेश्वर, अमृतेश्वर, वृद्धेश्वर, सिद्धेश्वर आदि बहुतेक जुनीं मंदिरें निभावलीं. हौसेला मोल नाहीं असें म्हणतात. म्हणजे आपली हौस पुरी करण्यासाठीं मनुष्य आपल्या सर्व बहुमोल शक्ति अक्षरशः पाण्यासारख्या खर्च करण्यास हंसतमुखानें सिद्ध होत असतो. भक्ति ही तर श्रेष्ठ प्रकारची, दिव्य कोटींतील सात्त्विक हौसच असते. आपल्या लक्षावधि मंदिरांतील शेंकडों मंदिरें अशीं आहेत कीं, ज्यांतील एकेकाच्या उभारणीस, अशा हौसेंतूनच त्या काळांत कोट्यवधि रुपये लागलेले आहेत. आठशें वर्षांपूर्वीं बांधलेल्या दिलवाऱ्याच्या आदीश्वर मंदिरास विमलशहानें १ कोटी, ८५ लक्ष रुपये खर्च केले, तर 'नेमिनाथ भगवान' या मंदिरावर कळस चढवीपर्यंत वीरधवल राजाच्या मंत्र्याला १ कोटी २३ लक्ष रुपयांचा कोष रिता करावा लागला ! अर्थात् राजे व धनाढ्य व्यापारी ह्यांच्याप्रमाणेंच इतर नागरिकांनीं बांधलेलीं मंदिरें हीं पण त्यांच्या त्यांच्या परिस्थितीचा विचार करतां बराच पैसा खर्च करून उभार-लेलीं आहेत. या दृष्टीनें हिंदुस्थानांतील मंदिरसंस्थेवर भक्तिभावनेंतून व दान-शूरत्वांतून जो धनवर्षाव करण्यांत आला आहे त्याचें संकलित मूल्यमापन करावयाचें तर अब्ज-खर्व-निखर्व अशा कोणत्या तरी श्रेणीचा आश्रय घ्यावा लागेल ! अर्थात् हा विचार येथें प्रारंभीं मांडण्याचा हेतु इतकाच कीं, आपल्या पूर्वजांनीं भक्तिभावनेंतून अत्यंत परिश्रमपूर्वक निर्माण केलेल्या

लक्षावधि संस्कार-केंद्रांची नेमकी आज कोणती अवस्था आहे हें पाहाण्याकडे आपलें लक्ष वेधावें. तसेंच आजवर मंदिरांचा समाजावर कसा संस्कार होत गेला व त्या दृष्टीनें त्यांची आजची स्थिति व त्यांच्याकडे पाहाण्याचा समाजाचा दृष्टिकोन यांत कांहीं विकृति वा न्यूनता निर्माण झाली आहे काय हें हेरावें, हाहि यामागील एक हेतु आहे. अशा मंदिरांच्या परीक्षणांतून ह्या संस्थेंतील टिकाऊ चांगुलपणा कोणता व टाकाऊ ओंगळपणा कोणता हें ध्यानीं येईल व त्यामुळें संस्कारक्षमतेच्या दृष्टीनें मंदिरांचा सुयोग्य कायापालट करण्याची प्रेरणा वाचकांच्या मनांत उदित होईल, या विश्वासानें हा प्रयत्न करीत आहें.

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 36309 दि: [illegible]
क्रमांक 9264 नों दि: 20/12/68

## प्रकरण २

# मंदिरांची कुलकथा

हिंदुस्थानांत देवालयें केव्हांपासून प्रचलित आहेत याचा नेमका काळ सांगणें कठीण आहे. एक तर आपल्या देशाची परंपरा अति प्राचीन व एकूण इतिहासाचीं साधनें अत्यल्प, त्यामुळें देवालयांच्या उदयासंबंधीं अनुमानानेंच निर्णय घेणें अपरिहार्य झालेलें आहे. ऋग्वेदांत "माझा हा इंद्र दहा गाई देऊन कोण विकत घेईल ?" असा उल्लेख आहे. त्यावरून दहा गाईंना विकत मिळणारा इंद्र म्हणजे ती त्याची मूर्तीच असावी, असा विद्वानांचा तर्क आहे. ऋग्वेदांत वर्णन केलेलें आपल्या पूर्वजांचें उन्नत, प्रगत व समृद्ध जीवन विचारांत घेतां त्यांना मूर्तिकला अवगत असणें मुळींच असंभवनीय नाहीं. पण अशा मूर्ति प्रचलित असल्या तरी इंद्र, अग्नि व सूर्य यांची उपासना ही प्रामुख्यानें यज्ञयागांच्या मार्गानेंच होत असे. मात्र इंद्र ही आराध्य-देवता मानणाऱ्या एखाद्या कलावंताला इंद्राची प्रतिमा निर्माण करण्याची कल्पना सुचणें स्वाभाविकच म्हणावें लागेल. जगद्गुरु श्री शंकराचार्य श्री योगेश्वरानंदतीर्थ ह्यांनीं आपल्या 'मंत्रशास्त्र' ह्या ग्रंथांत "प्रतीकें, प्रतिमा व मूर्ति यांची पूजा वेदकालापासूनच चालू आहे" असें अभिमत दिलें आहे. डॉ. विजनकुमार मुखर्जी, एम्. ए., एल्‌एल्. डी. हे आपल्या 'दि हिंदु लॉ ऑफ् रिलिजस

अँड चॅरिटेबल ट्रस्ट' या ग्रंथांत, वेदकाळांत निरनिराळ्या देवता मानल्या जात पण त्यांची पूजा केवळ हवनांतून केली जाई, असें सांगून, सूत्रकाळांत देवळें होतीं, असें साधार सांगतात. अद्‌भुत ब्राह्मणांत 'देवा यतन' व 'देव-प्रतिमा' हे आढळणारे शब्द व गौतम ब्रह्मसूत्रांत देवळांचा पापनाशक म्हणून अनेकदां आलेला उल्लेख त्यांनीं आधारासाठीं दिला आहे. तसेंच त्याच सूत्रांत देवळाला उजवीकडे ठेवून जावें असाहि नियम असल्याचें त्यांनीं ग्रथित केलें आहे.

महाभारतकाळांत घरांत देवघर निर्माण झालें नव्हतें, पण सार्वजनिक मंदिरें प्रचलित होतीं. भारताचार्य चिंतामणराव वैद्य 'श्रीमहाभारत उपसंहार' ह्या ग्रंथांत म्हणतात कीं, "... भारतीय युद्धकाळीं, किंबहुना, महाभारत-काळापर्यंत आर्यांच्या आह्निक धर्मांत कोणत्याहि प्रकारचें देवतांचें पूजन समाविष्ट झालेलें नव्हतें. कोणत्याहि गृहांत देव ठेवून त्यांच्या पूजनाचा विधि सुरू झाला नव्हता-" तरी "...लोकांचीं सार्वजनिक मंदिरें असून त्यांत प्रतिमांची पूजा होत असे ही गोष्ट निर्विवाद आहे. ह्या मूर्ति बौद्धांपासून घेतल्या असें म्हणणें संभवनीय नाहीं. अर्थात् हिंदुधर्मांत महाभारतकाळीं मूर्ति प्रचलित असून त्या शिव, विष्णु आणि स्कंद इत्यादि देवांच्या भक्तीपासूनच सुरू झाल्या होत्या." ...... "त्याचप्रमाणें ह्या देवतांच्या मूर्ति महाभारतपूर्वकाळापासून प्रचलित असाव्या ही गोष्ट पाणिनीच्या सूत्रावरूनहि निश्चयानें दिसते."

वैदिक आर्यांची यज्ञमय उपासना असतांना महाभारतकाळांत त्या समाजांत अशा मूर्तिपूजेचा शिरकाव कसा झाला, असा प्रश्न पडणें शक्य आहे. त्या-संबंधीं कांहींचा तर्क असा आहे कीं, भारतीय युद्धाच्या वेळीं बाहेरील देशांतून अनेक सैनिक आले व त्यांतील जे बचावले ते परत न जातां येथेंच राहिले. ह्या नवागतांना आपल्या समाजरचनेंत सामावून घेण्यासाठीं, त्या लोकांत पूर्वींच रूढ असलेली पद्धति चालू ठेवण्यांत आली. हा तर्क खरा असला तरी वैदिक हिंदूंतहि स्वतंत्रपणानेंच मूर्तिपूजा रूढ होऊं लागली होती व ह्या नवागतांमुळें तिला अधिक उत्तेजन वा चालना मिळाली असेंच म्हणणें युक्त दिसेल.

वैदिक धर्मीयांनीं मंदिरांचा स्वीकार बौद्ध-धर्मांतील महायान पंथाकडून केला ही प्रचलित कल्पना कशी चुकीची आहे हें भारताचार्य वैद्य यांनीं स्पष्ट

केलेंच आहे. त्याव्यतिरिक्त ह्या कल्पनेचा फोलपणा सिद्ध करणाऱ्या एक-दोन गोष्टींचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. मत्स्य पुराणांत मंदिरांच्या द्वारांवर व तोरणांवर गंधर्व व मंदिरांवर अप्सरा, सिद्ध व यक्ष यांच्या मूर्ति असाव्यात, असें दिलेलें आहे. पण बौद्ध संप्रदायांत 'अप्सरा' ही कल्पना प्रचलित नसूनहि बुद्धगया, मथुरा, नागार्जुन कोंडा व अन्य कांहीं ठिकाणीं तेथील स्तूपांवर प्रेमी गंधर्व व अप्सरांच्या मूर्ति आहेत! अर्थात् हें वैदिक हिंदूंचें त्यांनीं केलेलें अनुकरण आहे; हें सांगावयास नकोच. –( जयस्वाल : अन्धकारयुगीन भारत, पृ. ९४ ते ९६ )

भगवान् बुद्धदेव हे स्वत; स्वतःची पूजा करून घेण्याच्या व एकूण मूर्ति-पूजेच्या विरुद्ध होते. अर्थात् एखादी गोष्ट प्रचलित असल्यावांचून तिला विरोध करणें संभवत नाहीं. हा बुद्धदेवांचा विरोध त्यांच्या अनुयायांनीं ध्यानीं घेऊन अमरावती, बरहुत येथील शिल्पांत बुद्धचरित्रांतील प्रसंग चित्रित करतांना बुद्धाच्या जागीं स्वस्तिक, कमल किंवा चरण काढलेला आढळतो. मागील पिढीपर्यंत पतीचें नांव घेऊन उल्लेख करणें हें आपल्याकडे शिष्टसंमत नव्हतें. त्या वेळीं– 'हे' बाहेर गेले आहेत – अशा सूचकतेनें उल्लेख केला जाई. एका गृहस्थाचा मराठीचें ज्ञान असल्याची फुशारकी मारणारा इंग्रज मित्र एकदां त्याच्याकडे येऊन त्याच्या पत्नीला विचारूं लागला कीं, "पतिराज कोठें आहेत?" तेव्हां "ते बाहेर गेले आहेत" हा आशय व्यक्त करण्या-साठीं तिनें सांगितलें कीं, 'खुंटीवर पागोटें दिसत नाहीं!' याच धर्तीची सूचकता स्वस्तिक, कमल व चरण अशा प्रतीकांतून बौद्ध कलावंतांनीं व्यक्तविली होती. मानवी प्रवृत्यनुसार व त्या वेळच्या भारतीय पद्धतीप्रमाणें भगवान् बुद्धांचें चरित्र दगडांत कोरण्याची हौस तर त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती व मूर्तीला बुद्धाचा असणारा विरोध हाहि दुर्लक्ष करण्यासारखा नव्हता. अशा शृंगापत्तींतून वरील सूचक प्रतीकें शुंगकाळांत त्यांनीं स्वीकारलीं. पण वैदिक व जैन यांच्या शंकर, विष्णु, देवी, गणपति, कृष्ण, ऋषभ, पार्श्वनाथ, महावीर यांच्या लोकप्रिय प्रतिमा पाहून बौद्धांना आपल्या भगवान् बुद्धाची प्रतिमा नाहीं याची सारखी रुखरुख वाटे. आंग्ल मडमा नवऱ्याचें मोकळेपणानें नांव घेतात हें पाहून पाहून ज्याप्रमाणें आपल्याकडील नवशिक्षिता, संकोच सोडून नवऱ्याला एकेरी नांवानें हांका मारूं लागल्या, त्याचप्रमाणें जिकडे तिकडे

कृष्णोपासना व भक्ति यांची लाट उसळल्यावर बौद्धांनीं जुने संकेत मोडून, उघड उघड बुद्धाच्या प्रचंड मूर्ति घडविल्या व मंदिरें उभारलीं !

अर्थात् कांहीं काळ एका तऱ्हेनें दाबली गेलेली हौस पूर्ण करून घेतांना त्यांत थोडा अधाशीपणा येतो व हौसेंतहि इतरांशीं चढाओढ असेल तर मग त्या अधाशीपणाचें स्वरूप विचारूंच नका ! अशीच स्थिति बौद्धांतील महायान पंथी सुधारकांची झाली. त्यांनीं पुराणांच्या धर्तीवर, भगवान् बुद्धाच्या पूर्व-जन्मांवर आधारलेल्या सुरस कथा लिहिल्या व त्यांवरून विविध देवतांच्या मूर्ति निर्माण केल्या. बुद्धाच्या मूर्तिहि प्रचलित झाल्या. ह्या नव्या उत्साहांत बांधलेल्या मंदिरांना मागें टाकण्याची ईर्षा वैदिक व जैन यांना होणें स्वाभाविक होतें व त्याचा परिणाम म्हणजे हिंदुस्थानांत मंदिरसंस्थेचा कल्पनेबाहेर विस्तार झाला. ठिकठिकाणीं ह्या तिघांच्या चढाओढीची साक्ष देणारीं मंदिरें शेजारीं शेजारीं उभीं असलेलीं आजहि दाखवितां येतील. मराठवाड्यांतील देवगिरी-जवळील वेरूळ येथें ह्या तिघांचींहि लेणीं एकाच डोंगरांत ओळीनें कोरलेलीं आहेत नि त्या चढाओढींत वैदिक संप्रदायी वरचढ ठरल्याची ग्वाही तेथील जगद्विख्यात ‘ कैलास ’ लेण्यानें घोषित केली आहे ! चढाओढींत ज़्याला राज-सत्तेचें पाठबळ मिळे तो संप्रदाय इतरांचीं मंदिरें क्वचित् प्रसंगीं उध्वस्त करीत असे. पण सर्वसामान्यपणें इतरांच्या चित्रांवर शाई फेकून आपलें चित्र सर्वोत्तम ठरविण्यापेक्षां, इतरांहून सर्व दृष्टींनीं रेखीव, आकर्षक, नावीन्यपूर्ण व भव्य चित्र रेखाटण्याची सात्त्विक व उदात्त वृत्ति हीच वरील भारतीय संप्रदायांच्या चढाओढींत दिसून आली व त्यांत कांहीं ठिकाणीं वैदिक तर कांहीं ठिकाणीं जैन व बौद्ध हे अग्रगण्य ठरले.

हिंदुधर्मान्तर्गत विविध संप्रदायांच्या खऱ्या चढाओढींतून हिंदुस्थानांत मंदिरांचा प्रसार कसा झाला हें आपण पाहिलें. आतां मंदिरें उभारण्याची मूळ कल्पनाच माणसाला कशी सुचली असेल याकडे जरा बारकाईनें पाहाणें उद्बोधक ठरेल. आपल्या देशांत सर्व विद्यांत अग्रगण्य असणारी योगविद्या प्राचीन कालापासून प्रचलित आहे. मोहेंजोदारो येथील उत्खननांत योगारूढ शिवाची मूर्ति मिळाली, ही घटना योगविद्येचें प्राचीनत्व व्यक्त करणारी आहे. या योगशास्त्रांत प्रगति करतां करतां पुरुषार्थ ज्ञानासाठीं संयम व्यवस्थित साधूं लागला कीं, अतिशय दूरच्या वस्तूचें ज्ञान होणें, दिव्य असलेले शब्द ऐकूं

येणें, दिव्य स्पर्श कळणें, दिव्य रूप दृष्टीस पडणें, दिव्य रसाची गोडी चाखतां येणें आणि दिव्य गंध समजणें ह्या सिद्धि प्राप्त होतात. पातंजल–योग–दर्शनांत ३६ व्या सूत्रांत ह्या सिद्धींचा उल्लेख आहे. ( ततः प्रातिभश्रावणवेदनादर्शास्वादवार्ता जायन्ते ॥ ३६ ॥ ) ही सिद्धि प्राप्त झालेल्या योग्याला अनेक दिव्य रूपें दिसू लागतात. हीं रूपें पाहतांना त्या योग्याचें अंतरंग आनंदातिशयानें मोहरून जातें. हें घडणारें दर्शन डोळे उघडे असतांना व मिटले तरीहि होत राहतें व तें सूर्याच्या वा दिव्याच्या प्रकाशांत जसें होतें तसेंच काळ्या मिट्ट अंधारांतहि तें दर्शन घडत असतें. असें दिव्य दर्शन भगवान् श्रीकृष्णाच्या कृपेनें अर्जुनाला घडलें होतें. त्यासाठीं त्याला जी प्रातिभदर्शनाची दिव्यदृष्टि प्राप्त झाली होती तिचें इंगित सांगतांना श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात—

**आणि दीपें कां सूर्यें प्रगटे । अथवा निमुटलिया देखावेंचि खुंटे ।**
**तैसी दिठी नव्हे जे वैकुंठे । दिधली आहे ॥ २३४ ॥**

म्हणजे सूर्य वा दिवा ह्यांच्या असण्या–नसण्यावर अवलंबून नसलेली अशी ती दृष्टि होती. ह्या दिव्यदृष्टीचा अगदीं अलिकडील स्वानुभव इंग्रज वृत्तपत्रकार पॉल ब्रंटन यानें 'ए सर्च इन् सिक्रेट इंडिया' या ग्रंथांत पृष्ठ ९५–९६ वर साग्र दिलेला आहे. तो जिज्ञासूंनीं मुळांतून अवश्य पाहावा. त्या अनुभवांत एका अंधाऱ्या खोलींत, रात्रीच्या वेळीं त्यांच्यासमोर कुंभकोणम् पीठस्थ श्रीशंकराचार्यांची तेजःपुंज सगुण साकार मूर्ति अवचित अवतीर्ण झाली ! तेव्हां हा भ्रम तर नसेल, अशी शंका येऊन त्यानें आपले डोळे घट्ट मिटून घेतले; पण तरीहि ती तेजोमय मूर्ति तशीच दिसत राहिली. पॉल ब्रंटन म्हणतात, कीं, " I close my eyes tightly in an effort to test the matter. There is no difference and I still see him quite plainly. "

अशा योगारूढ अवस्थेंत दिसणाऱ्या प्रतिमा ह्या अलौकिक व कल्पनातीत आनन्ददायी असतात. त्यामुळें त्या स्थितींतून योगी देहभानावर आल्यानंतर त्याला त्या दिव्य प्रतिमांचा स्वाभाविकच वारंवार आठव होऊं लागतो. सुखाचा व आनंदाचा क्षण टिकाऊ करण्यासाठीं मनोहर देखाव्यांचीं व आनंदमय उत्सवांचीं छायाचित्रें व चलच्चित्रें काढून ठेवण्याची आपणाला

ओढ लागते. अर्थात् योग्यांना त्यांनीं पाहिलेल्या प्रतिमांसंबंधींचें आकर्षण अधिकच तीव्र असतें, हें सांगावयास नकोच. ह्या स्वाभाविक आकर्षणांतून त्या दिव्य प्रतिमा चित्ररूपानें रेखाटण्याची वा मूर्तिरूपानें साकार करण्याची त्या योग्यांना अनावर इच्छा झाली व त्यांतूनच परमेश्वराच्या मूर्तींचा श्रीगणेशा झाला.

आपल्याकडे समर्थ रामदासांच्या सुप्रसिद्ध अकरा मारुतींपैकीं कांहीं ठिकाणच्या मूर्ति ह्या त्यांनीं त्यांना झालेल्या मारुतीच्या साक्षात्काराप्रमाणें घडविल्या व घडवून घेतल्या हें सर्वविश्रुत आहे. तसेंच सांगली जिल्ह्यांतील वाटेगांवच्या वासुदेवाची हास्यवदन अप्रतिम मूर्ति हीदेखील एका योग्यानें स्वानुभूतींतून केलेली निर्मिति आहे. अस्तु.

ध्यानावस्थेंत प्रत्यक्ष पाहिलेल्या प्रतिमांचें जें स्वरूप योग्यांनीं वर्णन केलें, त्या हुबेहूब मूर्ति बनविण्याचा दंडक आपल्या समाजांतील भाविक शिल्पकारांनीं परंपरेनें चालविलेला आहे. त्यामुळें शरीरसौष्ठवाच्या दृष्टीनें ग्रीक व रोमन यांच्या मूर्तींशीं तुलना करतां भारतीय मूर्ति ह्या कमी प्रमाणबद्ध व ओबड-धोबड ठरतात. पण त्या मूर्तींचें स्वरूप हें शिल्पकाराच्या प्रतिभेवर विसंबून नसल्यानें त्या दोषांचें खापर त्याच्या माथीं फोडतां येणार नाहीं. हें जसें खरें, त्याचप्रमाणें वरील गोष्टींना मुळांत 'दोष' मानावें कीं नाहीं हाहि प्रश्नच आहे. प्रा. सुरेन्द्रनाथ दासगुप्ता हे आपल्या 'फण्डॅमेन्टल्स ऑफ इंडियन् आर्ट' या ग्रंथांत (पृष्ठ ३० वर) म्हणतात कीं, "....एका विशिष्ट देवतेचा साक्षात्कार घडावा म्हणून ध्यान करणाऱ्या अधिकारी पुरुषांना त्या देवतेचें दर्शन व साक्षात्कार एकाच स्वरूपांत घडतो अशी धारणा असे. त्यामुळें निरनिराळ्या देवतांचे आकार व रंगरूप यासंबंधींचे विविध योग्यांचे अनुभव हे एकमेकांशीं तंतोतंत जुळणारे असतात, हें तत्त्व निरपवाद मान्य झालें होतें. त्यामुळें कलाकाराला आपल्या स्वतंत्र प्रतिभेनुसार कलाविष्कार करण्यास अवसर नव्हता. निरनिराळ्या देवदेवता यांच्यासंबंधीं परंपरेनें चालत आलेल्या कल्पना त्याला अनुसराव्या लागत."

अशा कांहीं देवता ह्या प्रथम ध्यानांतून दिसल्या व मग त्यांच्या मूर्ति घडविण्यांत आल्या. त्या मूर्तिहि पुन्हां साधकांना ध्यानाची पूर्वसिद्धता करण्यास उपयुक्त ठरूं लागल्या. प्रारंभीं एखाद्या थोर साक्षात्कारी पुरुषानें आपल्या

समाधानासाठीं ध्यानावस्थेंत पाहिलेली देवता मूर्तिरूपांत उभी केली व त्याच्या कृपाछत्राखालीं असणारे साधक त्या मूर्तीपुढें बसून मन एकाग्र करण्यासाठीं भक्तियुक्त अंतःकरणानें साधना करूं लागले. कांहीं दिवसांच्या परिपाठानंतर त्या सर्वांना असा अनुभव येऊं लागला कीं, अन्य ठिकाणीं चंचल असणारें मन त्या मूर्ति असणाऱ्या पवित्र स्थानीं चटकन् एकाग्र व स्थिर होतें. हा आलेला अनुभव म्हणजेच मंदिर-संस्थेची मुहूर्तमेढ होय. स्वामी विवेकानंद म्हणतात कीं, " ...आपल्या आयुष्यांतील प्रत्येक दिवशीं आपण सुविचार अथवा दुर्विचार यांचे तरंग बाहेर टाकीत असतों. आपण जेथें जेथें म्हणून संचार करतों, तेथें तेथें अशा प्रकारचे तरंग भरून राहिलेले असतात. आपल्या भोंवतालचें सर्व वातावरण अशा प्रकारच्या तरंगांनीं भरून गेलें आहे. अशाच रीतीनें देवळें अथवा प्रार्थनेच्या विशेष जागा बांधण्याची कल्पना मानवी मनांत उत्पन्न झाली. वास्तविक विचार केला तर परमेश्वर सर्वत्र आहे असें म्हणत असतांना आपणाला देवळाची आवश्यकता कां वाटावी ? त्याचें पूजन कोठेंहि केलें म्हणून काय बिघडलें ? पण देवळें बांधण्याची कल्पना मनुष्याच्या नकळत त्याच्या मनांत उत्पन्न झाली.... जेथें अनेक माणसें ईश्वरासंबंधींच्या आपल्या सद्भावना व्यक्त करतात ती जागा शुभ तन्मात्रांनीं भरून गेलेली असते, असा अनुभव मनुष्यास आल्यानंतर तेथें कांहीं विशेष प्रकारची इमारत बांधावी, ती जागा इतर जागांहून निराळी करावी, अशी कल्पना त्याच्या मनांत सहज उत्पन्न झाली. "

प्रारंभीं कांहीं मंदिरें हीं अशीं सहज रीतीनें उत्पन्न झालीं असलीं तरी पुढें आणखी अनेक कारणांनीं मंदिरें उभारण्याचें सत्र सर्वत्र चालू झालें. दानशूर म्हणून मान्यता पावण्याची अभिलाषा, चढाओढ, विजयाचें स्मारक करण्याची लालसा, पापविमोचनाची इच्छा आदि अनेक गोष्टी मंदिरांच्या निर्मितीस प्रेरक ठरलेल्या आहेत. त्या सर्व गोष्टींचा पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत विचार करावयाचा असल्यानें, त्यांचा येथें नुसता निर्देश करून ठेविला आहे.

सबंध भारतवर्षांत ह्या मंदिरांच्या रूपानें भारतीय शिल्पकला शिखरास चढली. त्यांत वास्तुशिल्प व मूर्तिशिल्प या दोहोंचाहि विकास प्रत्ययास आला. ह्युएन्संगानें काशीच्या मंदिरांत महादेवाची सुमारें १०० फूट उंचीची तांब्याची मूर्ति पाहिल्याचें ग्रथित केलें आहे. ही गोष्ट धातुशिल्पांतील प्रगति

दाखविण्यास पुरेशी आहे. मंदिरांमुळेंच अगस्त्य, कश्यप, मय, अग्निजित् आदि शिल्पज्ञ उदयास येऊन त्यांनीं ग्रंथरचना केली व त्यांतून अनेक शिल्प-परंपरा निर्माण झाल्या. निरनिराळ्या शिल्पांच्या घाटणीचें वंशपरंपरेनें अनुकरण करणाऱ्या कुशल कारागिरांच्या कम्मालर, स्थपति, रथकारिक या नांवाच्या स्वतंत्र जातीच दक्षिणेंत बनल्या ही गोष्ट शिल्पकलेच्या उपासनेंतील सातत्याची निदर्शक होय.

भव्यता, स्थैर्य, प्रमाणबद्धता, सौंदर्य व बळकटी हे भारतीय शिल्पकलेचे आधारस्तंभ होत. हीं वैशिष्ट्यें इतरांना आश्चर्यानें मुग्ध करण्याच्या तोलाचीं आहेत याची साक्ष काळानें दिली आहे. त्या शिल्पांत दिखाऊपणापेक्षां टिकाऊ-पणावर भर आहे. परिश्रमांची व चिकाटीची परिसीमा आहे. अज्ञात राहून पिढ्यान् पिढ्या दगडांना दिव्यत्व आणून देणाऱ्या भारतीय शिल्पकारांची अमोल तपश्चर्या व भारतीयांची भाविकता त्या रूपानें प्रकट झालेली दिसेल. पर्सी ब्राउन् भारतीय शिल्पाविषयीं म्हणतो कीं, "आध्यात्मिकता हें भारतीय शिल्पकलेचें वैशिष्ट्य होय. लोकांची प्रचलित धर्मभावना मूर्त रूपांत व्यक्त करणें हाच मुळीं त्यांच्या शिल्पकलेचा मूलोद्देश. खडक, विटा व दगड यांच्या माध्यमांतून त्यांचें मनच जणूं साकार झालेलें आहे." भारतीय शिल्पांत उच्च सौंदर्याची दृष्टि आहे. वेलपत्ती, हत्ती, सिंह, घोडे, नाग, फुलें, फळें आणि पक्षी यांनीं सजलेलें ऐश्वर्यपूर्ण अलंकरण त्यावर आढळेल. नासिकच्या पंचवटींतील काळाराम मंदिरांत दूर असणाऱ्या महाद्वारांतून वा सभामंडपांतील कोणत्याहि स्तंभाजवळून मूर्तीचें व्यवस्थित दर्शन घडूं शकतें, ही त्या वास्तूची विशेषता आहे. महाद्वार व प्रत्यक्ष गाभारा यांमध्यें लहान मंदिरें, सभागृह, स्तंभ, पायऱ्या इत्यादि असणारी रचना दर्शनाच्या आड येऊं शकत नाहीं, अशा कौशल्यानें केलेली आहे. वर्षाच्या ठराविक दिवशीं मूर्तीवर उगवत्या व मावळत्या सूर्याचे सोनेरी किरण अचूक पडतील, अशी दिशा साधण्याची असामान्य हातोटी भारतीय शिल्पकारांनीं ठिकठिकाणीं प्रकट केलेली आहे. प्रत्येक दगड आरशासारखा, प्रतिबिंब उमटण्याइतका गुळगुळीत व घोटीव बनविण्यांतील त्यांची चिकाटी असामान्य गणली जाते. पांडवांच्या अलौकिक सामर्थ्याची आठवण करून देणारी भव्यता भारतीय शिल्पाला लाभली आहे. श्रीशैलावरील मल्लिकार्जुन मंदिराला असणारें बारा

फूट लांबीचें, तीन फूट रुंदीचें व अडीच फूट उंचीचें एकसंध दगडी व्हालें पाहिल्यावर भीमसेन कां न आठवावा ? काश्मीरमधील पट्टन, मार्तंड आदि ठिकाणच्या प्राचीन भग्न मंदिरांतील दगडी तुळया याहूनहि अवजड व मोठ्या आढळतात. ज्या पाथरवाटांनी अशोकाच्या स्तंभांसाठीं ५० टन म्हणजे १४०० मण वजनाचे एकसंध दगड खाणींतून काढून शेंकडों मैलांवर नेऊन उभारले त्याच पाथरवटांच्या छिन्यांनीं भारतीय शिल्पाला भव्यता दिली. वेरूळच्या डोंगरांतील काळाकभिन्न फत्तर फोडून त्यांतून ९६ फूट उंचीचें अत्यंत भव्य व सुंदर असें अखंड मंदिर कोरून काढणाऱ्या भाग्यवंत कलाकारांचा त्या शिल्पाला वरदहस्त लाभला आहे. वेरूळच्या लेण्याची भव्योदात्त व अतुल कला पाहून एका दानपत्रांत म्हटलें आहे की, " हें लेणें निर्माण झाल्यावर देव विमानांतून त्याच्याकडे पाहून थक्क झाले आणि आपसांत म्हणूं लागले कीं, हें लेणें मूळपासून स्वयंभूच असलें पाहिजे. असली कामगिरी मानवाची नव्हे !" स्वतः वास्तुकारहि आपल्या अतुल कृतीनें भेदरून गेला व म्हणाला कीं, " छे ! असली कृति पुन्हां माझ्या हातून वठणें अशक्य आहे !" सुप्रसिद्ध रामेश्वराच्या मंदिराचा सभामंडप एवढा अवाढव्य आहे कीं त्यांत एकाच वेळीं १०।१० सहस्र लोकांच्या चार-पांच सभा सहज होऊं शकतील ! त्या मंडपाची लांबी शेकडों फूट असून त्याचे असंख्य अलंकृत स्तंभ १२ फूट उंचीचे आढळतात. मदुरेच्या एका मंदिराच्या सभामंडपांत ९८५ स्तंभ आहेत. हें ऐकल्यावर कोणीहि स्तंभित झाला तर नवल नाहीं. त्या स्तंभांवरील कलाकुसर पाहून प्रा. गंगाधर गाडगीळ लिहितात कीं, " एकेका खांबांत इतकें अद्‌भुत सौंदर्य असूं शकतें ह्याची मला तोंपर्यंत कल्पनाच नव्हती. किती विविध प्रकारचे खांब होते तेथें ! आणि एकेक खांब म्हणजे एकेक काव्य होतें !... शब्द वांकवतांना आमची किती त्रेधा उडते. मग ह्यांनीं पाषाणाला कसें वाकविलें असेल ? कल्पना त्यांत कशा उमटविल्या असतील ?" इंग्रज लेखक आल्डस् हक्स्ले ह्यानें मदुरा, तिरुपति, कुंभकोणम् या भागांतील भव्य देवालयें पाहून त्यांच्यापुढें, जगांत एक महदाश्चर्य म्हणून गाजलेला ताजमहाल हा कलेच्या दृष्टीनें सवंग असल्याचें अभिमत दिलें आहे. एवढेंच नव्हे तर ताजमहालचा बोलबोला कां झाला, ह्याची उकल करतांना तो म्हणतो कीं, " आपणांपैकीं बहुतेक जण इतके दरिद्री

असतात कीं इतक्या शुभ्र, इतक्या मौल्यवान् दगडांचा इतका मोठा ढीग एके ठिकाणीं पाहूनच डोळे फिरतात!" पालिताणा, गिरनार व देलवाडा येथील भव्य मंदिरांच्या कलापूर्ण शिल्पापुढें असंख्य कलावंत नतमस्तक होत आले आहेत नि होत राहतील.

मंदिरांप्रमाणेंच अनेक ठिकाणीं भव्य व सुंदर मूर्तीहि आहेत. मद्रास प्रांतांतील कारकळ येथील गोमटेश्वराची मूर्ति ५६॥ फूट उंच आहे, तर नालंदाचा बुद्धदेव ८० फूट उंचीचा! मुंबईजवळील घारापुरीच्या लेण्यांतील त्रिमुखी शिवाची मूर्ति २० फूट उंच असून म्हैसूरजवळील नंदी हा एवढा प्रचंड आहे कीं त्याच्याजवळ उभा राहिलेला मनुष्य हा त्याच्या गुडघ्याइतका दिसतो! कांचीजवळील मामल्लपुरम्च्या भगीरथाची मूर्ति ९८ फूट उंच व ४३ फूट रुंद आहे नि रूपवास येथील बलदेवाची मूर्ति, त्याच्या नांवाला साजेशी २७ फुटांहून अधिक उंच आहे. वाईच्या 'ढोल्या गणपती'वर शिडी लावून दूर्वा-फुलें वहावीं लागतात, इतका तो भव्य आहे. असंख्य ठिकाणीं अशा मूर्ति आढळतील नि त्यांतून भारतीय शिल्पकलेची झेप ध्यानीं येईल. निमुळतें होत आकाशांत शिरणारें शिखर हें मंदिराचें एक वैशिष्ट्य असतें. खजुराहोचा कंदर्य महादेव व तंजावरचा राजराजेश्वर यांच्या मंदिरांचीं शिखरें अनुक्रमें ११६ व १९० फूट उंच असून तीं जणूं भारतीय शिल्पाची श्रेष्ठता व्यक्त करीत आहेत. शिखरांवरील मूर्ति व अलंकरण यांचें ऐश्वर्य पाहून विल ड्यूरंट लिहितो, "The Hindu covered his building with such exuberant statuary that one hesitates whether to class them as building or as sculpture." "हिंदु मनुष्य हा आपली वास्तु विपुल मूर्ति व पुतळे यांनीं अशी नटवतो कीं, त्यास वास्तु म्हणावें कीं मूर्तिशिल्पांत गणावें असा पेंच मनाला पडतो."

हें आज काल दिसणारें भव्य शिल्प हें केवळ अवशेषरूप आहे, असेंच म्हणणें युक्त दिसेल. कारण कांहीं मंदिरें काळाच्या ओघांत स्वाभाविकपणें पडून गेलीं व असंख्य मोठीं मंदिरें हीं मुसलमानांच्या वर्चस्वाच्या काळांत पाडलीं गेलीं किंवा मशिदींत रूपांतरित करण्यांत आलीं. दक्षिण भारतांतील मंदिरांचा थाट हा विजयनगरचें साम्राज्य व महाराष्ट्रांत उदित झालेली हिंदुपदपातशाही ह्यांच्या पुण्याईचें फळ आहे. राजसत्तेचा असा खंबीर आधार

नसल्यानें उत्तरेंतील शिल्पाचा सर्व दृष्टीनें विनाश झाला. आपल्या मत्स्य पुराणांत मंदिरें कशीं बांधावींत ह्यांचें जें सविस्तर वर्णन दिलेलें आहे, तें पाहिलें म्हणजे, एके काळीं आपल्या समाजानें केवढीं टोलेजंग मंदिरें उभारलीं असतील, ह्याची अटकळ बाधतां येते. त्यांत मंदिरांचे भव्यतेनुसार अनेक प्रकार दिलेले आहेत. त्यांत 'मंदरप्रसाद' ह्या प्रकारचें देवालय बारा मजल्यांचें, 'कैलास' नऊ मजल्यांचें व 'विमानच्छंदक' आठ मजल्यांचें असतें असें दिलेलें आहे. त्याचप्रमाणें अनेक दारें व शिखरें असणारीं, अनेक कोन साधलेलीं, सिंह–गज–कुंभ अशा भिन्न भिन्न आकारांचीं, असे मंदिरांचे अनेक प्रकार त्यांत वर्णिलेले आहेत. मंदिराचे खांब चौकोनी, अष्टकोनी, सोळा व बत्तीस कोनी करण्याची पद्धति दिलेली असून सत्तावीस प्रकारचे सभामंडप दिलेले आहेत. त्यांत विशेष म्हणजे बारा खांबांहून कमी संख्येचा सभामंडप आढळत नाहीं.

सभामंडपांतहि त्रिकोण, वर्तुळ, अष्टकोन, षोडशकोन असे विविध आकार साधण्याची हौस दिसून येते. गाभारेदेखील चार हात लांबी-रुंदीपासून तों पन्नास हात लांबी-रुंदीपर्यंत वर्णिलेले असून त्यांना मेरुप्रासाद, मंदर, कैलास, विमानक, नंदिवर्धन, सर्वतोभद्र अशीं नांवें दिलेलीं आहेत. एवढेंच नव्हे तर त्यांत मंद्रिरांतील मखर, सिंहासन, ध्वज व मूर्ति आदि गोष्टी कशा असाव्यात ह्यासंबंधींहि अगदीं बारकाईनें मार्गदर्शन केलेलें आढळतें.

हें मत्स्यपुराणांतील वास्तुशास्त्र केवळ 'काल्पनिक' ठरवून सोडून देतां येणार नाहीं. कारण मजले, खांब, सिंहासनें, सभामंडप ह्यांवरून मंदिरांचें वर्गीकरण करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यावांचून उगीच कल्पनेनें अशीं कोणीं वर्णनें केलीं असतील; हें संभवनीय नाहीं. वरील मंदिरांचे प्रकार वाचतांना डोळ्यांसमोर मंदिरांची जी भव्यता उभी राहते, तशी भव्यता आज दक्षिणेकडील अनेक मंदिरांना लाभलेली आहे. ही गोष्टहि मत्स्यपुराणांतील वास्तुशास्त्र वास्तवतेवर आधारलेलें होतें, याची साक्ष पटविण्यास पुरेशी आहे. ह्यावरून मध्यंतरींच्या काळांत, विशेषतः उत्तर हिंदुस्थानांत आपल्या विलोभनीय, प्रचंड व कलापूर्ण मंदिरांचा झालेला विनाश किती दुःखपूर्ण आहे; याची वाचकांनींच कल्पना करावी. असें हें शिल्प ज्या देवतांवरील भक्तींतून

प्रकट झालें, त्या देवतांचाहि मंदिरांच्या कुलकथेंत थोडासा विचार करणें युक्त होईल.

ह्याच प्रकरणांत ध्यानावस्थेंत दिसलेल्या देवतांच्या मूर्ति कशा बनविण्यांत आल्या हें आपण पाहिलें. पण सर्वच देवता या पद्धतीनें साकार झालेल्या नाहींत. शिव, विष्णु, गणपति, दुर्गा, सूर्य अशा वैदिक वाङ्मयांतील देवता ह्यांचीं लक्षणें योग्याच्या अनुभवांतून निश्चित झालीं असावींत. तसेंच श्रीराम, श्रीकृष्ण, हनुमान, गरुड, दत्त, ह्यांच्यासंबंधींचा सार्वत्रिक पूज्यभाव विचारांत घेतां, त्यांच्या प्रतिमाहि प्रारंभीं अशा साक्षात्काराधिष्ठित असणें संभवनीय दिसतें. पण वरील मुख्य देवता सोडल्यास अन्य देवतांचा उगम हा निरनिराळ्या तऱ्हेनें झालेला असून सर्वसामान्य लोकांच्या कल्पनेंतूनच त्या आकारास आलेल्या आहेत. देशभर सर्वत्र दिसणाऱ्या मंदिरांतील देवतांचें वर्गीकरण सामान्यपणें दोन प्रकारांनीं करतां येईल. एक स्थानिक देवता व दुसऱ्या सार्वत्रिक देवता. कांहीं देवता या विशिष्ट ठिकाणींच दिसतात. त्यांचा सर्व देशांत प्रसार झालेला दिसत नाहीं. उलट शिव, विष्णु, गणपति, देवी, दत्त, राम, कृष्ण, मारुती आदि देवता ह्या खऱ्या अर्थानें 'देशमान्य' देवता, म्हणजेच सर्वत्र आढळणाऱ्या देवता म्हणून सांगाव्या लागतील. वरील देवतांपैकीं कांहींचा स्वीकार तिबेट, जावा, जपान, अशा दूरदूरच्या देशांनीं केलेला आहे. 'महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना' ह्या पुस्तकांत 'संस्कृत' देव आणि 'प्राकृत' देव असें वर्गीकरण केलेलें आहे. राम, कृष्ण, दत्त, विष्णु, गणपति हे संकृत देव तर विठोबा, खंडोबा, बहिरोबा, वेताळ, म्हसोबा, सटवाई, मावलाई, यमाई, भावेसरी आदि प्राकृत देव म्हणून दिलेले आहेत. अर्थात् यांतील कांहीं प्राकृत देव हे संस्कृत देवांचे अवतार असल्याचें मानलें जातें. ह्या वर्गीकरणांतील संस्कृत वा सार्वत्रिक देवांच्या कथा व पुराणें उपलब्ध आहेत. तर स्थानिक वा प्राकृत देवतांविषयींच्या लोककथा क्वचित् प्रचलित असल्या तरी त्यांचा प्रसार त्या देवतांच्या परिसरांतील मोजक्या भक्तांइतकाच अत्यंत मर्यादित असलेला आढळेल. संस्कृत देवतांच्या मूर्ति अधिक नीटस व रेखीव आणि म्हसोबा, विरोबा, पोटोबा आदि देव ओबड-धोबड आढळतात. विठोबा, खंडोबा, हे प्राकृतांत उल्लेखिलेले देव मात्र श्रीकृष्ण व शिव ह्यांचींच रूपें असल्यानें त्यांच्या मूर्ति वरील विधानाला

अपवाद म्हणून सांगाव्या लागतील. प्राकृत देवता अशा ओबडधोबड कां याचें विवेचन करतांना इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात कीं, "....पुरातन कालीं हे देव ज्या लोकांत अस्तित्वांत आले त्यांना ह्याहून जास्त कौशल्याची मूर्तिकला माहीत नव्हती, आणि माहीत असली तत्रापि स्वयंभू ओबडधोबड मूर्तीपुढें कृत्रिम सुंदर मूर्तींची किंमत त्यांना वाटत नव्हती."– (राजवाडे लेखसंग्रह, पृ. २२)

समाजांतील सुसंस्कृत व पुढारलेल्या वर्गांत प्रचलित असलेल्या देवदेवतांना अंगभोग व रंगभोग अर्पण केले जातात; तर प्राकृत देवतांसमोर बकरीं कोंबडा, रेडा यांचें बलिदान, गाऱ्हाणीं, कौल, देवदेवस्की असले प्रकार आढळतात. देवापुढें देशाभिमानाचा व अहंकाराचा बळी दिला पाहिजे असें उच्च तत्त्वज्ञान अंगीं मुरविणाऱ्या भक्तांपासून तों रुष्ट मऱ्याईला संतुष्ट करण्यासाठीं तिच्यापुढें कंदुरी करणाऱ्या भोळ्याभाबड्या माणसांपर्यंत सर्वांसाठीं, ज्याच्या त्याच्या भाविकतेचें चोज पुरविण्यासाठीं देवता आहेत. त्या देवतांत वडापिंपळावरचे ब्रह्मराक्षस आहेत. ज्यांनीं पतिसमवेत हंसत मुखानें देहार्पण केलें; त्या पतिव्रता सतींचीं स्थानें आहेत. शिवमंदिरांचें रक्षण करणाऱ्या शूरांचें स्मरण करून देणारे कांदळाचे दगडावरील देव व गांवाचे रक्षणार्थ धारातीर्थीं देह ठेवणाऱ्यांच्या स्मरणार्थ उभे असणारे 'वीर' आहेत. संन्याशांच्या नि संत–महंतांच्या समाध्या गांवोगांव आढळतील. ह्यासंबंधीं श्रीसमर्थ म्हणतात :

> **"देव यक्षिणी कात्यायेणी। चामुंडा जखिणी मानविणी।**
> **नाना शक्ति नाना स्थानीं। देशपरत्वें ॥ ७ ॥**
> **पुरुष नामें कित्येक। देव असती अनेक।**
> **भूतें देवतें नपुंषक। नामें बोलिजेती ॥ ८ ॥**
> **देव देवता देवतें भूतें ॥ पृथ्वीमध्यें असंख्यातें ॥**

अशीं हीं आपलीं 'असंख्य' दैवतें आहेत !

हिंदूंचीं सर्वसंग्राहक व्यापक व सहिष्णु सामाजिक दृष्टि हीच अशा असंख्य देवतांना सामावून बसलेली आहे. ख्रिश्चन व मुसलमान ह्यांच्याप्रमाणें,– इतरांना आत्मसात् करतांना त्यांच्या मूळच्या सर्व श्रद्धांचें समूळ

उच्चाटन करून, कधीं फसव्या लाडीगोडीनें तर कधीं दंडेलीनें आपल्या श्रद्धा त्यांच्या गळीं उतरविण्याचा वा लादण्याचा – अधर्म हिंदूंनीं केलेला नाहीं. उलट, श्रद्धेच्या व संस्कृतीच्या जो ज्या पायरीवर उभा असेल तेथून हाताशीं धरून, हलके हलके त्याला प्रगतीच्या सोपानावर चढवीत नेण्याचें धोरण त्यांनीं अंगीकारलें. त्यांत ह्या देशांत ठिकठिकाणीं विखुरलेल्या निरनिराळ्या स्तरांवरील मागासलेल्या गटांना जसें आत्मसात् करण्यांत आलें त्याचप्रमाणें देशाबाहेरुन वालुकामय ओसाड प्रदेशांतून उदरंभरणासाठीं आलेल्या टोळ्यांनाहि वाव देण्यांत आला. अशा टोळ्यांपैकीं बहुतेकांच्या प्रचलित देवता होत्या व त्या देवतांचा उगम मृत पितरांच्या पूजेंतून वा पंचमहाभूतांच्या व अन्य संकटांच्या भीतींतून झालेला होता. मानवी जीवनाचें स्वरूप, सुख-दुःखाची मीमांसा, संकटांमागील कारणें यांचें आकलन होण्यासारखी वा अशा गहन प्रश्नांची उकल करून घेण्याजोगी बुद्धीची प्रगत स्थिति नसल्यानें, ते लोक आपत्तींत गांगरून जात. अशा विभ्रमावस्थेंत, हीं संकटें ज्यांच्या अवकृपेंतून उत्पन्न झालीं, त्या अज्ञात देवतांच्या काल्पनिक मूर्ति मांडल्या गेल्या व त्या अतर्क्य शक्तींच्या तुष्टीसाठीं दारू–बकरें आदि अर्पण करण्याचे पूजाप्रकार रूढ झाले. हिंदूंच्या समाजरचनेंत अशा लोकांना सामावून घेतांना त्यांचीं हीं प्राकृत दैवतें व त्यांचे पूजाविधि हेहि ओघानेंच आंत शिरले.

पण इतकीं दैवतें व त्यांचे निरनिराळे भक्तसमुदाय उभे राहिल्यावर त्यांच्यामध्यें कोणती देवता श्रेष्ठ ह्याविषयीं कलह निर्माण न होते तरच नवल ! विष्णुभक्त व शिवभक्त हे वास्तविक वैदिक देवतांची पूजा करणारे असूनहि त्यांच्यामधून विस्तव जाणें अशक्य होऊन गेलें होतें. अर्थात् हें द्वैत सर्वसामान्य जनतेच्या अज्ञानावरच परिपुष्ट झालें होतें; हें सांगावयास नकोच. जेथें कल्पना हाच आधार, तेथें मतभेद व भांडणें ह्यांचा सुकाळ होणें क्रमप्राप्त असतें. पण सुदैवानें आपल्या समाजांत कल्पनाजालांत न गुरफटतां, ज्यांनीं मनालाहि मागें टाकून सर्व विश्वाला व्यापून उरलेल्या चैतन्याचा साक्षात्कार करून घेतला, असे ज्ञानी कर्मयोगी व भक्त परंपरेनें उदयाला आले. त्यामुळें बहुजन समाजाच्या कल्पनाधिष्ठित द्वैतभावनेला अखंडपणें आवर घालण्याचा व सर्वांना एका बळकट श्रद्धासूत्रांत गुंफून पुढें चालविण्याचा यशस्वी प्रयत्न भारतांत होत आला आहे. ह्या विश्वांतील अणुरेणूंत एकच एक चैतन्य भरलेलें आहे व

'रिता ठाव या राघवेवीण नाहीं' या चिरंतन सत्याचें स्मरण ज्या काळांत साधु–संतांनीं व अनुभवी विचारवंतांनीं करून दिलें नाहीं, असा कालखंड दाखवितां येणें शक्य नाहीं. एकाच पाण्याचे जसे असंख्य तुषार तशा ह्या असंख्य देवता आहेत व ह्यांतील कोणत्याहि देवतेला अंतःकरणपूर्वक नमस्कार केल्यास तो सरळ 'केशवं प्रति गच्छति' असा स्पष्ट निर्वाळा अतिशय पुरातन काळापासून आपल्या साक्षात्कारी पूर्वजांनीं दिला आहे. हरि-हर यांत भेद नाहीं. हा ठसा उमटविण्यासाठीं, विष्णुसहस्रनाम हें 'शिवालये पठेन्नित्यं तुलसीवनसंस्थितः।' असा आदेश जसा दिलेला आहे, त्याचप्रमाणें रामनाम घेतल्यामुळेंच शिवशंकरांना हालाहल विष पचवितां आलें, हेंहि त्यांनीं सांगून ठेवलें आहे. महाराष्ट्र व कर्नाटक या प्रांतांचें उपास्य दैवत असलेल्या पंढरीच्या पांडुरंगानें पवित्र शिवलिंग शिरोधार्य मानलें आहे. ही गोष्टच ह्या अद्वैताची साक्ष देण्यास पुरेशी आहे. कांहींच्या मतें शिव ही अनार्यांची देवता होती व त्यामुळें वैष्णवांशीं त्यांचा संघर्ष झाला. अर्थात् तें क्षणभर खरें असेल असें मानलें तरीहि तें वितुष्ट आतां अद्वैत सिद्धान्तानें पचविलें आहे. पंढरीच्या विठ्ठलाच्या सम चरणांना भक्तिभावनेनें हृदयाशीं कवटाळणारे वीरच रणांगणांत उतरल्यावर मुक्तकंठानें 'हर हर महादेव!' अशी गर्जना करीत उठतात ही वास्तवता आतां कोण नाकारील?

हिंदुस्थानांतील देवतापूजकांच्या प्रमुख परंपरा ध्यानीं घालून त्या सर्वांत सामंजस्य निर्माण करण्यासाठीं पंचायतन पूजनाची जी पद्धति आद्य श्रीशंकराचार्यांच्या वेळेपासून चालू झाली, तिनेंहि लोकांना अनेकत्वाकडून एकत्वाकडे वाटचाल करण्यास उद्युक्त केलें आहे; अर्थात् कोणत्याहि देवतेला नमस्कार केला तरी तो आपल्या आराध्यदेवतेला व खरा म्हणजे 'स्थिर चर व्यापुनि दशांगुलें उरलेल्या' परमेश्वराला पोहोंचतो ह्या सत्यत्त्वाचा प्रसार अजून बराच व्हावयास पाहिजे, हेंहि तितकेंच खरें.

सर्वसामान्य मनुष्य हा मनाच्या व कल्पनेच्या साम्राज्यांत वावरतो. ह्यासाठीं ह्या साम्राज्याच्या पलिकडे जाऊन परमामृतांत मुकुंदराजानें म्हटल्या-प्रमाणें 'एकछत्री राणीव योगियासी!' या कोटीचा अनुभव घेतलेल्या महा-पुरुषांची देवतांसंबंधीं कोणती धारणा आहे, हें पहाणें आवश्यक आहे. त्यांच्या मतें आपण वावरत असलेल्या भौतिक सृष्टीच्या पलिकडे आधिदैविकाचा थर

आहे. त्या थरांत कांहीं ज्योतिर्मय व ज्ञानमय शक्ति आहेत. तेच देव होत. त्या दिव्य शक्ति अतींद्रिय आधिदैविक व स्थूल विश्वाचें नियमन करतात. भक्तांच्या तपस्येमुळें देवांचें बळ वाढतें व देवांच्या कृपेमुळें भक्तांचें कल्याण होत असतें. अशा ह्या विविध विश्वचालक शक्तीच्या रूपानें एकच जगज्ज्योति व्यक्त झालेली आहे. समर्थ रामदास म्हणतात :

**जगज्जोतीच्या अनंत मूर्ती । देवदेवतांच्या ॥ १३ ॥**

**मूळींचे जाणीवेचा विचार । पुढें जाला विस्तार ।**
**जैसे उदकाचे तुषार । अनंत रेणु ॥ १९ ॥**

**तैसे देव देवता देवतें भूतें । मिथ्या म्हणों नये त्यांतें**
**आपलाल्या सामर्थ्यें । सृष्टीमध्यें फिरती ॥ २० ॥**

**सदा विचरती वायोस्वरूपें । स्वइच्छा पालटिती रूपें ।**

(दशक १०, स. ३)

अशा तऱ्हेनें हीं दैवतें म्हणजे एकाच जगच्चालक चैतन्याचे स्फुलिंग होत, यामुळेंच समर्थ स्पष्टपणें सांगतात कीं, ' देव देवता भूत देवतें । मुळींचें सामर्थ्य आहे तेथें । अधिकारें नाना दैवतें । भजत जावीं ॥ १३ ॥ ( दशक १९, स. ६ ) असा देवतांच्या सामर्थ्याचा त्यांच्याशीं मानवाच्या असणाऱ्या संबंधाचा विचार साधुसंतांनीं व ऋषिमुनींनीं अनुभवपूर्वक मांडला आहे. त्यामुळेंच समाजांत अनेक दैवतें असल्याचें भय त्यांना वाटत नाहीं. उलट, एकाच डोंगरमाथ्यावर जाण्यास जशा अनेक पायवाटा असाव्यात, त्याचप्रमाणें कोणत्याहि दैवतावरील भक्तींतून एकाच सच्चिदानंदाकडे जातां येतें असा ते निर्वाळा देतात. झेंडूच्या फुलांतील असंख्य मोहक पाकळ्या जशा तळांतील एकाच खोबऱ्याच्या वाटींतून निघालेल्या असतात त्याप्रमाणें भारतांत चोहींकडे दिसणाऱ्या सर्व देवता ह्या एकमेवाद्वितीय अशा परमात्म्यांतून उदित झालेल्या आहेत, अशी धारणा बहुतेक जाणत्या वर्गांत प्रसृत झालेली असून तीच धारणा दृढ करण्याकडे विचारवंतांच्या प्रतिपादनाचा रोख सदैव दिसतो. ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. अस्तु.

मंदिरें उभारण्याचा प्रारंभ भारतीय युद्धाच्या पूर्वी झालेला असून, बौद्ध-मताच्या चलतीच्या काळांत वैदिक संप्रदायी व जैन यांच्या मंदिरांवर बौद्धांकडून आघात झाले. पण त्या आघातांनीं दबून न जातां त्यांनीं आपलीं सार्वजनिक

मंदिरें रक्षण करण्यासाठीं व खंडित मंदिरें पुन्हां उभारण्यासाठीं अटीतटीचे प्रयत्न केले. ह्या संघर्षाच्या काळांत ज्यांनीं शिवमंदिरांचें प्राणपणानें रक्षण केलें त्यांच्या स्मरणार्थच महाराष्ट्रांत गांवोगांवीं 'कांदळाचे दगड' कोरले गेले असावेत. ह्या दगडांवर एका मजल्यांत शिवलिंग व स्त्रीपुरुष उपासक कोरलेले असतात व दुसऱ्या मजल्यांत भालाईत घोडेस्वार. ह्या कांदळांसंबंधीं इतिहासभूषण राजवाडे म्हणतात, "बौद्धांपासून लिंगपूजकांचें संरक्षण करणारे भालेवाले कंदरांवर कोरलेले आहेत. बहुशः बौद्धांचा पराजय व लिंगपूजकांचा जय सुचविलेला असावा. ज्या अर्थीं प्रत्येक खेड्यांत कंदर सांपडतात, त्या अर्थीं एका काळीं बौद्धांची व शैवांची मोठी दंगल महाराष्ट्रांत होऊन गेली असावी असा तर्क होतो." –( राजवाडे लेखसंग्रह, पृ. २३ ). ह्या संघर्षांतून मंदिरें व मूर्तिपूजा टिकून राहिली; एवढेंच नव्हे तर, ह्या प्रकरणाच्या प्रारंभीं वर्णन केल्याप्रमाणें क्रमशः भगवान् बुद्धाचीं प्रतीकें व पुढें प्रत्यक्ष प्रतिमा बौद्धांना स्वीकाराव्या लागल्या. मग कांहीं काळ त्या क्षेत्रांत दोघांची चढाओढ लागली व शेवटीं क्रमाक्रमानें बौद्धसंप्रदायी लोकांना वादसभांतून पराभूत होऊन वैदिक हिंदूंत समरसून जावें लागलें. अशा पराभवानंतर बौद्धांनीं बांधलेलीं मंदिरें स्वाभाविकपणेंच वैदिक देवदेवतांनीं मंडित झालीं व बौद्धांचे कोरीव लेण्यांतील स्तूप व मूर्ति दुर्लक्षिल्या गेल्या. ह्या विजयानंतर खिस्ताब्द ८५० पासून सामान्यपणें देवगिरीच्या यादवांपर्यंतचा काळ हा मंदिरांच्या दृष्टीनें उत्कर्षाचा काळ म्हणून सांगावा लागेल. ह्या काळांत मंदिरसंस्थेचा विस्तार होऊन तिला ऐश्वर्य प्राप्त झालें. देशांत समृद्धि होती, शांततेचा काळ होता. त्यामुळें वैयक्तिक पुण्यसंपादन व मोक्ष-साधना या गोष्टींकडे लोकांचें लक्ष अधिक वेधलें. दुर्दैवानें सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेकडे लक्ष पुरवणारे समाजनेते व प्रभावी तत्त्वज्ञ त्या काळांत न लाभल्यानें समाजाचें समष्टिजीवन हें दुर्लक्षित व म्हणून दुबळें राहिलें व त्याचा परिणाम म्हणजे खैबर खिंडींतून आलेल्या मुसलमानी आक्रमणाला परतवून लावण्याचें वा पचवून टाकण्याचें सामर्थ्य आपण प्रकट करूं शकलों नाहीं. त्या आक्रमकांचें मूर्तिपूजेशीं विळ्या–भोपळ्याचें नातें होतें व त्यामुळें जिकडे तिकडे न भूतो न भविष्यति असा मंदिरांचा विध्वंस केला गेला.

त्या आक्रमणाला आपण लगेच रोखूं शकलों नाहीं; पण इतर देशां-प्रमाणें स्वत्व सोडून आपण कधीं शरणागतीहि पतकरली नाहीं. आज नाहीं

उद्यां, आपणांला हें आक्रमण मोडून–झोडून काढावयाचें आहे; अशी जाणीव देशांत सदैव जागृत राहिली व त्यांतून राणाप्रताप, हक्क–बुक्क गुरु-गोविंदसिंग, छत्रसाल, छत्रपति शिवाजी, बाजीराव नि महादजी असे प्रतापी रथी–महारथी पुढें येऊन त्यांनीं हें आक्रमण खिळखिळें करीत आणलें. ह्या पुनरुत्थानाच्या कालखंडांत कांहीं खंडित मंदिरांचा जीर्णोद्धार झाला व कांहीं नवीं मंदिरें विजयोत्साहांत बांधिलीं गेलीं. पण इस्लामी आक्रमकांचा पुरता मोड होण्यापूर्वींच भौतिक विज्ञानांत व सामाजिक जीवनांत प्रगत झालेले पाश्चात्य आक्रमक देशांत शिरले ! त्या वेळींहि सर्व भारतीय समाजाला कौशल्यानें व आपल्या प्रभावानें समष्टिजीवनाची दीक्षा देणारा महान् तत्त्ववेत्ता व कर्मयोगी संघटक न लाभल्यानें त्या आक्रमणाचें भूत दीडशें–दोनशें वर्षें देशाच्या मानगुटीस बसलें !

ह्या नव्या आक्रमणाचें स्वरूप वरून उजळ व अंतर्यामीं काजळ असल्या-प्रमाणें मायावी होतें. त्यांनीं पहिल्या आक्रमकांप्रमाणें मंदिरांचा प्रत्यक्ष विध्वंस विशेष केला नाहीं. उलट प्रजेच्या धार्मिक क्षेत्रांत ढवळाढवळ न करण्याचें प्रकटपणें व्रत घेऊन आपलें वेगळेंपण व सोवळेपण दाखविण्याचा यत्न केला. पण त्यांनीं सहस्रावधि ख्रिस्ती धर्मोपदेशकांना देशभर थैमान घालण्यास पूर्ण मोकळीक देऊन मूर्तिपूजेची थट्टा करण्याचा व लोकांतील धर्मश्रद्धा नष्ट करण्याचा सपाटा चालविला. दुर्दैवानें त्या दुष्ट प्रचाराला लक्षावधि देशबांधव बळी पडले ! तो त्यांचा प्रचार १९४७ पूर्वी रोखणें शक्य झालें नाहीं व दुर्दैवाची व लज्जेची गोष्ट म्हणजे त्यानंतरहि आपल्या राष्ट्रनेत्यांनीं त्यांच्या राष्ट्रद्रोही प्रचाराला निश्चयानें प्रभावीपणें पायबंद घालण्याऐवजीं प्रचारस्वातंत्र्याच्या नांवाखालीं व निधर्मीपणाच्या भ्रामक धोरणानुसार उत्तेजनच दिलें आहे. आपल्या देशांत स्वातंत्र्यपूर्व काळांत परदेशी पाद्र्यांची जी संख्या होती त्यांत आतां बरीच वाढ झाली आहे. ही गोष्ट मध्यप्रदेश सरकारनें न्या. नियोगी यांच्या नेतृत्वाखालीं केलेल्या चौकशींत निःसंदिग्धपणें सिद्ध झाली आहे.

पण ह्या धर्मोपदेशकांपेक्षांहि इंग्रज राज्यकर्त्यांनीं शिक्षणांतून आमच्या धर्मश्रद्धा नष्ट करण्याचा कुटिल डाव टाकला होता. १८३६ मध्यें मेकॉले म्हणतो, " इंग्रजी शिक्षण घेतलेला कोणताहि हिंदु हा खरोखर आपल्या

धर्माविषयीं सश्रद्ध राहात नाहीं. आपल्या शैक्षणिक योजना जर नीट अनुसरल्या तर आजपासून तीस वर्षांनंतर बंगालमधील प्रतिष्ठित वर्गांत एकहि मूर्तिपूजक सांपडणार नाहीं, असा मला पूर्ण विश्वास वाटतो आणि हें परिवर्तन धर्मांतरासाठीं कांहीं प्रयत्न न करतां व त्यांच्या धर्मस्वातंत्र्याला यत्किंचितहि धक्का न लावतां केवळ ज्ञान-दानानें अगदीं सहज घडून येणार आहे. ” अर्थात् मेकॉलेनें अपेक्षिलेलें यश ‘ कांहीं प्रमाणांत ’ त्यांच्या पदरांत पडलें आहे, हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. मात्र त्यानें भाकीत केल्याप्रमाणें ३० वर्षांनंतर तर सोडाच, पण १३० वर्षांनंतर बंगालमधील श्रीकालीपूजेचें माहात्म्य पुढारलेल्या शिक्षित वर्गातून नष्ट करतां आलेलें नाहीं. भगवान् श्रीरामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद ह्यांच्या थोर कार्यानें शिक्षित पिढी विमल धर्मश्रद्धेला आंचवली नाहीं, हें केवढें भाग्य !

इंग्रजांच्या काळांत कांहीं प्रमाणांत दबून असलेलें इस्लामी आक्रमण १९४७ मध्यें त्यांच्याच आशीर्वादानें भारताच्या कांहीं भागांत पाय रोवून उभें राहिलें व पंजाब, पुष्पपूर ( सीमा प्रांत ), बंगाल, सिंध व काश्मीर येथील राष्ट्रीय जीवनाचा व मंदिरांचा त्यांनीं पुन्हां उच्छेद केला. इंग्रजांच्या काळांत व आजहि उर्वरित हिंदुस्थानांत राहिलेल्या मुसलमानांनीं ‘ प्रार्थनेंत व्यत्यय येतो ’ असा कांगावा करून हिंदु देवतांच्या उत्सवांत निघणाऱ्या मिरवणुकींतील वाद्यें व मंदिरांत घणघणणाऱ्या घंटा बंद पाडण्याचा अट्टाहास चालविलेला आहे.

आज इंग्रज गेले आहेत. पण इंग्रजी वळण गेलेलें नाहीं. स्वतंत्र झालों आहोंत. पण ‘ स्व ’ची नेमकी जाणीव नाहीं. दारिद्र्य मी म्हणतें आहे. श्रद्धा क्षीण झाली आहे. समष्टिजीवनाचा अजून थांगपत्ता नाहीं. अशा विसकटलेल्या जीवनाची पुन्हां सुसूत्र व बळकट बांधणी करावी, ह्या उद्देशानें भगीरथ प्रयत्न करण्याची नितांत आवश्यकता आहे. अशी बांधणी करतांना सुसंस्कार करणाऱ्या मंदिरांचाहि विचार करावा लागेल. त्याच दृष्टीनें मंदिरांच्या इतिहासाचें आपण धांवतें अवलोकन केलें. आतां ही संस्था ज्या मूर्तिपूजेवर आधारित आहे तिचें रहस्य समजून घेणें उचित होईल.

☆ ☆ ☆

# प्रकरण ३

## मूर्तिपूजेचें रहस्य

आपल्या देशांत मंदिरसंस्थेचा उदय व विकास कसा झाला, हें आपण गेल्या प्रकरणांत थोडक्यांत पाहिलें. त्या पाहणींत आपल्या देवतांच्या मूर्ति व त्यांचे आकार कसे निश्चित झाले असतील, याचाहि कयास बांधला. या प्रकरणांत मूर्तिपूजेची मानवी मनावरील जी विलक्षण पकड आहे, तिचें रहस्य काय हें उकलून पाहाणें अत्यंत उद्‌बोधक ठरेल.

कांहीं दैवी वा यौगिक सामर्थ्य प्राप्त करून घेतलेल्या थोड्याशा व्यक्ति सोडल्यास बाकी आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसाचा सर्व व्यवहार हा पंचज्ञानेंद्रियांच्या भरंवशावर चाललेला असतो. शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध यांच्या माध्यमावांचून आपल्या कल्पनेच्या आवाक्यांत कोणतीच गोष्ट येण्याची शक्यता नसते. असें असल्यानेंच आपण कधीं अनोळख्या ठिकाणीं जावयास निघालों व आपणाला कोणी गुंतागुंतीचा वाकणा–वळणांचा रस्ता तोंडी सांगूं लागला तर आपण त्याला चटकन् म्हणतों कीं, ‘ नेमकें कोठें, कसें वळावयाचें याच्या खाणाखुणा कागदावर आराखडा काढून दाखव. ’ तसा रस्त्याचा आलेख पाहिला कीं, तोंडी वर्णनानें पटूं न शकलेली उमज तत्काल पटते. परमेश्वरी जगत्–संचालन करणारी शक्ति ही तर कल्पनेच्या पलीकडील ! समर्थ

विचारतात, " अतर्क्यासि तर्की असा कोण आहे ?" अशा अनंत व अतर्क्य परमात्म्याचें स्वरूप पंचज्ञानेंद्रियांच्या अत्यंत मर्यादित सामर्थ्यानें आकलन करूं म्हणणें; हें बाल प्रभुरामचंद्रांनीं आपल्या चिमण्या हातांत पौर्णिमेचा चंद्र खेळावयास द्या, असा हट्ट धरण्यासारखेंच होय ! तो बालहट्ट पुरविण्यासाठीं ज्याप्रमाणें लहानशा आरशांतून त्याला चंद्राचें मोहक प्रतिबिंब दाखवावें लागलें, त्याचप्रमाणें परमेश्वराच्या विश्वव्यापी, अनंत व अतर्क्य शक्तीचें ' मूर्ति 'रूपांत प्रतिबिंब दाखवून सामान्य माणसाच्या जिज्ञासेची तृप्ति करावी लागली आहे. लो. टिळक लिहितात, " ... मूर्तिपूजा कित्येकांस जरी हीन वाटत असली, तरी ज्या कल्पना बाह्येंद्रियांस अगोचर असतात त्या सामान्य लोकांस विशद करून दाखविण्यास प्रतिमेसारखें दुसरें साधनच नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. "– ( सूक्तिसंग्रह : १२२३ ) कल्पनेच्या कवेंत येऊं न शकणाऱ्या अव्यक्ताची उपासना ही सामान्य जनांना अत्यंत कठीण असते, हें ओळखूनच गीतेनेंहि सगुण-साकार उपासनेचा पुरस्कार केलेला आढळतो.

अशी मूर्ति करून त्या द्वारें उपासना करणें, हें इतर कांहीं उपासना-पद्धतींच्या तुलनेनें हीन लेखण्यांत येतें. " अग्नौ क्रियावतां देवो देवि देवो मनीषिणां । प्रतिमा स्वल्पबुद्धीनां योगिनां हृदये हरिः ॥ या वचनाचा आधार दिला जातो. पण एक तर, हें कोणतें शास्त्रवचन नाहीं व दुसरें असें कीं याहून दुसरा अनुभव सांगणारे संत व सुभाषितकार थोडे नाहींत. स्वामी विवेकानंद निःसंकोचपणें सांगतात कीं, " ज्या मूर्तिपूजेनें जगाला श्रीरामकृष्ण परमहंस दिले, त्या मूर्तिपूजेंत दोष सहस्र शिरले असले तरी ती मी उराशीं बाळगीन. " दासबोधांत समर्थ असें म्हणतात कीं, " सांडील सगुण भजनासी । तरी तो ज्ञाता परी अपेशी । " हरिपाठांत संत एकनाथांनीं " निर्गुणी पावलें सगुणी भजतां । विकल्प धरितां जिव्हा झडे ॥ " अशा निःसंदिग्ध शब्दांत असाच निर्वाळा दिला असून तुकाराम महाराजांनींहि दोन टिपऱ्यांची उपमा देऊन सगुण आणि निर्गुण ह्यांची समसमान योग्यता वर्णन केली आहे. तात्पर्य इतकेंच कीं, कोणी प्रतिमापूजेला गौण व प्रतिमापूजकांना ' अल्पमति ' लेखलें, म्हणून त्यानें गांगरून जाण्याचें कारण नाहीं. खरें पाहूं जातां, या ना त्या रूपांत मूर्तिपूजा करीत नाहीं असा समाज वा धर्मपंथ सांपडणें अवघड आहे. एवढेंच नव्हे तर उघड उघड मूर्तिपूजा करणाऱ्यांपेक्षां, तोंडानें तिची अवहेलना

करणारे लोकच अन्य निकृष्ट रूपांत व अधिक प्रमाणांत त्याच मूर्तिपूजेचा अवलंब करीत असतात !

प्रारंभीं बौद्धांना मूर्तिपूजा संमत नव्हती. पण त्या संप्रदायाची अवस्था काय झाली ? जगांत इतर कोणत्याहि देवतेपेक्षां भगवान् बुद्धाच्या मूर्ति अधिक सांपडतात. ही वस्तुस्थिति त्यांचा पराभव घोषित करण्यास पुरेशी आहे. ब्रह्मदेशांत प्रवास करतांना जिकडे तिकडे पॅगोडा ह्या मंदिरांतून 'बुद्धांच्या मूर्तींचा अक्षरशः खच पडलेला' पाहून प्रा. ना. सी. फडके स्तिमित झाले. ते लिहितात, "तो ( मूर्तींचा खच ) पाहिल्यावर मनांत येतें कीं, मूर्तिपूजे-विरुद्ध ज्यानं हत्यार उपसलं त्या बुद्धालाच त्याच्या भक्तांनीं मूर्तिरूप करून टाकलंय. काळानं बुद्धावर घेतलेला हा केवळ सूड म्हणायचा ? जे जे प्रिय किंवा आदरणीय असेल, त्याची साकार मूर्ति घडवायची व त्या मूर्तीची पूजा करावयाची ही मनुष्याच्या अंतःकरणांतली एक दुर्दम्य अविनाशी प्रेरणा आहे. तिला दडपण्याचे प्रयत्न ज्या ज्या धर्मांनीं किंवा संप्रदायांनीं केले; त्यांत कालांतरानं कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत मूर्तिपूजेचा—गुणोपासनेचा, बडिवार शिरलेला दिसतो. " ( स्मृति आणि संचार : पृ. ६५ )

ख्रिश्चन धर्मांतहि मेरी, येसू व संत-महंत यांच्या मूर्ति रूढ असून त्यांच्या-पुढें खंडोगणती मेणबत्त्या अखंड तेवत असतात. 'लेडी ऑफ फातिमा'सारख्यांच्या प्रतिमा दर्शनासाठीं मोठ्या थाटानें जगभर मिरविल्या जातात व लक्षावधि ख्रिश्चन आणि अन्य भाविक ठिकठिकाणीं दर्शनासाठीं भीड करतात. आपल्या-कडील संतांना त्यांच्या उपास्य दैवताचे साक्षात्कार म्हणजे प्रत्यक्ष सगुण—साकार असें दर्शन व दैवताशीं संभाषण घडल्याचे अनेक दाखले आहेत. पण साकाराची थट्टा करण्यांत धन्यता मानणाऱ्या ख्रिस्ती साधकांनींहि येसूचा साक्षात्कार करून घेतल्याच्या सुरस कथा अगदीं ह्या घटकेपर्यंत भक्तिपूर्वक सांगितल्या जात असतात. कांहीं वर्षांपूर्वी दिवंगत झालेला ख्रिश्चनांचा धर्मगुरु पोप पायस हा रुग्णशय्येवर प्रार्थना करीत असतां, दि. २ डिसेंबर १९५४ या दिवशीं पहाटे त्याला येसू खिस्ताचें प्रत्यक्ष दर्शन घडलें. ही घटना त्या वेळीं सर्वत्र प्रसिद्ध झालेली आहे. ( रीडर्स डायजेस्ट, एप्रिल १९५६, पृ. ७२ ) ख्रिस्ती साधकांप्रमाणें बौद्ध व इस्लाम धर्माच्या साधकांनींहि अनुक्रमें बुद्ध व महंमद यांचे साक्षात्कार करून घेण्याची मनीषा तृप्त करून घेतल्याचीं

कांहीं उदाहरणें सांपडतात. ह्याचा अर्थ इतकाच कीं, सगुण-साकार दैवताची उपासना करण्याची ओढ ही मूर्तिपूजा संमत नसणाऱ्या धर्मपंथांतील लोकांनाहि स्वभावतः असतेच व त्यामुळें एकापरीनें त्यांच्या धर्माच्या निर्गुणोपासने-संबंधीच्या एकांगी आग्रहामुळें त्यांच्या मनाचा कोंडमाराच होत असतो.

ख्रिश्चनांप्रमाणेंच नेमकी मुसलमानांची अवस्था आहे. काबाच्या पवित्र पाषाणासमोर भाविकतेनें गुडघे टेकून प्रार्थना करणाऱ्या मुसलमानांत व म्हसोबापुढें दंडवत घालणाऱ्या व आरती म्हणाऱ्या हिंदूंत तसें पहातां काय अंतर आहे ? एकावर ' मूर्तिपूजक ' म्हणून ठसा आहे नि दुसऱ्यावर नाहीं इतकेंच ! पण मुळांत पाहूं जातां, मुसलमानांना सगुण-साकाराच्या उपासनेला त्यांच्या धर्मानें आडकाठी केली तरी, इतरांच्या मूर्तींचें भंजन करण्यांत सरावलेले त्यांचे हात, जरा सवड मिळतांच कबरींवर गलेफ आणि डोल्यांवर बेगड चढवून ही हौस निराळ्या तऱ्हेनें भागविल्यावांचून राहात नाहींत. संत एकनाथ हें नेमकें वर्म ओळखून व त्यावर बोट ठेवून विचारतात :

" आम्हांसी म्हणतां पूजितां फत्तरें।  
तुम्ही कां मुडद्यावर ठेवितां चिरे।  
दगडाचे पूजितां हाजी रे। पीर खरे ते माना।।  
केवळ जें कां मेलें मढें। त्याची जतन करितां हाडें।  
फूल गलफ फतरियावरी चढे। उदसो तुम्हीं पुढें जाळा।।

थोडक्यांत म्हणजे फुलें–धूप–दीप त्यांनाहि सुटत नाहींत. अस्तु.


धार्मिक प्रतिबंधामुळें दबलेली सगुण-साकाराच्या पूजेची ओढ ही निराळ्या तऱ्हेनें कशी डोकें वर काढते; हें आपण पाहिलें. पण असें होतांना, त्यांच्या धर्माच्या अगदीं पांचवीला पुजलेल्या असहिष्णुता व संकुचितपणा ह्या विकृति त्यांत निर्माण झालेल्या दिसतात. आपली मूर्तिपूजा ही सहज सुंदर व मनमोकळी आहे. ती पूजा करतांना, चराचरांत परमेश्वर भरलेला आहे म्हणून तो मूर्तींतहि आहेच, अशी सुयोग्य धारणा आढळते. एवढेंच नव्हे तर ' रिता ठाव ह्या राघवेंवीण नाहीं ' असा साक्षात्कार करून घेतलेल्या श्रेष्ठ पुरुषांनींच मूर्तिपूजेला जिवंतपणा आणला आहे. आपल्या उत्कट व अनन्य भक्तीच्या बळावर तुकारामासारखे संत सांगत आले आहेत कीं, " देवाहातीं रूप धरवूं आकार। नेदूं निराकार होऊं त्यासी. " उलट

इतरांच्या पूजनांत ही परमात्म्याच्या व्यापकत्वाची व तो साकार–निराकार कसाहि होऊं शकतो ह्याची जाणीव नाहीं. इतर धर्मपंथांत मूर्तिपूजेची कल्पना किती विकृत नि संकुचित आहे हे विशद करतांना साने गुरुजी आपल्या 'भारतीय संस्कृति' ह्या ग्रंथांत म्हणतात कीं, " हिंदुधर्मातील मूर्तिपूजेपेक्षां इतर धर्मीयांची मूर्तिपूजा कमी उदार आहे. उदाहरणार्थ, ख्रिस्ती लोकांचा क्रॉस किंवा मुस्लिमांचा काबा यांच्यांतहि हिंदुधर्मी मनुष्य पावित्र्य पाहील. जशी माझी शाळिग्रामाची मूर्ति तशी ही त्यांची, असें हिंदु म्हणेल. माझ्या रामाच्या त्या अडीच हाती मूर्तीबाहेर जगांत कोठें पावित्र्य नाहीं असें हिंदु म्हणणार नाहीं; परंतु याच्या उलट क्रॉसला पवित्र मानणारा ख्रिश्चन मनुष्य रामाच्या मूर्तींत पावित्र्य पाहूं शकणार नाहीं. आपल्या धर्माचीं प्रतीकें, आपल्या धर्मातील चिन्हें, यांच्या पलीकडे जगांत पावित्र्य असूं शकेल; अशी कल्पना-सुद्धां त्यांना सहन होत नाहीं !... अशा रीतीनें पाहिलें म्हणजे इस्लामी मनुष्य, ख्रिश्चन मनुष्य हेच केवळ आकारपूजक, अत्यंत संकुचित मूर्तिपूजक आहेत असें दिसून येईल. " ( मूर्तिपूजा, प्रकरण–पृ. २१५ ते २२४ )

ख्रिश्चन धर्मीयांच्या राजकीय व वैज्ञानिक वर्चस्वानें प्रभावित होऊन आपल्या-कडेहि गेल्या शतकांत धर्मसुधारणेची एक लाट उसळली होती. त्या लाटेंत उदयास आलेले बंगालमधील ब्राह्मोसमाज व महाराष्ट्रांतील प्रार्थनासमाज यांचा उल्लेख करावा लागेल. " मूर्तिपूजा हा असन्मार्ग असून देवास अपमानकारक आणि मनुष्यास नीचत्व आणणारा व दुराचरणाप्रत नेणारा आहे. तेव्हां हा असन्मार्ग सुटून सन्मार्गाची लोकांत प्रवृत्ति व्हावी " या उद्देशानें प्रार्थनासमाजानें कार्यारंभ केला. ब्राह्मोसमाजानेंहि मूर्तिपूजेला कडाडून विरोध करीत पदार्पण केलें. पण त्यांच्या विस्ताराचें पाऊल मूठभर पांढरपेशा वर्गाबाहेर पडूं शकलें नाहीं. एवढेंच नव्हे; तर त्या पंथाचे अध्वर्यु केशवचंद्र सेन व एक तरुण सभासद नरेंद्रनाथ दत्त ( म्हणजेच पुढें विश्वविख्यात झालेले स्वामी विवेकानन्द ) यांच्यासारखी मंडळी थोड्याच काळांत दक्षिणेश्वराच्या मंदिरांतील एका 'पुजाऱ्या'कडे भक्तीनें येराझरा घालूं लागली व त्यांतून त्यांचा परमेश्वराच्या सगुणा–साकार रूपावर अनुभूतींतून विश्वास बसला ! असे मूर्तिपूजेला विरोध करणारे शेवटीं एका दिव्य पुजाऱ्याचेच पुजारी बनले ! प्रार्थनासमाजालाहि निराळा अनुभव आलेला नाहीं. त्या समाजाचे एक आधारस्तंभ न्यायमूर्ति

रानडे ह्यांच्या जीवनांतील एक प्रसंग प्रार्थनासमाजाची निष्प्रभता स्पष्ट करणारा आहे. ते एकदां पुण्यांतील 'नगर वाचन-मंदिरा'च्या खिडकीशीं वाचीत बसले असतां समोरील रस्त्यावरुन प्रतिवर्षाप्रमाणें देहू-आळंदीच्या पालख्या, सहस्रावधि वारकऱ्यांच्या 'विठ्ठल' नामाच्या गजरांत जाऊं लागल्या. ती वारकऱ्यांची तन्मयता व भाविकता पाहून न्यायमूर्तींचें सात्त्विक हृदय भरून आलें व त्यांचे डोळे ओलावले. हा प्रकार घडला तेव्हां त्यांच्या हातांतील वृत्तपत्र ते चाळीत होते. तेव्हां त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरारलेले पाहून एकानें पृच्छा केली कीं, 'आजच्या वृत्तपत्रांत एखादी दुःखद बातमी आहे काय ?' त्यावर न्यायमूर्ति म्हणाले, "माझ्या डोळ्यांसमोर वर्तमानपत्र असलें तरी माझ्या अंतःचक्षूंसमोर पंढरपूरचें देवालय उभें आहे. आज सातशें वर्षें झालीं, लक्षावधि विरक्त वारकरी कोणतीहि संघटना नसतांना, सभासदत्व नसतांना प्रतिवर्षी नियमानें पंढरपूरच्या वारीला जात आहेत आणि आमच्या प्रार्थना-समाजाचे सभासद आमच्या देखत गळत आहेत."

खरें म्हणजे माणसाच्या हृदयांतील भक्तिभावनेला दैवताच्या मूर्तरूपानें बहर येत असतो व त्यामुळेंच महापुरुषांचे भव्य पुतळे मूर्तिपूजा मान्य नसणाऱ्या देशांतहि उभारले जातात. त्यांच्यासमोर पुष्पोद्यानें फुलवून दीपाची नेत्राकर्षक योजना केली जाते. सामान्य माणसाच्या ओसरीवरहि आजोबा-आजी व माता-पिता अशांचीं छायाचित्रें लाविलीं जाऊन त्या चौकटींनाहि पुष्पहार घालण्यांत येतात. 'मूर्तिपूजक नाहीं' अशी पाटी लावल्यानें मानवी मनांतील नैसर्गिक विभूतिपूजेची ओढ वा भूक कशी शमणार ? हें मर्म न ओळखल्यानेंच आर्यसमाजासारख्या प्रभावी पंथाचीहि शेवटीं पीछेहाट झाली असें दिसून येतें. वास्तविक आर्यसमाजाचे आद्यप्रवर्तक स्वामी दयानंद यांनीं मूर्तिपूजेवर जितके कडाडून प्रहार केले, तितके अन्य कोणीच केले नसतील. मूर्तिपूजा हा एक खड्डा आहे, मूर्तिपूजा करणारा हा दिवसेंदिवस अधिकाधिक अज्ञानी होत असतो, आपल्या हृदयांत देवाच्या जागीं दगड ठेविल्यानें परमेश्वर क्रोधायमान होतो, देवळें हे दुष्ट लोकांचे अड्डे आहेत असे असंख्य तडाखे त्यांनीं मूर्तिपूजकांवर आवेगानें लगावले आहेत. 'तुमच्या भावाच्या आधीन परमेश्वर आहे. असे म्हणण्यास तुमच्याजवळ काय प्रमाण आहे ?' असाहि प्रश्न ते करतात. पण आश्चर्य असें कीं, आर्यसमाजाच्या प्रार्थनामंदिरांत स्वामी दयानंद,



'पूजनीय पुजारी'
भगवान श्रीरामकृष्ण परमहंस



श्रीरामकृष्ण-मंदिर, बेलूर मठ

श्रद्धानंद, लाला लजपतराय आदि आर्यसमाजी श्रेष्ठ नेत्यांच्या प्रतिमा लावाव्यात कीं लावूं नयेत, असा प्रश्न त्या संप्रदायांत उपस्थित झाला नि शेवटीं 'प्रतिमा लावा' म्हणणाऱ्या गटाला यश मिळालें. जर ऋषितुल्य दयानन्दांची प्रतिमा चालते तर श्रीराम नि श्रीकृष्ण यांच्या प्रतिमा असण्यांत वावगें काय ? एकूण आर्यसमाजाचा मूर्तिपूजेसंबंधींचा आग्रही विरोध आतां ढिला होऊं लागणें क्रमप्राप्त आहे. आज प्रतिमा लावण्यांत कांहीं दोष नाहीं असें मान्य झालें आहे; उद्यां त्या प्रतिमेला, आदर व्यक्त करण्यासाठीं, पुष्पहार घालण्यांतहि कांहीं वावगें नाहीं असें वाटूं लागलें, तर तें मनुष्यस्वभावाला धरूनच होईल एकूण सगळीकडेच असें गुडघाभर पाणी आहे !

सगुण किंवा निर्गुण उपासनेंत भाविकाची विमल भक्तिभावना हीच प्रधान असते, मग ती भावना कोणत्याहि रूपानें प्रकट होवो. ती भक्ति कधीं शब्दांतून तर कधीं प्रेमानें सद्गदित झालेल्या भक्ताच्या मूक आसवांतून प्रकट होते. 'नर हाच नारायण' अशा धारणेनें केलेली निःस्वार्थ सेवा, हें देखील तिच्या प्रकटीकरणाचे माध्यम असतें. सुस्वर भजन, नीरांजनाचा मंद प्रकाश, लहानग्या वाटींतील नैवेद्य, पुष्पमाला व गंधाक्षता अशा विविध साधनांतून व्यक्त होणारी ही भक्तिभावना, दयानिधि आणि सर्वसाक्षी परमेश्वराला पोंचत असते. ज्या परमेश्वराला चर्चमध्यें वा मशिदींत गुडघे टेकून केलेली प्रार्थना ऐकूं जाते त्याला फुलें व धूपदीप यांच्या द्वारा होणारी पूजा दिसत नसेल किंवा 'त्वमेव माता पिता त्वमेव' अशी केली जाणारी प्रार्थना ऐकूं येत नसेल; असें कसें म्हणतां येईल? साहित्याचार्य पं. अंबिकादास व्यास निर्गुण उपासकांना उद्देशून म्हणतात कीं, "... हमारे आपमें भेद इतना ही रहा कि—नाम रूप दो प्रतिनिधि होते हैं। सो आप नाम प्रतिनिधि तक हीं पहुंचे हम रूप प्रतिनिधि तक मानते हैं और किसी मूर्तिको उसीका प्रतिनिधि (मानकर) मूर्ति के द्वारा उसीका पूजन करते हैं..." भक्तिभावना उत्कट असेल तर 'सर्वशक्तिमान्' परमेश्वरालाहि भक्त म्हणेल त्याप्रमाणें रूप घेण्यांत धन्यता वाटते. एकनाथ–तुकारामांपासून स्वामी रामकृष्णांपर्यंत अनेक संतांनीं स्वानुभवानें घोषित केलें आहे. 'देवा हातीं रूप धरवूं आकार' असा निर्वाळा तुकाराम महाराज देतात तर "आतांही प्रत्यक्ष प्रमाण। दासांचेनि वचनें जाण। पाषाण प्रतिमें देवो आपण। आनंदघन प्रगटे पैं ॥ ४८२॥ (एकनाथी भागवत–

अध्याय ७ ) म्हणजे पाषाणाच्या प्रतिमेंतूनहि भक्ताच्या ओढीनें देव प्रकट होतो, अशी प्रामाणिक साक्ष एकनाथ देतात. विशुद्ध भावाचा भुकेला असणारा देव, तो भाव कोणत्या मार्गानें प्रकट होतो हें पहात नाहीं. त्यामुळेंच धातू, काष्ठ, पाषाण व मृत्तिका यांत देव नसून 'भावेहि विद्यते देवः' किंवा याहि पुढें जाऊन 'भाव तोचि भगवंत' असें म्हटलें जातें. मूर्तिपूजा म्हणजे धातू-पाषाणाची पूजा अशी अवास्तव टीका केली जाते. पण मागसलेल्या लोकांतहि अशी विकृत भावना नसते, असें आढळून आलें आहे. रानटी लोकहि प्रतीक वा प्रतिमा हें अदृश्य परमेश्वरी शक्तीला संतुष्ट करण्याचें माध्यम आहे असें समजून पूजा करीत असतात. 'शक्ति अ‍ॅन्ड शाक्त' ह्या ग्रंथांत म्हटलें आहे कीं, "आपण चढविलेले भोग व बांधलेली पूजा ह्या गोष्टी (मूर्तीतील) प्रत्यक्ष जड वस्तूला नसून तदंतर्गत परमेश्वराला अर्पण करीत आहांत, अशी जाणीव गोल्डकोस्टमधील निग्रोंनाहि असते. ह्या विषयावर ज्या ज्या स्थानिक माणसाजवळ बोलणें केलें त्यानें त्यानें, तो दगडासारख्या जड पदार्थाची पूजा करील वा त्याला बळी अर्पण करील अशी नुसती कल्पना करणाऱ्यांचीहि थट्टा उडविली" (पृष्ठ २७९). जेथें मागसलेले लोकहि या विषयांत इतके प्रगत आढळतात, तेथें हिंदूंसारख्या अध्यात्मक्षेत्रांत अनुभवसिद्ध ज्ञानानें अग्रगण्य ठरलेल्या आपल्या समाजाची ह्यासंबंधींची धारणा किती निकोप, स्पष्ट व उदात्त असेल हें सांगावयास नकोच. 'केला पाषाणाचा विष्णु। परी पाषाण नव्हे विष्णु। विष्णुपूजा विष्णूसि अर्पे। पाषाण राहे पाषाणरूपें।' हें आपल्या-कडील स्वतःला शूद्र म्हणविणाऱ्या तुकारामालाहि कळतें! 'जितने कंकर, उतने शंकर' या म्हणीप्रमाणें दगडांत देव पाहणें म्हणजे अल्पावर महदाची भावना करणें होय. अशी भावना करून उपासना करीत असतां 'पाषाण राहे पाषाणरूपें' हें खरें असलें तरी महर्षि दयानन्दांनीं म्हटल्याप्रमाणें साधकाच्या हृदयांत देवाच्या सिंहासनावर तो 'दगड' जाऊन न बसता, 'सर्व सुखाचें आगर' असलेला परमेश्वर त्याच्या विशुद्ध चित्तांत प्रवेशूं लागतो. नदी, वृक्ष, पशू, दगड अशा प्रतीकांतून परमेश्वराचें पूजन करण्याचें रहस्य उकलून दाखवितांना स्वामी रामतीर्थ म्हणतात कीं, "लहानसा काळा गुळगुळीत दगड हेंहि आर्यांच्या दृष्टीनें प्रतीक— अर्थात् ईश्वराला जोखण्याचें वजन किंवा ब्रह्मानुभवाचें साधनच आहे. आतां दगडाला जें प्रतीक म्हणून ठरविण्यांत

आलें तें सर्वव्यापी ईश्वराला तुच्छ बनविण्याकरितां काय ? अर्थात् नाहीं. प्रतीक इतकें लहान करण्याचा हेतु हा कीं, ईश्वरभाव अंगीं बाणून अंतःकरणांत ब्रह्मभावनेचा एकसारखा प्रवाह वाहावा. यःकश्चित् लहानसा दगड तुम्हांला ब्रह्मरूप वाटूं लागला कीं बाकीचे सारे पदार्थ, सारें जग ब्रह्मरूप दिसलेंच पाहिजे. परंतु हा लहानसा दगड ब्रह्म आहे, परब्रह्म काय तें या दगडांत साठविलें आहे, अशा समजुतीनें जो दगडांचें— पाषाणाच्या प्रतिमेचें पूजन करीत असेल तो मात्र अखेरपर्यंत गुळगुळीत गोटाच राहील!"— (रामतीर्थ, खंड ८, पृ. ११९)

मुळांत अशी अविकृत व सहजसुंदर मूर्तिपूजेची कल्पना असली तरी ख्रिस्ती पाद्र्यांनीं गेल्या कांहीं शतकांत तिच्या अखंड चालविलेल्या उपहासानें आपल्या समाजांतील अनेकांच्या श्रद्धा कोलमडल्या नसल्या तरी हादरल्या आहेत. राजकीय दृष्टीनें विजयी ठरलेल्या व भौतिक विज्ञानक्षेत्रांत अग्रेसर असणाऱ्या समाजाचा पगडा पराभूत समाजावर विलक्षण बसतो. कारण त्या वेळीं त्या पराभूत समाजाचा आत्मविश्वास ढासळलेला असतो व तशा अवस्थेंत दुसऱ्याचें गुळगुळीत नाणेंहि नीट पारखून पाहण्याचें त्याला जमत नाहीं. त्यांतून यज्ञासाठीं बकरा घेऊन चाललेल्या ब्राह्मणाला तीन ठगांनीं संगनमत करून 'हा कुत्रा कुठें चालवला आहे ?' असा अंतराअंतरावर प्रश्न विचारून गोंधळवून टाकावें, त्याप्रमाणें मूर्तीपूजेविरुद्ध सतत प्रचार करून आपल्या समाजाला भ्रमवून टाकण्यांत इतरांना कांहींसें यश आलें आहे. यासाठीं पुन्हां सावध होऊन आपल्या गोष्टी आपण होऊन नीट पारखल्या पाहिजेत. तशा परीक्षणांत मूर्तिपूजेंत मुळांत वैगुण्य नसून डोळसपणा सोडल्यानें आजच्या मूर्तिपूजेंत व मंदिरसंस्थेंत अनेक दोष शिरले आहेत असें आढळून येईल. मनुष्यनिर्मित कोणत्याहि संस्थेची उन्नत स्थिति सारखी टिकून राहते असें नाहीं. त्यांतहि राजकीय व भौतिक परिस्थित्यनुसार चढउतार होत असतात, हें ओळखून धैर्यानें उभें राहिलें पाहिजे.

ह्यासाठीं मूर्तिपूजेचें व मंदिराचें ऋण आपण ओळखलें पाहिजे. मूर्तिपूजेंतूनच मंदिरांचें भव्य शिल्प अस्तित्वांत आलें नि सृष्टिसौंदर्याचीं जणूं माहेरघरें वाटणाऱ्या अनेक स्थानांवर पावित्र्यानें व मांगल्यानें आपला वरदहस्त ठेवला. नृत्य, गायन व वादन या कलांचें लालन-पालन प्रारंभीं मंदिरांतच झालें आहे

आणि पुष्पवाटिकांची जोपासना, पुष्पहार गुंफण्याची कला, 'गंधयुक्ति' म्हणजे अष्टगंध, उदबत्त्या, बुक्का व फुलेलें (अत्तरें) सिद्ध करण्याची कला मूर्तिपूजेनेंच आपणाला शिकविली आहे. असंख्य विकारवश व प्रमादशील लोकांना पश्चात्तापाच्या पवित्र अग्नींत शुद्ध करून विवेकसंपन्न करण्याला मूर्तिपूजेनेंच हातभार लावला आणि 'निश्चयाचा महामेरु' ठरलेले शिवाजी महाराज, अनुशीलन–समिति व अभिनव भारत यांमधील पुलीन बिहारी दास नि स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्यासारखे जहाल क्रांतिकारक यांच्या वज्रकठोर निष्ठा सशस्त्र अष्टभुजादेवीच्या मूर्तिसमोरच घडविल्या गेल्या आहेत. जगद्‌गुरु आद्य शंकराचार्य, रामानुज, माधवाचार्य, चैतन्यप्रभु, ज्ञानदेव, रामदास, तुकाराम, तुळसीदास, मीराबाई नि रामकृष्ण परमहंस या कोटींतील असंख्य विशुद्ध चरित्रें, ही मंदिरसंस्थेचीच देणगी होय. मूर्तिपूजेंतून प्रचलित झालेल्या जत्रायात्रांनींच समाजाचें धर्मचैतन्य व भारताची एकता जागविली आहे आणि भारतीय वाङ्मयांतून दुथडीं वाहणाऱ्या भावगंगेला मूर्तिपूजकांतील तपस्वी भगीरथांनींच प्रवाहित केलें आहे. आत्मसमर्पणाचा श्रीगणेशा आपल्या समाजाला मूर्तिपूजेनेंच घालून दिला नि व्यक्तांतून अव्यक्ताकडे जाण्याचा सुलभ मार्ग तिनेंच मोकळा केला आहे.

अशा मूर्तिपूजेवर आधारलेल्या मंदिरसंस्थेंत आज विकृति निर्माण झाली असली तरी तिचा त्याग करून चालणार नाहीं. शेवाळ आलें म्हणून विहीर बुजवून टाकणें किंवा उंदीर-घुशींनीं बिळें पाडलीं म्हणून घर पाडून टाकणें हें जितकें असमंजसपणाचें, त्याहून, कांहीं दोषांसाठीं मूर्तिपूजेचा त्याग करणें हें अधिक अविवेकीपणाचें कृत्य ठरेल. राजकीय संग्रामांत पराभूत झाल्यानें ज्यांना आपल्या मूर्तिपूजेवर आधारलेल्या संस्कृतीला आंचवावें लागलें, त्या ग्रीक राष्ट्रांतील कांहीं जणांना ह्या घटकेलाहि ती प्राचीन राष्ट्रीय परंपरा नष्ट झाल्याचें दुःख होतें नि आज नाहीं उद्यां तीं मंदिरें, त्या मूर्ति नि त्यांच्या थाटामाटाच्या मिरवणुका आपल्या राष्ट्रांत पुनरपि पहावयास मिळाव्यात अशीं सुखस्वप्नें ते रंगवितात. एवढेच नव्हे, तर हें स्थित्यंतर हिंदूच घडवून दाखवितील; असा विश्वास प्रकट करतात. मूर्तिपूजेंतील सौंदर्यानें प्रभावित होऊन हिंदुधर्मांत प्रविष्ट झालेल्या ग्रीक विदुषी सौ. सावित्रीदेवी मुखर्जी लिहितात कीं, "... तें हिंदुस्थान; निसर्गाचा पंथ–तारुण्याचा आणि बलाचा

पंथ–जेथून जेथून उच्छेदिला गेला असेल तेथें तेथें तो पुन्हां निर्माण करील. सम्राट् ज्यूलिअननें जें घडवून आणण्याचा प्रयत्न केला, जें घडणें प्रत्यक्ष सूर्यदेवानें आपल्या डेल्फी येथील कौल सांगणाऱ्या भक्ताच्या मुखानें अशक्य म्हणून सांगितलें, तेंहि स्वतंत्र हिंदुस्थान विस्तृत प्रमाणावर घडवून दाखवील आणि त्या वेळचे विजयी हिंदु जिंकलेल्या युरोप खंडांत समुद्राच्या तीरावर कोठें तरी ज्युलिअनचा भव्य पुतळा उभारतील आणि त्या पुतळ्यावर देववाणी असणाऱ्या संस्कृतांत आणि ग्रीक भाषेंत पुढील वचन कोरतील : “ तूं जें ( मूर्तिपूजेचें पुनरुत्थान ) स्वप्नांत पाहिलेंस तें आम्हीं प्रत्यक्षांत आणून दाखविलें. ” आपल्याहि अंतरंगांत उत्कर्षाची अशीच आकांक्षा असावी.

☆ ☆ ☆

## प्रकरण ४

# मंदिरांतील पुजारी

प्रतीकोपासना हें मंदिरांचें वैशिष्ट्य आहे व तिचा उगम आहे मानवाच्या क्षुद्रत्वांत. 'अनंत' ह्या अन्वर्थक शब्दानें परमेश्वराचें वा या आश्चर्य-मुग्ध करणाऱ्या विशाल विश्वाच्या संचालकाचें वर्णन केलें जातें. सरड्याची धांव कुंपणापर्यंत असते त्याप्रमाणें मानवी मनाची, बुद्धीची आणि कर्तृत्वाची धांव ही देखील विश्वाच्या अनंतत्वाचा विचार करतां त्याच कोटींत बसणारी आहे. कल्पनेला कितीहि ताणलें तरी ज्या शक्तीचें दिव्यत्व आकलन होत नाहीं व बुद्धीनें कितीहि भरारी मारली तरी ज्या विशालतेचा ठाव घेतां येत नाहीं, त्या दिव्य शक्तीपुढें मनुष्य स्वाभाविकच नतमस्तक होतो. वळवाच्या पावसा-पूर्वीं उठणाऱ्या वावटळींत एखादा धुळीचा कण किंवा गवताची काडी असावी त्याप्रमाणें जगड्व्याळ, चमत्कृतिपूर्ण व अतर्क्य विश्वांत आपलें नगण्य स्थान आहे. अशा जाणिवेंतून माणसाचा अहंकार धुक्याप्रमाणें विरूं लागतो व त्याचे हात त्या एकमेवाद्वितीय व अनाकलनीय शक्तीपुढें जोडले जातात. पंचज्ञानेंद्रियांच्या व बुद्धीच्या आवाक्याबाहेरील ज्या शक्तीवर आपलें असणें-नसणें अवलंबून आहे, तिच्याविषयीं हृदयांत एक कृतज्ञतेचा भाव उत्पन्न होतो. त्या भक्तिभावांतूनच प्रतीकोपासनेचा उदय झालेला आहे. भक्त जेव्हां

प्रतीकाची वा प्रतिमेची पूजा करतो तेव्हां त्याला त्या प्रतीकासाठीं वापरलेल्या धातु, काष्ठ वा दगड या गोष्टी दिसत नाहींत; तर त्याला ती प्रतिमा म्हणजे साक्षात् जगच्चालक शक्तीच वाटत असते. त्याला त्या समोरील मूर्तीतून अमूर्त दैवी शक्तीचा आठव होत असतो. असें न होईल तर ती प्रतीकोपासना नव्हे. स्वामी रामतीर्थ म्हणतात, "बाह्य पदार्थांकडे पदार्थदृष्टीनें न पाहतां ब्रह्मदृष्टीनें पाहणें ही प्रतीकोपासना होय." ......उलट "बाह्य पदार्थाला अर्थात् प्रतीकाला सत्य मानून त्यांच्या ठिकाणीं ईश्वर कल्पना कराल तर ती ईश्वरोपासना नसून शुद्ध 'पाषाण'–पूजा अर्थात् तिमिरपूजाच होय !

प्रतीकोपासनेमागील ह्या विशिष्ट भावनेंतूनच पूजाविधि अस्तित्वांत आला. भक्ताला, समोर असणारी प्रतिमा ही जेव्हां प्रत्यक्ष परमेश्वरच होय असें वाटतें, तेव्हां भक्तीनें त्याला मी काय अर्पण करूं नि काय नको, असें होऊन जातें. एखादा मित्र वा नातेवाईक आपणाकडे आल्यावर आपण त्याला पाय धुण्याला पाणी देण्यापासून तों स्नान–जेवण–विडा आदि उपचारांनंतर निद्रेसाठीं शय्या देण्यापर्यंतच्या सर्व गोष्टी मोठ्या प्रेमानें व आस्थेनें करीत असतों. त्या आपल्या आतिथ्यांतून पाहुणा जसा प्रसन्न होतो तसेंच आपल्या जिवलगांसाठीं कांहीं करतां आलें; याचें समाधान आपल्या मनाला कांठोकांठ व्यापून उरतें. देवपूजेंतील षोडशोपचारांत उत्कट भक्तीनें केलेल्या परमेश्वराच्या आतिथ्यावांचून दुसरें कांहींच नाहीं.

'आवाहन' म्हणजे परमेश्वराला आपल्या घरीं बोलवावयाचें. मग दमूनभागून आलेल्या देवापुढें 'आसन' ठेवून, 'देवा, जरा बसा' अशी प्रार्थना करावयाची. त्यानें थोडी विश्रांति घेतल्यावर त्याचे पाय आपण हळुवार हातानें ऊन पाणी घालून धुवावयाचे व पुसावयाचे. हाच 'पाद्य'-उपचार. त्यानंतर 'अर्घ्य' म्हणजे गंधाक्षता व सुवासिक फुलें यांनीं युक्त असणारें पाणी हात प्रक्षालन करण्यासाठीं घालावयाचें. असें केल्यावर श्रमपरिहारासाठीं त्याला प्रेमानें 'पंचामृत' म्हणजे जणूं गूळपाणी द्यावयाचें व त्याच्या स्नानाची सिद्धता करावयाची. देवाचें स्नान झालें कीं, त्याला उंची रेशमी वस्त्रें व यज्ञोपवीत अर्पून 'चंदन'–केशर–कस्तुरीचा सुगंधित टिळा लावायचा. मग त्याच्या गळ्यांत स्वहस्तें गुंफलेली सुवासिक फुलांची भरघोस माळ घालून त्याच्या हातांत मोगऱ्याचे गजरे चढवावयाचे. त्याचा महाल धूपाच्या मंद सुगंधानें

दरवळून टाकावयाचा व रत्नदीप उजळून त्याच्या प्रकाशांत त्याला जेवावयास बसवावयाचें. त्याच्या ताटांत त्याच्या आवडीचीं रसपूर्ण पक्वान्नें वाढून त्याला आग्रहानें जेवूं घालावयाचें. जेवणानंतर त्याला विडा-दक्षिणा अर्पून झाली कीं त्याला 'प्रदक्षिणा' घालायची. म्हणजे त्याच्या सेवेसाठीं त्याच्याभोंवतीं हवें-नको पाहत फिरावयाचें. इतकें झालें कीं त्याची प्रार्थना करून मागणें मागावयाचें व पुन्हां भक्तिपूर्वक 'पुष्पांजलि' समर्पण करावयाची म्हणजे यथासांग पूजा झाली. "त्वमेव माता पिता त्वमेव। त्वमेव बंधुः सखा त्वमेव ॥ त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देव देव ॥" इतकी जवळीक ज्या भक्तानें देवाशीं जोडली असेल, त्यानें ब्रह्मदृष्टीनें प्रतिमेला हे उपचार अर्पण केले कीं पूजा झाली. ज्याला इतकें आतिथ्य करण्याची शक्यता नाहीं, त्याच्यासाठीं गंध, पुष्प, धूप, दीप नि नैवेद्य या पंचोपचारांवरहि देव संतुष्ट होतो. पण ज्याला तेवढेंहि शक्य नसतें त्याच्या नुसत्या मानसपूजेनेंहि तो देवाधिदेव पुंडलिकाच्या घरीं ताटकळत उभा राहतो. कारण तो 'भावाचा भुकेला' आहे.

अशी आपल्या दैवताची पूजा करण्याची ओढ भाविक माणसाला लागत असते. त्या ओढींतूनच घरोघर 'देवघर' अस्तित्वांत आलें. कुटुंबांत जसें देवघर तसें समाजांत मंदिर. देवघरांत कुटुंबांतील कोणी तरी एक जण देवाची साग्र पूजा करतो व अन्य कुटुंबीय मंडळी मागून गंधपुष्प वहातात. सर्वांनाच यथासांग पूजा करणें शक्य नसतें. जेथें देवघरांत ही स्थिति तेथें सार्वजनिक मंदिरांत सर्वांना स्वहस्तें शांतपणानें व मनसोक्त पूजा करण्यास संधि मिळणें हें अशक्यच असतें. त्यामुळें अशा मंदिरांतून मंदिर उभारणाऱ्या भक्तानें पूजा चालवावी लागते. तें त्याला शक्य नसेल तर आपल्या वतीनें त्यानें दैवताची पूजा करण्यासाठीं कोणा जाणत्या पुजाऱ्याची नियुक्ति करणें भाग पडतें. देवस्थानांत अनेक मूर्ति असतील व भक्तांची दिवसभर तेथें भीड होत असेल, तर एकाहून अधिक पुजाऱ्यांची योजना करणें अपरिहार्य होतें. अशा सार्वजनिक मंदिरांतील आवश्यकतेंतून पुजारी, पंड्ये, बडवे, गुरव असे वर्ग मोठमोठीं भारतीय तीर्थक्षेत्रें व देवस्थानें यांत निर्माण झाले आणि इतर व्यवसायांत ज्याप्रमाणें आनुवंशिक परंपरा उत्पन्न झाली, त्याप्रमाणें येथेंहि प्रकार घडून परंपरागत चालणारें पुजारीपण अस्तित्वांत आलें. एवढेंच नव्हे तर इतर अनेक दुष्ट रूढींप्रमाणें, या वर्गाचा पूजेंतील जिव्हाळा कमी होऊन देऊळ हें दक्षिणा

उकळण्याचें वंशपरंपरेनें अप्रतिहत चालणारें ‘ वतन ’ होऊन बसलें. भक्तांत निरपेक्षता व निर्लोभता असली तरी चाकर म्हणून राहणाऱ्या पुजाऱ्यांत ती असेलच असें सांगणें कठीण असतें. तो बोलून चालून उपजीविका चालावी म्हणून देवळांत सेवेकरी होतो. पुढें परंपरेनें पूजा करण्याचा त्याचा ‘ अधिकार ’ ( हक्क ) रूढ झाला म्हणजे त्याचा तेथील व्यवहार हा अधिक धंदेवाईक वा व्यापारी वळणावर जातो. अधिकार हा माणसाच्या व्यवहारांतील मार्दव व सचोटी कमी करणारा व डोळ्यावर धुंदी आणणारा असतो, असाच सामान्यपणें सार्वत्रिक अनुभव म्हणून सांगतां येईल. या गोष्टीला मोठमोठ्या मंदिरांतील वतनदार पुजारीवर्ग कसा अपवाद ठरावा.

दिवसांतून एकदां मूर्तीवर तांब्याभर पाणी घालून गंध–फुलें वाहणाऱ्या व सायंकाळीं सातत्यानें सांजवात करणाऱ्या खेड्यांतील व लहान–मंदिरांतील पुजाऱ्याला म्हणण्यासारखी प्राप्ति नसते. पण प्रसिद्धीस पावलेल्या देवस्थानांतील पुजाऱ्यांची स्थिति याहून अगदीं भिन्न असते. “ नखाला माती लागू न देतां देवाच्या नांवावर षोडशोपचार भोगण्याचा धंदा ” अशा मार्मिक शब्दांत ‘ गांवगाडा ’कार त्रिं. ना. अत्रे यांनीं पुजारीपणाचें वर्णन केलें आहे. पुजारीपणाला धंद्याचें स्वरूप आल्यावर पवित्र मंदिरांतील व्यवहार किती ओंगळ बनले आहेत हें सांगतांना अत्रे म्हणतात, “ सध्यां धार्मिक विधींना वाणसौद्याचें, तीर्थोपाध्यायांना वाण्याचें व यात्रांना व्यापारी सट्ट्याचें स्वरूप आलें आहे. ”

पण ह्या ‘ व्यापारां ’त होणारा लाभ लक्षांत येतांच पुढारलेल्या ब्राह्मण वर्गामागोमाग इतरहि असंख्य जातींचे लोक त्यांत शिरून अधिष्ठित झाले आहेत. सामान्यतः गुरव, गोसावी व जंगम यांनीं शिवाचें पुजारीपण मिळविलें आहे, तर विष्णु--हनुमन्त यांच्या मंदिरांत बैराग्यांनीं. देवीची पूजा भुत्ये, आराधी, गोंधळी व हिजडे करतांना आढळतील, तर बहिरोबाच्या देवळांत भराडी, कुणबी नि माळी यांच्याकडे तें वतन गेलेलें दिसेल. कोठें महार तर कोठें मानभावी पुजारी बनले आहेत. पण सर्वांत आश्चर्य वाटतें तें मुसलमानांनीं देवळांत व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीं हिंदूंचीं वतनें हस्तगत केलीं आहेत याचें. राशीन येथील देवीच्या मंदिरांत थेट देवीपर्यंत मुसलमान जातात व स्वहस्तें प्रसाद-अंगारा देऊन दक्षिणा घेतात ! वाराणशीचा दरबारघाट

व राजमहाल घाट या ठिकाणचे अधिकार हिंदूंनीं मुसलमानांना विकले असल्यानें तेथील असंख्य यात्रेकरूंचें उत्पन्न त्यांच्या खिशांत पडतें. विंध्याचल देवालयांतील कांहीं पंड्यांनींहि आपले अधिकार मुसलमानांना विकले व सध्या ते हिंदु हस्तकांकरवीं आपल्या वांट्याची पूजा चालवीत असतात, अशी माहिती डॉ. सी. पी. रामस्वामींनीं मंदिर-विश्वस्तनिधि संबंधींच्या प्रतिवृत्तांत दिली आहे.

अनेक ठिकाणचे पुजारी हे अशिक्षित, स्वार्थी व अडाणी असल्याचें दिसून येतें. त्यांना मंत्रतंत्रहि माहिती नसतें व त्यांच्यांतील जे कांहींजण मंत्र म्हणतात, त्यांचे संस्कृत उच्चार चुकीचे व विचित्र असतात. विशेषतः उत्तर हिंदुस्थानांतील पुजारीवर्गांत अशा लोकांचें प्रमाण अधिक आढळतें. यात्रेकरूंची आपल्या घरीं राहण्या–जेवण्याची सोय करून, त्यांचें देवकर्म नीट पार पाडणें, अशी दुहेरी कामगिरी पंड्ये व बडवे करीत असतात. वाराणशी, हरिद्वार, प्रयाग, विंध्याचल ( उत्तर प्रदेशांत ), जगन्नाथपुरी, गया, देवघर ( बिहारमधील ) अशा अनेक ठिकाणीं पंड्यांचा ससेमिरा चुकविणें अशक्य असतें. त्यांतील कांहींजण स्वतःला ब्रह्मयाचे मानसपुत्र समजतात व अनेक मार्गांनीं भाविकांना लुबाडतात. दागदागिने व पैसा-अडका हातोहात लांबविणें व प्रत्यक्ष यात्रेकरूंच्या खिशांत हात घालून ते चाचपणें इतक्या धिटाईपर्यंत त्यांतील कांहींच्या लोभाची मजल गेलेली आढळते. एकट्या जगन्नाथपुरीमध्यें पुजारी, पंड्ये व वाटाडये आदींची संख्या सहा सहस्र आहे. यावरून त्यांचा उपद्रव किती जाणवत असेल याची सहज कल्पना करतां येईल.

अशा पुजाऱ्यांची ही वतनदारी मंदिरसंस्थेला अत्यंत घातक ठरूं पहात आहे. काशी, प्रयाग, गया, मथुरा, नाशिक, पंढरपूर, मदुरा, रामेश्वर आदि ठिकाणीं चिकित्सक यात्रेकरूंना ‘ कुठून क्षेत्रांत आलों ! ’ असें म्हणण्याची पाळी येत असते. महाराष्ट्रांत गेल्या ३०।४० वर्षांत जीं प्रवासवर्णनें व यात्रावर्णनें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांत पुजाऱ्यांच्या सौजन्याचा, त्यांच्या संतोषी वृत्तीचा, त्यांच्या सचोटीचा व टापटिपीच्या व्यवहाराचा कोणी चुकूनच उल्लेख केला असेल! उलट पुजाऱ्यांची लाचारी, कोडगेपणा, त्यांच्याकडून होणारा उर्मट छळवाद त्यांचा ओंगळपणा, प्रसाद–पुष्पहार यांचा लबाडीनें होणारा विक्रय आणि त्यांचीं परस्परांतील भांडणें व चढाओढ आदि गोष्टींची शिसारी आणणारीं वर्णनें पानोपानीं आढतील. एवढेंच नव्हे तर, मंदिरांच्या पावित्र्याला कलंक

लावणाऱ्या अनेक भानगडी व्यसनाधीन पुजाऱ्यांनीं मंदिराच्या प्राकारांत चालविल्या आहेत; असेंच त्यावरून स्पष्ट दिसेल. श्रद्धेनें मंदिरात जावें व तेथील अनुभव घेऊन 'पुन्हा क्षेत्रांत फिरकावयाचें नाहीं' असें म्हणण्याचा प्रसंग यावा ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी आहे. वास्तविक मंदिरांतील वातावरणांत प्रशांतता, सौंदर्य, सुगंध, सुस्वर आदि गोष्टींनीं भाविकांना पुन्हा पुन्हा येण्याचें आकर्षण वाटेल अशी विशेषता पाहिजे. अशीं आकृष्ट करणारीं मंदिरें हींच संस्कारांच्या दृष्टीनें अपेक्षित आहेत. पण त्यांच्या जागीं उबग निर्माण करणारीं मंदिरें आज दिसत असतील तर त्यासंबंधीं अधिक खोलांत शिरून विचार करणें नितान्त आवश्यक आहे.

भारतांतील प्रमुख ठिकाणच्या देवस्थानांत वंशपरंपरेनें चालणारा पुजारी वतनदारवर्ग कसा उभा राहिला, हें आपण पाहिलें आहे. पण त्या वर्गाची आजची चिंतनीय अवस्था होण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत, हें नीट पाहिल्यावांचून त्यांत सुधारणा घडविण्याचा मार्ग दिसणार नाहीं. अशी पहाणी करूं लागतां असें ध्यानांत येतें कीं, पुजाऱ्यांच्या आजच्या स्थितीला माणसाची स्वाभाविक लोभी प्रवृत्ति व त्या प्रवृत्तीला चालना देणारी बाह्य समाजस्थिति अशा दोन्ही गोष्टी सारख्याच कारणीभूत आहेत.

एखाद्या ठिकाणच्या पुजारी-कुटुंबाचा निसर्गनियमानुसार विस्तार होतां होतां त्या क्षेत्रांत एकाच उपनांवाचीं अनेक पुजारी कुटुंबें उत्पन्न होतात व मुळांतील पुजारीवतन तितक्या कुटुंबांत विभागलें जातें. 'चिमणरावाच्या चऱ्हाटां'त चित्रित केल्याप्रमाणें ज्या समाजांत वडिलोपार्जित आंब्याच्या व फणसाच्या झाडाच्या फांद्या ह्या देखील सख्खे भाऊ वांटणी करून उपभोगतात, तेथें विपुल पैसा मिळवून देणाऱ्या पुजारीवतनांतील आपला वांटा पदरांत पाडून घेण्यासाठीं वेळप्रसंगीं न्यायालयापर्यंत पुजारी कुटुंबीय धांव घेत असले तर त्यांत नवल काय ? अशी वतनाची विभागणी होतां होतां एखाद्या कुटुंबाला ५।१० वर्षांनीं पुजारीपणाची पाळी येते आणि अशी कांहीं वर्षांच्या अंतरानें येणारी पर्वणी अधिकाधिक लाभदायक करून घेण्यासाठीं जी धडपड होते, त्यांतून शिसारी आणणारे वरील असंख्य प्रकार घडतात. दुसरें असें कीं, अशी वतनाची विभागणी झाल्यावर केवळ पुजारीपणावर उपजीविका करणें त्या विभक्त कुटुंबांना शक्य नसतें. त्यामुळें दुसरा उद्योग करून वतन संभाळणें

क्रमप्राप्त होतें. त्याचा परिणाम असा होतो कीं, उत्तम वेदपठण केलेले, शास्त्रोक्त पूजाविधि जाणणारे आणि पूजेंत रमणारे पुजारी दिवसेंदिवस कमी आढळतात, असा सार्वत्रिक अनुभव सांगावा लागेल. दक्षिण हिंदुस्थानांतील पश्चिम किनाऱ्यावरील देवस्थानचा अनुभव १९६० च्या १४ मार्चच्या 'ऑर्गनायझर' साप्ताहिकांत दिला आहे. तो मोठा उद्बोधक आहे. तो अनुभव असा कीं, 'त्या ठिकाणच्या पंड्यांच्या कुटुंबांतील ३०० शाळकरी वयाच्या मुलांतील केवळ तीन जण भिक्षुकीचें शिक्षण घेत होते !'

मंदिरांतील अवनत पुजारीवर्गावर जो सर्वांगांनीं टीकेचा भडिमार झाला, त्यामुळें पुजारी हा शिक्षित समाजांत एक थट्टेचा व अवहेलनेचा विषय होऊन बसला. त्यामुळें अनेक बुद्धिमान् पुजारी मंडळींनीं प्रतिष्ठित इंग्रजी शिक्षणाचा मार्ग चोखाळून आपल्या वृत्तीला राम राम ठोकला. लोकहितवादींपासून तों प्रबोधनकार ठाकरेपर्यंत असंख्य जणांनीं या वर्गाला सारखें फटकारून काढलेलें दिसतें. लोकहितवादी लिहितात कीं, "ज्यांचें कर्म लोकांचा मूर्खपणा दूर करावयाचें, तेच त्यास वृद्धिकर्ते होतात. याचें कारण असें आहे कीं, ब्राह्मण लोकांची उपजीविका या कामावर आहे. म्हणून ते असा मूर्खपणा वाढवून दोन पैसे आपणास मिळावे, असा बेत अल्पमति करितात." त्या टीकेच्या ओघांत पुढें त्यांनीं या वर्गाला 'अज्ञान व आळस यांचे चौकीदार' व 'निरुद्योगी' म्हणून संबोधिलें आहे. प्रबोधनकार ठाकरे यांनीं तर पुजाऱ्यांना विटून देव व भट ह्या दोघांचेंहि उच्चाटन करण्याचा आदेश दिला आहे. 'देवळाचा धर्म आणि धर्माचीं देवळें' या पुस्तिकेंत ते म्हणतात, "देवा-मुळें भट आणि भटामुळें देवळें. अर्थात् देवाचीच उचलबांगडी केली, तर भटाला व त्याच्या एकमुखी सत्तेला कायमची गति मिळून देवळांच्या इमारती व त्यांचीं उत्पन्नें हव्या त्या देशकार्यांसाठीं आज मोकळीं होतील."

येथें श्री. ठाकरे ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें मूर्तीचें उच्चाटन ज्या संप्रदायांनीं केलें आहे, त्यांना भटांचें उच्चाटन करतां आलेलें नाहीं. पण असें असलें तरी अशा टीकेच्या सरबत्तीमुळें व इंग्रजी शिक्षणानें मिळणाऱ्या प्रतिष्ठेमुळें कमी बुद्धिमान् व वेदाध्ययन वा शास्त्राध्ययन यांत विशेष गति नसलेल्या लोकांच्या हातांत पुजारीपण गेलें. वरील प्रकारच्या टीकेनें पुजाऱ्यांच्या वृत्तींत विशेष पालट झाला नसला तरी 'जाणते, विनयसंपन्न व समाधानी पुजारी निर्माण

केले पाहिजेत' येथपासून तों 'देव व भक्त यांमध्यें ही मध्यस्थाची अडगळ नको' असें वाटण्यापर्यंत एक प्रकारची जागरूकता जनमनांत दिसूं लागली ही गोष्ट खरी. ह्या जागरूकतेमुळें दिवसेंदिवस पुजारीवर्गाच्या लोभी वृत्तीवर आपोआपच नियंत्रण येऊं लागलें आहे. 'जात्युच्छेदक निबंधां'त लोकांनीं जागरूक व्हावें म्हणजे त्यांची कोणीहि छळणूक करूं शकणार नाहीं, असें प्रतिपादतांना स्वातंत्र्यवीर सावरकर लिहितात कीं, "जोंवर यजमान हा भावडेपणा सोडणार नाहीं, तोंवर भटशाहीस लाख शाप दिलेत तरी भट हा असाच डोक्यावर चढलेला असणार. यजमानाची खोड सुटली नाहीं, तोंवर भटाची खोडहि मोडतां यावयाची नाहीं." सावरकरांनीं म्हटल्याप्रमाणें टीकाकारांच्या भडिमारामुळें 'यजमान' जागे होऊं लागले असून त्यामुळें देवळांतील संतापजनक प्रकारांना थोडासा आळा बसूं लागला आहे. पण एवढ्यानें भागणार नाहीं.

परमेश्वराचें स्मरण वा प्रतिमेचें दर्शन होतांच ज्याचें हृदय भक्तिभावनेनें उचंबळून येई व ज्यांचें देहभान जाऊन अष्ट सात्त्विक भाव प्रकट होत असे भगवान् श्रीरामकृष्ण परमहंस हेहि एका मंदिरांत पुजारीच होते. पुजारी नि लाचारी एके ठिकाणीं नांदूं शकत नाहीं, असें आपल्या विशुद्ध व निर्लोभी वर्तनानें दाखवूं शकणारे पुजारी असतील, तर मंदिरें हीं मांगल्याचीं माहेरघरें होतील. पूजा हा आतिथ्याचा आदर्श असतो. असा पूजा करणारा सुहास्यवदन असण्याऐवजीं दर्शनेच्छूंवर गुरगुरणारा, कांहीं प्रसन्नता प्रकट न करतां पैसे घेण्यासाठीं उतावळा झालेला व भक्तीच्या जागीं विषया-सक्तीनें झिंगलेला असणें म्हणजे अमृताच्या ताटांत खरोखरच नरोटी ठेवण्यासारखें आहे! पण श्रीरामकृष्ण परमहंसांच्या कोटींतील पुजारी हा खरोखरच कोटींत एखादा! "चदनं न वने वने," हें सुभाषित या संबंधांत खरें आहे. पण सर्वच ठिकाणीं जातिवंत चंदन होत नसलें तरी खऱ्या चंदनाच्या सान्निध्यानें निंब–बोरी–बाभळीहि त्याचा सुगंध कांहीं प्रमाणांत ग्रहण करून उपयुक्त ठरत असतात हें विसरून चालणार नाहीं. भक्तिपूर्ण जीवन असणारे पुजारी हिंदुस्थानांतील सर्व मंदिरांना मिळवून देण्याची गोष्टच सोडा; पण सध्यां प्रमुख देवस्थानांना असे पुजारी योजनापूर्वक पुरवितां आले, तरी अतिशय मोठी गोष्ट साधली असें समाधान मानावें लागेल.

ह्यासाठीं पहिली गोष्ट म्हणजे देवळांतील पुजारी व गुरव यांना एक–दोन वर्षांचा शिक्षणक्रम पूर्ण केल्यावांचून पूजेचा अधिकार प्राप्त होणार नाहीं, असा दंडक करावा लागेल. हिंदु धर्माचें व संस्कृतीचें श्रेष्ठत्व, संतमहंतांचीं चरित्रें व शिकवण, मंदिरसंस्थेचें महत्त्व, पूजेचा शास्त्रोक्त विधि, आजची समाजस्थिति व ती सुधारण्याची दिशा, भारतीय तत्त्वज्ञान अशा कांहीं विषयांचें पद्धतशीर शिक्षण देऊन त्यांतून पूर्ण संस्कारित असा पुजारीवर्ग उभा करावा लागेल. हें काम समाजधारणेसाठीं प्रस्थापित झालेली श्रीशंकराचार्यांचीं पीठें व समाजांतील विचारवंत ह्यांनीं हातीं घ्यावें. असा वर्ग जुन्या वतनदार पुजाऱ्यांतून उभा करतां आल्यास त्याला आडकाठी नसावी व ते न येतील तर नवा पुजारीवर्ग उभा करण्याची धमक वा ईर्षा असावी. पूर्वी देवाल्यांत सेवा करणाऱ्यांचे चार वर्ग असत. ते म्हणजे आचार्य, पुत्रक, साधक व समयी. त्या प्रत्येकाला शिक्षण घेऊन विशिष्ट आचार-विचारांचें बंधन असणारीं दीक्षा घ्यावी लागे. अशा चार श्रेणींची दीक्षा घेतलेले सुसंस्कारित सेवेकरी मंदिरांतील वातावरणांत नेटकेपणा, पावित्र्य, सौंदर्य यांची जपणूक करीत. आजहि असे सेवेकरी नि पुजारी आपणाला हवे आहेत. मंदिरांतील छळिक व स्वार्थलंपट पुजाऱ्यांवर टीकेचे तडाखे मारीत राहिल्यानें आतां विशेष लाभ होणार नसून त्याच लोकांना किंवा ते सिद्ध नसतील तर त्यांना खो देण्यासाठीं नवीन लोकांना हाताशीं धरून मंदिरांची प्रतिष्ठा राखणारे पुजारी बनविले पाहिजेत. सुदैवानें शृंगेरी येथील मठांत व आद्य श्रीशंकराचार्यांच्या केरळांतील काल्टी या जन्मस्थानीं असे आगम-निगम नि पूजाविधि यांचें शिक्षण देण्याचे उपक्रम चालू झाले आहेत. पण अजून त्यांत म्हणावी तशी प्रगति नाहीं.

असे सुसंस्कारित होण्यास ना नसेल तर आजचा वतनदार पुजारीवर्ग त्याच स्थानावर राहिला तरी चालेल. पण असें शिक्षण न घेणाऱ्यांची वतनदारी लोकांनीं प्रयत्नपूर्वक पाल्टविली पाहिजे. जसे छोटे-मोठे महाराजे दूर करतां आले, तसेच अडाणी व चढेल पुजारी दूर करतां आले पाहिजेत. ह्या कामीं आपणाला प्रत्यक्ष राज्यशासनाचा पाठिंबा मिळण्याची शक्यता कमी आहे. पण लोक मनावर घेतील तर अशा मूठभर लोकांना सद्हेतूनें बाजूला सारणें अशक्य नाहीं. गांवापुढें (अरे) रावाचें कांहीं चालत नसतें, हा सार्वत्रिक अनुभव ध्यानीं

घेऊन प्रयत्न झाले पाहिजेत. तसेंच वतनदारींतून ओघानेंच येणाऱ्या आढ्यतेचें उच्चाटन करण्यासाठीं वंशपरंपरेनें पण निश्चित मासिक वेतन ठरवून पुजारी नेमले पाहिजेत. दैवतासमोर समर्पण करण्यांत येणारी प्रत्येक वस्तु ही त्या देवस्थानाच्या भांडारांत समाविष्ट व्हावी व तेथील व्यवस्थापकांनीं वा विश्वस्तांनीं त्यांतून पुजाऱ्यांना मासिक ठराविक वेतन द्यावें. इतकी दक्षता घेतल्यावर वंशपरंपरेला विरोध नसावा.

मात्र हें वेतन ठरवितांना अगदींच आखडतां हात न ठेवतां, त्या व्यक्तीच्या शिक्षणाच्या मानानें त्याला सन्मानपूर्वक नीट उपजीविका चालवितां येईल अशी दक्षता घ्यावी. अनेक ठिकाणीं अशा धोरणामुळें पुजाऱ्यांची कार्यक्षमता, दक्षता व नेटकेपणा वाढूं लागल्याचें प्रत्ययास येईल. डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर यांच्या समितीनें पुजाऱ्याला किमान ६० रुपये वेतन, अधिक महागाई भत्ता मिळाला पाहिजे; अशी सूचना केली आहे. तसेंच ज्या मंदिरांचें उत्पन्न अत्यंत कमी असेल तेथील पुजाऱ्यांना वेतन देण्यासाठीं शक्य असेल तर, त्याच संप्रदायांतील सधन मंदिरांकडून सहाय्य दिलें जावें, असेंहि त्यांनीं सुचविलें आहे. या दोन्ही सूचनांचा शक्य त्या त्या ठिकाणीं विचार झाला पाहिजे.

आजचा एकूण पुजारीवर्ग पाहिला कीं, मंदिरसंस्थेविषयीं चिंता वाटूं लागते. या परिस्थितींतून मार्ग काढावयाचा तर लोकांनीं व पुजाऱ्यांनीं विचार केला पाहिजे. तसें घडेल तरच मंदिरांतील निष्प्रभ वातावरण पालटूं शकेल. नाहीं तर ...... ?

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 36309 दि: ...
वर्ग ... 9388 ... नों. दि. ...

प्रकरण ५

# मंदिरांतील समर्पण

सबंध हिंदुस्थानांत आज जीं लक्षावधि मंदिरें दिसत आहेत त्या मंदिरांच्या उभारणीमागें प्रामुख्यानें पारंपरिक धर्मिक श्रद्धा उभी आहे. ज्या परमेश्वरानें हें अलौकिक विश्व निर्माण केलें, त्याच्यासंबंधींचा भक्तिभाव समर्पणाच्या रूपानें व्यक्त करण्याची इच्छा मनुष्याला स्वाभाविकपणेंच होते. खरें म्हणजे गंगेंत उभें राहून व तिचेंच ओंजळभर पाणी घेऊन जसें तिला अर्घ्य द्यावे किंवा स्वा. सावरकरांनीं वर्णिल्याप्रमाणें आईच्याच पुष्पवाटिकेंतून सुवासिक टपोरीं फुलें वेचून तीं तिच्या वेणींत गुंफावींत त्यांतलाच हा प्रकार असतो. पण ज्याच्या किरीट-कुंडलांत लक्षावधि चंद्र-सूर्यांचीं हिरेमाणकें जडविलेलीं आहेत, त्या निरंजनाच्या प्रतिमेपुढें इवल्याशा नीरांजनाची दीपकळी पाजळतांना भक्ताच्या हृदयाचा गाभारा खरोखरच समाधानानें ओतप्रोत भरून जातो, हेंहि तितकेंच खरें आहे.

प्रारंभीं मूर्तिपूजेचा विशेष प्रचार नसतांना वैदिक काळांत श्री अग्निनारायणाच्या रूपानें व्यक्त होणाऱ्या परमेश्वराला आहुति व बलि अर्पण करण्याची पद्धति होती. पुढें बौद्धकाळानंतर मूर्तिपूजा व मंदिरसंस्था विशेष लोकप्रिय व देशव्यापी झाल्यावर इष्ट देवतेसाठीं मंदिर, पूजा-साहित्य, विहिरी, धर्मशाळा,

वाद्यें, नर्तिका, घंटा, शेतें, अलंकार, पालखी, उंची वस्त्रें व विविध प्रकारचें धन अर्पण करण्यांत येऊं लागलें. यज्ञांत आहुति देतांना जी भावना असते ती भावना अशा समर्पणांतून व्यक्त होऊं लागली. पूर्वी यज्ञयाग करून त्यांतून समर्पण करण्याचा अधिकार व शक्यता फारच थोड्यांना असे, उलट मंदिरसंस्थेनें हें समर्पणाचें महाद्वार सर्व लोकांना खुलें करून दिलें. वैदिक यज्ञयागाच्या मार्गानें होणारें बलिदान, पुरोहितांना देण्यांत येणारी दक्षिणा, वेद मुखोद्गत करून त्यांचें करण्यांत येणारें संरक्षण, धार्मिक व्रतपालन, वैश्वदेवांतील आहुति व आतिथ्य आदि गोष्टींना 'इष्ट' संबोधण्यांत येतें व बलिदानानंतर देण्यांत येणाऱ्या दक्षिणा, ग्रहण–कपिलाषष्ठी--कुंभमेळा अशा वेळीं करण्यांत येणारें दान, धर्मादाय म्हणून बांधण्यांत येणाऱ्या विहिरी व तळीं, इष्ट देवतांसाठीं मंदिरें बांधणें, रथोत्सवासाठीं आर्थिक व्यवस्था करणें, अन्नसंतर्पण व रोग्यांच्या सेवेसाठीं दान ह्या गोष्टी 'पूर्त' म्हणून मानण्यांत येतात. श्रौत मार्गानें होणारें समर्पण तें 'इष्ट' व स्मार्त पद्धतीनें करण्यांत येणारें समर्पण तें 'पूर्त' असें थोडक्यांत सांगतां येईल. इष्ट काय किंवा पूर्त काय ह्या दोन्ही मार्गांनीं एकच भक्तिभाव व्यक्त होत असतो.

पूर्तांत मोडणाऱ्या दानाव्यतिरिक्त 'नवससायास' या रूपानेंहि मंदिरांत दान घडत असतें. या प्रकारचें दान अतिशय मोठ्या प्रमाणावर होत असल्यानें त्या 'नवस' करण्यामागील भूमिकेचें प्रस्तुत स्थळीं थोडें परीक्षण करणें आवश्यक आहे. सामान्यतः ज्याला सांसारिक जीवनांत कांहीं इच्छा व अभिलाषा नाहीं अशी व्यक्ति मिळणें अशक्य कोटींतील गोष्ट आहे. पण आपणाला एखादी गोष्ट पाहिजे म्हणून आपल्या शक्त्यनुसार प्रयत्न केला तर त्यांत यश मिळेलच अशी शाश्वती नसते. लक्षावधि लोकांच्या इच्छा या अपुऱ्या राहतात व त्यामुळें 'सुख पहातां जवापाडें। दुःख पर्वता एवढें ॥' असा तुकारामांनीं वर्णन केलेला अनुभव, हाच कमी–अधिक प्रमाणांत प्रत्येकाच्या वांट्याला येत असतो. एवढेंच नव्हे तर 'अपूर्तता' हा मानवी इच्छांना मिळालेला शाप असावा, असेंच अनेकदां वाटतें. 'मनांत येतें हत्ती घोडे पालखींत बैसावें। देवाजीच्या मनांत मजला पायिं चालवावें ॥' असेच असमाधानाचे सूर कोणत्या ना कोणत्या तरी रूपांत माणसाच्या मनांतून घुमत असतात. ह्या इच्छांच्या असफलतेप्रमाणेंच माणसाच्या जीवनांत लहान-

मोठ्या अडचणी व संकटें अनपेक्षितपणें उभीं राहत असतात या अडचणींचें व संकटांचें निराकरण करण्याला मनुष्य स्वाभाविकपणेंच प्रवृत्त होतो. पण कांहीं वेळां आलेलें संकट त्या व्यक्तीच्या दृष्टीनें इतकें भयानक असतें कीं, त्यांतून मार्ग निघण्याची शक्यता न दिसल्यानें तो गोंधळून गेलेला असतो. अशा वेळीं तो ईश्वरी सत्तेकडे आर्ततेनें सहाय्यासाठीं जी धांव घेतो, तिचें व्यावहारिक रूप म्हणजे ' नवस ' होय. ' देवा, तुझ्या कृपेनें माझी अडचण दूर होवो किंवा माझी इच्छा पूर्ण होवो म्हणजे मी तुला अमुक अमुक अर्पण करीन ' असें त्या नवसाचें रूप असतें. कोणाला पुत्र हवा असतो, तर कोणाला बढती ! कोणाच्या मुलीचें लग्न जमावयाला पाहिजे असतें, तर कोणाला दुर्धर रोगांतून मुक्तता ! अशा गांजलेल्या लोकांनीं आपला कुंठित झालेला मार्ग मोकळा करून घेण्यासाठीं परमेश्वराला मारलेली हांक म्हणजे ' नवस ' होय.

पण ह्या आर्ततेंत माणसाच्या मनाच्या कोतेपणाची छटा उमटल्यावांचून राहिलेली नाहीं. त्यानें जसें निराकार परमेश्वराला कल्पनेनें आपल्याच रूपांत उभें केलें, त्याचप्रमाणें कांहीं आपलेच स्वभावदोष त्यानें त्याला चिकटविले. देव रागावत असेल, देव त्याच्या केलेल्या स्तवनानें व त्याला कांहीं अर्पण केल्यानें प्रसन्न होत असेल, ही माणसाच्या वृत्तीची ईश्वराच्या ठिकाणीं कल्पनेनें पाडलेली पडछाया आहे. मनुष्य व्यवहारांत रागावलेल्या व्यक्तीचा राग वा रुसवा काढण्यासाठीं त्याला प्रसन्न करणारें आश्वासन देतो किंवा कांहीं मूल्यवान् वस्तु देऊं करतो. तसेंच आपल्या मुलाला कोठें कामधंदा लावून देणाऱ्या संबंधित अधिकारी व्यक्तीला धनरूपानें वा फळफळावळींच्या रूपानें कांहीं भेट अर्पण करण्याची त्याला खोड आहे. हीच व्यावहारिक खोड अगतिक झाल्यावर देवासंबंधांतहि प्रकट झाली तर त्यांत नवल काय ? सत्तेपुढें शहाणपण नसतें व अडचणींत सांपडला म्हणजे वेळप्रसंगीं अभिमान व ताठा सोडून अडल्या नारायणाला गाढवाचे पाय धरावे लागतात, हा लवचिक व्यवहारांतील विचित्र अनुभव ज्याच्या हाडींमांसीं अगदीं खिळलेला आहे त्याच्या वृत्तीचें तें क्षुद्रत्व, अगतिक झाल्यावर देवाला हांक मारतांना दिसून आलें तर त्यांत आश्चर्य कसलें ? दुसरें असें कीं, अडलेल्या व्यक्तीच्या हाकेला ओ देऊन त्याला मोकळा करावा ही इच्छा जेथें आपणासारख्या सामान्य माणसालाहि होऊं शकते, तेथें ' दयाघन–कृपानिधि ' म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो, त्या

दा. क्र. 75967

परमेश्वराचा आपणाला आधार मिळेलच असें माणसाला वाटलें तर त्यांत वावगें काय ? ‘ नवस ’ ही परमेश्वराला लाच देणें होय, अशी टीका आजकाल केली जाते. पण आपल्या दैनंदिन व्यवहारांत ज्या लाचलुचपतीचा धुमाकूळ चालू आहे, त्या लाचेच्या प्रकारापेक्षां ‘ नवस ’ हा प्रकार निःसंशय श्रेष्ठ मानावा लागेल. आपल्या व्यवहारांत लाच देणारा व घेणारा हे दोघेहि इतरांवर अन्याय करून सामाजिक दृष्टीनें अधःपतित होत असतात. उलट नवस करणारा मनुष्य आपल्या बुद्धीच्या आणि ज्ञानाच्या आवाक्यानुसार देवाला प्रसन्न करण्यासाठीं कांहीं देण्याला उद्युक्त होत असेल, तर त्यानें सर्वसाक्षी अशी परमेश्वरी शक्ति फसूं शकेल हें संभवत नाहीं. श्रीरामकृष्णांनीं म्हटल्याप्रमाणें ज्याला मुंगीच्या पायांतील पैंजणांची रुणझुण ऐकूं येते व ज्यानें कर्मानुसार प्रत्येक माणसाला धारवाडी काट्यानें फळ मिळण्याची व्यवस्था करून ठेवली आहे त्याला कोण फसवूं शकणार ? त्यामुळेंच सर्व नवस सफल होत नसतात.

पण ‘ नवस ’ करणाऱ्या माणसाचें, त्यानें ज्या हेतूनें नवस केला असेल त्या उद्दिष्टावरील लक्ष अधिक एकाग्र होत असतें व ईश्वरी आधार आपणास लाभेल अशा आशेनें, गोंधळलेल्या चित्ताला थोडीशी स्थिरता लाभून नीट विचारपूर्वक प्रयत्न करण्यास अनुकूलता मिळते. छत्रपति शिवाजीमहाराज आग्र्याला औरंगजेबाच्या कारावासांत पडले असतां, देव आपली हांक निश्चित ऐकेल या विश्वासानें नवस करणाऱ्या जिजामातेला केवढा आधार मिळाला असेल ! तसेंच कारस्थानी व घरभेद्या राघोबादादा पेशव्यांचें उच्चाटन करून त्या गादीवर श्रीमंत नारायणरावांचा न्याय्य वंशज बसवितां यावा म्हणून प्रयत्नरत असणाऱ्या ‘ बारभाई ’नींहि, आपल्या प्रयत्नांना ईश्वरी शक्तीची जोड मिळावी म्हणून नवस केले होते आणि सवाई माधवरावांच्या जन्मानंतर १ लक्ष ३४ सहस्र रुपये खर्चून त्यांनी ते पूर्ण केले. महाराज रणजितसिंगांनीहि एका संकटांतून मार्ग निघावा म्हणून आपणाजवळील सुविख्यात कोहिनूर हिरा पुरीच्या श्रीजगन्नाथाला अर्पण करण्याचा संकल्प सोडला होता. सामाजिक व राष्ट्रीय क्षेत्रांतील अशा रणधीर धुरंधरांनाहि जेथें अगतिकता येते, तेथें संसार करतांना मेटाकुटीस येणाऱ्या सर्वसामान्य व्यक्तीची स्थिति काय सांगावी ? नि अशा केविलवाण्या अवस्थेंत

मानवी प्रयत्न थकूं पहात असतां त्यांना जो नवसाचा मार्ग सुचतो तो त्या गोंधळलेल्या व हतोत्साहित माणसाचें धैर्य सावरून धरण्यास कारणीभूत होत असला तर त्याला टाकाऊ कसें म्हणावें ? जाणत्या माणसाच्या दृष्टीला जी गोष्ट क्षुद्र व टाकाऊ वाटेल, तीच गोष्ट विचारशीलतेनें त्याच्याहून निकृष्ट स्तरावर असणाऱ्यांना उपकारक वाटणारच नाहीं असें सांगणें कठीण आहे. 'बागुलबोवा' हा प्रकार खरा काय आहे हें मोठ्या माणसाला माहिती असल्यानें त्याची करमणूक होत असली तरी हट्ट धरून बसलेल्या वा भोकाड पसरलेल्या अजाण मुलाला त्याच्या दर्शनानें पंचानन आठवल्यावांचून राहत नाहीं. तोच प्रकार येथेंहि आहे. खरें सुख कशांत आहे– भोगांत कीं त्यागांत, आपल्या वांट्याला येणारीं दुःखें हा कशाचा परिपाक आहे, अशा अगदीं मूलगामी प्रश्नांचा उलगडा जों जों होऊं लागेल तों तों 'परमेश्वरा, मी तुला कांहीं अर्पण करण्यास असमर्थ आहें' असे उद्गार मुखांतून सहज उमटूं लागतील. पण अशी उमज अनेक नवस करावयास भाग पाडतील इतक्या संकटांतून जातां जातां माणसाला होऊं लागते. तोंवर देवाला बकरा-कोंबडें, खण-नारळ, अलंकार, कळस, मुकुट अशा गोष्टी अर्पण करण्याचे नवस बोलले जाणारच. अस्तु.

मंदिराला कांहीं समर्पण करण्यामागें आणखीहि कांहीं प्रेरक गोष्टी असूं शकतात. त्यांतील 'दानशूरत्व' सिद्ध करण्याची हौस ही एक समर्पणामागील प्रभावी प्रेरणा असते. जसें शक्तिशाली सैन्य, अद्ययावत् शस्त्रास्त्रें व धन ह्या गोष्टी जवळ असणाऱ्या राष्ट्राला साम्राज्य निर्माण करण्याची इच्छा होते, त्याचप्रमाणें आर्थिक क्षेत्रांत यशस्वी ठरलेला मनुष्य 'दानशूरत्त्वा'साठीं धडपडतो. ज्या दानामागें इतरांच्या कल्याणाच्या सद्भावनेशिवाय अन्य कोणत्याहि भावनेची छटा उमटलेली नसते, तें दान अत्यंत श्रेष्ठ व पवित्र. पण असें दान हें दुर्मिळच घडत असतें. बहुतेक दानांच्या मागें लोककल्याण नि ईश्वरभक्ति अशा हेतूसमवेतच लोकेषणाहि चिकटलेली असते. देवळांतील साधी फरशी बसविल्यावर त्यांत दात्यानें आपल्या नांवाची एक पाटी बसविण्याची दक्षता घेतलेली दिसेल व देवापुढें एखादी घंटा बांधली तरी त्यावर देणाऱ्याचें नांव आढळेल. ठिकठिकाणीं असणारे शिलालेख हे देखील बहुधा अशा दानशूरांचें स्मरण करून देण्यासाठींच असतात. लोकेषणेवर मात करतां येणें हें कर्म महा कठीण आहे! नव्या करारांत म्हटल्याप्रमाणें "उजव्या

हातानें दिलेलें दान त्याच व्यक्तीच्या डाव्या हाताला कळूं नये. " पण दानाची वाच्यता न करण्याइतकी निःस्वार्थता सहज बाणणारी नाही. जन्मोजन्मींच्या पुण्याईचा परिपाक म्हणून अशी निःस्वार्थता क्वचितच कोठें संभवते. अन्य ठिकाणीं दातृत्वामागें लोकेषणा ही चंद्रावर डाग असावा इतक्या प्रमाणांत तरी आढळतेच. काशीचा मनकर्णिका घाट हा बारामतीकर सदाशिवराव जोशी ह्यांनीं बांधला. तो बांधून पूर्ण झाल्यावर त्यांची सगळीकडून वाहावा झाली. त्यामुळें प्रसन्न होऊन ते एका पत्रांत म्हणतात कीं, "श्रीमनकर्णिका घाट सिद्ध होऊन आजी पांच वरसें. कार्तिकी पौर्णिमेस दीप लागती तेव्हां श्रीकैलास होऊन जातो. पन्नास हजार माणूस मज धन्य धन्य म्हणतात. आणि मी नाना स्वामीस धन्य म्हणतों. " देवळांना देणगी देण्यामागील उद्देशाविषयीं लिहितांना फ्रेंच लेखक आब्बे ज्झा आ द्युब्बुआ ( Abb'e J. A. Dubois ) म्हणतो कीं, " वृथाभिमान, श्रीमंतीचा पोकळ डामडौल मिरवण्याची इच्छा व इतरांच्या डोळ्यांत भरण्याची हौस ह्या गोष्टी प्रामुख्यानें श्रीमंतांच्या दातृत्वाला प्रेरक ठरत असतात. " पण सत्ता-सन्मानासाठीं का होईना, लक्षावधि रुपये देण्याइतकी उदारता असणें ही राजस दानाची वृत्ति हीन लेखतां येणार नाहीं. आपल्या व्यापारांत विक्रीच्या वस्तूवर अधिकाधिक लाभ उकळण्यासाठीं दक्ष असणाऱ्या व्यापाऱ्यानें, तेच पैसे केवळ लौकिकाच्या मानसिक समाधानासाठीं देऊं करणें हा एक प्रकारचा व्यापारच होय ! पण त्या व्यापारांत उदात्ततेचा स्तर निःसंशय उंचावलेला असतो. अशा राजस दानांतूनच मंदिरसंस्थेचें बाह्य ऐश्वर्य आश्चर्य करण्याइतकें वाढलेलें आहे; एवढेंच नव्हे तर एकानें दिलेल्या दानानें इतरांना दातृत्वाची अखंड प्रेरणा मिळत आलेली आहे.

पण दातृत्वामागें लौकिकाची ओढ कांहीं प्रमाणांत असली तरी कांहीं जणांच्या दातृत्वांत 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' पुण्य संपादण्याचा अत्यंत सोज्वल हेतु हाच प्रधान असतो. हिंदुस्थानांत दातृत्वानें विख्यात झालेल्या राणी अहिल्यादेवी होळकर ह्यांच्या उदारतेचा उगम अशा अलौकिक सात्त्विकतेंत झालेला दिसतो. त्या साध्वीनें मंदिरांचे जीर्णोद्धार केले. नवी मंदिरें बांधलीं. पुण्यक्षेत्रीं प्रचंड घाट बांधून दिले. धर्मशाळा, तळीं, विहिरी, सभामंडप, अन्नछत्रें, सदावर्तें अशा नाना प्रकारांनीं तिनें यात्रिकांची नि भाविकांची सर्वत्र सोय करून दिली. आपल्या कोषागारांत असणाऱ्या १५।१६ कोटि रुपयांपैकीं

कोट्यवधि रुपये ह्या साध्वीनें सर्व भारतांतील अनेक मंदिरांच्या योगक्षेमासाठीं हंसतमुखानें व सेवाभावानें अर्पण केले. तिनें आपल्या उत्कट भक्तीनें व श्रद्धेनें अखंड हिंदुस्थानची पुण्यभूमि जणूं हृदयाशीं कवटाळली होती असेंच म्हणणें युक्त दिसेल. तिच्या दातृत्वाचें गुणगान करतांना श्री. रा. भि. जोशी आपल्या 'वाटचाल' या प्रवासवर्णनांत म्हणतात कीं, "अहिल्याबाईचीं हीं पुण्यस्मारकें म्हणजे अध्वखिन्न यात्रेकरूंच्या पाठीवरून फिरणारा, त्यांचा शीणभाग घालविणारा, त्यांची भाविकता जागृत करणारा मातेचा प्रेमळ हात आहे." अशा अहिल्यादेवींच्या कोटींत स्वर्गीय स्वामी विशुद्धानंद तथा बाबा काळी कम्मळीवाले ह्यांचें नांव घ्यावें लागेल. हिमालयांतील चारी धामांची यात्रा करतांना १८८४ मध्यें त्यांना जे अनुभव आले त्यावरून यात्रेकरूंसाठीं अनेक सोयी केल्या पाहिजेत असा विचार तीव्रतेनें त्यांच्या मनांत उदित झाला. त्यानंतर त्यांनीं कलकत्त्याला प्रायोपवेशन चालू करून लोकांचे लक्ष त्या सत्कार्याकडे खेचून घेतलें व त्यांतून लक्षावधि रुपयांचा निधि उभा केला. त्या निधींतूनच यात्रिकांना सर्व दृष्टींनीं आधार वाटणारी एक संस्था नांवारूपास आली. हिमालयाच्या बिकट यात्रेंत ठायीं ठायीं असणारीं सदावर्तें, धर्मशाळा, पाणपोया, शीतनिवारणासाठीं अंथरूण-पांघरूण देण्याची सोय, अशा अनेक गोष्टी त्या 'काळी कम्मळीवाले' या संस्थेनें उभ्या केल्या असून त्या सोयींचा वर्षानुवर्षें लाभ घेणारे लक्षावधि यात्रिक त्या लंगोटी लावणाऱ्या निरिच्छ विशुद्धानन्दांना मुक्तकंठानें दुवा देत आले आहेत.

मनांत डांचणाऱ्या पापाच्या क्षालनासाठींहि मंदिराला देणग्या देणारे लोक असतात. लोकांना ठकवून लोभी मनुष्य पैसे खात असला वा लोकांच्या वित्ताचें अपहरण करूनहि जगांत सभ्य म्हणून मिरवत असला, तरी त्याचें मन त्याला आंतून भुंग्याप्रमाणें पोखरीत असतें. ही अंतर्यामींची रुखरुख शमविण्याच्या अंतस्थ हेतूनें उदार होऊन अशीं माणसें देणग्या देत असतात. बाह्यतः भक्तीचें स्वरूप दिसत असलें तरी मनाला अस्वस्थ करणाऱ्या पापाच्या तीव्र जाणिवेंतून असें दातृत्व घडतें. हें गुह्य सहसा प्रकट होत नसलें तरी निकटवर्ती लोकांत 'करून करून भागला नि देवपूजेला लागला' अशी कुजबूज उमटल्यावांचून राहत नाहीं. अशा दातृत्वांतून पापाचा भार प्रत्यक्ष हलका होतो अशी त्याची कल्पना असते. पण पापानें मिळविलेल्या धनाचा कांहीं वांटा देवाला अर्पण

केल्यानें पाप पचतें, अशी विकृत धारणा असेल व त्यांतून पुन्हां पुन्हां तसाच दुराचार घडणार असेल, तर तें दातृत्व परिणामीं त्या व्यक्तीला धुळीला मिळविल्यावांचून राहणार नाहीं. मात्र, हें समर्पण जर पश्चात्तापाच्या आसवांचे अर्घ्य सोडून झालेलें असेल, तरच पापक्षालनाची आशा करण्यास अवसर आहे. गोरगरिबांकडून भरमसाट व्याज उकळणारे सावकार, काळ्या बाजारांत पारंगत असणारे व्यापारी, खून करून नातलगांचें धनापहरण करणारे पाषाण-हृदयी लोक देवाला मणामणाचे भोग चढवितात व वस्त्रालंकारांनीं आभूषित करतात ही गोष्ट खरी. एवढेंच नव्हे तर, वर्षानुवर्षें भूमिगत असणारे सराईत दरवडेखोर हे देखील पाली-जेजुरी येथील खंडोबाच्या छबिन्यांत समाविष्ट होऊन भंडारा, खोबरें व खारका यांचा पालखीवर वर्षाव करण्यास चुकत नाहींत, असें सांगतात! अबूच्या पहाडावर जीं जैनांचीं कलापूर्ण व ऐश्वर्यसंपन्न संगमरवरी मंदिरें आहेत, त्यांच्या उभारणीमागेंहि असाच 'पापक्षालनाचा हेतु' असणें असंभवनीय नाहीं. तीं मंदिरें बांधण्यास विमलशहानें दहा कोटी रुपये खर्च केले, हें कळल्यावर मन भांबावून जातें. पण विमलशहा व त्याचे पूर्वज यांनीं ही संपत्ति इंग्रजांचे हस्तक बनून, त्यांना भारतीय राज्यकर्त्यांची माहिती पुरवून, म्हणजेच स्वजनद्रोह करून मिळविलेली होती. हें त्या संपत्तीचें खरें स्वरूप समजल्यावर मन खिन्न व लज्जित झाल्यावांचून राहत नाहीं!

अशा प्रकारच्या दातृत्वांतूनहि मंदिरांच्या प्राकारांत कांहीं चांगल्या गोष्टी घडलेल्या आहेत. १९४८ च्या पंजाबमधील शिक्षणविषयक परिस्थितीचा आढावा घेतांना डॉ. लैटनर म्हणतो कीं, "परकीयांच्या स्वाऱ्या व आपसां-तील यादवी यांनीं देशांत बजबजपुरी माजली असतांहि पंजाबांत शिक्षणसंस्था वाढतच होत्या. उलट्या काळजाचे संस्थानिक, लोभी व हावरे सावकार, फार तर काय पण दरवडेखोरसुद्धां आपल्या पापाचें क्षालन व्हावें व मनास शांति लाभावी म्हणून धर्मशिक्षणसंस्थांना सहाय्य करीत व विद्वानांचा परामर्श घेत. असें एकहि देवालय अथवा धर्मशाळा नव्हती कीं, जेथें धार्मिक शिक्षणा-करितां शेंकडों मुलें जमत नसत."

देशाला परतंत्र करून आपलीं देवळें-रावळें उध्वस्त करणाऱ्या शत्रूला पराभूत केल्यावर त्या विजयाच्या आनंदांत शूर राजांनीं आणि त्यांच्या सेनापतींनीं अनेक मंदिरें उभारलीं आहेत व असंख्य प्रकारच्या अमोलिक वस्तु

दैवताला समर्पून गांवेंच्या गांवें मंदिरांच्या व्यवस्थेसाठीं लावून दिलेलीं आहेत असें इतिहास सांगतो. ' तीर्थक्षेत्रें मोडिलीं। ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ' हें पाहून समर्थ रामदासांनीं कळवळून देवाचा धावा केला होता. त्याच समर्थांना छत्रपति शिवाजी राजांनीं ' अभक्तांचा क्षयो ' करून ' मोडिलीं मांडिलीं क्षेत्रें। आनंदवनभुवनीं। ' असें समाधान व्यक्त करण्याचें सौभाग्य लाभलें. हीं जीर्णोद्धारित तीर्थक्षेत्रें म्हणजे त्यांच्या जयिष्णु वृत्तीचीं स्मारकेंच होत. विजयनगरचा सम्राट् कृष्णदेवराय यानेंहि दक्षिणेंतील शेंकडों मंदिरांचा जीर्णोद्धार करून यवनांच्या आक्रमणानें खंडित झालेली परंपरा पुन्हां अधिक वेगानें प्रवाहित केली. बाराव्या शतकांत अजमेरच्या अरुण देवरायानें मुसल्मानांना पराजित करून भूमीच्या शुद्धीसाठीं यज्ञ केला व तेथें एक प्रचंड मंदिर बांधलें. मारवाडचे राजे जसवंतसिंग व वख्तसिंग यांनींहि मुसल्मानांनीं हिंदु-मंदिरें पाडून बांधलेल्या मशिदींचें उच्चाटन करून पुन्हां भव्य मंदिरें उभारलीं असें इतिहास सांगतो. विजयाच्या उत्साहांत जशी माणसाची छाती अभिमानानें फुलते, मान ताठ व मस्तक उन्नत होतें, त्याच-प्रमाणें त्या वेळच्या शिल्पालाहि डौलदार, कलापूर्ण, भव्य व दिव्य असा घाट आल्यावांचून राहत नाहीं. बौद्ध व जैन सांप्रदायिकांच्या मताचें खंडन केल्यावर वेरूळ येथें जें कैलास लेणें साकार झालें, तें तेथील तत्पूर्वीच्या सर्व लेण्यांना मागें टाकणारें ठरलें, याचें मर्म राष्ट्रकूट घराण्यांतील दानशूर कृष्णराजाच्या विजयोत्साहांत सांपडेल. स्वातंत्र्योत्तर काळांत सरदार पटेलांच्या प्रेरणेनें पुन्हां बांधलेल्या श्रीसोमनाथाच्या मंदिराची भव्यता व कलापूर्णता ही त्याच विजयाकांक्षेची निदर्शक होय; मनुष्य-स्वभाव येथून तेथून सारखाच असल्यानें ब्रह्मी सरकारनें स्वातंत्र्याच्या आनंदपूर्ण घटनेच्या स्मरणार्थ कोट्यवधि रुपये खर्चून ' कब्रा–ए–पॅगोडा ' हें भगवान् बुद्धाचें जें नूतन मंदिर उभारलें आहे, तेंहि अत्यंत भव्य व सुंदर असल्याचें सांगतात. जर्मन तत्त्ववेत्ता नित्शे म्हणतो कीं, " वास्तुरचनेंत मनुष्याचा स्वाभिमान....त्याची सत्तेची महत्त्वाकांक्षा साकार होत असते. शिल्प म्हणजे आकाराच्या माध्यमांतून प्रकट झालेलें, एक तऱ्हेचें सामर्थ्याचें वक्तृत्वच होय. " महाराष्ट्रांतील पंढरपूर, नाशिक, त्र्यंबकेश्वर, कोल्हापूर, वाई, मेणवली, तासगांव, धावडशी, भुलेश्वर अशा अनेक स्थानीं असें सामर्थ्याचें अलौकिक वक्तृत्व प्रकट झालेलें दिसतें. प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या कोषागारांत असणाऱ्या रत्नजडित अलंकारांतील एकेक टपोरें,

पैलूदार व सतेज रत्न एकेका नररत्नाच्या विजयाचें तेज घेऊन चमकतांना आढळेल. अशा विजयाच्या ओसंडत्या उत्साहांतून पेशव्यांचें सेनापति हरिपंत फडके यांनीं बदामी जिंकून घेतल्यावर तेथील वेस, दगड आणि दगड नगारखान्यासुद्धां तेथून वाहून नेऊन अष्टविनायकांपैकीं सुप्रसिद्ध असलेल्या सिद्धटेकच्या गांवाशिवेवर उभी केली ! एकूण विजय आणि मंदिरें यांचें असें नातें आहे.

परक्यांच्या उच्चाटनानंतर जशीं मंदिरें बांधलीं गेलीं, त्याचप्रमाणें वैदिकेतर मतांना मागें टाकण्यासाठींहि मंदिरें उभारण्याचा उपक्रम झालेला आहे. अर्थात् ही चढाओढ 'शकपूर्व सहाशेंपासून शकोत्तर चारशेंपर्यंत तब्बल एक हजार वर्षें' चालू होती व त्यांत जैन व बौद्ध मतानुयायी 'ह्यांचें पाखंड नरम होत होत शकोत्तर एक हजाराच्या सुमारास ह्या देशांतून समूळ उध्वस्त झालें," असें इतिहासाचार्य वि. का. राजवाडे ह्यांचें प्रतिपादन आहे. यानंतरहि अन्य मताभिमान्यांनीं डोकें वर काढण्याचा प्रयत्न केला कीं कोणी तरी जागरूकतेनें त्यांना मागें टाकण्यासाठीं पुढें सरत असे. पेशवाईच्या उत्तरकालांत पंढरपूरचा विठ्ठल हा जैनांचा देव आहे, वैदिकांचा नाहीं, असा प्रचार उमटूं लागला असावा. कारण त्याच वेळीं पांडुरंगाचे एक भक्त श्रीज्योतिबुवा महाभागवत हे पंढरपूरला गेले असतां त्यांना पांडुरंगानें स्वप्नांत विप्रवेषांत दर्शन देऊन आदेश दिला. तो असा कीं, "मला नास्तिक लोक जैनांचा देव म्हणतात, तरी ठिक-ठिकाणीं माझीं देवालयें बांधून भागवत–धर्माचा विस्तार करा." अर्थात् मनीं असें तें स्वप्नीं दिसे, ह्या न्यायानें हा दृष्टान्त झाला असणें संभवनीय आहे. झांशी संस्थानच्या मंत्रिपदाचें त्यागपत्र देऊन निघालेल्या ज्योतिबुवांनीं तो आदेश शिरसावंद्य मानून ठिकठिकाणीं १५०० विठ्ठलमूर्ति स्थापन करण्याचा संकल्प सोडला व श्रीमंत पेशवे व नाना फडणीस अशा मंडळींना ह्या कामीं उद्युक्त करून उज्जैनीपासून भागानगरापर्यंत संचार करून अनेक विठ्ठलमंदिरें बांधलीं. वाई, माहुली, चरेगांव, पाटण, मसूर, बेळगांव, मिरज, सावंतवाडी, रत्नागिरी, उरण, ठाणें, वसई, कल्याण, नासिक, त्र्यंबकेश्वर, येवलें, बाळापूर, अकोलें, नागपूर अशा ठिकठिकाणीं लक्षावधि रुपये खर्चून त्यांनीं उभारविलेलीं मंदिरें दाखवितां येतील.

अशा तऱ्हेनें पुण्यसंचय, नवस, लोकेषणेची हौस, पापविमोचन, विजय नि

चढाओढ अशा विविध कारणांनीं मंदिरांची उभारणी, जीर्णोद्धार व मंदिरांना उपयुक्त अशा वस्तूंचें समर्पण सतत होत राहिलें. त्या समर्पणाचा अधिक वांटा सर्व भारताला पवित्र वाटणारीं तीर्थक्षेत्रें व राजघराण्यांचीं कुलदैवतें यांना मिळालेला आहे. महंमदानें लुटलेल्या सोमनाथासारख्या विख्यात ज्योतिर्लिंगाच्या ऐश्वर्याचें वर्णन आजहि स्तंभित करणारें आहे. गाभाऱ्यांतील रत्न-दीप, तेरा मजली गोपुरें, त्यांवरील १४ भव्य सोनेरी कळस, ३५० गायिका व नर्तिका, प्रतिवर्षी ८ लक्ष रुपयांचें देवाला देण्यांत येणारें द्रव्य, १० सहस्र गांवांचें देवालयाला लावून दिलेलें उत्पन्न, चंदनी दरवाजे, विशाल घंटा, त्यांच्या दोनशें मण वजनाच्या सुवर्णाच्या साखळ्या, सहस्रावधि सेवेकरी नि पुजारी अशा आणखी अनेक गोष्टींचा अंतर्भाव या ऐश्वर्याचें साग्र वर्णन करतांना करावा लागेल. महंमदानें जी लूट नेली ती "त्या काळीं दोन कोटी पौंड म्हणजे आजचा अंदाज तीस कोटी असावा." असें रियासतकारांनीं १९२७ मध्यें म्हटलें आहे! महंमदानें मुलतानचें देवालय पाडून लूट केली त्यांत २३० मण वजनाच्या सुवर्णमूर्ती होत्या व १३२० मण सोनें त्याला तेथील हांड्यांमध्यें सांपडलें! मालिक काफूरनें दक्षिणेंत रामेश्वर व मदुरा या मंदिरांची लूट केली, त्याचें वर्णनहि मनाला चकित व व्यथित करणारें आहे. तेथून २७५० पौंड वजनाचें सोनें व ३०० हत्ती त्यानें लुटले, असे मुसलमान इतिहासकार सांगतात. १६६९ मध्यें औरंगजेबानें केलेल्या लुटीला तर सीमाच नव्हती! डोळे व अलंकार या ठिकाणीं उंची हिरे-माणकें जडविलेल्या १५ फूट उंचीच्या पांच सुवर्णमूर्ति एकट्या मथुरेंतून त्यानें लुटून नेल्या. १४८१ मध्यें विजयनगरचा व तेथील कलापूर्ण मंदिरांचा विध्वंस करणाऱ्या तिसऱ्या महंमद-शहाच्या संयमाची (!) प्रशंसा करतांना इतिहासकार फिरिस्ता म्हणतो कीं, "...त्यानें सुवर्ण, हिरेमाणकें व रुपें याव्यतिरिक्त कांहींच नेलें नाहीं!" चौदा कॅरेट सोन्याच्या आजच्या युगांत, मंदिरांच्या ऐश्वर्याची लूट पूर्वी कशी झाली, याची कारुण्यपूर्ण कथा किती म्हणून सांगावी!

आजहि बद्रीनारायण, काशी, डाकोर, पालिठाणा, गिरनार, नाथद्वारा, तिरुपति, मदुरा, रामेश्वर आणि मद्रास भागांतील अनेक देवालयें हीं शिल्प व ऐश्वर्य ह्या दृष्टीनें समृद्ध आहेत. वानगीसाठीं कांहीं मंदिरांकडे जातां जातां दृष्टिक्षेप करणें इष्ट ठरेल. नाथद्वारा येथील देवस्थानाच्या उत्पन्नांतून मुंबईला

५४ चाळी बांधलेल्या असून त्यांतून सहस्रावधि रुपये मिळत असतात. नाथद्वाराचें १९५९-६० या वर्षाचें उत्पन्न १८ लक्ष रुपये होतें ! बदरीनारायणाच्या स्वामित्वाचीं २०० गांवें असून अंशतः स्वामित्वाचीं १५० खेडीं आहेत. देवापुढें दीड-दोन लाख रुपये ठेवले जातात व गांवांचें उत्पन्न प्रतिवर्षी पाऊण लाख रुपये येतें ! तिरुपति देवस्थानाचें कोषागार अत्यंत समृद्ध व अलौकिक आहे. एका हातानें उचलतां येत नाहींत असे २५ सहस्र तेलगू ताम्रपट कांहीं भाविकांनीं त्यावर स्वरचित काव्य कोरून श्रीव्यंकटेशाला समर्पिले आहेत. त्या ताम्रपटांवरील भक्तिपूर्ण रसाळ काव्य तें तर खरोखर अमोलिकच ! पण त्या नुसत्या तांब्याच्या पत्र्यांचें आजचें मूल्य कांहीं लाखांच्या घरांत जाईल असें सांगतात. तिरुपति मंदिराची एकूण मालमत्ता ९,४९,२०,५६० रुपये असून सध्यांचें वार्षिक उत्पन्न १ कोटी ६० लक्ष रुपयांवर असल्याचें देवस्थानचे प्रमुख संचालक श्री. सी. अण्णाराव यांनीं प्रसिद्ध केलें आहे. ( केसरी, ७ मे ६३ ) बद्रीनाथाचे अलंकार ७ लक्ष ७० हजार रुपयांचे असून मंदिराचें वार्षिक उत्पन्न सुमारें सव्वाचार लक्ष रुपये आहे. महाराष्ट्रांतील शिरडीच्या श्रीसाईनाथांचें उत्पन्न जवळ जवळ ६ लाखांजवळ पोंचलें आहे. विमलशहानें बांधलेल्या दिलवारा येथील मंदिरांचें मूल्य १० कोटींच्या घरांत जातें असा उल्लेख मागें आलाच आहे. शीख संप्रदायी हिंदूंचे ठिकठिकाणीं जे गुरुद्वारा आहेत त्यांचें वार्षिक उत्पन्न ४० लक्ष रुपयांवर असून शीख गुरुद्वारा प्रबंधक समितींत १० सहस्र नोकर आहेत. तिरुचिरापल्ली, मदुरा, रामेश्वर येथील देवालयांचा विस्तार चौरस मैलांत सांगण्याइतका व त्यांच्या ऐश्वर्याचा थाटहि अपूर्वच ! अशा अवाढव्य व्याप असणाऱ्या मंदिरांचें कोणी सविस्तर वर्णन दिलें, तर तें अत्यंत रोचक ठरेल. पण येथें केवळ कल्पना येण्यापुरता उल्लेख करून पुढें जाणें भाग आहे. भारतांतील अशा प्रमुख मंदिरांची एकूण ३५० ते ५०० कोटी रुपयांची मालमत्ता असून, साधारणपणें ४० कोटी रुपये वार्षिक उत्पन्न येत असतें. ( ऑर्गनायझर १९ ऑक्टो. ५९ )

ह्या प्रमुख मंदिरांच्या झगझगाटांत महाराष्ट्रांतील मोठीं मंदिरेंहि दिपून जाणारीं आहेत. तरीहि आजच्या समाजस्थितींत धनासमवेत छायेप्रमाणें त्याचा अपव्यय वा अपहार हे जे दोष चिकटून येतात त्या दोषांच्या दृष्टीनें महाराष्ट्रीय मंदिरांचा स्तर विशेष वरचा आहे असें म्हणवत नाहीं. येथील खेड्यांतील

मंदिरांचें डामडौलाच्या दृष्टीनें दारिद्र्यच आहे. पूर्वीच्या काळांत अटकेपर्यंत झेंडे रोवणाऱ्या पूर्वजांनीं आपापल्या गांवच्या मंदिरांना जमिनी लावून दिल्या व आपापल्या शक्तीप्रमाणें त्यांना देणग्याहि दिल्या. 'पेशवेकालीन महाराष्ट्र' या ग्रंथांत म्हटलें आहे कीं, "वाड्यापेक्षांहि देवालयाकडे पेशव्यांचा व त्यांच्या सरदारांचा पैसा अधिक खर्च झाला."

पण देवस्थानच्या जमिनींतील आजचीं कुळें हीं खंड म्हणून देवासाठीं विशेष कांहीं देऊं शकत नाहींत. पूर्वीं खेड्यांतील ज्या मंदिरांतून ४।८ दिवस उत्सव चाले व भंडाऱ्याचें गांवजेवण होई, त्याच ठिकाणच्या मूर्तींवर आतां दोन दोन दिवसांत गंधाक्षताहि पडत नाहींत अशी अवस्था आहे! 'आम्हांलाच पोटाला पुरत नाहीं तर देवाला काय घालणार?' अशी कुळांची कुरकूर ऐकूं येते. कांहीं ठिकाणीं पंचांच्या दुर्लक्षामुळें १०।१० खंडींचें वार्षिक धान्य येणाऱ्या शेतांचा मक्ता कांहीं वर्षांत देवस्थानाला मिळालेला नाहीं असें आढळेल. असें होतांना तेथील पंचहि जमिनीच्या उत्पन्नांत कुळाचे अंतस्थ वांटेकरी झालेले असणें संभवनीय आहे. अर्थात् पंच म्हणजे विश्वस्त हेच असें करूं लागणें म्हणजे प्रत्यक्ष कुंपणानेंच शेत खाणें होय! ह्या गोष्टीला आळा बसावा व 'दातुरिच्छा बलीयसी' या दंडकानुसार मूळ दात्यानें ज्या उद्देशानें जमीन दान दिलेली आहे, त्याच हेतूनें तिचा उपयोग केला जावा म्हणून देखरेख करण्यासाठीं बहुतेक प्रांतांतून राजसत्तेकडून एक खातें उघडण्यांत आलें आहे, पण त्या खात्याचें स्वरूप एकांगी व पंगू आहे. एकांगी अशा अर्थानें कीं, साधारणतः कोणी गाऱ्हाणें आणीपर्यंत तें खातें एखाद्या विश्वस्त-निधीच्या प्रकरणांत आपण होऊन सहसा लक्ष घालीत नाहीं व पंगू ह्या अर्थानें कीं, एखाद्या प्रकरणांत घोटाळा आढळला तरी तो दूर करण्याच्या कामीं त्याला अपुरे अधिकार असल्यानें सर्व गोष्टी मनाजोग्या करून घेणें अवघड जातें. त्या खात्याचें स्वरूप अधिक परिणामकारक होण्यासाठीं अनुभवान्ती त्यांत कांहीं सुधारणा होतील तेव्हां त्या होवोत. पण तत्पूर्वीं सार्वजनिक मंदिरांच्या विश्वस्तांनीं व देवस्थानांच्या जमिनी करणाऱ्या कुळांनीं आपण होऊनच कांहीं विचार केला, तर मग खात्याच्या स्वरूपाकडे वळण्याचेंहि कारण उरणार नाहीं.

देवस्थानांचे विश्वस्त वा व्यवस्थापक आणि मंदिरांच्या जमिनींतील कुळें यांनीं

प्रारंभीं ही गोष्ट ध्यानीं घेतली पाहिजे कीं, तें मंदिर व त्या जमिनी ह्या वैधानिक दृष्टया त्या मंदिरांतील प्रत्यक्ष देवतेच्या आहेत. त्यांवर त्या देवतेचें स्वामित्व आहे. तसेंच तें मंदिर, धन व जमीन देवतेला अर्पण करणाऱ्या भक्ताच्या इच्छा पूर्ण करणें हें त्या देवतेचे प्रतिनिधि म्हणून पंच व कुळें ह्यांचें परम कर्तव्य आहे. ह्या कर्तव्याला न जागतां देवस्थानांच्या कोषांतील द्रव्याचें कदाचित् कोठारी अपहरण करतील या भीतीनें पंढरपूरच्या मंदिरावरील प्रसिद्ध चौऱ्याऐंशीच्या शिलालेखांत 'कोठारी ठाकवी तेयासी श्रीविठ्ठलाची आण' अशी देवाची शपथ घालून ठेविलेली आहे. पण अशा शपथेमागील भावना ध्यानांत घेण्यास आज सवड कोणाला ?

नाथद्वारा या विख्यात मंदिराचे 'तिल्कायत' या प्रमुख संचालकांचें तर असें म्हणणें आहे कीं, दैवताइतकाच त्यांचाहि अधिकार आहे. एवढेंच नव्हे तर ते त्या मंदिरांतील मूर्ति वाटेल तेव्हां व वाटेल तेथें हालवूं शकतात व तेथील संपत्तीचा मन मानेल तसा वापर करूं शकतात. मंदिरांत चढविले जाणारे भोग व अर्पण करण्यांत येणारें द्रव्य हें देवतेला अर्पण केलें जात नसून तें वास्तविक महंत म्हणून आपणालाच दिलें जातें अशी त्यांची दृढ धारणा आहे. ज्यांनीं मूळ मंदिरें बांधिलीं त्यांनीं नियुक्त केलेले कारभारी व पुजारी हे, इंग्रजांच्या धर्मक्षेत्रांतील कांहीं वर्षांच्या तटस्थतेच्या धोरणाचा लाभ घेऊन स्वतःच मंदिराचे वरीलप्रमाणें प्रत्यक्ष स्वामी होऊन बसले. स्वातंत्र्यांतहि मोठमोठ्या मंदिरांचे असे असणारे निरंकुश संचालक, सरकारी निर्बंधांना धूप न घालतां आपलें प्रभुत्व टिकविण्यासाठीं पराकाष्ठा करीत आहेत.

जमेल तेथें शिरकाव करून सन्मान उपटावयाचा व त्या सार्वजनिक पदाच्या व अधिकाराच्या आधारानें जमेल तितका स्वार्थ साधावयाचा ही वृत्ति आजकाल सर्वत्र बोकाळूं पाहत आहे. खरें म्हणजे घरचें खाऊन सैन्याच्या भाकऱ्या भाजाव्यात अशा कोटींत विश्वस्तांचें काम बसतें (onerous job) त्याच्या उलट घरच्या भाकऱ्या भाजण्यासाठीं सैनिकांना वेठीला धरण्याचे उरफाटे प्रकार अनेक ठिकाणीं घडत आहेत, हें कटु सत्य आहे. ईश्वरी धनाचा असा अपहार करणाऱ्या व्यक्तींना परमेश्वरी सत्तेकडून कांहीं शासन होतें कीं नाहीं यासंबंधीं मतभेद असूं शकतील. पण 'पांचामुखीं परमेश्वर' ह्या न्यायानें देवस्थानांत येणाऱ्या भाविकांकडून अशा प्रकारांना आळा

घालण्याचा प्रयत्न पूर्ण यशस्वी होईल ह्याविषयीं शंका असूं नये. तसेंच 'सब भूमि गोपाल की' असली तरी त्या गोपालाचा प्रतिनिधि म्हणून देशांतील राजसत्तेलाहि अशा नाठाळ पंचांचें वा कुळांचें पारिपत्य करण्याचा अधिकार आहे. पण लोकांच्या वा राजदंडाच्या भयानें कर्तव्यनिष्ठा टिकून राहिलेली दिसणें हें समाजाच्या सुस्थितीचें निदर्शक नव्हे. यासाठीं आपण होऊन कर्तव्यपालन करण्याची वृत्ति दिवसेंदिवस समाजांत बळावत गेली पाहिजे. ह्यासाठीं विश्वस्तांनीं आपल्या व्यवहारांतून निःस्वार्थतेचा व चोखपणाचा निर्वाळा दिला पाहिजे. आपल्या पूर्वजांनीं, अर्पण केलेल्या तळ्याचें पाणी स्वतः दात्यानें पिऊं नये असा दंडक पाळून उच्च प्रकारच्या समर्पणाचा आदर्श घालून दिला आहे. अशा थोर दान देणाऱ्यांची इच्छा त्याच्या विश्वस्तांनीं धुळीला मिळविणें म्हणजे 'भरंवशाच्या म्हशीला टोणगा' हीच म्हण सार्थ करणें होय ! लोकमान्य टिळक हे पुण्यांतील श्रीमन्त भाऊमहाराजांच्या मालमत्तेचे एक विश्वस्त होते. पण त्यांची कर्तव्यनिष्ठा व निःस्वार्थता इतकी कडवी होती कीं, भाऊमहाराजांच्या शेतांतील माळ्यानें तेथील टोपलीभर भाजीपाला लोकमान्यांकडे आणतांच ते म्हणाले, "ही भाजी येथें ठेवूं नको व आपल्या घरींहि नेऊं नको; तर लगेच महाराजांकडे पोंचव. तसेंच पुन्हां केव्हांहि अशा कांहीं वस्तु तूं तेथून आणीत जाऊं नकोस." एवढें सांगून ते थांबले नाहींत, तर ते त्याला म्हणाले, "माझें मोठें शेत आहे व तेथून बाराहि महिने मला वाटेल ती भाजी हवी तेवढी मिळते. चल ती वाडी तुला मी दाखवतों." असें म्हणून ते त्याला घेऊन मंडईत गेले व तऱ्हेतऱ्हेचीं फळें व भाजी खरेदी करून ते त्याला म्हणाले, "पाहिलीस माझी शेतवाडी!" असा निर्मळ व्यवहार पंच व कुळें ह्यांच्याकडून अपेक्षित आहे.

विश्वस्त व कुळें यांच्या स्वार्थी वृत्तीचा मंदिरांवर होणारा परिणाम जसा आपण पाहिला त्याचप्रमाणें कांहीं प्रांतांतील कुळांसंबंधीं झालेल्या सरकारी दंडकांनींहि मंदिरांवर किती कठोर आघात केलेला आहे हें पाहिलें पाहिजे. केरळ प्रांताच्या धार्मिक विश्वस्त निधीचे नियंत्रक आपला अनुभव सांगतांना म्हणतात कीं, केरळमधील जमिनींच्या कायद्यांमुळें मंदिरांचें उत्पन्न इतकें घटलें आहे कीं, साधी पूजा चालविणेंहि कांहीं मंदिरांना जड झालें आहे. आंध्रांतील तिरुपति देवस्थानानें सहाशें गांवांत एक कोटी रुपये गुंतवून जमीन

विकत घेतली होती. तिचें वार्षिक उत्पन्न ७ लक्ष रुपये येई. पण जमीनदारी नष्ट करण्याच्या सरकारी धोरणाचा परिणाम असा झाला कीं, त्या जमिनींचे कुळांकडून अवघे १२ लक्ष रुपये घेऊन मंदिराच्या चालकांना हात चोळीत बसावें लागलें ! तसेंच त्या प्रांतांत निर्बंध नसतांना ज्या शेताचा खंड २०० पोतीं मिळत असे तो १९५६च्या निर्बंधानें १५० पोत्यांवर घसरला व आतां नव्या विधेयकानें तो ७५ पोत्यांवर येणार आहे, असें डॉ. सी. पी. रामस्वामींनीं प्रति-वृत्तांत म्हटलें आहे. या गोष्टीचा परिणाम किती भयानक होईल हें सांगतांना त्या प्रांताचे धार्मिक विश्वस्त निधीचे नियंत्रक ( कमिशनर ) श्री. पी. लक्ष्मय्या म्हणतात कीं, असें उत्पन्न बऱ्याच प्रमाणांत घटल्यास प्रांतांतील १०,००० मंदिरांपैकीं सुमारें ९५ टक्के मंदिरांना टाळाच ठोकावा लागेल ! कुळांसंबंधींच्या अशा निर्बंधाचे होणारे विपरीत परिणाम ध्यानीं घेऊन मंदिरांच्या जमिनी नुकसान-भरपाई ( Compensation ) घेऊन कुळांना देऊं नयेत; पण तसें करावयाचेंच तर ती भरपाई एकमुठी न घेतां, योजना करण्यापूर्वींच्या सहा वर्षांचें सरासरी उत्पन्न ध्यांनीं घेऊन प्रतिवर्षी तेवढे रोख पैसे मंदिराला मिळतील असें केलें पाहिजे, असें रामस्वामींच्या प्रतिवृत्तांत सुचविलेलें आहे. त्यांतील हेतु असा कीं, जमिनीची नुकसानभरपाई म्हणून एकदम कांहीं पैसे हातीं आल्यास ते हां हां म्हणतां सरून मंदिराची स्थिति केविलवाणी होण्याचें टळावें. हे कांहीं प्रांतांतील अनुभव ध्यानीं घेतां इतर प्रांतांतहि असे प्रकार घडले असतील वा घडतील हें सांगणें नलगे. ह्यासाठीं मंदिरें बंद करावीं लागणार नाहींत इतकी दक्षता घेऊनच, मंदिरांच्या कुळांकडे असणाऱ्या जमिनींचा विचार राजसत्तेनें व लोकनेत्यांनीं केला पाहिजे. असो.

मंदिराला दिलेलें धन मधल्यामध्यें मुरून जाणें ही गोष्ट अत्यंत लांच्छनास्पद होय. पण खेड्यांतील मंदिरांप्रमाणेंच मोठमोठ्या मंदिरांच्या पैशाचे व्यवहार हे घोटाळ्याचे असतात असें वृत्तपत्रांवरून सहज ध्यानांत येत असतें. नाथद्वारा, शिरडी आदि प्रसिद्ध देवस्थानांतील प्रकरणें नुकतींच प्रकाशांत येऊं लागलीं आहेत. अशीं कांहीं ठिकाणचीं प्रकरणें परिस्फोट होऊन चव्हाट्यावर मांडलीं गेलीं असलीं तरी आंतल्या आंत दबलेलीं प्रकरणें कांहीं कमी नसतील. पवित्र स्थानांना लागलेली ही अमंगळ कीड ज्या त्या ठिकाणच्या भाविकांनीं पंचांच्या व्यवहारावर बारकाईनें लक्ष ठेवून वेळींच नष्ट केली पाहिजे. कै. सानेगुरुजी

म्हणतात, " मंदिरांतून जो व्यभिचार चालतो त्याचें पाप तेथें दिडक्या फेकणाऱ्यावर असतें " हें विसरून चालणार नाहीं. तेव्हां भाविकांनीं देखरेखीचा अंकुश तेथील व्यवहारावर प्रभावीपणें चालविणें हें त्यांचें कर्तव्यच ठरतें.

जेथें विश्वस्तहि विश्वासघातकी ठरूं शकतात, तेथें समाजांतील सराईत चोर व दरवडेखोर अशा देवस्थानांच्या संपत्तीचा अपहार करीत असल्यास नवल काय ? गेल्या कांहीं वर्षांत महाराष्ट्रांतील अनेक देवस्थानांच्या संपत्तीवर डाके पडलेले आहेत. त्यांतील शांतादुर्गा, पर्वती, जेजुरी, प्रतापगड व साताऱ्याचें जलमंदिर या ठिकाणच्या लक्षावधि रुपयांच्या सुवर्णमूर्ति व रत्नखचित सुवर्णालंकार चोरीस गेले. किरकोळ चोऱ्या तर सारख्याच चालू असतात. मुंबई राज्यांत पांच वर्षांच्या अवधींत मंदिरांतील वस्तूंच्या ११९६ ठिकाणीं चोऱ्या होऊन २,५३,४९० रुपयांची मालमत्ता लुटली गेली ! त्या चोऱ्यांपैकीं ४२३ प्रकरणांतील मालमत्ता तेवढी परत मिळाली. ३६४ प्रकरणांत खटले भरले गेले. व त्यांतील २८६ प्रकरणांत आरोपींना शिक्षा ठोठावण्यांत आल्या. हे आंकडे मंदिरांतील संपत्तीच्या असुरक्षिततेची कल्पना आणून देण्यास पुरेसे आहेत. तसेंच शितावरून भाताची परीक्षा ह्या न्यायानें एकंदर भारतांतील मंदिरांच्या स्थितीचीहि त्यावरून कांहीं प्रमाणांत अटकळ बांधतां येईल.

ह्या गोष्टींना आळा घालवयाचा तर तें कांहीं प्रमाणांत सर्वसामान्य व्यक्तींच्या हातीं आहे. पण त्याचा बराच भार हा एकंदर देशाची आर्थिक व नैतिक पातळी उंचावण्यावरच अवलंबून राहील. देशांतील दारिद्र्य इतकें आहे कीं, खेड्यांतील मूर्तींना बसविलेली चांदीची दृष्टिहि दोन दिवस टिकत नाही ! त्या दृष्टीच्या अर्ध्या रुपयाच्या रुपेरी तुकडयांवरहि कांहीं जणांची दृष्टि अगतिकतेंतून खिळलेली दिसते ! तसेंच समाजाचा नैतिक स्तर उंचावला जाणें हेंहि झटपट होणारें कार्य नाहीं. संथपणानें पण सातत्यानें अनेक वर्षें समाजांतील उगवत्या पिढ्यांना संस्कारानुकूल वातावरणांत योजनापूर्वक वाढवावें लागेल. तोंवर राजसत्ता, पंच, भाविक व देवळांतील सेवेकरी अशा सर्वांनीं अधिक दक्षतेनें मंदिरांतील वित्ताची जपणूक केली पाहिजे. सार्वजनिक कामाचें वळण पुन्हां एकदां आपल्या समाजांत निर्माण करण्याचा प्रयत्न मंदिरसंस्थेशीं निगडित असलेल्या मंडळींनीं केला पाहिजे. खेडयांत काय किंवा नगरांत काय, बहुतेक संस्थांचे पदाधिकारी हे ' उत्सवमूर्ति ' असतात व सेवेकरी हे पोटार्थी

व कामचुकार असतात ! नेहमीं 'तोबऱ्याला पुढें नि लगामाला पाठीमागें' सरणाऱ्या नाठाळ घोड्याप्रमाणें असणारी चुकार वृत्ति ही साऱ्या सार्वजनिक जीवनाला काळवंडून टाकीत आहे. ती वृत्ति टाकून देण्याचा श्रीगणेशा मंदिरां-सारख्या श्रेष्ठ व पवित्र अशा श्रद्धाकेंद्रांशीं निगडित असणाऱ्या लोकांनीं करून दिला पाहिजे. देवळासमोर दगडाचे निश्चल भालदार–चोपदार उभे असतात. त्यांच्या संख्येंत आपल्या निष्क्रियतेनें भर घालणारा व्यवहार सेवे-कऱ्यांनीं व पंचांनीं करूं नये. "देवासंबंधींचें धन जो पापी पुरुष लोभानें हरण करतो, तो मरणोत्तर अन्य लोकांत गिधाडाच्या उष्ट्या अन्नानें पोषिला जातो" असें भगवान् मनूंनीं आपल्या स्मृतींत म्हटलें आहे. ते लिहितात, 'देवस्वं ब्राह्मणस्वं वा लोभेनोपहिनस्ति यः। स पापात्मा परे लोके गृध्रोच्छिष्टेन जीवति ॥ भगवान् मनूंनीं दिलेली समज ध्यानीं घेऊन पंच व सेवेकरीवर्गानें अशा पापी वर्गांत स्वतःचा अंतर्भाव होणार नाहीं असें दक्षतापूर्वक पाहावें. तसेंच राजसत्ता व जनता ह्यांनींहि जागरूक राहून, अशा सामाजिक वा ईश्वरी धनाचें अपहरण करणाऱ्यांना अन्य लोकांत शिक्षा होईलच अशा भरंवशावर न राहतां, त्यांचे इह लोकांतच पूर्ण धिंडवडे काढण्याची सिद्धता ठेवावी. दक्षता व अखंड सावधानता हे परवलीचे शब्द ठरवून समाजांतील सर्व आर्थिक व्यवहार केले पाहिजेत व डोळ्यांत तेल घालून परीक्षिले पाहिजेत. त्यांतून व इतर योजनाबद्ध संस्कारांतून आपली राष्ट्रीय दानत उंचावलेली दिसेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूजनीय गुरुजी हे पंढरपूरला गेले असतां, कडी-कुलपांत ठेवलेले श्रीपांडुरंगाचे मूल्यवान् अलंकार त्यांना दाख-विण्यांत आले. ते पाहतांना विषण्ण होऊन ते म्हणाले, "देवालयांतील मूर्तीचे अलंकार हे चोरांच्या भीतीनें भांडारांत कडी-कुलपांत ठेवण्याचा प्रसंग जरी आज आपणांवर आला असला, तरी आपल्या सर्वांच्या प्रयत्नांतून असा एक भाग्यशाली दिवस उगवो, कीं जेव्हां दैवताला हिरेमाणकांच्या आभूषणांनीं अखंड अलंकृत केलेलें असतांहि मंदिराच्या दारावर रक्षक ठेवण्याची आवश्यकताच उरणार नाहीं !" पण असा सोन्याचा दिवस पाहणें हें आपणां सर्वांवरच अवलंबून नाहीं काय ?

☆ ☆ ☆

प्रकरण ६

# उपेक्षित देवळेंच देवळें !

सामान्यतः प्रत्येक हिंदूच्या घरांत लहानसें देवघर हें असतेंच. मुंबई–पुण्यासारख्या ठिकाणीं खुराड्याप्रमाणें असणाऱ्या बिऱ्हाडांतूनहि, एका लहानशा ताम्हनांत वा संपुटांत पंचायतन व त्याच्याजवळ चार-दोन देवांच्या वा साधूंच्या छापील चित्रांच्या चौकटी आढळतील. त्यांच्यासमोर सकाळ–सायंकाळ समई वा नीरांजन तेवतांना दिसेल. सकाळीं देवपूजा व सायंकाळीं धूपारती हे कार्यक्रम बहुतेक घरांतून होत असतात. सधन–घरंदाज व्यक्तीच्या देवघरांत डोकावून पाहाल तर तें मोठें व थाटामाटानें सजविलेलें आढळेल, तर कांहीं भाविकांचीं देवघरें हीं '.देवालया 'ची आठवण करून देतील इतकीं भव्य असतील. विष्णु, शंकर, देवी, गणपति व सूर्य अशा पंचायतनपूजेंतून सर्व हिंदूंच्या हृदयांतील भक्तिभावनेला एकरूपता आणून देण्याचा हेतु होता व कांहीं प्रमाणांत तो सफलहि झालेला आहे. घरांतील भक्तिभाव जागविणें एवढीच मर्यादा देवघरांना पडलेली आहे. अशा देवघरांशीं बाहेरील मंदिरांची तुलना करतां मंदिरें हीं भव्य, अधिक सार्वजनिक व परिणामाच्या दृष्टीनें प्रभावी ठरतील.

पण आपल्या मंदिरांचीं सार्वजनिकता ही इसायांचीं चर्चें व मुसलमानांच्या

मशिदी ह्यांच्या सार्वजनिकतेपेक्षां अतिशय भिन्न आहे. चर्चें व मशिदी यांची उभारणी सामूहिक उपासनेच्या कल्पनेवर आधारलेली असून त्यांच्यावरील स्वामित्व हें व्यवहारतः सर्व समाजांत व तेथें चालणाऱ्या प्रार्थनांचें रहस्य त्यांच्या सांघिकतेंत साठविलेलें दिसेल. उलट आपलीं मंदिरें हीं प्रामुख्यानें कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या पुण्यसंपादनाच्या आकांक्षेतून साकार झालेलीं व सांघिक उपासनेच्या जागीं वैयक्तिक उपासनेला प्राधान्य असणारीं आहेत. प्रा. माधवराव पटवर्धन उपाख्य माधव ज्यूलियन हे हा भेद स्पष्ट करतांना 'भाषाशुद्धि-विवेक' ह्या ग्रंथांत म्हणतात कीं, "मुसल्मानांना आपल्या मशिदीविषयीं जो आपलेपणा वाटतो, तो हिंदु गांवकऱ्यांना आपल्या देवळाविषयीं वाटत नाहीं, म्हणूनच दोन्ही देवळांच्या बाह्य रूपांत अंतर दिसतें. कारण, देऊळ कांहीं बहुजन-समाजासाठीं आणि बहुजनसमाजाच्या स्वामित्वाचें असें बांधलेलें नाहीं ! हीं दोन पूजास्थानें मला सांघिक आणि वैयक्तिक धर्मभावनांचीं आणि त्यांच्या परिणामाचीं प्रतीकें वाटतात." इसाई व मुसल्मान यांचीं प्रार्थनामंदिरें हीं त्यांना त्यांच्या सार्वजनिक चळवळीचें नियंत्रण करणारीं प्रमुख केंद्रें वाटतात. हिंदूंच्या मंदिरांना तसें स्वरूप आलेलें प्रायः कोठें दिसत नाहीं. एखाद्या देवळांत त्याच्या परिसरांतील लोक दर्शन–पूजनासाठीं आपल्या इच्छेनुसार व सवडीनुसार येतात ही गोष्ट खरी; पण त्या देवळाच्या योगक्षेमाचा, व्यवस्थेचा व रक्षणाचा अंशतः तरी आपणांवर भार आहे, अशी जागती जाणीव त्यांच्या व्यवहारांत सहसा आपणाला दिसणार नाहीं. मागील प्रकरणांत वर्णिल्याप्रमाणें मंदिरांतील गुरव–पुजारी व पंच हे लोकहि जेथें कर्तव्याला जागत नाहींत, तेथें नुसत्या दर्शनासाठीं येणाऱ्यांच्या वृत्तींतील स्वार्थी तुटकपणा व दुर्लक्ष किती सांगावें ? डॉ. इरावती कर्वे लिहितात कीं, "...दैवतांची पूजा करावी हें हिंदुधर्माचें तत्त्व आहे. त्याप्रमाणें वागणूक ठेवतांना इतरांनीं आमच्या दैवतांचें व मंदिरांचें पावित्र्य भ्रष्ट करतां कामा नये. त्यासाठीं प्राण खर्ची करूं, ही भावना हिंदूंनीं दाखविली नाहीं. नाहीं तर हिंदु मंदिरांच्या मूर्तींची मोडतोड व त्या जागीं चर्चें व मशिदी ह्यांची स्थापना होती ना."

चर्चें व मशिदी ह्यांमध्यें सार्वजनिक प्रार्थना-प्रवचनें चालतात, त्यांतून चित्त-शुद्धीच्या दृष्टीनें किती लाभ लोकांना होत असेल तो न कळे, पण सामाजिक एकात्मतेची भावना त्यांतून दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जाते ही गोष्ट निःसंशय.

ह्या सामाजिक ऐक्याच्या बळावरच हिंदुस्थानांतील हे दोन्ही समाज, विविध प्रलोभनें व आक्रमण अशा मार्गांनीं, हिंदुसमाजाला पोखरण्याचा अव्याहत प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या आक्रमक चळवळींची आंखणी, प्रेरणा व कार्यवाही अशा तिन्ही गोष्टी प्रार्थनामंदिरांच्या अंतस्थ गोटांतून घडत असतात. अनेकदां त्यांच्या आक्रमणांचें स्वरूप अगदीं जवळून निरीक्षण केल्यावर असें ध्यानांत येतें कीं, त्यांचीं हीं मंदिरें नसून हिंदुसमाजावरील आक्रमणाचा व्यवस्थित पाठपुरावा करणारे हे त्यांच्या समाजाचे बालेकिल्लेच आहेत. प्रार्थनामंदिरांत त्यांच्या गुप्त सभा होतात. तेथील त्यांच्या प्रार्थनांना हिंदूंच्या सवाद्य मिरवणुकांनीं व्यत्यय येतो, असा कांगावा करून दंडेलीनें त्या मिरवणुका अडविण्याचे व त्यांच्यावर दगड-विटांचा मारा करण्याचे प्रकार येथूनच घडतात. अनेक ठिकाणीं त्यांनीं पुरातन हिंदुमंदिरांचेंच प्रार्थनामंदिरांत रूपांतर केलेलें असतें आणि अशा आक्रमणांतून उदित झालेल्या त्यांच्या मंदिरांतून पुढील आक्रमणाचे मनोरे रचले जात असतात! उलट हिंदुसमाजांत आपल्या सर्वश्रेष्ठ धर्माची दीक्षा इतरांना देण्याचा कर्तव्यनिष्ठ हव्यास आज उरलेला नाहीं, एवढेंच नव्हे तर इतरांचें आक्रमण संपूर्ण मोडून काढण्याइतकीहि जागरूकता अभावानेंच उरलेली आहे! अशा विपन्नावस्थेंत आमच्या मंदिरांचें स्वरूप सामाजिक दृष्टीनें सूत्रबद्ध, प्रभावी नि तेजस्वी कसें असणार? सामाजिक उत्थानाच्या जाणिवेंतून एखाद्या समाजांतील संस्थांना व संस्कारकेंद्रांना जें शिस्तबद्ध व सांघिक रूप प्राप्त होतें तें आपल्या आकांक्षाहीन, स्वार्थपरायण व म्हणून फुटीर असणाऱ्या समाजांतील संस्थांना कसें प्राप्त व्हावें?

वेदकाळांत आपल्या समाजांत सामूहिक उपासना रूढ असावी असें वैदिक मंत्रांवरून दिसून येतें. पण कालान्तरानें उपासनेचें स्वरूप अधिकाधिक व्यक्तिनिष्ठ होत गेलें आहे. राजकीय स्वास्थ्य, समृद्धि व सुसंस्कृतता ह्या गोष्टींनीं मंडित असणारा समाज हा निश्चिंतपणामुळें सामूहिक जीवनाला हळूहळू आंचवून बसतो आणि अधिकाधिक व्यक्तिवादी बनतो. अशा सुबत्तेच्या काळांतच दानधर्म व्रतवैकल्यें व यज्ञयाग ह्या मार्गानें व्यक्तिजीवनाचें परमकल्याण साधण्याचे विचार स्वाभाविकपणें बळावतात. अशा वेळीं 'इष्टेन लभते स्वर्गं पूर्तेन मोक्षमाप्नुयात्' अशा श्रद्धेनुसार पुण्यप्राप्तीचे विविध उपक्रम व्यक्ति करूं लागते. दानधर्म, मंदिर-उभारणी, अन्नछत्रें व सदावर्तें अशा

' पूर्ता 'त समाविष्ट झालेल्या गोष्टी करण्यास सधन भाविकाला उद्युक्त करील अशीच भरघोस फलश्रुति त्या त्या पुण्यकर्मांची पुराणांनीं सांगितली आहे. नरसिंहपुराणांत म्हटलें आहे कीं, " ज्या दिवशीं देऊळ बांधण्याचा विचार एखाद्याच्या मनांत येतो त्या दिवशींच त्या व्यक्तीचीं पंच महापातकें भस्म होऊन जातात. " मग तो सत्संकल्प सिद्धीस नेल्यावर किती लाभ होत असेल हें सांगणें न लगे! एखादा मनुष्य देवळासाठीं एक वीट बनविल्यावर मरण पावला तर त्याला पूर्ण ज्ञानी माणसाइतकें पुण्य लाभतें, असेंहि त्या पुराणांत म्हटलें आहे. देऊळ बांधण्यासाठीं जो भूमि देतो त्याला ज्या देवतेचें मंदिर तेथें बांधलें जातें त्या देवतेचा ' स्वर्गलोक ' प्राप्त होतो, असें विष्णुपुराण सांगतें. शिवमंदिराला शेतजमीन देणारा अनेक युगें रुद्रलोकांत सुख भोगतो, असें शिवधर्मांत दिलें असून विष्णुमंदिराला भूमिदान करणाऱ्या व्यक्तीला सात जन्म ऐश्वर्यसंपन्नता लाभते, असें आश्वासन वराह पुराणानें दिलें आहे. इतर पुराणेंहि फलश्रुति-कथनांत उणीं ठरणार नाहींत, अशा विश्वासानें हें फलश्रुति-पुराण अधिक लांबवीत नाहीं !

अशा पद्धतीनें अल्प दानांतून जर महापातकांतून शिरसुरक्षित सुटका होऊन स्वर्गसुखापासून मुक्तीपर्यंतच्या अलौकिक सुखाचा लाभ होत असेल तर कोणता श्रद्धावान् मनुष्य अशा गोष्टी करण्यास उद्युक्त होणार नाहीं. ' श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थम् ' हेंच ज्या समाजाच्या उपासनेचें सूत्र त्या भाविक लोकांनीं वरील फलश्रुतींच्या भरंवशावर आपापल्या शक्त्यनुसार इष्ट देवतेचीं मंदिरें उभारलीं यांत आश्चर्य कोणतें ? आज नगरांत व खेड्यांत, जनांत नि विजनांत, नद्यांच्या तटांवर, डोंगरांच्या शिखरांवर, पर्वतांतील अवघड घाटांच्या वळणांवर, झऱ्यांवर नि उन्हाळ्यांवर जीं असंख्य लहान–मोठीं देवालयें उभीं आहेत तीं मंदिरें प्रामुख्यानें अशा श्रद्धेनें बांधलेलीं आहेत. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीं तर देवळेंच देवळें ! एकट्या काशी क्षेत्रांत १५०० मंदिरें व उडिसा प्रांतांत भुवनेश्वरीला ५०० हून अधिक देवळें आहेत. इतर तीर्थक्षेत्रांत हाच प्रकार चढत्या वाढत्या प्रमाणांत आढळून येईल. गेल्या शतकांत दक्षिण भारतांतील जीवनाचें अत्यंत जवळून व बारकाईनें परीक्षण लिहून विख्यात झालेला फ्रेंच धर्मोपदेशक आब्बे ज्झा आ दुब्बुआ ( Abb'e J. A. Dupois ) म्हणतो कीं, " Buildings dedicated to religious worship are extreemly

numerous in India. " म्हणजे " हिंदुस्थानांत देवळांची संख्या भलतीच भरमसाट आहे ! " समर्थ रामदासांनीं जिकडे तिकडे देवळेंच देवळें पाहून ' देव जाले उदंड । देवांचें माजलें बंड ॥ ' असे उद्गार काढले असून " नाना तीर्थें थोरथोरें । सृष्टीमध्यें अपारें । सुगमें दुर्गमें दुष्करें । पुण्यदायकें ॥ ३ ॥ ऐसीं तीर्थें सर्वहि करी । ऐसा कोण रे संसारी । फिरों जातां जन्मवरी । आयुष्य पुरे ना ॥ ४ ॥ अशा शब्दांत तीर्थक्षेत्रांच्या संख्येची कल्पना मांडली आहे.

देशाच्या सुस्थितींत, पुण्यसंपादनाच्या सद्भावनेनें देशांत चोहींकडे, अगदीं जळीं–स्थळीं–काष्ठीं-पाषाणीं जीं मंदिरें झालीं तींच देशावरील आक्रमणाच्या कठीण काळांत व त्यानंतरच्या पारतंत्र्यावस्थेंत समाजाला कधीं चिंतेचा तर कधीं उपेक्षेचा विषय होऊन बसलीं. हीं देवळें प्रामुख्यानें व्यक्तिगत प्रेरणेंतून उभारण्यांत आलीं व त्यांचा ' लाभ ' कांहीं प्रमाणांत समाजानें घेतलेला असला तरी त्यांचा ' भार ' समाजानें जवळ जवळ स्वीकारलेला नाहीं. त्यामुळें देऊळ बांधणारे भाविक निघून गेल्यावर, पोरक्या मुलाप्रमाणें, त्यांच्या देवळांची सर्वच दृष्टीनें आबाळ झाली. बांधलेल्या देवळांच्या योगक्षेमाची व पूजेअर्चेची व्यवस्था कांहीं जणांनीं नीट केलेली होती. पण ढासळत्या समाजस्थितींत ती व्यवस्थाहि विसकटून जाऊन, संस्कारकेंद्रें ह्या दृष्टीनें तीं देवळें असून नसल्या-सारखीं ठरलीं ! ज्या काळांत मंदिरसंस्था ही नवी होती व बौद्ध–जैन आदि भिन्न संप्रदायी बांधवांशीं वैदिक हिंदूंची एका तऱ्हेनें चढाओढ चालली होती तोंवर वरील पौराणिक फलश्रुति ही तिला प्रेरक व उपकारक ठरली. पण पुढें वैदिक संप्रदायाचें निर्विवाद प्रभुत्व सिद्ध झाल्यावरहि जेव्हां व्यक्तिगत इच्छेनें मंदिर–उभारणी अव्याहत चालूच राहिली तेव्हां तीच फलश्रुति ही त्या संस्थेला व एकूण समाजाला मारक ठरलेली आहे. मंदिर म्हणजे मूर्ति नि सभोंवार चार भिंती नव्हेत ! तर सातत्यानें दर्शनास येणाऱ्या भाविकांच्या सद्भावनांची व सद्भक्तीची, ज्या देवतेच्या पायाशीं अखंड वृद्धिंगत होत जाणारी भावगंगा दुथडी वहात असेल व तेथें येणाऱ्या सर्वसामान्य माणसाची सात्त्विकता जेथें सहज जागृत व प्रबल होत असेल तें पवित्र स्थान म्हणजे मंदिर. पण कांहीं अपवाद वगळून, व्यक्तिगत स्वर्ग व मोक्ष–सुखाच्या अभिलाषेनें मंदिरें उभारणाऱ्या लोकांनीं त्यांच्या दगडी व लाकडी बाह्यांगाकडे अधिक लक्ष दिलें. पतित समाजाला पावन करणाऱ्या संजीवक, पवित्र व प्रभावी वातावरणाची

त्या दगडी वा लाकडी शिल्पांत निर्मिति होते कीं नाहीं, या गोष्टीकडे अनेकांचें ध्यान गेलें नाहीं. तसें ध्यान गेलें असतें तर, एक ना धड भाराभर चिंध्या, ह्या न्यायानें आधींच कळाहीन बनलेल्या मंदिरांत आणखी भर न घालण्याची दक्षता त्यांनीं घेतली असती. पण मंदिरांचा ' लाभ ' वरील फलश्रुतींत वर्णिल्याप्रमाणें, मनांत मंदिर बांधण्याची नुसती कल्पना डोकावतांच जेथें पदरांत पडूं लागला, तेथें त्या मंदिराचा लाभ समाजाला किती होईल याची आणखी चिंता करण्याची त्यांना आवश्यकताच कोठें उरली ? नुसत्या मंदिर-उभारणीनेंच त्या व्यक्तीला कृतकृत्यता वाटे; पण आपण बांधलेल्या मंदिराचा आपणाला लाभ झाला तरी समाजांतील उपेक्षित स्थानांत आपण एकाची भर तर घालीत नाहीं ना ? असा प्रश्न मनांत उत्पन्न होणें हें समष्टि-जीवनाचा विचार विसरून गेलेल्या व्यक्तिवादी समाजांत संभवनीय नव्हतें. त्यामुळेंच ज्या देवळांत कधीं अनेक दिवसांत पूजा होत नाहीं व जेथील घंटा ही अनेक दिवसांत घणघणत नाहीं, अशीं पडिक व दुर्लक्षित देवळें आज आपणाला ठायीं ठायीं दिसतात. व्यक्तिगत करमणुकीसाठीं चपटके दगड व खापऱ्या घेऊन तळ्यावर 'भाकऱ्या' पाडण्याचा खेळ करणाऱ्या मुलांना जसें आंतील घायाळ होणाऱ्या बेडकांचें दुःख कळत नाहीं, त्याचप्रमाणें अर्थहीन व कळाहीन बनलेल्या देवळांच्या केविलवाण्या दृश्यानें गांवांतील औदासीन्यांत भर पडते व परक्यांना आक्रमण करण्यास नि धर्माची कुटाळकी करण्यास संधि मिळते, याचें अवधान राहत नाहीं.

यासाठीं श्रद्धास्थानांची उभारणी करणें हें पुण्यप्रद असलें तरी श्रद्धा उडून जाईल अशा विपन्न स्थितींत अनेक देवळें सभोंवतीं दिसत असतांना, नवें मंदिर उभारणें हें सामाजिक पातक आहे, असें स्पष्टपणें सांगणें आज अत्यावश्यक आहे. मंदिराच्या व्यवथेसाठीं शाश्वतची पुरेशी आर्थिक योजना करून जर कोणी नवीन मंदिर बांधणार असेल तर त्याला तत्त्वतः विरोध असूं नये, असें म्हणूनहि आज भागणार नाहीं. कारण समाजांत आजच पडूं लागलेल्या व दुर्लक्षित असणाऱ्या मंदिरांचा प्रश्न त्यामुळें सुटत नाहीं. त्यासाठीं जोंवर गांवांत जुनें मंदिर उपेक्षित आहे तोंवर नवें मंदिर उभारूं इच्छिणाऱ्या भाविकानें आपली उदारता जीर्णोद्धाराकडे वळविणें हें सामाजिक दृष्टीनें हितकर व पुण्यप्रद होय. ह्यासंबंधीं लोकमान्य टिळक म्हणतात कीं, "...नवीन

देवालय बांधण्याचें जितकें श्रेय त्याहून अधिक श्रेय जीर्णोद्धाराचें आहे; कारण जीर्णोद्धार केल्यामुळें पूर्वापार चालत आलेल्या कल्पना बदलून नवीन प्रकार अंगवळणीं पाडण्याचा खटाटोप करावा लागत नाहीं."

नवीं देवळें बांधू नयेत, तर उलट जुनीं देवळें योजनापूर्वक कमीं करावींत असाहि एक सूर ऐकू येतो. त्यांत कांहींसें तथ्यहि आहे. पं. महादेवशास्त्री दिवेकर लिहितात कीं, "कुणी तरी उपटशुंभानें वैयक्तिक समाधानाकरितां देवालय बांधलें व त्या देवळांतील मूर्तीचा संरक्षणाच्या अभावीं भंग झाला तर त्याबद्दल सर्व समाजाला मान खालीं घालण्याचा प्रसंग येत आहे. तो टाळावयाचा असेल तर नवीं देवळें नकोत आणि नव्या प्राणप्रतिष्ठाहि नकोत. आहेत त्यांतील कांहीं देव कमी करून दर पंचवीस हजार वस्तीला एक देव आणि एकच देवालय करण्याची आतां वेळ आली आहे. ( हिंदुसमाज समर्थ कसा होईल, पृ. ११९ ) यांतील तत्त्व ढोबळ मानानें संमत होण्यासारखें असलें तरी २५ सहस्र वस्तींत एका देवाचें एकच देऊळ हें प्रमाण कांहीं तरीच वाटतें. कारण इतक्या वस्तीच्या नगरांत एक देऊळ म्हणजे कांहींच नाहीं! खरें म्हणजे, कांहीं देवळें कमी करावींत हें तत्त्व मान्य असलें तरी कमी करण्याचें प्रमाण हें ज्या त्या ठिकाणच्या 'पडिक व उपेक्षित' देवळांच्या संख्येवर अवलंबून राहील. वरीलप्रमाणें प्रमाण ठरविणें हें व्यवहार्य होणार नाहीं.

मंदिरें कमी करावयाचीं तर प्राणप्रतिष्ठित देवतेची शास्त्रीय पद्धतीनें संमति घेतां येते, याचा उल्लेख पुढील एका प्रकरणांत येणार आहे. त्या पद्धतीचा अवश्य अवलंब करावा. तसेंच ज्या देवळांतील मूर्तीचें अनेक वर्षांत पूजन झालेलें नसेल त्या मूर्तीहि विसर्जित केल्या तरी चालतात. जागची हलविलेली, पडून फुटलेली वा फोडलेली अशी मूर्ती ही देखील विसर्जित करावी असें शास्त्र सांगतें. पण यासंबंधीं एक विचार येथें मांडणें आवश्यक आहे. तो असा कीं, उपेक्षित देवळांची संख्या कमी करणें ही गोष्ट सुलभ असली तरी समाजांतील जाणत्या लोकांनीं मंदिरांची होणारी उपेक्षा प्रयत्नपूर्वक कांहीं प्रमाणांत कमी करतां आल्यास प्रथम पाहावें व ते प्रयत्न जितक्या प्रमाणांत अयशस्वी ठरतील तितक्या प्रमाणांत मंदिरांची संख्या कमी करण्याच्या उद्योगास अवश्य लागावें. प्रत्येक दहा वर्षांनीं ८।१० कोटींनीं भारताची

वाढणारी लोकसंख्या ध्यानीं घेतां कांहीं प्रमाणांत आजचीं 'उपेक्षित' देवळें हीं उद्यां 'अपेक्षित' देवळें ठरूं शकतील. म्हणून मंदिरें पाडण्याची घाई न करतां त्यांची होणारी उपेक्षा दूर करणें हें अधिक श्रेयस्कर; पण मंदिरें उपेक्षित राहून इतरांकडून विटंबित होणार असतील, तर मात्र मूर्तींचें विसर्जन करणें हेंच अत्युत्तम !

☆ ☆ ☆

प्रकरण ७

# मंदिरें प्रभावी कशीं होतील ?

पुण्यसंचयाच्या अभिलाषेंतून मंदिरांची संख्या समाजाला न पेलण्याइतकी भरमसाट कशी वाढली व त्यासाठीं यापुढें आपण कोणती दक्षता घेणें आवश्यक आहे ह्याचा विचार गेल्या प्रकरणांत आपण केला आहे. आतां प्रत्यक्ष मंदिरांत गेल्यावर ज्या गोष्टी आपणाला व्यथित करतात, त्यांचें नीट परीक्षण करून त्यांवर काय उपाय करतां येतील याचा विचार करणें युक्त होईल.

प्रथमतः खटकणारी गोष्ट म्हणजे मंदिरांच्या पटांगणांत, शिखरांवर आणि अंतरंगांत असणारी अस्वच्छता. ह्या अस्वच्छतेच्या संबंधांत 'आंत-बाहेर' असा पक्षपात आढळणार नाहीं ! मंदिरावरील फुटकीं कौलें, पाख्यांवर सांठलेला पालपाचोळा व उगवलेले गवत ह्या गोष्टी खेड्यांतील मंदिरांत अनेक ठिकाणीं दिसतील. शेजारील वडा-पिंपळाच्या फुटक्या व ढांसळलेल्या पारांतून बाहेर पडणाऱ्या पाळांनीं देवळाची भिंतहि भेदाळून जाण्याच्या पंथाला लागलेली आढळेल. काय मौज आहे कोण जाणे, पण साध्या सपाटीवर पिंपळाचीं रोपें उगवत नाहींत. समर्थांनीं वर्णिल्याप्रमाणें 'बांधिले घुमट किल्ल्याचे तट। तयाला फुटती पिंपळ-वट' हा अनुभव देवळाच्या भिंती व आकाशांत उंच चढत गेलेलें शिखर यांकडे लक्ष जातांच पुरेपूर पटूं लागतो. सर्व देवळांना,

रात्रीं लावून घेण्यासाठीं झडप असतेच असें नाहीं व असली तरी तीं लावून घेण्याची पद्धति असेल असें नाहीं ! त्यामुळें सकाळींच मंदिरांत जावें तों मरतुकडीं कुत्रीं व क्वचित् गाढवेंहि तेथें आश्रयाला आलेलीं आढळतील ! मंदिरांतील अंधाराच्या आश्रयानें गाभाऱ्यांत व प्रदक्षिणेच्या वरील बाजूंना पाकोळ्यांनीं व कबुतरांनीं वसति केलेली आढळेल व आपण गाभाऱ्यांत शिरूं लागावें तों आपल्या अनपेक्षित जाण्यानें भेदरून गेलेल्या त्या बिचाऱ्या प्राण्यांची ओंगळवाणी फडफड अवश्य पाहावी लागेल! पावसाळ्यांत गळक्या पाख्यांतून अनेक मंदिरांत 'अभिषेक' चालू असेल व त्यामुळें तेथील जमिनीची पुरी वाट लागलेली दिसेल. देवापुढील समया कळकट असतील नि दिवलीजवळ तेलाचा ओहोळ जाऊन त्यावर धुरळा स्थिरावलेला आढळेल. खेड्यांत काय नि नगरांत काय, गाभाऱ्यांतील अंधार, तेथील चिकचिकाट, नीट व्यवस्था न लावल्यानें कुजूं लागलेला 'निर्माल्य' व सर्वत्र कोंदलेला दिपूस वास ह्यानें अगदीं शिसारी येते. हे व असे असंख्य अनुभव प्रवासवर्णनांच्या पानां-पानांतून वाचावयास मिळतील. गेल्या शतकांतहि हीच स्थिति होती. लोकहित-वादी 'देवळें व नेमधर्म ह्या पत्रांत लिहितात कीं, "किती एक देवळें पडून गेलीं व कित्येक अनावस्थेंत आहेत. किती एक देवळें कसबिणींकडे भाड्यानें आहेत व कित्येक देवळांचा दुर्लौकिक होऊन वाईट नांवें पडलीं आहेत." गंजड व भंगड लोकांचा अड्डा व रिकामटेकड्यांना बसून टवाळी करण्यास 'टिंगलकट्टा' म्हणून कांहीं देवळांचा दुरुपयोग होत असतो, हें कोण नाकारील ? मंदिरांतील गलिच्छतेचें अगदीं अंगावर कांटा उभें करणारें वर्णन प्रबोधनकार ठाकरे यांनीं श्री संत गाडगे बाबा ह्यांच्या चरित्रांत केलेलें आहे. त्यांत ते म्हणतात कीं, "देवळांच्या छपरांखालीं ब्रह्मचाऱ्यांचे वंश किती वाढतात, पति नसतांनाहि किती विधवा पुत्रवती होतात, किती गोसावडे सावकारी करतात, किती गुरुमहाराजांचे मठ गोकुळकाल्याच्या चिखलांत कटिबंध बुडतात आणि किती पळपुट्या छंगीभंगी टग्यांचे थर तेथें खुशाल-चेंडूप्रमाणें निर्घोर जीवन कंठित असतात...याची दखल घ्यावयास नको काय ?" योगी श्रीचिन्मयानन्द ह्यांनीं अनेक मंदिरांचें परीक्षण करून काढलेला निष्कर्ष याहून निराळा कसा असणार ? ते म्हणतात कीं, "If the temple of God is no way different from a third class railway waiting room.

we shall have as much peace and consentration in the temple as we have in the railway station. Unfortunately, of the religionists in this world, the Hindus, in this respect are the dirtiest of the lot; ignorant, careless, indolent and stupid.) " जर देऊळ हें लोहमार्गावरील तिसऱ्या वर्गाच्या प्रतीक्षालयाहून कोणत्याच तऱ्हेनें निराळें नसेल तर आगगाडीच्या स्थानकावर शांतता व एकाग्रता जितकी लाभते तितकीच तेथेंहि लाभेल. ह्यासंबंधांत जगांतील सर्व धर्मनिष्ठ लोकांत हिंदु लोक हे सर्वांत गलिच्छ आहेत; अज्ञानी, गलथान, आळशी व मूर्ख आहेत." (जपयोग अँड गायत्री, पानें ६० ते ६२.)

वास्तविक मनुष्याच्या आवश्यकता व श्रद्धा यांतून उदयाला आलेल्या कोणत्याहि कार्याचें वा संस्थेचें गलिच्छ व किळसवाणें चित्र हें वास्तविक त्या लोकांच्या जीवनाचें चित्र असतें. जें आडांत तेंच पोहऱ्यांत या न्यायानें ढासळलेली मंदिरसंस्था ही अधःपतित समाजजीवनाची द्योतक होय. आमच्या मंदिरांत प्रकाश, स्वच्छता, सुगंध, सुस्वर व प्रसन्नता खेळण्याऐवजीं जर गुरांच्या गोठ्यासारखी स्थिति दिसत असेल तर स्वामी चिन्मयानन्द ह्यांनीं 'गलिच्छ, अज्ञानी, आळशी व मूर्ख' अशा शेलक्या शब्दांत जें आपल्या सर्वांचें वर्णन केलें आहे तें वास्तव म्हणावें लागेल. वास्तविक श्रीरामकृष्ण परमहंसांनीं म्हटल्याप्रमाणें आईच्या सान्निध्यांत वाईट विचार येत नाहींत. दैवत हेंहि मातेसारखेंच प्रभावी असतें. 'देवाशपथ' किंवा 'आईशपथ' खरें सांगतों असें आपण म्हणतों किंवा कालभैरवांपर्यंत आपलें म्हणणें खरें आहे हें पटविण्यासाठीं आपण देवावरचें फूल उचलून दाखविण्याला वा देवळांतील घंटेखालीं उभें राहण्याला सिद्ध असल्याचें सांगत होतों अशा पवित्र ठिकाणीं जर बजबजपुरी माजली असेल तर समाजजीवनाचा स्तर किती ढासळला आहे हें त्यावरून सहज कळण्यासारखें आहे.

अशा वेळीं वैतागून जाऊन श्री. ठाकरे सुचवितात कीं, " हिंदुस्थानांतल्या सगळ्या मूर्ति व पिंड्या जमा करून एखाद्या मोठ्या मध्यवर्ती शहरांत त्यांचें एक कायम प्रदर्शन करावें.... अशी कांहीं योजना झाल्यास पंथ, मत, पक्ष भेदांचा निरास होऊन देवळांचा अनेक सत्कार्यांकडे उपयोग होईल. सार्वजनिक वाचनालयें, संशोधनशाळा, वेधशाळा, शास्त्रीय प्रयोगशाळा, दवाखाने,

अनाथाश्रम, सोशल क्लब, व्याख्यानमंदिरें, तालीमखाने, सहभोजनशाळा इत्यादि नानाप्रकारच्या देशोद्धारक गोष्टींकडे देवळांचा सदुपयोग अभेदभावानें करतां येणें शक्य आहे." (देवळांचा धर्म आणि धर्माचीं देवळें, पृ. ३४) हा श्री. ठाकरे ह्यांनीं सुचविलेला उपाय म्हणजे आरशांत आपलें ओंगळ रूप दिसतें म्हणून, एखाद्या माणसानें तोंड स्वच्छ धुण्याचें सोडून, तो आरसाच फोडून टाकावा, त्या प्रकारचा आहे. जे किळसवाणे प्रकार मंदिराच्या प्राकारांत चालतात, ते चालविणारे लोक मंदिरांतील मूर्तीचें उच्चाटन केल्यानें सुधारणार आहेत असें समजणें, हा शुद्ध भ्रम आहे. मंदिराच्या सावलीलाहि जे चुकून उभे राहात नसतील अशा तथाकथित पुढारलेल्या लोकांनीं, ठाकरे यांनीं वर उल्लेखिलेल्या पद्धतीनें चालविलेल्या सार्वजनिक संस्थांतून किती तऱ्हांचा भ्रष्टाचार चालू आहे व त्यांत मंत्र्यांपासून संत्र्यांपर्यंत अनेकांवर 'स्पुटनिक' सोडण्याची संधि वृत्तपत्राच्या संपादकांना व वक्त्यांना हरघडी कशी लाभते हें सर्वांच्या परिचयाचें आहे. अशा स्थितींत जो उपाय मंदिरांच्यासंबंधीं सुचविण्यांत येईल त्याच उपायाचा अवलंब जीवनांतील समाजोपयोगी म्हणून उदित झालेल्या असंख्य संस्थांवर करावा लागेल. एकाच कुबट व रोगट बनलेल्या तळ्यांतील पाणी कोणी पिंपांत भरो, कोणी घागरींत भरो वा कोणी गडव्यांत भरो, त्यांत कोणताच पालट आढळणार नाहीं. तशीच स्थिति स्वार्थलंपट, कर्तव्यविन्मुख, फुटीर, बोलघेवडया व आकांक्षाहीन झालेल्या समाजामधील लहान-मोठ्या संस्थांची झालेली आहे. ह्यासाठीं समाजांतील जाणत्या लोकांनीं वैतागून जाऊन वरीलप्रमाणें अगदीं कडेलोटाची उपाययोजना न सुचवितां ज्या संस्कारकेंद्रांतून सर्व जनमनांत सद्भाव जागवितां येतील, कर्तव्याची जाणीव करून देतां येईल, आकांक्षा फुलवितां येतील त्या केंद्रांचीं सूत्रें हातीं घ्यावींत व भगीरथाप्रमाणें काळाचा प्रवाह योग्य दिशेनें वळविण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. ज्या देवळांत व्यभिचारी लोक, सावकारी करणारे गोसावडे व छंगीभंगी टग्ये नंगा नाच घालीत असतील त्याच ठिकाणीं राष्ट्रीय उत्थानाचा ध्यास घेतलेल्या तरुणांनीं देवळांचे पंच व व्यवस्थापक हीं स्थानें योजनापूर्वक हातीं घ्यावींत व पावित्र्य, मांगल्य व भक्ति यांचा त्या ठिकाणीं त्रिवेणीसंगम घडवून दाखवावा.

सध्या 'साधु समाज' म्हणून कांहीं साधूंची सरकारच्या पाठिंब्यावर एक संस्था चालू आहे. त्या संस्थेकडे सर्व ठिकाणच्या मंदिरांचीं सूत्रें द्यावींत

असाहि सूर कधीं कधीं उमटलेला ऐकू येतो. वास्तविक देवस्थानांतील मूर्तींच्या ठिकाणीं दिव्यत्व प्रस्थापित होण्यास पुण्यपुरुषच कारणीभूत होत असतात. 'साधु न येतां जिणें वेर्थ। तयां पुण्यक्षेत्रांचें' हें समर्थवचन खरें आहे. त्यामुळें साधूंनीं मंदिरांत येणें जाणें ठेवलें तरी तेथील एकूण नियंत्रण हें त्यांच्या हातीं सोपवावें असें वाटत नाहीं. वरील संस्थेमुळें साधूंतहि भेद पडूं पाहत आहेत असें ऐकिवांत आहे. अशा स्थितींत मंदिरांच्या महाद्वारांतून हें भेदाचें नवें दुखणें आंत न आणलेलें चांगलें. प्रापंचिकांनीं आपला संसार संभाळतां संभाळतां त्यांतून निःस्वार्थ बुद्धीनें वेळ व पैसा देण्याची सिद्धता ठेवून, आपापल्या गांवच्या देवळांची स्थिति सुधारून दाखविण्यासाठीं पुढें येणें, हेंच सर्व दृष्टीनें हिताचें ठरेल. जसें ग्रामपंचायतींतून कांहीं जणांना सहकार्यानें गांवाचा मर्यादित कारभार पाहण्याचें वळण मिळण्याची शक्यता आहे, त्याचप्रमाणें मंदिरांच्या पंचांनाहि सहकार्यानें व वेळप्रसंगीं स्वतःच्या मताला मुरड घालून कसे चोख काम करावें, ह्याचा बहुमोल धडा मिळण्यासारखा आहे. चार जणांचीं मनें राजी राखून चालणारे, कष्टाळू, सुस्वभावी, व्यवहारदक्ष पण निरहंकारी अशा वृत्तीचे कार्यकर्ते हीच सार्वजनिक कार्याची प्रेरक शक्ति असते. ही शक्ति समाजांत जागृत व विकसित करण्याचा ओनामा ह्या दृष्टीनें मंदिरसंस्थेचें महत्त्व मोठें आहे. सरकारमान्य व अन्य साधूंविषयीं (अर्थात् संधीसाधू सोडून) व त्यांच्या कार्याविषयीं मला येथें कोणताच आक्षेप घ्यावयाचा नाहीं; पण मंदिरांचें नियंत्रण मात्र त्यांच्याकडे न जातां ते साध्यासुध्या गांवकऱ्यांकडेच जावें हें आवश्यक वाटतें.

कर्तव्यदक्ष व कामाचा उरक असलेले नियंत्रक लाभले म्हणजे धूळ खात पडलेल्या मंदिरांचा कायापालट झालेला दिसूं लागेल. असे गांवोगांवच्या मंदिरांचे पंच वर्षातून २।४ दिवसांसाठीं एकत्र आणून त्यांना ते करीत असलेल्या कार्यांची परस्परांना माहिती देण्याची संधि दिली तर त्यांतून चांगल्या उपक्रमांची देवाणघेवाण होऊं शकेल. अशा परिषदेच्या वा बैठकीच्या वेळीं मंदिरसंस्थेचें उद्दिष्ट, मंदिरांतील वातावरण, पंचांच्या कार्याचें स्वरूप अशा विषयांवर चांगल्या अधिकारी व्यक्तींचीं उद्बोधक भाषणें ठेवून मंदिरांच्या अंतर्-बाह्य स्वरूपांत कसा धडाक्यानें पालट घडविला पाहिजे, याची सम्यक् दृष्टि देतां येईल. सामान्यतः मंदिरांतील अस्वच्छता ही दुर्लक्षांतून उत्पन्न झालेली

आहे; ती अशा उपक्रमांतून दूर होऊं लागेल. असे जागृत पंच नवनवीन उपक्रम करून मंदिरांचें स्वरूप पालटूं शकतील. सध्या राज्यशासनाकडून विश्वस्तमंडळावर आर्थिक आयव्ययाच्या दृष्टीनें नियंत्रक देखरेख ठेविली जाते. इतर कारभारालाहि सुनियंत्रित वळण लागावें म्हणून ठिकठिकाणच्या पंचांना डोळस व कार्यक्षम बनविण्यासाठी कोणी खटपट चालू केल्यास त्याला कांही दानशूर नागरिकांचें व कदाचित् सरकारचेंहि आर्थिक पाठबळ मिळूं शकेल. ह्यासाठीं एखाद्या तालुक्यांत सर्व दृष्टीनें व्यवस्थित व प्रभावी वातावरणानें युक्त असणाऱ्या मंदिराला प्रतिवर्षी प्रोत्साहनासाठीं कोणत्या तरी स्वरूपांत पुरस्कार देण्याचा उपक्रम चालू करावा. त्यामुळें गांवोगांवच्या मंडळींत आपापलीं देवळें चढाओढीनें नेटकीं करण्याचा उत्साह निर्माण करणें शक्य होईल. चढाओढींत अग्रगण्य ठरणाऱ्या देवळाला ढाल किंवा रोख पैसे न देतां प्रोत्साहनार्थ एखादी प्रचंड घंटा देणें हें सर्व दृष्टीनें शोभून दिसेल.

मंदिरांतील अस्वच्छता व ती नष्ट करण्यासाठीं व्यवहारदक्ष व कुशल पंच उभे करण्याची आवश्यकता आपण पाहिली. आतां मंदिरांतील वातावरणाला उणेपणा आणणाऱ्या इतर गोष्टींकडे आपण वळूं. एकाच देवळांत अनेक मूर्ति असणें हेंहि शक्यतोंवर टाळलें पाहिजे. एका गांवीं गेलों असतां मुख्य गाभाऱ्याच्या दोन्ही अंगांना लहान लहान घुमट्यांमध्यें निरनिराळ्या देवता बसविलेल्या दिसल्या. तें देऊळ दाखवावयास आलेला माझा मित्र त्या घुमट्यांची ओळ दाखवून उद्गारला कीं, 'देवहि आतां चाळीमध्यें राहूं लागले आहेत!' 'इंडियन टेंपल' या पुस्तकांत हिंदूंच्या मूर्तींचा उल्लेख करतांना तो 'Wild exuberance of Hindu images' म्हणजे त्या 'वारेमाप' आहेत, अशा शब्दांत केलेला आढळतो. आपल्या मदुरेच्या 'मीनाक्षी' मंदिराचें वर्णन करतांना प्रा. गंगाधर गाडगीळ लिहितात कीं, "ते घाऊक प्रमाणावर बसलेले देव मोठे केविलवाणे दिसतात... हें देवालय नसून देवांचा Zoo (संग्रहालय) आहे कीं काय असें वाटूं लागतें." अर्थात् दक्षिण भारताइतकी स्थिति सुदैवानें आपल्या भागांत नाहीं, हें प्रारंभींच सांगितलें पाहिजे. पण कांहीं ठिकाणीं एकाच देवळांत अनेक मूर्ति आढळतात. यासंबंधांत असें वाटतें कीं, ज्या देवतेचें मंदिर असेल त्या देवतेशीं अगदीं संबंधित असणाऱ्या देवतांच्या ठसठशीत व सुंदर अशा मोजक्याच मूर्ति

तेवढ्याच तेथें असणें, हें परिणामाच्या दृष्टीनें उत्तम. रामाचें मंदिर असेल तर तेथें राम, लक्ष्मण, सीता आणि मारुती यांच्या मूर्ति पाहिजेत. शिवमंदिरांत गणपति, कार्तिकस्वामी व नंदी यांच्या मूर्ति तेथील वातावरणाला उठाव वा पूर्णता देऊं शकतील. विठोबाच्या मंदिरांत जशी रखुमाई पाहिजे त्याप्रमाणें पंख उभारलेला गरुडहि हवा असतो. पण कोणत्याहि मंदिरांत कोणत्याहि व कितीहि मूर्ति असणें हे परिणामाला उणेपणा आणणारेंच ठरेल. कोणत्याहि ठिकाणीं अतिरेक हा वाईटच. पंढरपूर, त्र्यंबकेश्वर, नासिक आदि ठिकाणीं एका मंदिरांत जागोजागीं मूर्तीसमोर बसलेले लोभी पुजारी वा सेवेकरी दक्षिणे-साठीं यात्रिकांना किती पीडतात याची कल्पना बहुतेक यात्रिकांना आलेली असतेच. पैशाचा लोभ हा प्रामुख्यानें एका मंदिरांत अनेक देवतांची प्रस्थापना करण्याला प्रेरक ठरलेला असावा. मुंबईला श्रीमहालक्ष्मीचें देवालय अत्यंत निसर्गरम्य स्थानीं उभें आहे. छोटी टेकडी व तिच्या पायाशीं फेसाळणारा समुद्र हीं तेथील वैशिष्ट्यें. त्या मंदिरांतील व्यवस्थाहि वाखाणण्यासारखी आहे. पण त्या टेकडीवरील देवळाकडे जाणारा जो रस्ता आहे त्याच्या दोन्ही अंगांनीं असणारा बहुतेक प्रत्येक गाळा हा देवालय बनलेला आहे ! पैशाचा लोभ हाच त्याहि ठिकाणीं व्यथित करतो.

अशा वेळीं काय करतां येईल हें मंत्रशास्त्रांत पारंगत असणाऱ्या विद्वानांनींच सुचविलें पाहिजे. कारण प्राणप्रतिष्ठित चल वा अचल अशा मूर्तींच्या विसर्जन-संबंधांत शास्त्रीय मार्ग कोणता हें सामान्य लोकांना कळणारें नाहीं. काशी-क्षेत्रस्थ महापंडित श्री. राजेश्वरशास्त्री द्रविड ह्यांच्याशीं संभाषण करतांना त्यांनीं उपेक्षित मंदिरांतील मूर्ति अन्यत्र नेण्यासाठीं त्या देवतेची संमति घेण्याचें शास्त्रप्रणीत मार्ग उपलब्ध आहेत, असें सांगितलें होतें. त्याच पद्धतीनें जेथें एकाच मंदिरांत विविध देवतांच्या असंख्य मूर्ति आहेत तेथेंहि काय करतां येईल हें पाहिलें पाहिजे. ह्या ठिकाणीं सर्वसामान्य माणसाला एकाच ठिकाणीं अनेक मूर्ति असल्या तर काय वाटतें हें स्पष्ट केलें आहे; पण ही स्थिति पालटविण्याचा मार्ग हा त्या क्षेत्रांतील जाणकारांनींच पुढाकार घेऊन ठरविला पाहिजे. सध्यां तरी, शक्यतोंवर नवीं मंदिरें कां बांधलीं जाऊं नयेत यासंबंधीं ऊहापोह मागील प्रकरणांत केलेलाच आहे; त्या जोडीनें येथें असें सुचवावेंसें वाटतें कीं, आज असणाऱ्या मंदिरांत आणखी नव्या देवतांच्या मूर्ति बसविण्याचेंहि

शक्यतोंवर टाळावें. अस्तु.

प्रमुख मंदिरांतील प्रवेशद्वाराजवळ असणारे असंख्य रोगी व भिकारी हाहि मंदिराच्या परिसराचा अविभाज्य घटक बनला आहे. दान हें पुण्यप्रद असतें व त्यामुळें दान करणें हा धर्म होय, असें सार्थ समीकरण जनमनांत बसलेलें आहे. 'ज्यासि अपंगिता नाहीं, त्यासी धरी जो हृदयीं ' त्या उदारधीची सर्वच धर्मांनीं मुक्तकंठानें स्तुति केलेली आढळेल. दुसऱ्याचें दुःख, क्लेश दारिद्र्य, असहाय्यता पाहून मन कळवळून जाणें ही माणुसकीची निशाणी होय. हे देवळाजवळील रोगी व भिकारी एका परीनें आपल्या माणुसकीला जिवंत ठेवीत असतात. चार–दोन पैसे भिकाऱ्याच्या ओंजळींत वा कटोऱ्यांत टाकल्यानंतर त्याच्या मुखावर उमटणारें समाधान, त्याच्या दृष्टींतून उमलणारी कृतज्ञता व मुखांतून भलाईचे येणारे उद्गार, हे चार दिडक्यांच्या मानानें खरोखरच बहुमोलाचे असतात. अशा भिकाऱ्यांत लंगडे, थोटे, आंधळे, मुके, बहिरे, जख्खड म्हातारे व कुष्ट रोगानें जर्जर झालेले रोगी हे निरपवादपणें दान देण्यास योग्य आहेत; पण महारोग्यांसारख्यांनीं पैसे मागण्यासाठीं लोकांच्या अंगाला स्पर्श करण्यापर्यंत जो प्रकार घडतो तो सामाजिक आरोग्याच्या दृष्टीनें योग्य नाहीं. तसेंच शरीरानें अव्यंग असून शारीरिक कष्टाचें काम करण्याची क्षमता असणारे कांहीं लोक जेव्हां धंदा म्हणून भिकाऱ्यांत शिरतात, तेव्हां त्यांचाहि विचार स्वतंत्रपणें करणें आवश्यक ठरतें. आजकाल कल्याणकारक राज्याची कल्पना साकार करण्यासाठीं अनेक उपक्रम चालू आहेत. त्यांत इतर भिकाऱ्यांप्रमाणें महारोगी व धंदेवाईक भिकारी यांना मार्गी लावण्याच्या योजना झालेल्या आहेत. त्या सफल होण्यासाठीं कांहीं कालावधि अर्थातच जावा लागेल. तोंवर लोकांनीं क्रमाक्रमानें व तारतम्यानें व्यक्तिगत दान देण्याचें बंद करून सामुदायिक निधींत यथाशक्ति आपला वांटा उचलण्याची सिद्धता ठेविली पाहिजे. जों जों समाजाची आर्थिक स्थिति सुधारेल व राजसत्तेकडून भिकारीवर्गाला स्वतःच्या पायावर उभें करण्याचे प्रयत्न यशस्वी होतील तों तों लक्तरांत हिंडणाऱ्या रोगग्रस्त समाजबांधवांचें हृदयविदारक चित्र देवळांच्या परिसरांतून पुसलें जाईल. हें दैन्याचें चित्र आज किती भेसूर आहे, हें पहावयाचें असेल तर एकट्या मुंबई नगरांत २० सहस्र भिकारी आहेत ही वस्तुस्थिति ध्यानीं घेतली कीं झालें !

[६]

अर्थात् देवळांजवळ बसणारा व घरोघर भिक्षांदेहि करणारा वर्ग समाजांत जेव्हां उरणार नाहीं तेव्हां तो दिवस खरोखरच अत्यंत भाग्याचा ठरेल. भिकारी दिसला कीं, हृदयाला पाझर फुटतो व त्याला कांहीं द्यावें म्हणून आपला हात धान्याच्या पोत्याकडे किंवा पैशासाठीं आपल्या खिशाकडे वळतो. माणसाच्या व्यवहारांतून प्रकट होणारी ही अनुकंपा व सहानुभूति ही त्याच्या सात्त्विकतेंत भर घालून त्याच्या अंतरंगाचें ऐश्वर्य वाढविणारी असते. थोड्या दिवसांनीं सरकारी योजना आणि देशाचा आर्थिक-विकास यांमुळें खरे-खोटे भिकारी मार्गी लागल्यावर, हा सात्त्विकतेला चालना देणारा दानधर्म आपो-आप थांबेल कीं काय, अशी शंका मनांत उमटणें शक्य आहे. पण आपल्या सात्त्विकतेच्या परिपोषणासाठीं दारिद्र्यानें गांजलेला व माणुसकीला आंचवलेला एखादा वर्ग समाजांत राहावा, असें कोणी कधींच म्हणणार नाहीं. तर भविष्य-काळाचें जें चित्र डोळ्यासमोर येतें त्यांत एक अतिशय उच्च श्रेणीचा ज्ञानी, कर्मयोगी व सेवा हेंच जीवन मानणारा वर्ग 'भिक्षेची दीक्षा' घेऊन समाजांत पुढें येईल असें स्पष्ट दिसतें. तो वर्ग रात्रंदिवस जीवनाच्या कोणत्या तरी क्षेत्रांत समाजाची निरलसतेनें निःस्वार्थ सेवा करण्यांत निमग्न असेल व त्या सेवेंतच त्या बुद्धिमान्, चारित्र्यसंपन्न व समाजहितैषी वर्गाला आपल्या प्रगत शक्ति व अलौकिक गुण सहजपणें व सढळ हातानें वेचतां यावेत यासाठीं समाजानें त्यांच्या योगक्षेमाची चिंता आपण होऊन वाहिलेली असेल. हिंदुस्थानाचा भविष्यकाळ हा शुक्ल पक्षांतील चंद्राप्रमाणें, अज्ञान, दारिद्र्य, स्वार्थ व फुटीरता यांचा अंधार क्रमशः दूर करणारा ठरणार असून निःस्वार्थ सेवेचा व सहका-र्याचा प्रकाश समाजजीवनांत कलेकलेनें वाढविणारा ठरणार आहे. ह्या वाटणाऱ्या विश्वासांतूनच असें म्हणावेंसें वाटतें कीं, आजच्या समाजांतील भिकाऱ्यांकडे पाहून कींव वाटते व दुःख होतें तर उद्यांच्या कर्तव्यनिष्ठ व गुणसंपन्न असणाऱ्या नव्या भिक्षूंविषयीं कौतुक व आदर वाटेल नि आपल्याकडून त्यांची अल्पस्वल्प तरी सेवा घडावी, असें वाटूं लागेल. एवढेंच नव्हे, तर त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून चालण्यांतहि अनेकांना धन्यता वाटूं लागेल! असो.

मंदिरांत गेल्यावर त्या ठिकाणीं भाविकांना जितकी शांतता लाभेल तितकी चांगली. ही अपेक्षा खेड्यांतील मंदिरांत पुरी होते; पण प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीं व मोठ्या नगरांतून जो कलकलाट चालू असतो, त्यानें आपलें कान

किटतात ! एखादा उत्सव व जत्रा असली तर कलकलाट होणें हें कांहीं प्रमाणांत स्वाभाविक म्हणावें लागेल. पण मुंबईतील गिरगांव व नळबाजार येथील गोंगाट सर्वसामान्य दिवशीं मंदिरांच्या प्राकारांत अनुभवास येणें हें इष्ट नाहीं. महाराष्ट्रांतील प्रसिद्ध उद्योगपति श्रीमंत वि. रा. वेलणकर लिहितात कीं, " देवालयांत शांतता व गांभीर्य दृष्टीस पडत नाहीं. कलकलाट, घंटांचे नाद, मुलांचे खेळ तेथें चालल्यामुळें आमच्या प्रत्येक देवालयास बाजाराची उपमा शोभेल ! " ( जगांत वागावें कसें ?– पृ. १४६ ) कांहीं ठिकाणीं अशी बाजाराची उपमा देण्याचीहि आवश्यकता नाहीं. कारण तेथें नाकापेक्षां मोती जड ह्या न्यायानें प्रत्यक्ष मंदिरापेक्षां जीवनोपयोगी वा सांसारिक वस्तूंच्या प्रत्यक्ष बाजारानेंच मंदिराचा परिसर गजबजलेला असतो ! हीं दुकानें मंदिराच्या प्राकारांत अंतर्मुख असतात व तेथील कटकटीनें मंदिरांत अंतर्मुख होण्यास कोणालाच सुचणें शक्य नसतें ! मंदिरांत जाणाऱ्यांनीं तोंड शिवून घेतल्याप्रमाणें वागावें असा अतिरेकी उपाय कोणी सुचविल्यास त्यावर अनेक जण ' तोंडसुख ' घेतील. यासाठीं आपला आवाज जरा मर्यादेंत ठेवावा, एवढी सूचना सर्वांना पेलणारी वाटेल. आतां मंदिरांच्या सभोंवतीं जेथें दुकानांचा वेढा पडलेला असतो अशी पुण्याच्या तुळशीबागेंतील श्रीराममंदिरासारखीं स्थानें हीं तर शांततेच्या दृष्टीनें कुचकामाचीं झालीं आहेत. तेथें असणारीं दुकानें जर बहिर्मुख करण्यांत आलीं तर संस्काराच्या दृष्टीनें तेथील वातावरणांत सुधारणा होईल. पण हें घडण्यासाठीं तेथें येणाऱ्या भाविकांनीं तेथील दुकानांवर कटाक्षपूर्वक कडकडीत बहिष्कार टाकला पाहिजे; किंवा श्रीरामाच्या कृपेनें तशी त्या जागेच्या धन्याला सद्बुद्धि तरी झाली पाहिजे ! जोंवर यांतील एकहि गोष्ट घडणार नाहीं तोंवर तेथील बाजारानें लोक बेजार होणें अटळ आहे ! वास्तविक मंदिरांच्या प्राकारांत फुलें, उदबत्त्या कापूर, बुक्का, गुलाल, हळद–कुंकू, नारळ, मेवामिठाई, जपमाळा व चित्रें अशा पूजेसाठीं वा नैवेद्यासाठीं लागणाऱ्या वस्तूंचीं नीटनेटकीं, नेमस्त व ठरीव भावांत व्यवहार करणारीं मोजकीं दुकानें असणें हेंच युक्त होय. पण मंदिरांतील पवित्र वातावरणापेक्षां आर्थिक लाभाचा विचार मनुष्य अधिक करूं लागला कीं मंदिराला असें गौण स्थान प्राप्त होऊन त्याचा उद्देश विफल होतो. अशाच पैशाच्या लोभांतून मंदिरांच्या भिंतींवर ' लगाव सोटा ' व ' जमालगोटा ' अशा औषधींचीं भित्ति-प्रकटनें ठळकपणें चितारण्यास संमति दिली जाते.

१८५७ च्या क्रांतियुद्धांतील पराक्रमी व स्वाभिमानी नरवीरांच्या स्मरणार्थ उत्तर प्रदेशांत मेरठ येथें नुकताच एक प्रचंड स्तंभ उभारण्यांत आलेला आहे. आश्चर्य असें की, त्या स्मारकाच्या भितींवरहि नाहीं नाहीं त्या जाहिराती दिसून आल्या ! पैशापुढें औचित्य दिसत नाहीं आणि औचित्य सुटलें कीं ह्याहून दुसरें काय होणें शक्य आहे ?

मंदिरांच्या आवारांत कांहीं दुकानें असण्यास प्रत्यवाय नसावा म्हणून ज्यांचा वर उल्लेख केला, त्या दुकानांसंबंधींहि एक दक्षता घेणें आवश्यक वाटतें. हीं फुलां-फळांचीं, हळदी-कुंकवाचीं आणि लाह्या-बुक्क्याचीं दुकानें हीं कटाक्षानें मूर्तिपूजकांचींच असावींत हें सुचविणें आजच्या घटकेला उचित होईल. नीट विचार केला असतां, देवाला भक्तिभावनेनें समर्पण करण्यासाठीं ज्या वस्तु भाविकांनीं घ्यावयाच्या, त्या मूर्तिपूजेची थट्टा करणाऱ्या लोकांपासून घेणें, हें पूजेच्या पावित्र्याला बट्टा लावण्यासारखें आहे, हें कोण नाकारील ?

देवाला अंगभोग व रंगभोग असे दोन प्रकारचे भोग द्यावयाचे असतात. देवाला चंदनाची उटी लावणें, दहीभातानें पूजा बांधणें, नवीन वस्त्रालंकार चढविणें हे अंगभोग मानले जातात. तर 'रंग–भोगांत' कीर्तन, भजन, प्रवचन, नृत्य आणि गायन यांचा अंतर्भाव होत असतो. सामान्यतः पंचोपचारांनीं पूजा करण्याची पद्धति सर्वत्र दिसून येते. कांहीं क्षेत्रांतील व नगरांतील प्रसिद्ध मंदिरें सोडल्यास इतरत्र हे भोग व थाटाच्या पूजा असणें संभवनीय नाहीं. खेड्यांतील अनेक मंदिरांत यथासांग समंत्रक पूजा तर सोडाच पण मूर्तीवर तांब्याभर पाणी घालून गंधाक्षतांनीं होणारी साधी पूजाहि घडत नाहीं ! कांहीं वेळां अशा मंदिरांत गेल्यावर, केव्हां तरी वाहिलेलीं व आतां वाळून गेलेलीं फुलें मूर्तीवर पाहिलीं कीं, या गोष्टीची साक्ष पटते. गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मद्रास आदि प्रांतांतील प्रसिद्ध देवस्थानांतून देवाला दाखविण्यांत येणारे मणामणांचे नैवेद्य, त्यांना चढविले जाणारे भोग, त्या नैवेद्यांचे, भोगांचे व दैनंदिन पूजेचे होणारे लिलांव मनांत तिटकारा वा उबग निर्माण करणारे आहेत. सुदैवानें असे अतिरेकी प्रकार महाराष्ट्रांत विशेष दिसत नाहींत. जेथें साध्या यथासांग पूजेचीच मारामार तेथें हे श्रीमंती प्रकार कोठून यावेत ? पण आपल्या कांहीं मंदिरांतून पूजाहि होऊं नये, ही गोष्ट मनाला रुचणारी नाहीं. समंत्रक व शास्त्रशुद्ध पूजा करणारे श्रद्धावान् व जाणते पुजारी

दिवसेंदिवस कमी होऊन त्यांच्या जागीं हांजी हांजी किंवा दंडेली करणारे अडाणी पोट-पुजारी दिसावेत हें केवढें दुर्भाग्य ! ह्यासंबंधींचा विचार एका स्वतंत्र प्रकरणांत मागें केलेलाच असल्यानें येथें त्या खटकणाऱ्या गोष्टीचा नुसता उल्लेख पुरेसा आहे.

मंदिरांतील विशेष खटकणाऱ्या गोष्टींचा येथवर विचार झाल्यावर तेथील वातावरणांत गांभीर्य, पावित्र्य व सौंदर्य अशा गोष्टी आणण्यासाठीं काय करावें, या दिशेनें विधायक विचार करणेंहि युक्त दिसेल. मंदिराजवळ एखादी सुंदर पुष्पवाटिका असावी व सभोंवतीं छाया देणारे व प्रशांततेंत भर घालणारे तऱ्हेतऱ्हेचे वृक्ष लावावेत. मंदिरावर, दुरून दिसूं शकेल असा भगवा ध्वज डोलत असणें, हेंहि तेथील पावित्र्याला पोषक आहे. आजकाल मंदिराच्या उत्सव-प्रसंगीं व एखाद्या सणाच्या दिवशीं मंदिरावर अनेक झेंडे लाविले जातात; पण निरनिराळ्या देवतांचे म्हणून जे ध्वज वर्णिलेले आहेत त्यांचा वापर करण्याची प्रथा खंडित झाली आहे. गणपतीच्या मंदिरावर ‘ मूषक ’ चिन्हांकित ध्वज वा विष्णूच्या मंदिरावर ‘ गरुड ’ असणारा ध्वज लावण्यांत औचित्य आहे. अशा चिन्हांप्रमाणेंच मंदिरावर झेंडे लावतांना त्यांच्या रंगाकडेहि ध्यान दिलें जात नाहीं. झेंड्यांसाठीं तऱ्हेतऱ्हेचे रंग योजण्यांत येतात. भारतीय एकात्मतेला परिपुष्ट करण्याच्या दृष्टीनें भगवा–गेरवा रंगाचा ध्वज करून त्यावर देवतेला अनुरूप असें चिन्ह काढण्यांत आलें पाहिजे. आपल्या सहस्रावधि वर्षांच्या प्रदीर्घ परंपरेनें भगवा रंग हा पराक्रम नि त्याग यांचा निदर्शक म्हणून उभ्या भारतांत मान्यता पावला आहे. ऐहिक ऐश्वर्यासाठीं, तळहातावर शिर घेऊन शत्रूवर तुटून पडणाऱ्या विजयी वीरांचें सौभाग्य आणि पारमार्थिक कल्याणाचा गड सर करणाऱ्या संन्याशांचें धगधगतें वैराग्य या दोहोंचेंहि प्रतिनिधित्व भगव्या ध्वजानें मिळविलें आहे. असा ध्वज मंदिरांच्या उंच शिखरांवर अखंड डोलत ठेवणें हें जणूं उगवत्या पिढीसमोर भारताचें ब्रीद झळकत ठेवण्यासारखें ठरेल. कारण जे कांहीं गुण आज आमच्या जीवनांत प्रकर्षानें पाहिजे आहेत, त्यांपैकीं ‘ त्याग नि पराक्रम ’ यांची प्रेरणा देण्याचें अद्‌भुत सामर्थ्य ह्या प्रतीकांत आहे. ज्या दिवशीं एखाद्या मंदिरांत उत्सव असेल त्या दिवशीं किंवा गुढीपाडवा वा त्रिपुरी-पौर्णिमा असा सण पाहून नवा ध्वज मंदिरावर चढविण्याची प्रथा पाडावी. या ठिकाणीं त्रिपुरी पौर्णिमेचा

दिवस अशा हेतूनें सुचविला आहे कीं, मंदिरावरील ध्वज पावसाळ्यांत वारंवार भिजून फिका झालेला असेल, तर तो त्या वेळीं पालटविणें योग्य ठरेल.

मंदिरांच्या वातावरणाला उठाव आणण्यासाठीं तेथील भिंतींवर व आंतील खांबांवर सुंदर नि भव्य चित्रांच्या चौकटी लावण्याची पद्धति आहे. पण त्यांत एक सुधारणा होणें आवश्यक वाटतें. तेथें लावण्यांत येणारीं चित्रें हीं ज्या देवतेचें मंदिर असेल तिच्या जीवनकथेवर आधारित असावींत. आजकाल कोणाहि भाविकानें देणगी म्हणून जीं चित्रें दिलीं असतील तीं सरसकट लाविलीं जातात. त्यांत कांहीं ठिकाणीं देणगीदारांचीं वा त्यांच्या कुटुंबियाचींहि छायाचित्रें तेथें लटकलेलीं दिसतात. वास्तविक देवळांत व्यक्तींची प्रतिष्ठा ती काय ? त्यांनीं नामदेवाप्रमाणें पायरीशीं राहण्यांतच धन्यता मानली पाहिजे. पण चालू काळाचा रंग वा ढंग कांहीं औरच आहे ! परिणामाच्या दृष्टीनें रामाच्या देवळांत रामायणांतील प्रसंग नि श्रीकृष्णाच्या देवळांत महाभारतांतील घटना जर क्रमानें चितारल्या गेल्या तर त्यांत औचित्य साधेल. रंगीत चित्रांनीं मंदिराचें ऐश्वर्य किती वाढतें हें औंध येथील पंतप्रतिनिधींच्या राजवाड्यांत असणाऱ्या देवीच्या मंदिरांत जाऊन समजण्यासारखें आहे. औंधचे कलाभिज्ञ अधिपति कै. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि ह्यांच्या कुंचल्यांतून साकार झालेलीं भव्य व रेखीव तैलचित्रें तेथें हारीनें लावलेलीं दिसतील. पण त्यांत वर सुचविल्याप्रमाणें योजना नाहीं, हेंच तेवढें वैगुण्य. त्यांत ऐतिहासिक व पौराणिक चित्रांची सरमिसळ केलेली आढळते. अर्थात् असें असूनहि त्या कलापूर्ण चित्रांनीं तेथील वातावरणाला शोभा, गांभीर्य व आकर्षकता प्रदान केली आहे हें निःसंशय. खेड्यांतील मंदिरांना असा संस्थानी थाट परवडणार नाहीं. त्या ठिकाणीं गांवांतील कोणी हौशी चितारी भिंतीवर कांहीं नक्षीकाम करून चित्रें रेखाटतो. तसेंच पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणीं नांवारूपास आलेला कोणी गांवकरी ग्रामदेवतेला राजा रविवर्म्यासारख्यांच्या चित्र-चौकटी अर्पण करतो. खेड्यांतील देवळांच्या भिंतीवर, शाळकरी असतांना काढलेल्या एका चित्रांतील सफाई, रेखीवपणा व अभिजात कला ह्यामुळें शिल्पकार श्री. करमरकर हे एका इंग्रज अधिकाऱ्याच्या आढळांत आले व त्याच्या कौतुकास व प्रोत्साहनास पात्र ठरले. सासवणें गांवांतील हौसेनें काढलेल्या एका भित्तीचित्राचा बोलवाला होऊन त्यांच्या प्रगतीचा प्रारंभ झाला. अशी अभिजात कलाकार मंडळी, खेड्यांतील विपरीत

परिस्थितींत कोठें कोठें गंजत पडलीं असणें सहज संभवतें. त्यांना खेड्यांतील देवळांत चित्रें रेखाटून आपली हौस कांहीं प्रमाणांत भागवितां येते व थोडा विरंगुळा लाभूं शकतो, हेंहि कांहीं कमी नाहीं. अशा झाकल्या माणकांना, त्या गांवांतून बाहेर जाऊन कोणत्या तरी क्षेत्रांत यशस्वी झालेल्या मंडळींनीं हेरावें व त्यांच्या कलेच्या अंकुराला सक्रिय पाठबळाचें खत-पाणी देऊन त्यांना जगद्विख्यात नानासाहेब करमरकरांप्रमाणें फळांफुलांनीं ओथंबलेले कलेचे महावृक्ष होण्यास अवसर वा संधि द्यावी. अर्थात् असें प्रोत्साहन मिळालें नाहीं तरी मुळांत अभिजात कला ही नागर संस्कारांनीं युक्त नसतांनाहि हृदयाचा वेध घेणारी असते, असें खेड्यांतील मंदिरांत दिसणाऱ्या कांहीं चित्रांवरून ध्यानांत येते. असो.

नगरांतील मंदिरांतून कथा-कीर्तन, पुराण व प्रवचन अशा कार्यक्रमांचें आयोजन होऊं शकतें. पण खेड्यांना या गोष्टींचा लाभ क्वचितच होतो. खरें पाहूं जातां श्रवणभक्ति ही सुलभ व सुखद असते. त्यामुळें तीच सर्वसामान्यपणें सर्वांना जमणारी असते. पण ज्या खेड्यांत श्रवणाला संधि नाहीं, तेथें सद्विचार व सदभिरुचि जागविणाऱ्या निवडक पुस्तकांनीं युक्त असें छोटेंसें ग्रंथालय चालवितां आल्यास, दुधाची तहान ताकावर भागविल्याचें तरी समाधान लाभूं शकेल. अर्थात् वाचन म्हटलें म्हणजे कांहीं कष्ट आले. दुर्दैवानें वाचण्याचें ज्ञान व आवड नसलेले लोकच अधिक. पण त्यांतून ज्यांना वाचण्याची इच्छा व सवड असेल त्यांच्या मनांतील सद्भाव जागविण्याचें कार्य कांहीं प्रमाणांत असे निवडक ग्रंथ करूं शकतील.

मंदिरांच्या सुधारणेची नुसती दिशा कळावी व सर्वांच्या प्रगतीकडे लक्ष वेधावें, इतक्या बेतानेंच येथें विचार मांडलेले आहेत. ह्यांतील कांहीं कल्पना नवीन असतील व कांहीं रूढकल्पनांची येथें उजळणी केलेली आढळेल. पण ह्या सर्व खटाटोपाचा हेतु मंदिरसंस्थेच्या उपेक्षित स्थितीचें नीट परीक्षण करण्याची इच्छा तरुणवर्गांत जागृत करावी व त्यांतून दुबळ्या, दैववादी व भोळसट अशा बहुजनसमाजाला महत्त्वाकांक्षी, प्रयत्नवादी, डोळस आणि आत्मनिर्भर होण्याला अनुकूलता निर्माण करावी असा आहे. ढासळलेली व निष्प्रभ मंदिरसंस्था ही समाजाच्या मनोवृत्तीचें प्रतिबिंब आहे. हें विचारसूत्र

ध्यानीं घेऊन मंदिरांचा प्रभाव व चैतन्य जागृत करण्याच्या निमित्तानें खरें म्हणजे समाजाची उत्कर्ष करून घेण्याची आकांक्षा व त्यासाठीं लागणारा कर्मयोग हाच सचेतन करावयाचा आहे. हा हेतु ओळखून मंदिरांतील वातावरण अधिक गंभीर, प्रसन्न व प्रभावी करण्यासाठीं अनेकांनीं प्रयत्नाला लागावें हीच इच्छा.

☆ ☆ ☆

## प्रकरण ८

# निवांत वनराजींतील मंदिरें

कांहीं मंदिरें हीं गांवापासून थोड्या अंतरावर झाडीझुडीनें वेढलेलीं असतात; तर अनेक देवस्थानें लोकवस्तीपासून दूर असणाऱ्या डोंगरावर वा शैलशृंगावर आढळून येतात. वनराजीनें नटलेल्या एकान्तांतील मंदिरांच्या परिसरांत जेव्हां नदीप्रवाह, खळखळून वाहणारे निर्झर वा स्फटिकाप्रमाणें निर्मळ पाणी असणारीं कुंडें असतात, तेव्हां तेथील वातावरणांत एक गूढ आकर्षकता प्रत्ययास येते. कुंडांत असणाऱ्या रुपेरी माशांची, भाविकांनीं टाकलेल्या लाह्या–दाणे वेचण्यासाठीं होणारी चळवळ व घनदाट झाडींतून विहरणाऱ्या रानपांखरांचे किलबिलाट हे तेथील एकान्ताला मोहकता आणतात. अशीं रम्य स्थानें गांवोगांव असलीं, तरी आज त्यांचीहि उपेक्षा होत असलेली आढळते. देवतांचे विशेष महत्त्वाचे दिवस वा उत्सव वगळून इतर दिवशीं अशा मंदिरांत नियमितपणानें जाणारे भाविक अगदींच थोडे असतात. त्यामुळें मिळकतीवरच अधिक लक्ष असणारे पुजारी अशा ठिकाणच्या मंदिरव्यवस्थेकडे विशेष ध्यान देत नाहींत. त्याचा परिणाम म्हणजे, मंदिराची पडझड व नैसर्गिक रम्यतेची नासाडी, असा सांगावा लागेल.

मुळांत अशा निसर्गरमणीय स्थानीं मंदिरें उभारण्यास कोणा तरी

भक्ताची एकान्तप्रियता व रसिकता कारणीभूत झालेली असते. पण अशा भक्ताच्या जीवनांत भरभराटीस आलेलीं मंदिरें, त्याच्यामागून पोटार्थी व्यवस्थापकांच्या व पुजाऱ्यांच्या हातांत गेलीं कीं, त्याची दुरवस्था होण्यास वेळ लागत नाहीं. मंदिराजवळ फळांफुलांचीं व शोभेचीं झाडें प्रयत्नपूर्वक लावून त्यांची जोपासना करण्याकडे हलकें हलकें दुर्लक्ष होतें; एवढेंच नव्हे तर अशा ठिकाणची शोभा वाढविणारे सुंदर वृक्ष जळणासाठीं क्रमाक्रमानें तोडले जाऊन तेथील सौंदर्याची खरोखर राखरांगोळी केली जाते! आत्मीयतेनें व्यवस्थेंतील बारकावे पाहणारे दक्ष संचालक असेपर्यंतच सार्वजनिक संस्था नीट चालू असतात; पण एकदां का सांगकाम्या, स्वार्थी व कर्तव्यशून्य लोकांच्या हातांत अशा स्थानांचीं सूत्रें गेलीं कीं, अशा लोकांना साक्षी ठेवूनच गांवांतील लोक दिवसाढवळ्या तेथील मालमत्तेची लूट करतात. ‘ सार्वजनिक ’ शब्दाचा अर्थ सर्व लोकांची असा होतो. पण त्या सर्व लोकांच्या असणाऱ्या संस्थेंत वा स्थानांत सर्वांनीं ह्या ना त्या रीतीनें कांहीं तरी भर घालण्याची आवश्यकता असते. पण उपभोगापुरताच ‘ सार्वजनिक ’ शब्दाचा अर्थ सीमित झालेला दुर्दैवानें दिसत आहे. सध्यां अशा पवित्र व रम्य ठिकाणीं, नवीन वृक्ष लावून ते कष्टपूर्वक जोपासतांना सहसा कोणी आढळणार नाहींत; तर पूर्वजांनीं लाविलेल्या वृक्षांची दुष्ट तोड करून ‘ सार्वजनिक ’ शब्दाची विटंबना करणारे महाभाग ठायीं ठायीं आढळतील! अर्थात् असें होण्याला लोकांची खालावलेली दानत व पुजारी आणि संचालकवर्गाचें दुर्लक्ष अशा दोन्ही पापग्रहांची युतीच कारणीभूत होत असते.

निसर्गरम्य स्थानीं असणाऱ्या मंदिरांचें महत्त्व मानसिक परिणामांच्या दृष्टीनें स्वतंत्र व विशेष असतें. दैनंदिन जीवनाच्या धकाधकींत मानवी मनाची विलक्षण ओढाताण होत असते, अशा मनाला गजबजाटापासून दूर असणाऱ्या मोकळ्या व प्रसन्न वातावरणांत कांहीं काळ संचार करण्याची संधि मिळाल्यास त्याचा सर्व शीण दूर होऊन त्याला टवटवी येऊं लागते. कजाग सासूच्या छळवादानें बेजार झालेली वा रडकुंडीस आलेली सून आपल्या माहेरीं यावी त्यासारखी मनाची अवस्था अशा स्थानीं आल्यावर होत असते. ह्या नवजीवन देणाऱ्या निसर्गाच्या माहेरवासांतच मनुष्याला आत्मनिरीक्षण करण्याला सुसंधि प्राप्त होते व मनांतील सुप्त असणाऱ्या सात्त्विकतेला जाग येऊं लागते.

सध्यांच्या यंत्रयुगांत नगरें ही गोरखचिंचेच्या बुंध्यासारखी बेढब वाढत असून खेड्यांची अवस्था त्याच चिंचेच्या फांद्यांसारखी किडकिडीत व रोडावलेली होत आहे. नगरांतील व खेडयांतील जीवन हें अत्यंत गुंतागुंतीचें व प्रक्षोभक झालें असून मानवी मनापासून शांति ही सारखी दूर दूर पळत आहे. अशा स्थितींत अतृप्त आकांक्षांनीं अगदीं वखवखलेल्या मानवीं मनांतून ज्या ज्या भावलहरी वातावरणांत अखंड उमटत असतात त्या स्वाभाविकच विकारवशता व अतृप्ति वाढविणाऱ्या असतात. त्यामुळें अशा खवळलेल्या रोगट वातावरणांत मुरून राहणाऱ्या लोकांना मनःस्वास्थ्य व शांतता कशी मिळावी ?

योगविद्येसाठीं अंतर्मुख होऊन एकाग्रतेनें जी साधना करावी लागते, तिला तर अशा वातावरणाचें संपूर्णतः वावडेंच असतें. वाई क्षेत्रांत साठ वर्षांपूर्वी एक योगी ईश्वरदास म्हणून होऊन गेले. ते ह्यासंबंधीं सांगत असत कीं, "दार लावून घेऊन बसले तरी बाहेरचा आवाज कानीं येतो; अगदीं त्याचप्रमाणें सभोंवतींच्या लोकांच्या बऱ्या-वाईट विचारांचीं आंदोलनें आपल्या एकाग्रतेच्या अभ्यासावस्थेंत विक्षेप उत्पन्न करतात. ह्या कामीं आपल्याकडे असें एकहि ठिकाण राहिलेलें नाहीं कीं, जेथें नैसर्गिक शुद्ध वातावरण आणि पूर्ण एकान्त असून दहा-पांच मैलांच्या परिसरांत अन्य विचारांचा नुसता वासहि येणार नाहीं." जेथें अंतर्मुख होऊन योगविद्येकडे वळलेल्या सात्त्विक मनाला धक्के देणारें वातावरण सर्वत्र कोंदून राहिलें आहे, तेथें सर्वसामान्य माणसांच्या आधींच प्रक्षुब्ध व गढूळ असणाऱ्या मनोकोषावर त्याचे किती विपरीत परिणाम होत असतील, याची सहज कल्पना करतां येईल. असें असल्यानें धांवपळीच्या यांत्रिक जीवनक्रमांतून थोडी सवड काढून जर नैसर्गिक निरोगी, प्रभावी व पवित्र अशा वातावरणांत दिवसांतील कांहीं काळ शांतपणें काढावयाचा असेल, तर निसर्गानें सुंदरतेचें वरदान दिलेल्या एकान्तांतील पवित्र मंदिरांकडेच आपले पाय वळविणें, हेंच हितकर ठरणारें आहे. ह्या दृष्टीनेंच अशीं असणारीं मंदिरें सुस्थितींत ठेवण्याकडे व तेथील नैसर्गिक प्रसन्नतेंत न्यूनता उत्पन्न होऊं न देण्याकडे, समाजांतील जाणत्या मंडळींनीं बुद्धिपुरस्सर लक्ष पुरविलें पाहिजे.

अलीकडे नागरी जीवनाला अगदीं कंटाळून वा विटून गेलेली मंडळी सुटीच्या दिवसांत नगराजवळील कोणत्या तरी रम्य ठिकाणीं १–२ दिवसांच्या सहलीसाठीं जाऊं लागली आहे. मुंबईच्या उकडहंडींत शिजून निघणारी मंडळी

माथेरान, खंडाळा, लोणावळा, घारापुरी, वज्रेश्वरी व कनकेश्वर अशा स्थानांकडे धांव घेतात, तर पुणेकर नागरिक लोणावळा, खंडाळा, विठ्ठलवाडी, बनेश्वर सिंहगड यांच्या परिसरांत आश्रयाला जातात. यंत्रयुगानें निर्माण केलेल्या संकीर्ण समाजस्थितींत 'सहल' ही गोष्ट आतां अपरिहार्य झाली आहे; व जों जों नागरी बकाल जीवनाची गुंतागुंत वाढत जाईल, तों तों ही अपरिहार्यता वज्रलेप होऊन बसेल. ह्या अपरिहार्यतेंतून नवीं नवीं थंड वायुमान असणारीं थारेपालट करण्यासारखीं स्थानें शोधून सजविलीं जात आहेत. अशा स्थानांकडे जनतेचें लक्ष अधिकाअधिक खेचून घेण्यासाठीं राज्ययंत्रणेकडूनहि विविध अद्ययावत् सुखसोयींनीं युक्त असणारे निवास उभारले जात असून हौशी लोकांना तेथें जाण्यासाठीं स्वतंत्र 'आराम' गाड्यांची अत्यंत सुखकर व्यवस्था केली जात आहे. ही समाजांतील नवी हालचाल अटळ आहे व समाजस्वास्थ्याच्या दृष्टीनें हितकर आहे, पण त्यांतहि मंदिरसंस्थेच्या संस्कारक्षमतेला अवकळा येऊं नये म्हणून दक्षता घेतली जाणें, हें अत्यावश्यक आहे. सामान्यतः अशी सहलीला जाणारी मंडळी बाहेर गेल्यावर खाणें–पिणें, गप्पा–गोष्टी, थट्टा–विनोद, गाणें–बजावणें आणि पत्त्यांसारखे बैठे खेळ यांमध्यें रंगून जातात. अर्थात् मोकळ्या वातावरणांत आल्यावर वागण्यांत अधिक मोकळेपणा व खेळकरपणा आला तर त्यांत वावगें असें कांहींच नाहीं. पण खेळकरपणाला व हौसेमौजेलाहि सदभिरुचीच्या दृष्टीनें कांहीं मर्यादा घालण्याचें व त्या स्थानाचें पावित्र्य राखण्याचें भान अवश्य राहिलें पाहिजे. खेळकरपणा म्हणजे उच्छृंखलपणा ठरूं नये व मंदिर हें तमाशाचें 'थेटर' होऊं नये. मंदिराच्या सभामंडपांत सिलोन नभोवाणी थाटाचें संगीत चालू होतें व लावण्या म्हणण्यापर्यंत मजल जाते, हें अनेकांच्या अनुभवाचें आहे. तसेंच कांहीं वेळां अचकट–विचकट थट्टेपर्यंत गप्पागोष्टींची तार ताणली जाते, ही गोष्टहि जाणत्यांच्या दृष्टींतून सुटणारी नाहीं. अशा गोष्टींची उबग येऊन हिमालयांतील चारी धामांची पदयात्रा करून आलेले पुण्याचे श्री. शंकरराव दाते लिहितात, "...ह्या देवळांचें पावित्र्य आणि शुद्धता ह्यांचें रक्षण राजानें व चालू मनूंत राजशासन-संस्थेनें आणि त्याहिपेक्षां अधिक काळजीकाट्यानें व उत्तरदायित्वाच्या जाणिवेनें समाजानेंहि केलें पाहिजे. ...ही तपोभूमि ही एक प्रायोगिक मानसोन्नति शिक्षणाची शाळाच आहे. ह्याच दृष्टीनें हिमालयाच्या तपोभूमीचें पावित्र्य व शुद्धता राखण्याची काळजी घेणें

हेंहि राज्यशासन संस्थेचें काम ठरतें. यात्रीशिवाय अनधिकाऱ्यास तेथें प्रवेशबंदी असावी " अर्थात् हिमालयाच्या तपोभूमीविषयीं हें जें लिहिण्यांत आलें आहे, तेंच सर्व ठिकाणच्या पवित्र मंदिरांसंबंधांत तंतोतंत लागू पडणारें आहे. यात्रीवांचून इतरांना तेथें जाण्यास प्रतिबंध करणें, ही गोष्ट अगदीं टोकाची म्हणून सोडून दिली, तरी मंदिराच्या संचालकांनीं तेथें येणाऱ्यांच्या वर्तनाला शिस्तीचें योग्य असें वळण लावणें नितान्त आवश्यक आहे. पण त्याहिपेक्षां नागरिकांनीं समंजसपणानें आपण होऊनच ह्या गोष्टीकडे लक्ष पुरविलें तर तें आज हवें आहे.

एकान्तांत व थंड वायुमान असणाऱ्या डोंगरावरील झाडींत असणाऱ्या मंदिरांसंबंधीं आणखी एक दक्षता घेतली पाहिजे. ती म्हणजे अशा मंदिरांजवळ शक्यतोंवर नवें थंड हवेचें ठिकाण (Hill-station) वसविण्याचा प्रयत्न करूं नये. अशा ठिकाणीं असें ठिकाण निर्माण करण्याचा कांहींचा अत्याग्रहच असेल तर कमींत कमीं मंदिरापासून अर्ध्या मैलाच्या परिसरांत तरी, पेठ, बंगले, क्रीडागृहें, उपाहारगृहें असूं नयेत. अशा स्थानीं विश्रांतीसाठीं येणाऱ्या बहुतेक मंडळींचा समाजांतील स्तर हा आर्थिक दृष्टीनें बराच वरचा व त्यांच्या करमणुकीचे प्रकारहि पाश्चात्य पद्धतीचे व कांहींसे स्वैर धाटणीचे असतात. त्यांच्या डोळ्यांपुढें चमचमीत खाणें-पिणें, नाचरंग, मृगया व चैन अशाच गोष्टी प्रामुख्यानें असलेल्या दिसतील. सर्वसामान्य लोकांना न झेपणारे व अनेक वेळेला न रुचणारें हें वातावरण अशा पवित्र मंदिरांच्या अगदीं शेजारीं निर्माण करणें युक्त नाहीं. निसर्गाच्या सान्निध्यांत श्रीमंत व गरीब अशा दोघांनाहि येण्याचा अधिकार आहे. पण त्या सान्निध्यांतून मनावरील ताण जसा दूर व्हावा त्याचप्रमाणें माणसाला नागरी गोंगाटापासून व तेथील वातावरणांतील दूषित विकारलहरीं-पासून दूर राहून, शांततेचा आणि एकान्ताचा मनसोक्त आस्वाद घेतां यावा. थंड हवेचें स्थान म्हटलें म्हणजे त्या ठिकाणीं गाड्या-घोड्यांची धांवपळ चालू होते. चित्रपटगृहें व उपाहारगृहें थाटलीं जाऊन आकाशवाणीचें संगीत चालू राहतें. आतिथ्य करून श्रीमंतांचे खिसे हलके करणारीं आलिशान निवासस्थानें गजबजून जातात. फळांफुलांची व हौस पुरविणाऱ्या छानछुकीच्या वस्तूंचीं भांडारें खोललीं जातात. सरकारी नियंत्रणांना धूप घालून, गांवठी व विलायती मदिरेचे चषक नृत्यगृहांतील फेसाळत्या हास्यविनोदांत रिते होऊं लागतात.

या व यासारख्या तेथें होणाऱ्या नागरी स्वच्छंद प्रकारांनीं जें वातावरण उत्पन्न होतें, त्यांत व्यक्तीला अंतर्मुख होण्याला विशेष अनुकूलता उरत नाहीं. हें सर्व सांगत असतांना, वरील हौशी लोकांच्या गोष्टी या मानवी भावनांचा विचार करतां, सध्यांच्या गढूळ बनलेल्या वातावरणांतच काय, पण भविष्यकाळांतहि समाजांतून पूर्णपणें बंद होण्याची सुतराम् शक्यता नाहीं. असा वर्ग पूर्वी होता आज आहे व पुढेंहि राहणार. मात्र अपेक्षा एवढीच आहे कीं, त्या गोष्टी नागरी जीवनापासून दूर अंतरावर असणाऱ्या कांहीं निवान्त व पवित्र मंदिरांच्या शेजाराला तरी नेऊं नयेत. मुंबईचें यंत्रारूढ धावपळीचें व अस्वस्थ जीवन असे-पर्यंत माथेरान-महाबळेश्वर यांची आवश्यकता नाकारतांच येणार नाहीं. पण म्हणून कनकेश्वरासारखें रम्य स्थान 'माथेरान' व्हावें असें मला वाटत नाहीं. कारण माथेरान जशी एक उणीव दूर करण्यास समर्थ आहे, त्याचप्रमाणें कनके-श्वराचा पवित्र एकान्त हाहि मानवी मनाचें स्वास्थ्य व त्याची प्रसन्नता वृद्धिंगत करण्यास समर्थ आहे, हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. कांहीं थंड हवेचीं स्थानें हीं माथेरान–लोणावळा–खंडाळा म्हणून जशीं योजनापूर्वक संवर्धिलीं जावींत तशींच कनकेश्वर, बनेश्वर, सज्जनगड, गणपति पुळें यांसारखीं कांहीं स्थानें घनदाट झाडी वाढवून तेथील निर्मळ एकान्ताचा यत्किंचित् भंग न होईल अशा धोरणानें निवान्त राखलीं जावींत. उंच शैलशृंगावरील विशुद्ध वायुमान असणारें प्रत्येक ठिकाण हें हौसे-मौजेचें केंद्र न बनवितां, त्यांतील कांहीं स्थानें तरी लोकांना आत्मनिरीक्षणाला, उपासनेला, मननाला व चिंतनाला उपकारक ठरतील अशीं राखण्याचा प्रयत्न झाला, तर तो आज पाहिजे आहे. भोग एवढेंच कांहीं आपल्या जीवनाचें परिपूर्ण रूप नव्हे; तर भोगाच्या रुळावरून अनेक जणांच्या मनाची गाडी विवेकपूर्वक योगाच्या रुळावर नेता येण्यावरच समाजाचें स्थैर्य व समाधान अवलंबून आहे, ही गोष्ट आपल्या साक्षात्कारी पूर्वजांनीं स्वानुभवांतून प्रतिपादन केलेली आहे. ती ध्यानीं घेऊनच अशा रम्य पवित्र स्थानांच्या रक्षणाकडे व विकसनाकडे आपण वळलें पाहिजे.


यासंबंधीं कांहीं गोष्टी सहज सुचवितां येतील व बऱ्याच गोष्टी कोणी जाणता व कल्पक मनुष्य वा राजसत्ता जेव्हां ह्या दिशेनें प्रयत्न करूं लागेल तेव्हां आपोआप सुचतील. प्रत्यक्ष प्रयत्न हेच नव्या नव्या कल्पनांना जन्म देतात व प्रारंभीं लहानशा झऱ्याएवढी असणारी कल्पना अशा प्रयत्नांतून पुष्ट होत होत

कार्यरूपानें गंगौघासारखी शतमुखी व विशाल बनून समाजाला पावन करते. अशा एकान्तांतील देवस्थानाला लागून असणारीं पाण्याचीं कुंडें, विहिरी वा झरे निर्मळ राहतील अशी योजना केली पाहिजे व कांहीं दिवसांसाठीं येणाऱ्यांना जेथें उतरतां येईल, असे छोट्या खोल्या असणारे बंगले वा धर्मशाळा योग्य अंतर सोडून बांधल्या पाहिजेत. या धर्मशाळांत सात्त्विक आनंद देणाऱ्या आणि धर्मनिष्ठेची व जीवनविषयक तत्त्वज्ञानाची बैठक स्थिर करणाऱ्या निवडक उत्तमोत्तम ग्रंथांचा संग्रह असावा व तेथें येणाऱ्या जिज्ञासूंना मोकळेपणानें तो वापरता यावा. कांहीं धार्मिक उपासना, व्रत वा प्रासादिक ग्रंथांचें पारायण करणाऱ्यांना येथील खोल्या भाड्यानें दिल्या जाव्यात. त्या खोल्यांत प्रकाश व वारा खेळता राहील व खिडकींतून दृष्टिक्षेप केल्यावर सुंदर देखावा दिसेल, अशा दक्षतेनें धर्मशाळांची उभारणी व्हावी. खोल्यांतून देवादिकांचीं व श्रीज्ञानेश्वर-तुकारामादि संत–महतांचीं सुंदर चित्रें लाविलेलीं असावींत. प्रारंभीं अशा खोल्यांत येऊन राहणाऱ्यांना स्वतःच स्वयंपाक करावा लागेल; पण एकदां का अशा सात्त्विक एकान्ताची आवड वाढून अनेक जण येऊं लागले कीं, योग्य शुल्क घेऊन चांगलें जेवण देण्याची व्यवस्था अशा ठिकाणीं हलके हलके करतां येणें सहज शक्य होईल. अशा स्थानीं छाया देणारे मोठे वृक्ष लावावेत व सुवासिक व शोभिवंत फुलें देणाऱ्या फुलझाडांची व पुष्पलतांची प्रसन्न वाटिका निर्माण करावी. पावित्र्याच्या संगतीला तेथें सौंदर्यानें यावें. साधेपणा व मोकळेपणा यांनीं तेथील वातावरणाला साथ द्यावी. यासाठीं आश्रमाप्रमाणें प्रसन्न वातावरण टिकवूं शकणारे कर्ते संचालक जसे लागतील त्याचप्रमाणें ह्या सर्व गोष्टींसाठीं सतत करावा लागणारा खर्च भागविण्यासाठींहि कांहीं नित्याची योजना करावी लागेल. ह्या कामीं कोणी पुढाकार घेतल्यास आपल्या समाजांतील दानशूर धनिक त्याचा पुरेसा पाठपुरावा केल्यावांचून राहणार नाहींत; तसेंच त्याची उपयुक्तता ध्यानीं आल्यावर राजसत्तेकडूनहि अशा उपक्रमाला आर्थिक सहाय्य मिळणें सहज शक्य आहे.


दिवाळी वा उन्हाळ्याच्या सुट्टींत निवडक तरुण विद्यार्थ्यांना गीता, ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, दासबोध, गीतारहस्य अशा कांहीं ग्रंथांचें पद्धतशीर शिक्षण देणारे वर्ग अशा ठिकाणीं अधिकारी मंडळींकडून चालवितां येणें शक्य आहे. निवान्त व निसर्गरम्य ठिकाणीं असणाऱ्या पवित्र मंदिराच्या परिसरांत अशा

असंख्य कल्पना साकार करण्याचा एखादा प्रयत्न दीर्घोद्योगपूर्वक कोणी यशस्वी करून दाखविला, तर त्याचें योग्य अनुकरण इतरत्र झाल्यावांचून राहणार नाहीं. आजच्या निरंकुश परिस्थितीला आटोक्यांत आणण्यासाठीं जीवनाच्या सर्व क्षेत्रांतून अटीतटीचे प्रयत्न होणें आवश्यक आहे. त्याच दृष्टीनें मंदिरांच्या परिसरांत अशी कांहीं संस्कारक्षमता उत्पन्न करण्याचा प्रत्यक्ष उपक्रम झाल्यास हवा आहे; कारण नुसत्या कल्पना मांडून काय होणार ?

☆ ☆ ☆



लिंगराज मंदिर, भुवनेश्वर



श्री क्षेत्र काशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वामित.
अनुक्रम 3209 वि: निबंध
क्रमांक 7282 नों दि 10/11/68

प्रकरण ९

# उत्सव – जत्रा – यात्रा

मंदिरांची उभारणी व त्यांमधील उपासना ह्या दोनहि गोष्टी प्रामुख्यानें वैयक्तिक स्वरूपाच्या असल्यानें त्यांतून समाजापुढें कोणते प्रश्न निर्माण झाले, ह्याचा विचार मागील कांहीं प्रकरणांत आपण थोडक्यांत केला आहे. पण मंदिरसंस्थेंत चर्च व मशिदी ह्यांमधील स्वरूपाची सार्वजनिकता नसली तरी तिचा तेथें अभाव आहे, असें मात्र मुळींच म्हणतां येणार नाहीं. मात्र मंदिरसंस्थेंतील तिचें स्वरूप व प्रमाण हीं भिन्न आहेत. आजच्या काळांत तीं सर्व समाजाचीं शक्तिकेंद्रें राहिलेलीं नसून बऱ्याच प्रमाणांत वैयक्तिक भक्तिकेंद्रें दिसत आहेत. तरी प्रसंगाप्रसंगानें आपलीं देवळेंहि विवक्षित क्षेत्रांतील समाजाला घुसळून काढतात नि एकत्रित करीत असतात.

केवळ व्यक्तिगत स्वामित्वाचीं देवळें अत्यल्प सांपडतील. त्या ठिकाणीं लोकांना दर्शनाला येऊं देणें अथवा न देणें हें सर्वस्वीं त्याच्या प्रवर्तकाच्या इच्छेवर अवलंबून असतें. बाकी बहुतेक देवळें ही सार्वजनिक म्हणून लोकनियुक्त पंचांकडून चालविलीं जातात. सार्वजनिकतेची सरकारमान्य कसोटी हीच लोकमान्य कसोटी म्हणून सांगावी लागेल. ज्या देवळांत समाजांतील घटकांचे व त्यांतील एखाद्या गटाचे हितसंबंध व पूजादर्शनादि अधिकार निगडित असतात तें देऊळ सार्वजनिक समजण्यांत येतें. ( ... a public

temple, i. e. a temple in which the members of public or any section of it have some kind of interest or right e. g. right of worship or 'darshan'. (The Bombay Public Trusts Act 1950, Page 16.) एखादें मंदिर व्यक्तिगत कीं सार्वजनिक हें ठरवितांना त्या मंदिराचा इतिहास, तेथील व्यवस्थेचें स्वरूप, मिळालेल्या देणग्यांचें स्वरूप व व्याप्ति, भाविकांना मिळणाऱ्या पूजेच्या सवलतीचें स्वरूप, व्यवस्थापकाची व भाविकांची मंदिराविषयींची धारणा आदि गोष्टी प्रामुख्यानें विचारांत घेतल्या जातात. असा विचार करतां सार्वजनिक गटांत मोडणारीं देवळेंच अधिक आहेत.

अशा सार्वजनिक मंदिरांतून होणारे उत्सव हे समाजांतील असंख्य जणांना एकत्र आणून, कांहीं प्रमाणांत सहकार्यानें काम करण्याचे प्राथमिक धडे आजवर देत आले आहेत. मनुष्य हा नावीन्याचा भुकेला असून त्यांतूनच उत्सवाविषयींचें औत्सुक्य जनमनांत फुलत आलें आहे. कृष्णाष्टमी, रामनवमी, हनुमान जयन्ती, महाशिवरात्र, नवरात्र, माघी चतुर्थी, गणेश चतुर्थी अशा प्रसंगीं गांवोगांव उत्सव होतात व त्या वेळीं मंदिराचे परिसर हौशे, नवसे व गवसे अशा सर्व प्रकारच्या लोकांनीं गजबजून जातात. मंदिरांतील दैवतावर अभिषेक होतात नि त्यावर महापूजा बांधली जाते. कोठें अखंड नामसंकीर्तन चालतें तर कोठें अखंड वीणावादनानें मंदिर घुमून जातें. गोंधळ, गायन, भजन, प्रवचन व कीर्तन अशा विविध कार्यक्रमांतून भिन्न अभिरुचीची मंडळी समरसून डोलूं लागतात. अशा उत्सवप्रसंगीं वा जत्रेंतील फडांत उदयोन्मुख मल्ल कुस्त्या करतात आणि गांवोगांवचे बालगंधर्व नि बोडस पुढें येऊन लोकांच्या टाळ्या घेतात. तमासगिरांचें डफ-तुणतुणें तेथील रंगणाऱ्या फडांत, मधमाश्यांच्या पोळ्याप्रमाणें असंख्य जणांना बिलगवून ठेवतें. रथ किंवा पालखीची मिरवणूक असली कीं पंचक्रोशींतील जनता तेथें लोटते व सारा गांव ढोलांच्या गदारोळानें, लेझिमींच्या धुंद करून टाकणाऱ्या तालबद्ध खुळखुळाटानें व भजनी ताफ्यांच्या टाळमृदुंगांच्या ठेक्यानें दुमदुमून जातो. नेहमीं खेडयांतील जीवनाचा कसाबसा वाहणारा ओढा वळवी पावसानें जणूं खळाळत दुथडी वाहूं लागला आहे, असें वाटतें! त्या वेळचें तें सामाजिक उत्साहाचें स्वरूप खरोखरच आगळें असतें. गांवांतील प्रत्येक देवळाच्या उत्सवांत इतका थाट नसतो. पण परंपरेनें एखाद्या ग्रामदेवतेची जत्रा ही मात्र अशी थाटामाटाची होत असते. तिला कोठें कोठें

'उरूस' असेंहि म्हणतात. अर्थात् हा शब्द म्हणजे पूर्वी महाराष्ट्रांत असणाऱ्या मुसलमानी वर्चस्वाचा आपल्या भाषेंत उरलेला अवशेष आहे. अशा जत्रांतून १०-१५ गांवच्या लोकांची परस्परांत ये-जा होते व सारा समाज ढवळून निघतो.

पण ह्या बाह्य उत्साहाच्या अंतरंगांत, अनेक ठिकाणीं समाजशोषक वृत्तींचा नंगानाच चालू असतो. बहुतेक गांवांत 'गांव तेथें गांवगुंड' अशी म्हण पाडण्याइतकें पुंड लोक असतात नि ते दंडेलीनें अशा जत्रांचें सूत्रचालकत्व हातीं घेऊन आपलें उखळ पांढरें करून घेतात. 'गांवगाडा' ह्या सुप्रसिद्ध ग्रंथांत त्रिं. ना. आत्रे म्हणतात कीं, "यात्रेची वर्गणी गोळा करणारे इसम बहुधा गांवचे पुंड असतात. आपसांतलें खाजगी वांकडें उगविण्याला आणि लोकांच्या पैशांवर हौस पुरविण्याला यात्रा ही संधि चांगली असते. वर्गणी देण्याला आढेवढे घेणें म्हणजे चारचौघांत मानखंडना करून घेणें असें लोकांना वाटतें. म्हणून ज्याला माणूसबळ, द्रव्यबळ कमी अशा लोकांना, विशेषतः बायाबापड्यांना, आपल्या ऐपतीबाहेर यात्रेची वर्गणी द्यावी लागते, आणि पुढाईत पुंड व त्यांच्या पुठ्यांतील मंडळी अजिबात कोरी राहते, किंवा अल्पस्वल्प वर्गणीवर सुटते. जमलेल्या वर्गणींत हे ठक मौज मारतात आणि बचत तोंडांत टाकतात." (पृ. १०६) ही गेल्या शतकांतील समाजस्थिति आजहि टिकून असून त्यांत कोठें कोठें तर राजकारणांतील हेव्यादाव्यांची भर पडून ती अधिक विकृत व रोगट बनलेली आहे. अर्थात् अशी विकृति आहे म्हणून जत्राच बंद करून टाकाव्यात हें म्हणणें सयुक्तिक नाहीं. कारण सर्व-सामान्य व्यक्तींना अशा उत्सवांतून व जत्रांतून करमणूक व उत्साह यांची प्राप्ति होत असते. उत्सव व जत्रा या समाजाचें स्वत्व व स्वाभिमान जागृत करण्यास अत्यंत समर्थ असतात, हें ओळखूनच औरंगजेबापासून तों निजामापर्यंत अनेक मुसलमान राजांनीं हिंदूंचे उत्सव व जत्रा यांवर प्रतिबंधक निर्बंध लादले होते असें दिसून येतें. विजापूरच्या महमद आदिलशहानें "त्यांस (हिंदूंस) सणाचे समारंभ उघडपणें करूं देऊं नयेत," असा दंडक राज्यांत रूढ केला होता, तर "हिंदूंनीं देवाचे उत्सव सरकारची अनुमति घेऊन केवळ देवळाच्या प्राकारांतच साजरे करावेत" अशा निर्बंधानें निजामानें हिंदूंना जखडलें होतें.

अशा पारतंत्र्यांत अनेक वर्षें पिचत पडल्यानें ३५० वर्षांपूर्वींच्या महाराष्ट्रांत राजकीय दृष्टीनें उठाव करण्यासाठीं एकत्र येण्याची गोष्टच सोडा पण धार्मिक कारणासाठींहि एकत्र येण्याचें त्राण व भान दडपलेल्या समाजांत उरलें नव्हतें. त्याच काळांत व त्याच समाजाला समर्थ रामदासांनीं पराक्रमी मारुतीचीं मंदिरें उभारून व त्यांचे उत्सव प्रचलित करून सुसंघटित व आत्मनिर्भर बनविण्याला प्रारंभ केला. शके १५६७ म्हणजे ख्रिस्ताब्द १६४५ मध्यें त्यांनीं रामजन्मोत्सव चालू केला. त्याचें मर्म सांगतांना ते लिहितात : " देवमात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यू भला " अशी स्थिति झाली असल्यामुळें " रक्षिता देव देवांचा । त्याचा उत्साव योजिला ॥ " एवढेंच नव्हे तर श्रीदासबोधांत दास्यभक्तीचें स्वरूप सांगतांना त्यांनीं सार्वजनिक उत्सव कसा ऐश्वर्यसंपन्न व थाटाचा असावा याचें रसभरित वर्णन केलें आहे. ते म्हणतात, " जयंत्या पर्वें मोहोत्साव । असंभाव्य चालवी वैभव । जे देखितां स्वर्गींचे देव । तटस्थ होती ॥ १८ ॥ ऐसें वैभव चालवावें । आणि नीच दास्यत्वहि करावें । पडिलें प्रसंगीं सावध असावें । सर्व काळ ॥ १९ ॥ (द. ४, समास ८) अशा पद्धतीनें पदरमोड करून थाटामाटानें उत्सव करण्याचा व नीच दास्यत्व करण्याचा म्हणजेच पडेल तें काम करण्याचा आदेश त्यांनीं दिलेला आहे. पण एवढें सांगून न थांबतां असा उत्सव करतांना संकटें आणि अडचणी आल्यास गांगरून न जातां, सावधानतेनें तो उत्सव सफल करा, असे ते प्रोत्साहन देतात. यावरून जत्राउत्सवांमधून बाहेरील परिस्थितीशीं संघर्ष करण्यासाठीं माणसें उभीं करतां येतील, हें इंगित त्यांनीं नेमकें हेरलें होतें व त्याप्रमाणें लोकांचें सुप्त कर्तृत्व व नेतृत्व अशा उत्सवांतून जागृत करण्याला चालना दिली होती. उत्सव व जत्रा यांमधून त्या काळांत झालेला लाभ ध्यानीं घेऊनच श्री शिवछत्रपतींच्या उदयापासून तों पेशवाईच्या पतनापर्यंत " चढता वाढता देवाचा महोत्सव, चढतें वाढतें राज्य " असें सूत्र राज्यशासकांनीं अनुसरलेलें आढळतें.

हीच उत्सवांतील समाजप्रेरक शक्ति ध्यानीं घेऊन लो. टिळकांनीं सार्वजनिक गणेशोत्सव प्रचलित केला. त्यांतून सहस्रावधि लोकांना सांघिकपणें एकत्र येण्याचें वळण मिळालें व त्यांचें मनोधैर्य व राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव दृढ झाली. या पूर्वसिद्धतेंतूनच १९२० नंतर सामूहिक सत्याग्रहाचें पर्व

दा. क्र. १२५०१

उदयाला येऊं शकलें. बाह्यतः अशा उत्सवांचें स्वरूप मनोरंजक असलें तरी जनतेला कार्योत्साहित करण्यास ते समर्थ ठरत असतात.

पारतंत्र्याच्या काळांत प्रेरक ठरलेलें हें साधन स्वातंत्र्याच्या काळांतहि डोळसपणें टिकविलें पाहिजे व वापरलें पाहिजे. तसें करतांना ही गोष्ट जाणत्यांनीं प्रारंभीं गृहीत धरली पाहिजे कीं, अशा उत्सवांचें स्वरूप हें धार्मिकतेपेक्षां सामाजिक रंजनाकडेच झुकतें राहील. वृत्तीच्या दृष्टीनें बहुजनसमाजाची प्रकृति ही बहिर्मुख असते व त्यामुळें त्यांच्या उत्सवांचे स्वरूप बुद्धिजीवी वर्गाला वा अंतर्मुखता साधूं इच्छिणाऱ्या लोकांना कदाचित् रुचणारहि नाहीं. त्यांतील नवस व बलिदानासाठीं होणाऱ्या कंदुऱ्या या गोष्टी त्यांना शिसारी आणतील. अश्लील व रंगेल तमाशे यांचें नांव काढतांच त्यांना स्नान करावेंसें वाटेल. पण समाजांतील सर्व थरांना जागृत करून चालवावयाचें असेल तर त्यांना आज प्रिय असणाऱ्या साधनांचाच कल्पकतेनें वापर केल्यावांचून गत्यंतर नाहीं. जों जों समाजाच्या सर्व थरांत ज्ञानाचे किरण पोहोचतील तों तों आज शिसारी आणणाऱ्या गोष्टी आपोआप कमी होऊं लागतील. पण तसे ज्ञानाचे किरण सर्वसामान्य व्यक्तीच्या बुद्धींत शिरावयासहि हें रंजकतेचें माध्यमच योग्य प्रमाणांत स्वीकारणें आवश्यक आहे, असें अनुभवानें ध्यानीं येईल. आजकाल अशा जत्रांतून समाजांतील वेडगळ चालींची व भ्रामक कल्पनांची खुसखुशीत टर उडवून, हसतां हसतां लोकांना जाणते करावें ह्या हेतूनें कांहीं प्रथितयश साहित्यिकांनीं तमाशांच्या क्षेत्रांतहि लक्ष घालण्यास प्रारंभ केला आहे हें सुचिन्ह होय. श्री. पु. ल. देशपांडे, माडगूळकर बंधू आदि प्रतिभावन्तांनीं कांहीं प्रमाणांत तमाशाचें गांवढळ व अश्लील रूप घालवून त्याला ‘ लोकनाटय ’ या वरच्या स्तरावर आणण्याचा जो यशस्वी उपक्रम चालविला आहे तो स्वागतार्ह आहे. अस्तु.

मल्लविद्या ही भारतीय असून महाराष्ट्राला तिचें भारी वेड आहे. जत्रांतील फडांतून, हलग्यांच्या कडकडाटांत रेवड्यांवर कुस्ती करणाऱ्या लहान-सहान पोरांपासून तों इनामी कुस्तीसाठीं जोड शोधणाऱ्या सराईत पहिलवानांपर्यंत सर्वांचेंच स्वागत असतें. ‘ पिचेल मनगट परी उरांतिल अखंड आवेश ’ अशा धैर्याचे व छातीचे असंख्य तरुण खेड्यापाड्यांतून सैन्यांत प्रवेश करतात. पण अशा तरुणांत ‘ आपण दणकट बनावें ’ ही इच्छा गांवोगांवच्या जत्रांतून

होणाऱ्या प्रेक्षणीय कुस्त्यांतून जागृत झालेली असते. महाराष्ट्रांतील अजोड ठरलेले विष्णु नागराळे, खंचनाळे, आंदळकर, छबू रानबोके, श्रीरंग जाधव यांच्यासारखे यशस्वी मल्ल प्रारंभीं अनेक ठिकाणच्या जत्रांतील लाल मातींत कुस्त्या मारतां मारतांच पुढें आलेले आहेत. अशी ही तारुण्याला प्रेरणा देणारी जत्रा ही राष्ट्रीय सामर्थ्याचें मूळपीठ आहे, असेंच म्हणणें युक्त ठरेल.

अशा जत्रांतून ज्या अनिष्ट गोष्टी दिसतात, त्यांचा विचारहि येथें केला पाहिजे. त्यांतील पहिली गोष्ट म्हणजे ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा प्रचार. येथें एक गोष्ट प्रारंभींच मान्य केली पाहिजे कीं, ह्या लोकांची धर्मनिष्ठा व चिकाटी ही खरोखरच वाखाणण्यासारखी असते. सहस्रावधि मैलांवरील मायदेश सोडून व नवीन लोकांचा व भाषेचा स्नेह जोडून, हे लोक एका विशिष्ट निष्ठेनें कार्य करतात, हें कौतुकास्पद होय. पण भारतांत हिंदुधर्म सोडल्यानें राष्ट्रावरील निष्ठा व भक्ति नाहींशी होते, हा सर्वसामान्य नियम म्हणून सांगावा लागेल. ‘ इस्लामचा स्वीकार करणें वा ईसाई होणें हें राष्ट्रीयता सोडणें होय ’ असा विचार डॉक्टर भीमराव आंबेडकर मांडीत असत व स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकरहि ‘ धर्मान्तर म्हणजे राष्ट्रान्तर ’ ह्या सूत्रमय शब्दांत तोच विचार अखंड प्रचारीत आले आहेत. इतरांना भारतांत धर्मप्रचाराचें स्वातंत्र्य असावें यांत दुमत नाहीं. पण त्या प्रचारांतून भारतावरील निष्ठा ढळणार असेल तर तो प्रचार राष्ट्रभंजक म्हणून थांबविला पाहिजे, यांतहि दुमत होऊं नये. ह्यासाठीं जाणत्या लोकांनीं ‘ नागा लँड ’चा अनुभव लक्षांत ठेवून परधर्म प्रचाराला आपलें समाजबांधव बळी पडणार नाहींत अशी दक्षता घ्यावी. ह्या दृष्टीनेंहि कोठें कोठें जाग येऊं लागल्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. धुळें जिल्ह्यांतील भिल्लांनीं व ठाणें जिल्ह्यांतील वारली लोकांनीं अशी जागरूकता प्रकट केल्याचें आतां सर्वविश्रुत आहे. अशा दक्षतेचा प्रचार वायुवेगानें सर्वत्र झाला पाहिजे; म्हणजेच आपण केला पाहिजे.

जत्रा म्हटली म्हणजे ‘ अंगापेक्षां बोंगा मोठा ’ ह्या म्हणींत ध्वनित केल्याप्रमाणें देवालयापेक्षां सभोंवतींच्या इतर गोष्टींचाच पसारा अधिक होतो. ज्या देवतेच्या उत्सवाला जोडून ही जत्रा भरते त्या देवालयाकडे कांहीं ठिकाणीं अतिशय दुर्लक्ष होतें असा स्वानुभव आहे. ज्या जत्रेसाठीं २।४ सहस्र रुपये

गांवांतून गोळा होतात, तेथील देवालयाच्या जमिनीची, भिंतींची व एकूण परिसराची स्थिति दुर्लक्षित असणें युक्त नाहीं. पण असे लाजिरवाणे प्रकार मीं प्रत्यक्ष पाहिले आहेत. तमाशा, कुस्त्या, पालखी, भाषणें, प्रवचनें या सर्वांकडे अवश्य ध्यान द्यावें; पण त्या सर्वांआधीं मंदिराच्या सुस्थितीकडे लक्ष पुरविणें हें कर्तव्य मानलें पाहिजे.

तिसरी गोष्ट जमविलेल्या वर्गणीच्या आयव्ययाची. यासंबंधीं पुंडांचा वरचष्मा दूर करण्यापासून प्रारंभ करावा लागेल. पण तसें करावयाचें म्हणजे सामोपचार पुरा पडणार नाहीं. वेळप्रसंगीं पुंडांशीं पुंडपणा करण्याची सिद्धता समाजहितदक्ष अशा तरुणांना ठेवावी लागेल. पुंडपणा हा स्वार्थासाठीं असतो म्हणून त्याज्य, निंद्य, दंड्य ! तोच जर पुंडांचा उच्छाद थांबविण्या-साठीं असेल तर तो स्तुत्य व अनुकरणीय ठरेल, हें पक्कें ध्यानांत ठेवावें. समाजहितासाठीं वेळप्रसंगीं अस्तन्या सारण्यास मागेंपुढें न पाहणारे कांहीं तरुण पुढाकार घेईपर्यंत पुंडांना दूर सारतां येणें अत्यंत अवघड आहे. त्यांतून बुद्धिबळांतील प्याद्याप्रमाणें, जर अधिकारारूढ पक्षांतील वरिष्ठांच्या कृपाकटाक्षाच्या जोरांत तो पुंड बसलेला असेल तर त्याला पदच्युत करणें हें त्याहून अवघड ! तेव्हां हें ‘ येरा गबाळ्याचें काम नोहे ’ हेंच खरें ! तसेंच जो गांवगुडांचे गुंतागुंतीचे पाचपेंच ओळखण्याइतका धूर्त व चाणाक्ष असेल त्याला अशा पुस्तकी धूर्तपणाच्या धड्यांचें कारणहि नाहीं. सातारा जिल्ह्यांतील कांहीं ठिकाणच्या जत्रांतून, सरकारी आरक्षकांच्या साक्षीनें पुंडांनीं चालविलेला जुगार बंद पाडण्यांत निष्ठावंत समाजसेवकांचें सांघिक बळ व मनोधैर्य कसें यशस्वी ठरतें, याचा प्रत्यक्ष अनुभव मीं घेतलेला आहे. आणि तो जमेस धरूनच संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून प्रारंभ ह्या न्यायानें जत्रेंतील अपव्ययाला पुंडांच्या उच्चाटनापासून प्रारंभ करावा, हें सूत्र ग्रथित केलें आहे. अस्तु.

आतांपर्यंत ज्या ठिकाणच्या सार्वजनिक उत्सवांना जत्रेइतकें भव्य स्वरूप असतें त्यांचा विचार झाला; पण नुसती महापूजा, भजन, पुराण व कीर्तन अशा आटोपशीर होणाऱ्या मंदिरांतील उत्सवांविषयींहि कांहीं विचार करणें युक्त होईल. मोठ्या समुदायाला आकृष्ट करणारे कांहीं सधन गांवांतील उत्सव सोडल्यास, बाकी बहुतेक खेड्यांतील उत्सव हे परिणामाच्या दृष्टीनें ‘ सालाबाद प्रमाणें ’ निर्जीव होतात. त्या उत्सवांच्या निमंत्रणपत्रिकेंत येणारा ‘ सालाबाद

प्रमाणें ' हा शब्द पाहिला कीं माझ्या डोळ्यांसमोर उन्हाळ्यांत खांडके पडून आटून गेलेल्या गांवढळ नदीचें रेताड पात्र उभें राहतें! दारूकामांतील नळ्याला काडी लावतांच तो जसा सरसरत व फुलत वर उसळतो, त्याप्रमाणें जेथें प्रतिवर्षी चढता वाढता उल्हास नि उत्साह आढळत असेल तोच उत्सव होय. कोठें साथ आहे तर बुवा नाहीं, तर कोठें बुवा आहे तर साथ नाहीं! चुकून ह्या दोघांची सांगड जमलीच तर दिव्यांत पुरी तेलवात नाहीं, अशीच खेड्यांतील एकूण उत्सवांची अवस्था आहे!

उत्तम कीर्तनकार असेल तर त्याला श्रोत्यांची वाण सहसा कोठेंच पडणार नाहीं. कारण श्रवणभक्ति ही मुळांतच अत्यंत सुलभ व रोचक असते. त्यांत पट्टीचा मुरब्बी बुवा भेटला तर गायन, विनोद, कोट्या, गोष्टी, चुटके असा नवरसांना उत्तेजित करणारा मसाला निरूपणांत मिसळला जाऊन कीर्तनाला बहारीचा रंग चढतो. रंजन करतां करतां लोकांच्या ज्ञानदृष्टींत अंजन घालण्याचें सामर्थ्य अशा कीर्तनांत असतें. कीर्तन हें लोकजागृतीचें प्रभावी साधन आहे, अशी लोकमान्यांची धारणा होती व त्यामुळेंच कांहीं पदवीधर तरुणांनीं व्यासंग-पूर्वक या क्षेत्रांत शिरावें असें त्यांनीं आवर्जून सांगितलें होतें. कीर्तनाची महति गातांना समर्थ लिहितात कीं :

कीर्तनें माहा दोष जाती । कीर्तनें होय उत्तम गती ॥
कीर्तनें भगवत्प्राप्ती । येदर्थीं संदेह नाहीं ॥ २७ ॥

कीर्तनें वाचा पवित्र । कीर्तनें होय सत्पात्र ।
हरिकीर्तनें प्राणिमात्र । सुसिळ होती ॥ २८ ॥

कीर्तनें अवेग्रता घडे । कीर्तनें निश्चये सांपडे ।
कीर्तनें संदेह बुडे । श्रोतयांवक्तयांचा ॥ २९ ॥

थोडक्यांत म्हणजे कीर्तनांतून लोकांना सुशील, सुजाण, एकाग्र, निःशंक व निश्चयी बनवितां येतें. ही सामान्य गोष्ट नाहीं. मनुष्याची विकारांकडे झुकणारी वृत्ति विचारांकडे–विवेकाकडे वळविणें, वाऱ्याप्रमाणें सैरावैरा धांवणारें मन चांगल्या गोष्टीवर स्थिर करणें, श्रोत्याला सदाचारप्रवृत्त करणें व त्याच्या जीवनांत हरघडी येणाऱ्या संकटांतून मार्ग काढून तो चारी पुरुषार्थांच्या प्राप्तीच्या निश्चयानें पुढें सरावा अशी प्रेरणा देणें ह्या गोष्टी प्रभावी कीर्तनकार

करूं शकतो. लोकमान्य टिळकांना नाटककार, शाळाशिक्षक व वृत्तपत्रकार ह्यांहून कीर्तनकाराचा अधिकार श्रेष्ठ वाटतो. त्याच्या सात्त्विक प्रतिपादनाचें स्वरूप स्पष्ट करतांना ते मार्मिकतेनें म्हणतात कीं, "...पिनल कोड हा मारका मास्तर होय. पण कीर्तनकार हे सामोपचारानें शिक्षण देणारे गुरु होत." पण पिनलकोडाची छमछम वाजणारी छडी हातीं घेऊन बसलेले राज्यशासक हे दिवसेंदिवस जीवनाच्या सर्व क्षेत्रांत त्या छडीच्या बळावरच सुधारणेची 'घमघम विद्या' आणण्यास अधिक प्रवृत्त दिसतात! विधिविधानांच्या नव-नव्या लवचिक छडया ह्या पाहिजेतच. कारण समाजांतील बराच वर्ग असा असतो कीं, तो शिक्षेच्या धाकानें सदाचारप्रवृत्त होतो. पण ही त्यांची प्रवृत्ति ही टिकाऊ नसते. सदाचार हा स्वभाव व्हावयास पाहिजे असेल, तर ह्या छडीच्या जोडीनें संथपणानें व सुलभ पद्धतीनें धर्माची व नीतीची उमज पाडून देण्याची आवश्यकता असते. ही अवघड गोष्ट कीर्तन व प्रवचन अशा माध्यमांतून उत्तम रीतीनें साधतां येते.

श्रीज्ञानदेव, नामदेव, तुकाराम ह्यांच्या वेळेपासून वारकरी व कांहीं अन्य संप्रदायांतील अनेक संतमहंतांनीं व श्रेष्ठ साधकांनीं गांवोगांवीं कीर्तनें करून, समाजाला सत्प्रवृत्त करण्याचें ज्ञानसत्र ठायीं ठायीं अखंड चालविलेलें आहे. विष्णुबुवा जोग, भाऊ काटकर, श्रीपतिबुवा भिंगारकर, ल. रा. पांगारकर, बंकटस्वामी, गुलाबराव महाराज, गाडगेबुवा आदि अनेक जण हें कार्य करून गेले. सध्याच्या काळांतहि प्राचार्य सोनोपंत दांडेकर, धुंडा महाराज ( देगलूरकर ) आदि वारकऱ्यांतील अग्रणींनीं देहू–आळंदी नि पंढरपूर येथें व अन्य ठिकठिकाणीं असंख्य जनतेच्या मनांत सद्भाव व सत्प्रवृत्ति जाग-विण्याचा निःस्वार्थ उद्योग चालविलेला आहे. एक तर निरूपणी कीर्तनांत प्रवृत्तिपर उपदेश नसतो असा आजवर जो योग्य गहजब झाला, त्यांतून प्रवृत्ति–निवृत्तीचें सुयोग्य प्रमाण वा त्या दोन प्रवृत्तींचा सुवर्णमध्य साधण्याकडे वारकरी संप्रदायांतील अग्रणींचा कल दिसूं लागला आहे. पण वारकरी संप्रदाया-पेक्षां प्रवृत्तीवर अधिक भर देऊन प्रतिपादन व निरूपण करण्याची ज्यांची ख्याती त्या नारदाच्या गादीवर वारसा सांगणाऱ्या कीर्तनकारांत समाजाला सत्प्रवृत्त करण्याचें कौशल्य दिवसेंदिवस कमी आढळत आहे. उलट दैनंदिन राजकारणांतील सभांतून चालणाऱ्या उटपटांग गोष्टी कीर्तनांत शिरूं पाहात

असून पक्षोपपक्षांत चालणाऱ्या चिखलफेकीला जणूं हें नवें क्षेत्र मोकळें झालें असावें, असेंच अनेकदां वाटतें ! धर्मकारण व राजकारण हीं एकाच नाण्याचीं दोन अंगें असलीं तरी धर्मकारणाचा छाप कीर्तनांवर व राजकारणाचा छाप सभांतील भाषणांवर ठसठशीतपणें उमटावा हेंच योग्य होय. कीर्तनांत कांहीं प्रमाणांत चालू राजकारण आलेलें चालेल; पण त्यानेंच त्या ओसरीवर पाय पसरून सारी जागा अडविली तर दुरवस्था प्रसंग ओढवेल.

इंग्रज जाण्यापूर्वी सभांतून कांहीं गोष्टी मांडणें अशक्य होतें; एवढेंच नव्हे तर सभा घेणेंहि कधीं कधीं अवघड जाई. त्या वेळीं धार्मिक कीर्तनाच्या नांवाखालीं प्रच्छन्नपणें राजकीय आंदोलनांना चालना देण्याचा उद्योग करावा लागला. ऐतिहासिक कथानकाच्या आवरणाखालून प्रचलित राजकारणांतील घटनांचा उलगडा करून दाखविणें हें त्या वेळीं अपरिहार्य होतें. असें निरूपण करणाऱ्या कीर्तनकारांना त्या वेळीं 'राष्ट्रीय' म्हणून संबोधून त्यांचें निराळेंपण व्यक्त केलें जाई. पण आतां आपल्याच हातीं सत्ता आल्यावर प्रच्छन्नपणें राजकारणाचा प्रचार करण्याची आतां आवश्यकता उरलेली नाहीं. सभास्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य घटनेनें आपणाला प्रदान केलेलें आहे. तेव्हां आतां 'राष्ट्रीय कीर्तनकार' असा निराळा वर्ग हवा कशाला ? खरें पाहतां सर्वच कीर्तनकार राष्ट्रीय असले पाहिजेत व त्यांनीं राजकारणाला कीर्तनाच्या मंदिरांत योग्य पायरीपर्यंतच चढूं दिलें पाहिजे. "धर्माचा व नीतीचा उपदेश हा कीर्तनाचा आत्मा होय," हें लोकमान्य टिळकांचें प्रतिपादन ध्यानीं घेऊन आतां 'साधे व राष्ट्रीय' असे दोन वर्ग कीर्तनकारांनीं उरूं न देतां नवीन काळांतील स्वतंत्र वातावरणांत जनतेच्या चारित्र्याचा परिपोष करण्यावर लक्ष द्यावें. लोकमान्यांनीं वर्णन केलेल्या 'कीर्तनाचा आत्मा' गमावून वा क्षीण करून कसें चालेल ? यापुढें कीर्तनाला अधिक भीड होणें, घसघशीत बिदागी मिळणें व सभांतील श्रोत्यांप्रमाणें लोकांनीं खदखदून हसणें हीच कीर्तनाच्या यशाची कसोटी मानून चालणार नाहीं. पण आजकाल अशीच धारणा झालेली असावी, अशी शंका येते. अर्थात् गेल्या पिढींतील कै. ब्रह्मनाळकर, नानाबुवा बडोदेकर किंवा कऱ्हाडकर, निजामपूरकरद्वय, कायरकर, डॉ. पटवर्धन आदि प्रभावी कीर्तनकारांचा ह्याला अपवाद म्हणून सांगावा लागेल.

असे फड मारणारे व अलोट जनसंमर्द खेचून घेणारे पट्टीचे कीर्तनकार

महाराष्ट्रांतील प्रमुख देवस्थानांच्या उत्सवांना लाभूं शकतात. पण खेडया-पाडयांपर्यंत जाण्यास त्यांना सवड उरत नाहीं व त्यांना वेळप्रसंगीं सवड असली तरी त्यांच्या अपेक्षेइतकी बिदागी देण्याचें त्राण लहान गांवांत असूं शकत नाहीं. त्यामुळें वेळ भागविण्यापुरता कोणी तरी बुवा उभा केला जातो व तो एखाद्या कीर्तनतरंगिणीच्या आधारें श्रोत्यांना डोलवतो म्हणजे डुलक्या घेण्यास अनुकूलता निर्माण करतो ! नंतर तो कथेकरी व ते श्रोते उत्सवाची परंपरा चालू ठेवल्याच्या समाधानांत घरोघर परततात. असें ताकापुरतें रामायण सांगणारे कीर्तनकार ठिकठिकाणीं असले तरी त्यांचा समाजावर प्रभाव कसा पडावा ? 'समजुतीनें शिक्षण देणारे गुरु' हे असे आहेत ! कीर्तनकाराचा वास्तविक अधिकार हा नाटककार, शिक्षक व वृत्तपत्रकार ह्यांच्याहून श्रेष्ठ आहे व असावा. विद्याव्यासंग, वैराग्य, लोकजागृतीविषयींची तळमळ, निःस्पृहता व निर्भयता आदि गुणांनीं कीर्तनकार मंडित असल्यावांचून हा अधिकार कसा प्राप्त व्हावा ? वास्तविक समाजांतील विधिज्ञांच्या संख्येपेक्षां कीर्तनकारांची संख्या अधिक असावी. कारण विधिज्ञ हा एकापरीनें पिनलकोडाच्या मारकुट्या शिक्षकाचा मार चुकविण्यासाठीं कांहीं अपराध्यांना सहाय्य करतो; तर कीर्तन-कार हा लोकांत विवेक जागा करून व पापभीरुता निर्माण करून अपराध करण्याच्या प्रवृत्तीला अप्रत्यक्षपणें आळा घालूं शकतो. पण आज पुरेसे कीर्तनकार नाहींत व गुणवत्तेनें श्रेष्ठ असे कीर्तनकार तर हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच असूं शकतील. ह्यांतून मार्ग काढण्यासाठीं प्रामुख्यानें भारतांतील धर्मपीठांनीं प्रयत्न केले पाहिजेत. कीर्तनाचें पद्धतशीर शिक्षण देण्याचे प्रयत्न व कीर्तनकारांचीं संमेलनें भरवून कीर्तनाचा स्तर उंचावण्यासाठीं काय करतां येईल ह्याचा विचार 'हरिकीर्तनोत्तेजक संस्था', 'नारदमंदिर' आदि संस्था कांहीं प्रमाणांत करीत आल्या आहेत. त्या प्रयत्नांना संघटित स्वरूप देऊन त्या द्वारें नगरांकडून खेडयांपर्यंत ज्ञानाचा वर्षाव करणारे मेघ पोहोंचूं शकतील, असें केलें पाहिजे सध्यां पुणें–मराठवाडा आदि विद्यापीठांनीं बहिःशाल व्याख्यानमाला गुंफून त्यांतून खेडयापाडयापर्यंत ज्ञान–विज्ञान प्रसारित करण्याचा अत्यंत स्तुत्य उपक्रम केला आहे. त्या योजनेंत भाग घेऊं इच्छिणाऱ्या गांवानें ठराविक सभासद नोंदवून विद्यापीठाकडे ठराविक वर्गणी पाठविली कीं, निरनिराळ्या विषयांवर भाषणें देण्यासाठीं विद्यापीठाकडून ज्या त्या विषयांतील तज्ज्ञ

व्याख्याते पाठविले जातात. अशीच योजना कीर्तनकार व प्रवचनकार ह्यांची झाली पाहिजे. नाहीं तर नगरांतून कीर्तन-प्रवचनांचा नुसता पाऊस पडत राहावयाचा आणि आमच्या असंख्य खेडयांतून अज्ञानाची धूळ तशीच उधळत राहावयाची ! खेडयांतील लोकांना अशा योजनेंतून कांहीं व्यासंगी व प्रभावी बुवांचा नि प्रवक्त्यांचा लाभ नियमितपणानें होईल तर तेथील लोक मनापासून दुवा देतील. ठिकठिकाणच्या खेडुतांचा संतोष त्या मध्यवर्ती संस्थेला स्थैर्य प्राप्त करून देईल व त्यांतून आपोआपच तिचा व्याप वाढूं लागेल. ही कल्पना कार्यवाहींत आणली कीं खेडयांतील मंदिरांच्या पंचांनाहि स्वकर्तव्याची जाग येण्यास चालना मिळेल.

सध्यां नभोवाणीवरून कांहीं वेळां कीर्तनें ठेविलीं जातात. तुकारामाचा गाथा, ज्ञानेश्वरी, नवनीत, एकनाथी भागवत, दासबोध असे प्रासादिक ग्रंथ अत्यल्प मूल्यांत सर्वत्र प्रसारित करण्यांतहि सरकारनें अभिनंदनीय पुढाकार घेतलेला दिसतो. अशा वेळीं कीर्तन-प्रवचन संस्थेला पुनरुज्जीवित करून त्याद्वारें जनतेला सुशील, सदाचारसंपन्न व कर्तव्यरत बनविण्याचा कोणी उपक्रम चालू केल्यास त्याला राजाश्रय मिळूं शकेल, असा भरवसा वाटतो. जेथें तमाशा, नृत्य, नाटक अशा विविध कलांना सरकारकडून घसघशीत प्रोत्साहन मिळत आहे तेथें जनजागरण करणाऱ्या कीर्तनसंस्थेची उपेक्षा होईल असें कसें मानावें ? व्यासंगी व निष्णात असणाऱ्या कीर्तनकारांना वर्षासनें व पुरस्कार दिले जावेत व कीर्तनाचा प्रसार करणाऱ्या भावी संस्थेचाहि कांहीं आर्थिक भार सरकारनें उचलावा. मात्र, ह्या सरकारी अनुदानामुळें त्या संस्थेंतील कीर्तनकारांच्या मत-स्वातंत्र्यावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जर दडपण येण्याची शक्यता दिसत असेल तर केवळ लोकाश्रयावर निर्भर राहून प्रयत्न करण्याची उभारी दाखविली पाहिजे.

कीर्तनापेक्षां पुराण व प्रवचन हे प्रकार भिन्न आहेत. त्यांतील पुराण हा प्रकार बहुजनांना परंपरेनें परिचित असणार व रुचणारा असून प्रवचन हा प्रकार जाणत्या लोकांना पेलणारा असतो. पौराणिक कथांचें परिणाम नीतीच्या दृष्टीनें उत्तम होत असतात. पूर्वी महाराष्ट्रांतील सैनिकांकडून श्रीरामकथेचें वाचन करून घेत असत. अर्थात् वीरत्वाला प्रोत्साहित करावें हाच प्रधान हेतु असल्यामुळें रामदासांचें व मुद्गलांचें युद्धकांड गडांवर व इतरत्र सैन्याकडून वाचून घेत. पंजाबांत शीखांना सशस्त्र करणारे श्रीगुरुगोविंदसिंग ह्यांनींहि

आपल्या सैनिकांना राम, कृष्ण, अर्जुन, भीम ह्यांच्या वीररसपूर्ण कथा सांगण्याचा क्रम ठेविला होता, असें इतिहास सांगतो. पण यापुढें पोथी-वाचनापेक्षां कथा सांगण्याची पद्धतीच अवलंबिली पाहिजे व त्यासाठीं आपल्या अमोघ वक्तृत्वानें एखादी पौराणिक कथा, नैतिक तत्त्वाचा ठसा जनमनावर उमटेल अशा पद्धतीनें सांगणारे पुराणिक उभे केले पाहिजेत. खेड्यांतूनहि व्याख्यान ऐकण्याची गोडी व समजण्याची पात्रता सारखी वाढत जात आहे. त्यामुळें पोथीवरून पुराण सांगण्यापेक्षां भाषणरूपानें एखादी गोष्ट खुलवून लोकांसमोर ठेवणें हें अधिक परिणामकारक ठरेल. अशी पात्रता आणणारे पदवीधर व शाळा–प्रशाळांतील शिक्षक जर मनावर घेतील तर सुट्टीच्या दिवशीं कांहीं गांवीं असे कार्यक्रम घडवून आणणें त्यांना सहज शक्य होईल. मात्र हे कार्यक्रम मंदिरांत घेतले जावेत व प्रयत्नपूर्वक शिस्त व गांभीर्य राखून कथा सांगण्यांत याव्यात. चैत्रांत ९ दिवस श्रीरामकथा व त्यानंतर हनुमान-चरित्र सांगतां येईल. श्रावणांत श्रीकृष्ण–चरित्र व नवरात्रांत दुर्गेच्या कथा सांगणें युक्त ठरेल. अन्य वेळींहि प्रसंगानुसार असे कार्यक्रम मंदिरांतून होऊं लागतील तर पुराणकथनाला काळानुसार योग्य वळण दिल्यासारखें होईल. आजहि खेड्यांतून पुराणें चालतात, पण मंदिरांतील खांबाइतकेहि श्रोते दिसत नाहींत; व जे असतात तेहि बहुतेक वृद्ध ! खेड्यांतील मंदिरांतून चातुर्मासांत हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप आदि ग्रंथ वाचले जातात. पण त्यांतील कथा क्रमानें व्याख्यानरूपानें सांगण्याची पद्धति चालू केली तर अधिक रसनिष्पत्ति होईल. पुराणश्रवण हें वाती वळणाऱ्या म्हाताऱ्या आजीबाईंचें व मान लटलटूं लागलेल्या वृद्धांचें होऊन बसलें आहे. वास्तविक जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा, धर्माचा नि नीतीचा उलगडा गोष्टीरूपानें बाल व संसारी तरुणवर्ग ह्यांच्याच कानावर प्रामुख्यानें पडला पाहिजे. ज्यांना जगांत अजून कांहीं करण्याची धमक आहे, त्यांनाच कर्तृत्वाला योग्य ती दिशा व वळण लावून देणाऱ्या कथा सांगितल्या जाव्यात. पण पुराणश्रवणांत तो वर्ग जवळ जवळ अभावानेंच दिसतो. त्यामुळें पूर्वीच्या पिढ्यांतून हरिश्चंद्राची सत्यनिष्ठा, ध्रुवाचा निश्चय, हनुमन्ताची उत्कट भक्ति, सावित्री व अनसूया यांचें पातिव्रत्य अशा असंख्य गोष्टींचा ठसा जो सहज उमटत असे, तो आज उगवत्या पिढीवर विशेष उमटलेला दिसत नाहीं. विशेषतः आपल्या खेडेगांवांतून असे संस्कार केले

जाण्याची आवश्यकता आहे व ती आवश्यकता वरील उपक्रमानें भागूं शकेल. खेड्यांतील जीवन दिवसेंदिवस रुक्ष होत जाणें हें सुचिन्ह नव्हे हें ओळखून प्रयत्न व्हावेत. असो.

उत्सव व जत्रा यांचा विचार आतांपर्यंत आपण केला. यापुढें मंदिरसंस्थेंतील 'यात्रा' ह्या एका प्रमुख अंगाकडे आपण वळूं. वास्तविक जत्रा हा शब्द 'यात्रा' ह्या शब्दाचेंच अपभ्रष्ट रूप असलें तरी आतां जत्रा व यात्रा ह्या शब्दांना व्यवहारांत भिन्नभिन्न अर्थ निश्चित झालेले आहेत. जत्रा ही मंदिराच्या उत्सवानिमित्तानें भरणारी प्रासंगिक असते; तर यात्रा ही बाराहि महिने चालणारी असते. जत्रा ही लहानशा टापूंतील लोकांना आकृष्ट करते तर यात्रेचा प्रभाव साऱ्या देशाला व्यापून उरतो. जत्रेंत धार्मिकतेपेक्षां सामाजिक संघटन हाच प्रमुख भाग असतो तर यात्रेंत धार्मिकतेला, भक्तीला व श्रद्धेला अग्रस्थान असतें. जत्रा सर्वसंग्राहक, सुलभ व मनोरंजक तर यात्रा भाविक वर्गाइतकी सीमित, कष्टदायक व मनोनिग्रहाला प्रेरणा देणारी असते. जत्रा ही खर्चाच्या दृष्टीनें आटोपशीर तर यात्रा ही खर्चाच्या दृष्टीनें सर्वांनाच झेपणारी नसते. असें जत्रा व यात्रा ह्यांचें स्वरूप अगदीं भिन्न असतें.

अति प्राचीन काळापासून आपल्या देशांत यात्रा करण्याची पद्धति रूढ आहे. महाभारतांत पांडवांनीं केलेल्या तीर्थयात्रांचीं वर्णनें आढळतात. अर्थात् त्यापूर्वींहि यात्रा होत्याच. देवतुल्य महापुरुषांच्या पदस्पर्शानें पवित्र झालेलीं स्थानें ह्यांचा अंतर्भाव 'क्षेत्रांत' होतो व जेथें त्यांच्या सान्निध्यानें जलप्रवाह पवित्र झालेले असतात ते 'तीर्थ' म्हणून गणले जातात. देवदेवतांच्या जीवनकथेशीं निगडित असणारीं स्थानें हीं तीर्थक्षेत्रें म्हणून दर्शनीय व पूजनीय ठरतात. आपल्या इष्ट देवतेचें दर्शन घेतल्यानें लाभणारें पुण्य नि समाधान आणि त्यामुळें जीवाचा होणारा उद्धार ह्या यात्रेमागील प्रेरणा होत. 'दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ती' अशी ग्वाही संतमहंतांनीं यात्रिकांना दिलेली आहे. म्हणूनच 'जी तारते ती यात्रा' असा त्या शब्दाचा भावार्थ रूढ आहे. महाराष्ट्रांत घरोघरीं पूजेंत व वाचनांत असणाऱ्या 'श्रीगुरुचरित्र' ह्या प्रासादिक ग्रंथांतहि गोकर्ण महाबळेश्वर, श्रीशैल, वाराणसी आदि क्षेत्रांच्या यात्रांची महति मुक्तकंठानें गायलेली आहे.

हीं तीर्थक्षेत्रें आपल्या देशाच्या प्रदीर्घ परंपरेंतून उदयाला आलेलीं

आहेत. देवता, महापुरुष, अनन्यभक्त, अवतारी पुरुष व साधुसंत ह्यांच्या जीवनाशीं निगडित असणारीं स्थानें हींच त्यांच्या असंख्य भक्तांकडून वा चहात्या अनुयायांकडून पुण्यक्षेत्रें म्हणून पूजिलीं जातात. ह्याला कोणत्याहि देशांत व काळांत अपवाद सांपडणार नाहीं. राम नि कृष्ण यांचीं जन्मस्थानें म्हणून अयोध्या आणि मथुरा जशीं तारकक्षेत्रें ठरलीं तशींच आजच्या काळांत बेलूर, रायगड नि गायकवाडवाडा हीं नवीं क्षेत्रें भगवान् रामकृष्ण नि विवेकानंद, छत्रपति शिवाजी राजे व लो. टिळक ह्यांच्या विभूतिमत्त्वांतून जनहृदयांत क्षेत्रत्व पावत आहेत. तीर्थक्षेत्रांत घडलेल्या दैवी पुरुषांच्या जीवनांतील घटनांचें तेथें जाणाऱ्या भाविकाला स्मरण होतें व त्यांतून त्याचा भक्तिभाव उत्कट होतो. श्रीरामकृष्ण परमहंस ह्यांचे राखाल तथा स्वामी ब्रह्मानन्द म्हणून एक शिष्य होते. ते मथुरा येथें गेले असतां तेथें जातांच त्यांच्या भावपूर्ण दृष्टीला प्रत्यक्ष भगवान् कृष्णाचें दर्शन घडलें. भाविकाच्या भक्तीला अष्ट सात्त्विक भावांचें भरतें आणण्याचें सामर्थ्य अनेक तीर्थक्षेत्रांत प्रत्ययास येतें. अर्थात् हा तेथील वातावरणाचा प्रभाव हा दैवी महापुरुषांच्या वास्तव्यांतून व अनन्यभक्तांच्या सात्त्विकतेंतून निर्माण झालेला असतो. तेथील कण अन् कण इतरांना संजीवित करण्याइतका तेजस्वी होण्यास, शतकानुशतकें तेथें आलेल्या असंख्य यात्रींनीं हातभार लावलेला असतो. अशा स्थानांचें महात्म्य हें खरोखर अद्वितीयच असतें. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराहून मोठें व शिल्पाच्या दृष्टीनें सुंदर असें पांडुरंगाचें मंदिर, चंद्रभागेहून मोठ्या नदीच्या कांठीं बांधण्यांत आलें व तेथें सकाळपासून सायंकाळपर्यंत महापूजा, आरत्या, कीर्तनें, चौघडे असे कार्यक्रम झडूं लागले तरी पंढरपूर तें पंढरपूर ! तेथें 'त्या सम तें' असेंच म्हणणें अपरिहार्य ठरेल. स्वातंत्र्यवीर सावरकर अशा स्थानांविषयीं लिहितात कीं, "रायगड ही शिवरायाची राजधानी. तिथें ती अवलोकन करूं इच्छिणाऱ्या महाराष्ट्रीयास जर आपण म्हणूं लागलों कीं 'तुला नवा किल्ला बांधून देतों. तूं तिथेंच रायगड अशी कल्पना कर आणि समाधान मान,' तर तें हास्यास्पद होईल. कारण तें स्थानमहात्म्य अप्रतिम आहे. तसेंच जिथें राम वनवासीं राहिले, जिथें सीता वनवासीं निवसे, जिथें कौरव पांडव लढले, गीता उपदेशिली तीं तीं ऐतिहासिक देवस्थानें, तीर्थें, क्षेत्रें हीं अप्रतिमच – त्यांचें वैशिष्ट्य त्यांच्या कोणत्याहि

प्रतिलिपीस ( कॉपीस ) येणें शक्य नाहीं..." अशा अद्वितीय व अप्रतिम क्षेत्रांविषयींचा आदरभाव क्षेत्रमहात्म्यांच्या पोथ्यापुस्तकांनीं व पौराणिक कथांनीं समाजांत अखंड जागृत ठेवला असून तो भावच लोकांना सर्व दृष्टीनें अवघड असणाऱ्या यात्रा हंसतमुखानें करण्यास उद्युक्त करीत आला आहे.

हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतून अशीं भारतीय ख्यातीचीं स्थानें आहेत. त्यांत बारा ज्योतिर्लिंगें, देवीचीं एक्कावन्न स्थानें, आठ गणपतीचीं स्थानें, ह्यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. विशेषतः काशी, रामेश्वर, प्रयाग, हिमालयांतील केदारनाथ, बद्रिनारायण, गंगोत्री, जम्नोत्री हीं चार स्थानें, तशींच द्वारका, मथुरा, नाशिक, पंढरपूर, कोल्हापूर, जगन्नाथपुरी, अयोध्या, नाथद्वार, तिरुपति, मदुरा हीं स्थानें विशेष विख्यात आहेत. वैदिक सांप्रदायिकांप्रमाणेंच जैन, बौद्ध व शीख ह्या संप्रदायी हिंदूंचींहि यात्रेचीं स्थानें सर्वत्र विखुरलेलीं आहेत. अशा सर्व राष्ट्रव्यापी क्षेत्रांमुळें भक्तिभावनेच्या दृष्टीनें आपला समाज अभंग राहिलेला आहे. दुर्दैवानें इंग्रजी राज्याचें संकट आपल्या देशावर कोसळल्यावर आपल्या भावजीवनांत फुटीरतेचें व विद्वेशाचें विष घुसविण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला. पण तो प्रयत्न पुरेसा सफल होऊं न देण्याचें श्रेय कांहीं प्रमाणांत अशा भारतीय तीर्थक्षेत्रांना अवश्य द्यावें लागेल.

यात्रा ह्या जत्रांच्या तुलनेनें बऱ्याच कष्टप्रद असल्याचा उल्लेख मागें केलाच आहे. ही कष्टप्रदता पूर्वी देशांत वाहनांची सोय नसतांना अतिशयच जाणवे. प्रामुख्यानें काशी–रामेश्वर ही यात्रा सर्व यात्रांत अग्रगण्य मानली जाते. देशाच्या उत्तरेला असणारी काशी व दक्षिण टोकावर वसलेलें रामेश्वर ह्या क्षेत्रांची पुरातन काळापासून यात्रेच्या निमित्तानें घातली गेलेली अतूट सांगड, हा विशाल भारताच्या भावनिक एकात्मतेचा पुरावा आहे.

आपल्या गांवाहून तीर्थक्षेत्रें करीत करीत काशीस जावयाचें. जातांना प्रयागला त्रिवेणी संगम होण्यापूर्वीच्या गंगा प्रवाहांत गडव्यांत पाणी भरून घेण्याची पद्धति आहे. काशीला गंगास्नान व श्रीविश्वनाथाचें दर्शन घेऊन यात्रा करीत रामेश्वरास जावयाचें व तेथें बरोबर नेलेल्या गंगेचें पूजन करून ती रामेश्वरावर वहावयाची. मग रामेश्वराजवळील धनुष्कोडीला जाऊन तेथील वाळूचें लिंग करून त्याची पूजा करावयाची. मग त्याच वाळूचीं तीन लिंगें करून त्यांतील 'वेणीमाधव' व 'बिंदुमाधव' हीं लिंगें पूजा

करून रामेश्वर येथें समुद्रांत विसर्जित करावयाचीं व तिसऱ्या 'सेतुमाधव' लिंगाची वाळू आपल्यासमवेत घेऊन दीड-पावणेदोन सहस्र मैलांचा प्रवास करून तो सेतुमाधव पूजा करून पवित्र प्रयागतीर्थांत गंगेला समर्पण करावयाचा. मग तेथून गंगाजल घेऊन व काशीला पुन्हां विश्वनाथाचें दर्शन घेऊन घरीं यावयाचें. त्यानंतर एवढी प्रदीर्घ व कष्टाची यात्रा सफल झाल्याचें निदर्शक म्हणून गंगापूजनाचा म्हणजे मांवद्याचा कार्यक्रम मोठ्या थाटामाटांत साजरा करावयाचा. अशी सामान्यतः पद्धति असते. सध्या लोहमार्गामुळें हा प्रवास १५।२० दिवसांत होत असला तरी पूर्वी पायीं वा बैलगाडीनें एवढें अंतर तोडावयाचें म्हणजे ७।८ महिनेहि अपुरे पडत. त्या पदयात्रेंत ऊन–पाऊस–थंडी ह्या तिन्ही तापांचा अनुभव घेत घेत, स्वतःचें ओझें स्वतः वागवीत प्रवास करावा लागे. वाटेंत अरण्यांत वा एखाद्या अवघड खिंडींत चोरांकडून अडवणूक होण्याची, लुटलें जाण्याची व प्रसंगीं 'प्राणास मुकण्या'ची भीति असे. पण अशा अवघड प्रदीर्घ प्रवासाचा शीण वाटणार नाहीं इतक्या चिवट व निर्भय वृत्तीची लक्षावधि भाविक मंडळी प्रतिवर्षी अशा यात्रा करीत असत. ही यात्रा सफल करून आल्यावर भाविकाला कृतकृत्य झाल्याचा आनंद व समाधान प्राप्त व्हावें, असेंच तें एक दिव्य होतें व तें दिव्य करण्याची प्रेरणा भक्तींतून व 'अश्वमेधाधिकं पुण्यम्' प्राप्त करण्याच्या सात्त्विक अभिलाषेंतून मिळत असे.

ही यात्रा करतां करतां यात्रिकांना वाटेंतील अ नेक तीर्थक्षेत्रांचा लाभ घेतां येई व आपल्या प्रांताबाहेरील देशबांधवांची भाषा, वेष, राहणी, खाणें–पिणें, चालीरीति, स्वभाव, कलाकौशल्य अशा विविध गोष्टींचें अगदीं जवळून निरीक्षण करण्याची व नवीन उपयुक्त दिसतील त्या गोष्टींचा स्वीकार व अनुकरण करण्याची त्यांना संधि मिळे. इंद्रधनुष्यांतील सप्तरंग हे जसे एकमेकांत सर-मिसळून गेलेले असतात तशी सुखद देवाण-घेवाण होऊन आचारांच्या भिन्नतेंतहि विविध रंगांच्या व आकारांच्या पुष्पांतून जसा एकच दोरा जावा त्याप्रमाणें भक्तीचा नि आत्मीयतेचा एक बळकट धागा नकळत सर्व देशबांधवांना गुंफून टाकी. जवळून संथपणानें भारतीय जीवन पाहण्याची ही संधि आतां मोटार व आगगाडी ह्या वाहनांतून यात्रा करणाऱ्यांना पुरेशी मिळत नाहीं. मात्र ह्या गतिमान् वाहनांमुळें 'काशीस जावें, नित्य वदावें' असें केवळ यात्रेला

जाण्याचे मनोरे रचण्याला आतां कारण उरलेलें नाहीं. खिशांत पैसा असणारा पंगू मनुष्यहि आतां सुखेनैव लांबच्या यात्रा करूं शकेल, अशी शक्यता निर्माण झाली आहे. पण आजकालच्या झटपट यात्रेंतील सुखसोयींच्या व्यस्त प्रमाणांतच देशावलोकनाचें महत्त्वाचें कार्य साधूं शकतें, हेंहि तितकेंच खरें. समर्थ रामदास व स्वामी विवेकानन्द ह्यांनीं सर्व भारतांत ज्या पदयात्रा केल्या त्यांतूनच त्यांना देशपरिस्थितीचें आकलन झालें व जागृतीची दिशा व प्रेरणा मिळाली. पण ही गोष्ट धांवत्या यात्रेनें कशी साधणार ? एकट्या महाराष्ट्रांत जगदीश यात्रा कंपनी, किशोर ट्रॅव्हल सर्व्हिस, दत्तदिगंबर यात्रा कंपनी, भारतीय प्रवासी, भारत यात्रा गाइड अशा निरनिराळ्या प्रवासी संस्था प्रतिवर्षी सहस्रावधि लोकांना घरगुती सुखसोयींत भारतभ्रमणाचें आणि तीर्थयात्रांचें पुण्य मिळवून देण्यासाठीं धडपडतांना पाहिल्या म्हणजे तीर्थयात्रांचें आपल्या जीवनांतील महत्त्वपूर्ण स्थान तेव्हांच ध्यानांत येतें. ह्या संस्थांव्यतिरिक्त असंख्य यात्रेकरू स्वतंत्रपणें यात्रा करीत असतील हें सांगावयास नकोच. एकट्या काशीक्षेत्रांत प्रतिवर्षी किमान १५।२० लक्ष यात्रिक येत असतात व कुंभ मेळ्यांत तर ही यात्रिकांची संख्या ४०।५० लक्षांच्या घरांत सहज जाते ! मुळांतच यात्रेची ओढ व तिला सुलभ गतिमान् वाहनांची जोड मिळाल्यानें दोन वृत्तींची भेसळ यात्रेंत झालेली आहे. एक वर्ग पूर्वीप्रमाणें पूर्ण भाविकांचा तर दुसरा प्रामुख्यानें प्रवासाची हौस असणाऱ्यांचा. पण प्रवास-सौकर्यांच्या दृष्टीनें भाविकांसमवेतच हे हौशी प्रवासी सर्व भारतांत यात्रा करतांना आढळतील.

हिमालयांतील चारी क्षेत्रांची यात्रा व मानसयात्रा ह्या देहदंडन व मनोनिग्रह शिकविणाऱ्या, अत्यंत कसोटीच्या, कष्टाच्या पण सृष्टिसौंदर्यांच्या दृष्टीनें अतुल आनंदमय यात्रा होत. काश्मीरांतील अमरनाथ व वैष्णव देवी ह्या यात्राहि त्याच वर्गांत मोडणाऱ्या आहेत. सध्यांच्या आर्थिक टंचाईच्या काळांत हिमालयांतील यात्रेसाठीं चार महिन्यांची सवड काढून अपरिचित वायुमानांत बर्फ, पाऊस, हिमवर्षाव, धुकें, थंडी नि सोसाटयाचा वारा आदि गोष्टींना पचवून यात्रा करण्याची हौस व त्राण इतर प्रांतांच्या तुलनेनें महाराष्ट्रांत कमी दिसतें. त्यामुळें हिमालयांत जाऊन तेथील निसर्गाची अपूर्वाई अनुभवणारी मंडळी महाराष्ट्रांत अल्प आहे. ५०।६० सहस्र लोक प्रतिवर्षी बदरीनारायणास जातात असें वाचनांत येई, पण सध्यां हा आंकडा एक लाखावर

गेला असून तो यापुढें वाढतच जाणार आहे. तेथें जाणाऱ्या यात्रेकरूंतील २० टक्के केदारनाथास, ५ टक्के गंगोत्रीस व २ टक्के जम्नोत्रीस जातात. पण आश्चर्य असें कीं, एक सहस्र यात्रींत महाराष्ट्रीय यात्री केवळ ५ सुद्धां नसतात! व त्यांतहि ८० टक्के ' श्रीमती ' बायका असतात असा अनुभव, चारी धामांची सहकुटुंब पदयात्रा करून आल्यावर पुण्याचे श्री. शंकर सखाराम दाते ह्यांनीं ' हिमालयदर्शन ' ( पृ. २९२ ) ह्या ग्रंथांत दिला आहे. अर्थात् हें त्यांनीं केलेलें परीक्षण कांहीं वर्षांपूर्वीचें आहे. इतक्या बिकट यात्रा करणाऱ्या भाविकांच्या तपश्चर्येनेंच भारताची उत्तर सीमा ही हिमालयाच्या दक्षिण उतरणी-वर नसून ती त्या पर्वतराजाच्या उत्तरेकडील मानससरोवराच्याहि पलीकडे जाऊन भिडते, ह्या ऐतिहासिक सत्याचा प्रत्यक्ष पुरावा टिकून उरला आहे. आज काव्यमय वातावरणानें विनटलेला पवित्र मानससरोवराचा परिसर आपल्या दुबळ्या राजनीतीमुळें आणि सैनिकी सामर्थ्याच्या अपुरेपणामुळें आपण गमावल्यासारखा दिसत आहे. पण हिमालयाच्या दुर्गम पर्वतांतून मार्ग काढणारी, हिमाचलाला आपल्या पराक्रमानें इकडचा तिकडे करून त्यांतील गंगेसारखे महानद आपल्या भगीरथ प्रयत्नांनीं भारतांत वळवून आणणारी घोर तपश्चर्या व उत्कट देशभक्ति ही, आज नाहीं उद्यां, मागें हटलेल्या सीमा लीलेनें ओलांडून पलीकडे नेल्यावांचून राहणार नाहीं. ज्या हिमालयांतील प्रत्येक पाऊलवाट ही असंख्य भाविकांच्या पदधूलीनें पावन व जेथील वाता-वरणांतील कण न् कण त्यांच्या विमल भावभक्तीनें पुलकित झाला आहे त्या स्वर्गतुल्य हिमनगाचें भारतीयत्व अविचलित ठेवण्यासाठींच आपली जीवनयात्रा आहे, अशी दृढ धारणा असणारे महान् वीर त्याच भाविकांच्या पुण्याईतून उभे राहतील असा विश्वास वाटतो.

महाराष्ट्र व कर्नाटक या दोन प्रांतांतील सहस्रावधि कुटुंबांतून मोठ्या निष्ठेनें पंढरीची आषाढी-कार्तिकी वारी केली जाते. ही यात्रा दोन्ही प्रांतांना व विशेषतः महाराष्ट्राला जागृति आणते. आषाढी वारीच्या वेळीं ठिकठिकाणां-हून जवळ जवळ ६० संतांच्या पालख्या निरनिराळ्या दिशेनें पांडुरंगाच्या दर्शनासाठीं येत असतात व त्यासमवेत येणारे लक्षावधि वारकरी तेथील भावगंगेत न्हाऊन पावन होऊन जातात. ' पंढरीची वारी आहे माझे घरीं। आणिक न करी तीर्थव्रत ' अशा तुकोबारायांच्या निष्ठेनें ही वारी करणारे

आजहि अनेक जण आहेत, ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. जेजुरी, पाली, ज्योतिबाची रत्नागिरी, पैठण येथील यात्राहि पंढरीच्या खालोखाल गाजत असतात. पण भारतांतील प्रांतोंप्रांतीच्या यात्रा सफल होण्यासाठीं, या ग्रंथांत विविध प्रकरणांतून विवेचन केल्याप्रमाणें, मंदिरसंस्थेंतील वैगुण्यें हेरून त्यांत प्रयत्नपूर्वक सुधारणा घडविण्यासाठीं पराकाष्ठेचे प्रयत्न केले पाहिजेत. समाजाविषयीं तळमळ व आस्था असणाऱ्या लोकांनीं असे प्रयत्न केले तरच स्वामी दयानन्दांनीं टीका केल्याप्रमाणें यात्रा म्हणजे 'भ्रमंती करण्याचा निष्कारण त्रास' ठरणार नाहींत !

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्वमत.
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नों दि ....................

## प्रकरण १०

# देवळांत जातांना

देवळांसंबंधीं विचार करतांना पुजारी, पंच आणि विश्वस्त यांच्याप्रमाणेंच दर्शनाला जाणाऱ्या भाविकांसंबंधींहि विचार करणें व त्यांच्याशीं चार हितगुजाच्या गोष्टी करणें आवश्यक वाटतें. प्रथमतः देवळांत जाण्याच्या वेळेचा विचार डोळ्यांसमोर येतो. देवदर्शन केव्हांहि घेणें उत्तमच; पण त्यांतल्या त्यांत परिणामाच्या दृष्टीनें सकाळव सायंकाळ ह्या वेळा अनुकूल असतात. वातावरणांत शांतता असल्यानें सकाळची वेळ ही एका दृष्टीनें प्रसन्न असते. पण सबंध दिवसाच्या धांवपळीनें शरीर दमून व मन त्रासून गेलेलें असतांना, ज्या दैवतावर आपली भक्ति असेल त्याच्या दर्शनाला सायंकाळीं जाणें, हेंहि माणसाला उपकारक ठरत असतें. कारण जीवनांतील धकाधकीचे अनुभव घेतल्यावर, माणसाचें मन अंतर्मुख होण्याला व आत्मनिरीक्षण करण्याला उद्युक्त होत असतें. अशा वेळीं मंदिराच्या पवित्र वातावरणांत गेल्यास, तापवलेला वेत सहज वळवावा त्याप्रमाणें मनाला वळण लावणें सुलभ होतें. तेव्हां सकाळ व सायंकाळ हीं दिवसाचीं दोन टोकें, आपापल्या वैशिष्ट्यांनीं मंदिरांत जाण्यास योग्य ठरतात.

मंदिरांत ज्या वेळीं आपण सकाळीं जात असतों त्या वेळीं सामान्यतः स्नान करून जाणें सहज जमतें. सायंकाळीं दर्शनाला जातांना किमान हात-पाय

धुऊन व थोडा विसांवा घेऊन मगच जावें. त्यामुळें मनाचा व शरीराचा शिणवठा दूर होऊन दर्शन घेण्याला लागणारी प्रसन्न व उल्हसित मनःस्थिति आपणाला प्राप्त होईल. सचैल स्नानापासून तों मार्जन स्नानापर्यंत कोणत्याहि प्रकारच्या जलस्पर्शानें मनुष्य कसा उत्साहित होतो व आंघोळीनंतर धूतवस्त्र परिधान केल्यावर त्या शुचिर्भूतपणाचें समाधान मनाच्या कासारांत कांठोकांठ भरून कसें वाहूं लागतें, हें प्रत्येकाच्याच अनुभवाचें आहे.

देवदर्शन केव्हांहि घेणें यांत वावगें कांहींच नाहीं. प्रत्येक दिवशीं नियमपूर्वक ठराविक देवांचें दर्शन घेणें ह्या गोष्टीला कांहीं वेगळेंच महत्त्व आहे. एखादी गोष्ट मोठ्या निष्ठेनें व्रत म्हणून पालन केल्यानें कांहीं प्रमाणांत आपलें मन आपल्या हातांत येऊं लागतें. त्यावर नियंत्रण ठेवण्याचें आपलें सामर्थ्य त्यामुळें वाढत असतें. सामान्यतः आपण मनाचे दास असतों. त्याची ज्या दिशेनें ओढ असेल त्या दिशेकडे आपण खेंचले जातों. अशी स्थिति असणें हें प्रगतीला उपकारक नाहीं. ह्यासाठीं अनेक मार्गांनीं, कधीं थोपटून तर कधीं धोपटून, कधीं चुचकारून तर कधीं फटकारून मनाला आपल्या मुठींत आणण्याचा प्रयत्न करावा लागतो. ज्यांनीं मनाला मागें टाकून त्याच्या पलीकडील अखंड आनंदमय स्थितीचें क्षेत्र आपलेंसें केलें त्यांनींहि असे नियम, त्या अलौकिक साक्षात्कारानंतरहि पालन करण्याचा कटाक्ष ठेवलेला दिसतो. महर्षि अण्णासाहेब पटवर्धन ह्यांच्या देवदर्शनाविषयीं श्री. अप्रबुद्ध लिहितात कीं, “ ... हे ( देव ) बहुत करून त्यांच्या नित्यांतले होते. याशिवाय कांहीं निमित्तानें इतर देवांसहि जात.... देवाच्या दर्शनास जावयाचें म्हणजे सुद्दाम दर्शनाकरितांच जावयाचें असा त्यांचा स्वभाव होता. वेळेस देवदर्शनांत दुसरीं कामें उरकीत. परंतु दुसऱ्या कामास अगदीं शेजारीं गेले असले तरी, त्यांतच दर्शन घेऊन कधीं आले नाहींत. घरीं परत येऊन पुन्हां दर्शनास जात. त्याचप्रमाणें दोन दोन दिवस देवदर्शनास सवड न झाली, तर ती शिल्लक बाकी हिशेबानें एक दिवसच भरून काढीत; म्हणजे एक चक्कर संपवून घरीं यावें, व गणपतीचें दर्शन घेऊन पुन्हां दुसऱ्या चक्करीस जावें, असें चाले ! जातांना रिक्तहस्तानें जाऊं नये म्हणून खिशांत पुष्कळसे तांदूळ नेण्याची त्यांना संवय होती. ” ( पान २३७ )

महर्षींच्या देवदर्शनांतील ‘ केवळ देवदर्शनासाठीं ’ जाणें, कार्यबाहुल्यामुळें

चुकून दर्शन अंतरलें तर त्याची पुरेपूर भरपाई करणें व देवळांत रिक्तहस्तानें न जाणें, हे तिन्ही बारकावे व्रतधारित्वाचे निदर्शक होत. ते सर्व लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. देवळांत चिमूटभर तांदूळ, फळें–फुलें व दक्षिणा अशा गोष्टी यथाशक्य अर्पण करणें हें कांहीं जणांच्या मतें केवळ अनावश्यक नसून हास्यास्पद होय. लोकहितवादी लिहितात कीं, "...ईश्वरास जर आम्हीं फुलें अर्पण केलीं, तर पहा बरें, त्यानें पृथ्वी निर्माण केली, तेव्हां त्यास कांहीं कमी आहे काय ? तसेंच त्यास नैवेद्य दाखवावा, तर तो उपाशी आहे काय ? "... यासाठीं जे कांहीं उपचार करावयाचे ते "मनुष्यास करावेत. कांहीं देणें असल्यास देवास देऊं नये; कारण देव उणा व उघडा नाहीं, " असें ते आवर्जून सांगतात. पण देव उघडा पडलेला असतो म्हणून कोणी भक्त त्याला कांहीं अर्पण करण्यास प्रवृत्त होत नसतो. भक्तीनें मन फुलून गेलें असतां आपल्या दैवताला, फूल नसेल तर फुलाची पाकळी देखील अर्पण करण्यांत भक्ताला अलौकिक समाधान लाभत असतें व त्याच दिव्य समाधाना-साठीं हें अर्पण केलें जातें. सुदाम्याच्या चिंधींत बांधून आणलेले मूठभर पोहे षडैश्वर्यसंपन्न भगवान् श्रीकृष्णाला अशाच दिव्य समाधानासाठीं दिले जात असतात. तसें पाहूं जातां 'अनंतकोटिब्रह्मांडनायक' म्हणून ज्याचें यथार्थ वर्णन केलें जातें, त्याला 'उघडा पडला' असें कोण म्हणणार आणि त्याला, कोणी झाला तरी, अर्पण तें काय करणार ? आपण 'उपचारार्थे अक्षतां समर्पयामि' इतकेंच काय तें करूं शकतों ! पण अक्षतासमर्पणामागील भावना कृपानिधि परमेश्वरापर्यंत जाऊन पोहोंचते अशी भक्ताची दृढ श्रद्धा असते. त्या क्षुद्र दिसणाऱ्या समर्पणांत आत्मसमर्पणाची गंगोत्री दडलेली असते. प्रारंभीं खिशांतील चार पैसे भक्तिभावनेनें देवापुढें ठेवून 'श्रीकृष्णा-र्पणमस्तु' म्हणणें म्हणजे खऱ्या अर्थानें 'मीतूंपणाची बोळवण' करून त्या जगचालक शक्तीशीं एकरूप होण्याचा श्रीगणेशा करण्यासारखें असतें. आरंभीं 'सुंदर तें ध्यान, उभा विटेवरी' अशा विठ्ठलाच्या प्रत्यक्ष भजन-पूजनांत निमग्न असणाऱ्या संत तुकारामाला पुढें पुढें जळीं-स्थळीं तोच विठ्ठल भरून उरला आहे, असा साक्षात्कार होऊं लागतो व देवा, तूंच पाणी, सुगंध, धातू, नाद आदि सर्व कांहीं असल्यानें, "कासयानें पूजा करूं केशि-राजा । हाचि संदेह माझा फेडी आतां ? ॥ फळ दाता तूंच तांबूल अक्षता ।

तेथें मी अनंता काय वाहूं ? ।। असा कृतार्थतेनें प्रश्न करण्याचें भाग्य लाभतें ! पण देवापुढें जें अर्पण करावयाचें तें विनीत होऊन व भक्तिपूर्वक अर्पण केलेलें असेल तर त्यामुळें आपल्या मनाच्या प्राजक्ताखालीं दिवसेंदिवस अष्टसात्त्विक-भावाच्या स्वर्गीय कोमल फुलांची गोड पखरण पडल्यावांचून राहणार नाहीं !

मात्र आपल्या समर्पणांत रूढीची यांत्रिकता व दंभ नको. तसाच आपण अर्पण केल्याचा अनाठायीं अहंकार हाहि कामाचा नाहीं. समर्पणाच्या संबंधांत आढ्यतेनें दुसऱ्याशीं तुलना करण्याचा मोह मनाला होणें, हें आपल्या अहंकाराला अधिक पीळ देणेंच होय! एवढेंच नव्हे तर अशा मनःस्थितींत केलेलें पूजन हें देवाचें न म्हणतां देहाचेंच पूजन म्हणावें लागेल. एकदां तथाकथित अस्पृश्यांसाठीं मरियाम्मनचें देऊळ खुलें करतांना महात्मा गांधींनीं देवापुढें बळी देण्याची प्रथा बंद केली पाहिजे असें प्रतिपादन केलें. ते म्हणाले कीं, "...एखाद्या ( मुक्या ) प्राण्याचा बळी देऊन देव प्रसन्न होतो असें मला वाटत नाहीं. त्यासाठीं आपण आत्मबलिदानच केलें पाहिजे." अर्थात् येथें आत्मबलिदान याचा अर्थ अहंकार, मीपणा, देहाभिमान असाच आहे. असें देहाभिमानाच्या बलिदानाचें पवित्र कार्य मंदिरांत होणें आवश्यक आहे. पण पंढरपूरसारख्या वैकुंठतुल्य क्षेत्रांत काय अनुभव येतो! मंदिरांत दर्शनासाठीं शेंकडों लोकांची बारी (क्यू) लागलेली असतांना, दुसऱ्या आड-मार्गानें श्रीमंतांना थेट गाभाऱ्यापर्यंत प्रवेश दिला जातो. असे अनेकांना असंतुष्ट करून, पैशाच्या बळावर आधीं दर्शन घेतल्याचा टेंभा कोणीं मिरवूं शकत असला, तरी त्यानें देव प्रसन्न कसा व्हावा ? अहंकाराचा बळी दिल्यानें तुष्ट होणारा विठोबा न्यायाच्या हत्येनें थोडाच हरखून जाणार आहे! बाहेरच्या व्यवहारांत अधिकार, धन, विद्वत्ता अशा गुणवत्तेमुळें श्रेष्ठपदस्थ असणाऱ्यांना 'मंदिरांतील बारी' हें अहंकारविसर्जनाचें पुण्यक्षेत्र वाटलें पाहिजे. पण त्या ठिकाणीं येऊन अहंकाराचा पीळ मनापासून उकलण्याचें सोडून आपल्या कृतीनें तो पीळ वाढविणाऱ्यांना काय म्हणावें ?

अर्थात् प्रत्येक ठिकाणीं बारींत उभें राहावें लागत नाहीं. पण देवळांत येऊन मूर्तीसमोर उभें राहिल्यावर मध्येंच आपलें लक्ष तेथून पळून आपल्या बाहेर असणाऱ्या पादत्राणांकडे जातें कीं नाहीं ? परत बाहेर पडेपर्यंत कोणा भामट्यानें चपला-जोड आपलासा केला नसेल ना, ही भीति मनाला सतावते

कीं नाहीं ? मंदिरासारख्या पवित्र स्थानीं वहाणा बाहेर काढून आंत जाणें हें अत्यंत आवश्यक होय. पण तसें केल्यामुळें शरीर आंत व मन बाहेर असेंहि होऊन चालणार नाहीं. ह्यासाठीं कांहीं विचार केला पाहिजे. पादत्राणें काढून ठेवण्याचा हा नियम राजा व रंक ह्या दोघांनाहि सारखाच लागू आहे. सोमनाथाच्या नव्या मंदिरांत प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रम चालू असतां कांहीं संस्थानिकांनीं नव्या रेशमी पादरक्षा चढवून गाभाऱ्यांत प्रवेश केला. तेव्हां क्षणाचाहि विलंब न लावतां स्वामी केवलानन्द ह्यांनीं त्यांना त्या बाहेर काढून येण्याविषयीं निर्भीडपणें चमकावलें होतें ! अशीं निरपवादपणें पादत्राणें बाहेर ठेवणें तर आवश्यक व तीं बाहेर ठेविलीं कीं सुरक्षित राहणेंहि कठीण !

ह्यावर उपाय म्हणून शीख सांप्रदायी हिंदूंच्या अमृतसर, सरहिंद, आनंदपूर, नांदेड आदि ठिकाणच्या पवित्र गुरुद्वारांतून प्रवेशद्वाराजवळच पादरक्षासुरक्षित ठेवण्यासाठीं विनामूल्य व्यवस्था केलेली आढळते. दिल्लींतील श्रीमंत बिर्ला शेठ ह्यांनीं बांधलेल्या लक्ष्मीनारायण मंदिरांतहि अशा सुव्यवस्थेमुळें निर्धास्तपणें व लगबग न करतां दर्शन घेण्याला अनुकूलता आहे. आर्थिक दृष्टीनें संपन्न असणाऱ्या मंदिरांतून अशी व्यवस्था होणें नितान्त आवश्यक आहे. पण जेथें अशी शक्यता नसेल तेथें अन्य पर्याय काढले पाहिजेत. ज्या वहाणा पळवून नेण्यासहि लाज वाटेल असा अजोड वहाणांचा जोड देवळांत जातांना वापरावा असें मध्यंतरीं एका व्यंगचित्रकारानें रेखाचित्रांतून सुचविलें होतें ! पण हा खरा उपाय नाहीं. अशा लाजिरवाण्या वहाणा घालून जाण्याऐवजीं सरळ अनवाणी गेलेलें काय वाईट ? मात्र असें अनवाणी गेल्यावर मंदिरांत प्रवेशण्या-पूर्वीं पाय स्वच्छ धुऊन आंत जाण्याची सोय पाहिजे. विशेषतः कोकणांतील अनेक मंदिरांसमोर विहिरी असतात व तेथें ओकतीनें वा पोहऱ्यानें पाणी काढून त्यानें हात-पाय धुऊन आंत जाण्याचा परिपाठ आढळून येतो. अर्थात् अशी व्यवस्था असेल तर दर्शनासाठीं अनवाणी जाण्यांत मुळींच लज्जा वाटू नये. देवळाच्या बाहेर आपल्याच चपलांवर उभें राहून दुरूनच हात जोडण्याची पद्धति नागरी मंदिरांतून सध्या सदैव दिसून येते. ह्या अशा मंडळींना शांत मनानें आंत जाऊन दर्शनसुख घेतां यावें, अशी व्यवस्था करणें मुळींच अशक्य नाहीं. विशेषतः नित्यनियमानें दर्शनास येणाऱ्या वृद्धांनीं आपला कार्यभाग आटोपल्यावर देवाच्या दाराशीं घटका दोन घटका बसून इतरांच्या

पादरक्षांवर लक्ष ठेवलें तर बसल्या बसल्या अनेक जगांचे दुवे व अल्पशी सेवा घडल्याचें समाधान त्यांना मिळूं शकेल. इतरांना निर्वेधपणें दर्शनास अनुकूलता निर्माण करणें हेंहि पुण्यप्रद होय. देवळांजवळ पूजासाहित्याचीं जीं दुकानें बसलेलीं असतात त्यांतील परिचिताला थोडे पैसे देऊन कांहीं वेळासाठीं वहाणा ठेवण्याची सोय करून घेतात. कांहीं ठिकाणीं वहाणा ठेवून घेऊन पोंच म्हणून बिल्ला देण्याचीहि सोय केलेली दिसते. अर्थात् जत्रेसारख्या प्रसंगीं ही पैसे देऊन वहाणांच्या रक्षणाची व्यवस्था करण्यांत येत असली तरी नेहमींसाठीं लोकांनींच परस्परांच्या सहकार्यातून व सेवाभावांतून ही गोष्ट घडविल्यास अधिक भूषणास्पद ठरेल. कसेंहि करून देवांसमोर डोळे मिटून ध्यान करूं लागल्यावर देवाचे पवित्र पाय समोर यावेत, त्या वेळीं क्षुद्र चिंतेनें मन व्यग्र होऊं नये, एवढ्यासाठीं दक्षता घेतली पाहिजे. अस्तु.

प्रत्यक्ष दर्शन घेतांना आपल्या मागें कोणी उभे असतील तर किंचित् तिरकें उभें राहून त्यांनाहि दर्शन घडेल व आपण साष्टांग नमस्कार घातल्यावर इतरांच्या प्रदक्षिणेंत व्यत्यय येणार नाहीं, अशी दक्षता घ्यावी. मंदिरांत जाण्यासाठीं घरून निघाल्यापासून शक्य असेल तर कौटुंबिक व इतर विषय मनांतून काढून टाकून आपल्या दैवताच्या चरित्रांतील लीलाप्रसंग मनश्चक्षूसमोर उभे करण्याचा प्रयत्न करावा. ‘केसरी’चे नामवंत संपादक कै. ज. स. करंदीकर हे देवदर्शनाला जात असतां अखंड नामस्मरण करीत असत हें सर्वविश्रुत आहे. प्रत्यक्ष मंदिराच्या प्राकारांत पाऊल टाकल्यावर तरी परस्परांत गांवगप्पा मारावयाच्या नाहींत, असा दंडक ज्यांना पाळतां येईल ते त्या मंदिराच्या गांभीर्यांत भर घालूं शकतील.

नुसत्या दर्शनाच्या शारीरिक बाह्य हडेलहप्पीनें कांहीं लाभ नाहीं. यासाठीं मनानें विनम्र होऊनच देवळाचा उंबरठा आपण ओलांडला पाहिजे. देवळांतील वातावरण हें तेथें जाणाऱ्या लोकांच्या भावभावनांचा संकलित परिपाक असतो. देवळाचे अलंकरणांनीं नटलेले स्तंभ, चित्रांनीं सुशोभित होणाऱ्या भिंती, नक्षीदार खिडक्या, हंडया-झुंबरें व घंटा आदि सर्व गोष्टींचा होणारा हा व्यक्त परिणाम होय. पण तेथें गेल्यावर सहज न कळणारा असा एक अव्यक्त परिणाम वा संस्कार मनावर होत असतो. तो परिणाम प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या जागीं व्यक्त परिणामाहून किती तरी पटीनें अधिक होत असतो. हा जो परिणाम होत असतो

तो तेथें येणाऱ्या भाविकांच्या सदैव वृद्धिंगत होत जाणाऱ्या विशुद्ध भावगंगेचा ! विचार व भावभावना ह्या देखील वस्तूंचा आश्रय घेऊन राहात असतात. आपण वापरीत असलेल्या प्रत्येक वस्तूवर आपल्या भावभावनांचा प्रभाव पडत असतो. संस्कार घडत असतो. उत्तरेंतील दयाळबागेचे प्रमुख श्री साहबजी लिहितात कीं, " ज्या व्यक्तीनें सदैव वापर केला असेल, तिचा न दिसणारा प्रभाव, त्या व्यक्तीच्या वापरांतील प्रत्येक खोली व प्रत्येक खुर्ची इतरांवर पाडीत असते. हें वातावरण तुम्हांला कदाचित् दिसलें नाहीं तरी तें तसें असतें व जे त्या वातावरणाच्या कक्षेंत प्रवेशतात त्यांच्यावर ' न कळत ' त्याचा कमी-अधिक प्रमाणांत प्रभाव पडतो. " सभोंवतीच्या ' जड ' वाटणाऱ्या वस्तूंवर व शिल्पांवर जेथें व्यक्तीच्या भावभावनांचा परिणाम होतो, तेथें तशाच भाव-भावना असणाऱ्या ' सचेतन ' माणसांवर त्याचा परिणाम अनेक पटीनें अधिक होणें, हें स्वाभाविक आहे. स्वामी रामतीर्थ ह्याविषयीं म्हणतात कीं, " एकाच सुरांत लावलेले दोन तंबोरे या मेजावर समोरासमोर ठेवले आहेत. यांतील एका तंबोऱ्याच्या तारांवरून बोट फिरविलें कीं, दुसरा तंबोराहि न वाजवतां वाजूं लागतो. पहिल्या तंबोऱ्याप्रमाणें दुसऱ्या तंबोऱ्यांतून आवाज निघूं लागतो. ध्वनिशास्त्राच्या भाषेंत याचें कारण हें आहे कीं, पहिल्या तंबोऱ्याची तार ओढली कीं, तींतून जीं स्पंदनें निघतात व ज्या स्पंदनांमुळें आपणांस ध्वनि ऐकूं येतो, तीं त्या दुसऱ्या तंबोऱ्यावर कार्य करतात. म्हणून एक तंबोरा वाजविला कीं, दुसराहि वाजूं लागतो. हाच न्याय आपल्या वृत्तिरूपी तारांना लागू आहे. आपल्या अंतःकरणांतील वृत्तींचे जे सूर निघतात, तेच सूर इतरांच्या वृत्तींतून निघत असतात. तुमच्या अंतःकरणांत एखादी कल्पना आली कीं, तुमच्या शेजाऱ्यावर तिचा तत्काळ परिणाम होतो. " ( खंड ९, पान ७३ ) ह्यासाठीं सात्त्विक, विनयसंपन्न, प्रसन्न व भक्तिमय अशा पवित्र भावनांनीं मंदिरांत गेलें पाहिजे. त्यामुळें वर्षानुवर्षांच्या संस्कारांनीं पवित्र बनलेल्या तेथील वातावरणाचा जसा आपणावर इष्ट व हितकर परिणाम होणार त्याचप्रमाणें आपल्या भावनांच्या विशुद्धतेचा तेथें जमणाऱ्या लोकांवर व तेथील वातावरणावर परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं.

कांहीं अंतर्ज्ञानी योगी सोडल्यास, आपली मनःस्थिति नेमकी कशी आहे, हें आपल्याव्यतिरिक्त इतरांना सहसा कळत नाहीं. मात्र, त्याची कल्पना

ज्याची त्याला येऊं शकते. ‘ खुलभर दुधाची कहाणी ’ ह्या प्रसिद्ध कथेंत वर्णिल्याप्रमाणें राजाच्या आज्ञेमुळें घरांतील सारें दूध शंकराच्या मंदिरांतील गाभाऱ्यांत ओतूनहि तो भरत नाहीं; पण भक्तिमय अंतःकरणानें एक चुळकाभर दूध देवावर वाहणाऱ्या म्हाताऱ्या बाईच्या हातून ती किमया घडते. तसेंच देवळांतील कासंडीएवढ्या बाह्यावडंबरापेक्षां मनांतील भक्तिभावाची लहानशी वाटी जर अंतर्मुख होऊन आपणाला मंदिरांत नेतां आली तर पाहिजे. प्रत्येकानें आपल्या समवेत सद्भावनेचा एक थेंब नित्यनियमानें आणण्याचा परिपाठ ठेवला तरी त्यांतून तेथें येणाऱ्या सर्वांना थेंबे थेंबे तळें सांचे, ह्या न्यायानें मोठ्या भावसरोवराचा लाभ झाल्यावांचून राहणार नाहीं. ह्यासंबंधींचे स्वामी विवेकानन्दांचे विचारहि मननीय आहेत. ते म्हणतात कीं, “ अनेक लोक एकाच प्रकारच्या भावनांनीं युक्त होऊन एकाच जागेंत जमूं लागले, म्हणजे दिवसगतीनें ती जागा अधिक पवित्र होत जाते आणि त्या जागेंत येणारीं माणसेंहि अधिक शुद्ध होत जातात. एखाद्या मनुष्यांत सत्त्वगुण अतिशय कमी असला आणि असा एखादा मनुष्य देवळांत गेला, तर तो गुण थोडया प्रमाणांत तरी त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होऊं लागतो. हा गुण कोठून तरी बाहेरून येऊन त्याला नवीनच प्राप्त होतो असें नाहीं, तर त्याच्या ठिकाणीं अगदीं गाढ झोपेंत असलेला तो गुण हळूहळू जागृत होऊं लागतो. देवळांचें अथवा प्रार्थनेच्या विशिष्ट जागांचें महत्त्व याच कारणाकरितां आहे. तथापि, अशा जागांचें पावित्र्य तेथें जमणाऱ्या माणसांच्या पावित्र्यावर अवलंबून असतें. त्या जागांना जें पावित्र्य प्राप्त होतें, तें त्या पवित्र मनुष्यांनीं निर्माण केलेलें असतें. त्यांच्या अंतःकरणांतील पवित्र विचारतरंगांनीं ती जागा भरून गेलेली असते व हे तरंग तेथें साचून राहून दुसऱ्याच्या मनांतील सदृश तरंगांना जागृति आणतात. ”

असें सात्त्विकतेला जाग आणणारें वातावरण प्रमुख मंदिरांतून बहुधा असतेंच. त्या वातावरणाच्या पावित्र्यांत भर घालणारें असें आपलें वर्तन ठेवण्याची प्रत्येकानें दक्षता घेतली पाहिजे. तेथें मनावर न कळत होणारा संस्कार मंदिरांत उभ्या उभ्या गेल्यानें होणारा नाहीं, हें ओळखूनच दर्शन घेऊन झाल्यावर तेथें प्रत्येकानें कांहीं वेळ थांबावें—बसावें असा दंडक रूढ केलेला आहे. पण त्यांतील मर्म न ओळखतां उगीच आपलें बूड तेथें टेकल्यासारखें करून निघून जाणारे अनेक दिसतात. असा केवळ उपचार

म्हणजे मुईमुगाच्या शेंगेचें केवळ फोलकटच होय! विशेषतः पंढरपूरच्या मंदिरांत तासन् तास बारींत उभें राहून मुंगीच्या गतीनें पुढें सरकत सरकत दर्शन घेण्यामध्यें जी विशेष मौज आहे, ती ह्या दृष्टीनें प्रत्येकानें खरोखरच अनुभवून पाहण्यासारखी आहे. आपल्या मागें–पुढें, नव्हे दाही दिशांना श्रीविठ्ठलाचें पावन नाम कणाकणांतून घुमत असल्यानें एका आनंदपूर्ण मनःस्थितींत आपण गेल्यावांचून राहत नाहीं.

आपल्या लहानशा गांवांतील देवळें व शतकानुशतकें पुण्यक्षेत्रें म्हणून विख्यात असणाऱ्या ठिकाणचीं मंदिरें ह्यांतील वातावरणांत स्वाभाविकच महदंतर असतें. पुण्यक्षेत्रींच्या देवळांतील प्रतिवर्षी येणारे लक्षावधि भाविक हे तेथील प्रभावाचें कारण होत. अशा ठिकाणचें वातावरण हें इतकें प्रचोदक व तेजस्वी असतें, कीं तेथें जाणाऱ्या व्यक्तीच्या अहंकाराच्या निरगांठी तेथें सहजा–सहजीं उकलूं लागतात नि ह्या गांठी सुटल्यानेंच माणसाच्या जीवनाला निःस्वार्थ सेवेचें व विमल भक्तिभावनेचें तेज चढूं लागतें. भक्तिभाव हा माणसाला विनय व अंतर्मुख बनवितो. तेव्हां अशा प्रभावशाली वातावरणांत येणारा भाविक मनुष्य मेणाहून मऊ बनत जाणें शक्य आहे. पण भक्तीची उत्कटता नसणाऱ्या सत्प्रवृत्त निरीश्वरवादी व्यक्तीलाहि तें वातावरण विरघळून टाकतें असें दिसून येतें. यादृष्टीनें साथी श्री. ना. ग. गोरे ह्यांनीं 'कारागृहाच्या भिंती' ह्या पुस्तकांत ग्रथित केलेला पंढरपूर येथील त्यांचा अनुभव उल्लेखनीय आहे. ते लिहितात कीं, "बिठोबाच्या देवळांत जावें न जावें असा विचार मनांत चालू होता. शेवटीं जाण्याचें ठरलें. गाभाऱ्यांत जाईपर्यंत नित्य अनुभवाहून निराळा अनुभव आला नाहीं. शेवटीं विठोबाच्या अगदीं पायांशीं जाऊन उभा राहिलों, 'सुंदर तें ध्यान। उभें विटेवरी। कर कटावरी। ठेवोनीया' असें ज्याचें वर्णन तुकोबांनीं केलें तेंच हें दैवत. मी एक मिनिटभर त्या मूर्तीकडे टक लावून पाहिलें. मूर्ति अगदींच साधी, पण ठसठशीत आहे. घोटीवपणा तर तिच्यांत मुळींच नाहीं. माझ्या मनांत ऊर्मि आली कीं, येथें आपण माथा लववावा कीं नाहीं? मी कांहीं 'बुत्‌शिकन्' नव्हे, मी निरीश्वरवादी असलों तरी सहिष्णु आहें. ज्या मूर्तीपुढें उभ्या महाराष्ट्राचे गेल्या एक सहस्र वर्षांतले संत नम्र झाले, ज्याच्या पायांवरून आपल्या भक्तिभावाची चंद्रभागा त्यांनीं दुथडी वाहविली, त्यांच्या दैवतापुढें

मीं काय म्हणून नम्र होऊं नये ? असा मी कोण ? मी नमस्कार केला आणि मला बरें वाटलें. नमस्कार केला नसता तर आपण उगीच ताठा दाखविला अशी रुखरुख माझ्या मनाला लागून राहिली असती. असल्या ताठयांत अर्थ नसतो. ज्ञानेश्वरादि संतांचा ईश्वरवाद अमान्य असला म्हणून त्यांचें कार्य, त्यांची बुद्धि, त्यांची तपस्या किती थोर. ते हिमालयासारखे तर मी ढेकळाएवढाहि भरणार नाहीं. आणि त्यांच्या अंगच्या उच्च गुणांना ज्यामुळें निश्चय प्राप्त झाला तें स्थान पुढें दिसल्यावर मी कां म्हणून नम्र होऊं नये ? " ( पृ. ४१ ते ४३ ) श्री. न. वि. गाडगीळ ह्यांनींहि आपल्या मनःस्थितींतील अद्‌भुत परिवर्तनाचा तेथील अनुभव ' माझा येळकोट ' या पुस्तकांत ग्रथित केला आहे, तो जिज्ञासूंनीं मुळांतूनच पाहावा.

माणसाला अंतर्मुख बनवून त्याच्या मनावर सुसंस्कार करणाऱ्या मंदिराच्या प्रभावी वातावरणांत देवतेला स्मरून आपल्या दिवसभरांतील जीवनाची बारकाईनें पाहणी करावी व ' त्याचें नांव दोष, राहे अंतरीं किल्मीष ' ह्या सुभाषिताप्रमाणें ज्या गोष्टी मनांत शल्याप्रमाणें रुतून बसल्या असतील त्या हेरून काढून, पश्चात्तापानें दग्ध करून टाकाव्यात. प्रकाशांत जसे धान्यांतील खडे स्पष्ट दिसतात त्याचप्रमाणें दैवताच्या सान्निध्यांत आपले दोष स्वतःला तीव्रतेनें जाणवतात. विशेषतः दृष्टि, मन व जिह्वा ह्या तिन्हींकडून अनेक प्रमाद घडत असतात. सिंहावलोकन करण्यासाठीं मागें वळून पाहण्याचें टाळलें व प्रमाद पुन्हां घडूं देऊं नको असें मनाला वेळींच न बजावलें, तर कांहीं काळानें उग्र संकटांच्या रूपानें ते आपणाला अक्षरशः अगतिक करून सोडतात. पवित्र ठिकाणीं केलेलें आत्मनिरीक्षण हा विकारांच्या मदोन्मत्त हत्तींना नियंत्रणांत ठेवणारा अणकुचिदार अंकुश ठरत असतो.

आणखी एका गोष्टीची जोड देवदर्शनाला दिली पाहिजे. ' प्रास्ताविका '-मध्यें प्रतीकाचा व प्रतिमेचा आशय मनांत जागा असेल तरच त्याच्या दर्शनांतून इष्ट असा परिणाम होतो, हा विषय ओझरता येऊन गेला आहे. त्यासंबंधीं थोडा अधिक विचार येथें करणें युक्त दिसेल. आपल्या विविध देवतांविषयींच्या कथा पुराणरूपानें सर्वत्र प्रचलित आहेत. त्याचप्रमाणें राम नि कृष्ण ह्यांच्या दिव्य जीवनावरील महाकाव्यें हीं तर भारतीय सारस्वतांतील अमोलिक रत्नें म्हणून विश्वविख्यात ठरलीं आहेत. पुराणें व महाकाव्यें ह्यांतील ' सगुण चरित्रें,

परम पवित्रें' हीं आपल्या वाचनांत असावींत; आणि आपल्या दैवतांचें दर्शन घेतांना त्या दिव्य जीवनांतील उद्‌बोधक व प्रचोदक घटनांचा आपणास आठव व्हावा. अशा स्मरणांतून त्यांच्या गुणांचें मनुष्य न कळत अनुकरण करूं लागतो. अशी दैवतांतील श्रेष्ठत्वाची अल्पस्वल्प छाया प्रत्यक्ष जीवनावर पडूं लागणें, हीच चरित्रश्रवणाची व प्रतिमादर्शनाची सफलता होय. श्रवण व दर्शन ह्यांतून, दैनंदिन जीवनांतील संकटांना प्रयत्नपूर्वक ठोकरून लावण्याचा निश्चय उदित न होतां जर प्रत्येक वेळीं 'काय करूं नि कसें करूं!' असे उद्गार काढण्याच्या स्थितींत आपण असूं, तर तें श्रवण नि दर्शन ही दोन्ही व्यर्थच म्हणावीं लागतील. सेवाभाव, कर्तव्यपरायणता, प्रयत्नशीलता, धैर्य आदि गुणांच्या बळावर पुरुषार्थ साधण्याची महन्मंगल आकांक्षा जर प्रदीप्त होत नसेल तर आपण मर्यादापुरुषोत्तम रामाचें वा स्थितप्रज्ञ, व्यवहारकुशल, पराक्रमी व चतुर अशा श्रीकृष्णाचें खरें स्मरण वा दर्शन घेतलेलेंच नाहीं, असा त्याचा सरळ सरळ अर्थ होईल. दुर्दैवानें आपण देवाची व देवतुल्य महापुरुषांची वरवर स्तुति करतों, पण त्यांचें अनुकरण करण्याचा ध्यास घेत नाहीं. शिवो भूत्वा शिवं यजेत । म्हणजे शंकरासारखें बनून शंकराची पूजा करावी, हा खऱ्या भक्तीचा मार्ग आपण अनुसरत नाहीं. खरी भक्ति जीवनाला अवकळा आणीत नाहीं. दैववाद नि निराशा फैलवीत नाहीं. कर्तव्याचें विस्मरण भक्तींत संभवत नाहीं. खरी भक्ति ही पौरुषाला तेजस्वी करणारी, प्रयत्नांना उद्युक्त करणारी व संकटांना भीक न घालतां माणसाला धैर्यानें पुढें नेणारी असते. शंभू महादेव व अष्टभुजा तुळजा—भवानी ह्यांच्या भक्तीनेंच, बलाढ्य शत्रूवर तुटून पडण्याचें व दुष्ट हेतूनें अफझलखानाच्या रूपानें आलेल्या प्रत्यक्ष मृत्यूला मिठी मारून त्याचींच आंतडीं लोंबविण्याचें इंद्रतुल्य धैर्य शिवाजीराजांना प्राप्त झालें. विकारवश मनाशीं व उन्मत्त जनाशीं दोन हात करण्याला उत्तेजन देणें हा जणूं भक्तीचा स्वभाव आहे. हें मर्म ओळखून आपण प्राप्त-कर्तव्य पार पाडण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करावी व त्या प्रयत्नांना यश लाभण्यासाठीं इष्ट देवतेचा आशीर्वाद अवश्य मागावा. पण खुळ्या कल्पना मनांत बाळगून, आपला प्रयत्नवाद मुळींच झाकाळूं देऊं नये.

☆ ☆ ☆

## प्रकरण ११

# मंदिरांत प्रवेश कोणाला ?

'मंदिरांत जातांना' कोणती दक्षता घ्यावी, ह्याचा विचार मागील प्रकरणांत आपण केला असला तरी, 'मंदिरांत प्रवेश कोणाला ?' हा प्रश्न उरतोच. हिंदु समाजांत मोडणाऱ्या सर्व पंथोपपंथांतील लहान-थोर, सुशिक्षित-अशिक्षित अशा आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना मंदिरांत दर्शनासाठीं प्रवेश मिळाला पाहिजे, असेंच उत्तर आज बहुतेक जण देतील. महात्मा ज्योतिबा फुले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, प्रा. श्री म. माटे, कर्मवीर शिंदे, डॉ. आंबेडकर, डॉ. हेडगेवार अशा दोन-तीन पिढ्यांतील कर्त्या व डोळस नेत्यांनीं, हिंदु समाजाच्या कळवळ्यांतून जे अविरत प्रयत्न केले, त्यांतूनच असें उत्तर सहज मिळणें शक्य झालें आहे. नाहीं तर, हिंदु असूनहि कोट्यवधि लोकांना अस्पृश्य लेखून, शतकानुशतकें मंदिरप्रवेशास, प्रतिबंध केलेला होता. त्या स्थितींतून सर्व हिंदूंना स्पृश्य बनवून देवदर्शनास मोकळीक मिळवून देण्यासाठीं, गेल्या ६०।७० वर्षांत जे प्रयत्न झाले, त्यांचा प्रगतीच्या दृष्टीनें आढावा घेणें आवश्यक आहे.

भारतांतील कोणत्याहि सार्वजनिक मंदिरांत सर्व हिंदूंना प्रवेश मिळालाच पाहिजे, असा दंडक १९४७ च्या सप्टेंबरमध्यें राजसत्तेनें प्रचलित केला

आहे. असा दंडक असला तरी सहस्रावधि वर्षांच्या संस्कारांमुळें, हिंदूंतील असंख्य जणांच्या विचारांत, ही गोष्ट पचविण्याइतकें परिवर्तन झालेलें नाहीं. अर्थात् सापाचें तोंड नीट ठेचलें गेल्यावरहि, मागून बराच वेळपर्यंत जशी त्याच्या शेपटीची वळवळ चालू राहावी, त्यांतलाच हा प्रकार आहे. सामाजिक जीवनांतील परिवर्तन हें सामान्यतः हलकें हलकेंच होत असतें. ह्याचें कारण परंपरेनें लोकांच्या अगदीं हाडींमाशीं खिळलेले संस्कार हे चुटकीसरसे पालटत नसतात. बुद्धीला व भावनेला कळलेल्या गोष्टी प्रत्यक्ष व्यवहारांत वळविण्यालाहि अवधि लागत असतो. पण ज्यांच्यावर अन्याय होतो, त्यांच्या मनाची तो अन्याय दूर करण्यासाठीं जी स्फोटक स्थिति निर्माण होते, तिला हें 'गजगतीनें' होणारें परिवर्तन संपूर्णशः अमान्य असतें. 'एक घाव, दोन तुकडे' ह्या न्यायानें तो प्रश्न तत्काळ सोडविणें, एवढीच एक गोष्ट त्यांच्या संतप्त मनाला रुचणारी असते. त्यामुळें अशा अन्यायावर कडाडून आघात करण्यासाठीं ते पुढें सरसावतात. अन्याय झालेल्या वर्गाच्या असंतुष्ट व प्रतिशोधक मनाची गति ही अन्यायपरिमार्जन करणाऱ्यांच्या गतीहून स्वाभाविकच किती तरी पटीनें अधिक असते. ह्या गतींतील नैसर्गिक अंतराचा परिणाम असा होतो कीं, असे प्रश्न सुटतांना, केव्हां केव्हां, त्यांतून नवेच प्रश्न उत्पन्न झालेले दिसतात. पूर्वीच्या अस्पृश्यांच्या मंदिर-प्रवेशांतूनहि कांहीं नवीन व्यथा उत्पन्न झालेल्या दिसत आहेत. वास्तविक पूर्वास्पृश्यांना, अनेक जणांच्या तळमळीच्या प्रयत्नां-मुळें, सर्व मंदिरांचीं द्वारें खुलीं होत असतांना, ते इतर समाजबांधवांसमवेत देवदर्शनाला जात आहेत, असें अत्यंत आनंददायी व समाधानकारक दृश्य दिसावयास पाहिजे होतें. पण आपण असें सुखद दृश्य पाहूं शकलों नाहीं. एक तर स्पृश्यांचीं मनें असावीत तितकीं मोकळीं नव्हतीं व अस्पृश्यांना तर तोंपर्यंत मंदिरप्रवेशांत कांहीं स्वारस्यच उरलें नव्हतें !

अस्पृश्यतेचें उच्चाटन करण्यासाठीं गेल्या ६०।७० वर्षांत जे प्रयत्न झाले त्यांचें धांवतें परीक्षण या ठिकाणीं करणें युक्त ठरेल. म. फुले व 'सार्वजनिक काका' जोशी ह्या दोघांनीं १८७३ मध्यें स्पृश्यास्पृश्य स्त्रियांसाठीं सार्वजनिक हळदीकुंकवाचा समारंभ घडविला व म. ज्योतिबा फुले ह्यांनीं आपल्या वाड्यांतील पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला केला. लोकमान्यांनीं गणेशोत्सवांत आपल्या गणपतीसमवेत एका अस्पृश्याकडील मूर्ति मिरविली आणि लेखन व

भाषण यांमधून अस्पृश्यतेवर कडाडून प्रहार केले. "कांहीं लोक जमल्यानें देवाला विटाळ होतो असें म्हणणें म्हणजे देवानें माणसें उत्पन्न केलीं नाहींत, असें म्हणण्यासारखें आहे," असें त्यांचें सांगणें असे. तसेंच, "ब्राह्मणादि चार वर्ण हे एकाच विराट् पुरुषाचीं चार अंगें आहेत, ही गोष्ट सर्वांस मान्य आहे. असें असूनहि पायांचा विटाळ डोक्यास होतो, असें मानणें असमंजसपणाचें आहे," असें त्यांचें अधिकारयुक्त वाणीनें केलेलें परखड प्रतिपादन असे. महर्षि शिंदे ह्यांनीं अस्पृश्यांसाठीं वसतिगृहें काढलीं व कै. प्रा. श्री. म. माटे ह्यांनीं अस्पृश्यवस्तींत जाऊन त्यांच्या शाळा चालविल्या नि आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्यानें तेथील उकिरडेहि झाडून काढले. म. गांधींनीं केलेले प्रयत्न हे देशव्यापी व झंझावाती होते. त्यांनीं देशांत दौरा काढून मंदिरप्रवेशासाठीं चळवळ केली आणि संत नरसी मेहता ह्यानें अस्पृश्यांसाठीं योजलेला 'हरिजन' हा शब्द रूढ करून त्यांच्या वसतींत जाऊन स्वतः राहण्याला प्रारंभ केला. ते सांगत, "देवालयें हीं मुख्यतः पापी लोकांसाठींच असतात. कारण त्या ठिकाणीं त्या पापी लोकांचें पाप धुतलें जातें..... जर तुम्हीं कांहीं माणसें आपल्या गतपापाचें प्रायश्चित्त भोगण्यासाठींच हरिजन म्हणून जन्माला आलीं आहेत, असें म्हणत असाल तर देवालयांत जाऊन पूजा करण्याचा सर्वांपेक्षां त्यांनाच विशेष अधिकार आहे, हें तुम्हांला मान्यच करावें लागेल. कारण जगांतील प्रत्येक धर्मशास्त्र अशी ग्वाही देतें कीं, परमेश्वर हा पापी लोकांचा तारणहार आहे." स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांनीं ह्या क्षेत्रांत केलेले प्रयत्न हे खरोखरच अजोड होते. एखाद्या हिंस्त्र पशूची मृगया साधण्यासाठीं ज्याप्रमाणें चोहींकडून हाकारा करून सारें रान उठवतात, त्याप्रमाणें त्यांनीं जीवनाच्या सर्व क्षेत्रांतून अस्पृश्यतेसारख्या दुष्ट रूढीविरुद्ध एकाच वेळीं मोठ्या त्वेषानें उठाव केला. तें त्यांचें सर्वस्पर्शी असामान्य कार्य पाहून कर्मवीर शिंदे ह्यांनीं असे उद्गार काढले कीं, "बॅरिस्टर सावरकरांचा मी किती गौरव करूं असें मला झालें आहे. त्यांनीं चालविलेली सामाजिक क्रांतीची ही यशस्वी चळवळ पाहून मी इतका प्रसन्न झालों आहें कीं, देवानें माझें उरलेलें आयुष्य त्यांसच द्यावें!" रत्नागिरी येथें श्रीमंत भागोजी कीर यांच्या करवीं 'पतितपावन' मंदिर त्यांनीं बांधविलें व सर्वांना खुलें केलें. तेथें "अखिल हिंदु जाति वर्णपंथनिर्विशेषपणें देवपूजा करील, सांघिक

प्रार्थना करील," अशी घोषणा त्यांनीं तें मंदिर सर्वांना खुलें करतांना केली होती. त्या मंदिरांत "पूर्वास्पृश्यांसुद्धां सर्व हिंदु जातीस पूजा-प्रार्थना-प्रवेशाचा समसमान अधिकार राहील," एवढेंच नव्हे तर "स्वकार्यक्षम असा कोणत्याहि जातीचा पुजारी नेमला जाईल व विश्वस्त-मंडळांत पूर्वास्पृश्य प्रतिनिधि राहील," अशी त्यांनीं व्यवस्था लावून दिली. ही पतितपावन-मंदिराची उभारणी म्हणजे अस्पृश्यांना सर्व मंदिरें खुलीं होण्यास चालना मिळावी म्हणून योजलेला एक उपक्रम होता. त्या वेळीं आपलें मनोगत व्यक्त करतांना ते म्हणाले होते कीं, "जुन्या देवळांचा प्रश्न नव्या ( पतितपावन ) देवळांतील सांघिक पूजेच्या सवयीनें अधिक लवकर सुटेल हें जाणूनच सभा पतितपावनाचें मंदिर बांधीत आहे. इतकेंच नव्हे तर कितीहि नवीं मंदिरें बांधलीं तरी पंचवटीचा राम, काशीचा विश्वेश्वर, रामेश्वर इत्यादि पुरातन क्षेत्रस्थ देवालयांचें महत्त्व स्वतंत्र असल्यानें, त्या विशिष्ट महत्त्वाच्या जुन्या देवालयांत पूर्वास्पृश्यादिक अखिल हिंदूंना प्रवेश-पूजाधिकार समानतेनें मिळाल्यावांचून अस्पृश्यता समूळ गेली, असें म्हणतांच यावयाचें नाहीं." कोल्हापूरचे छत्रपति श्रीशाहूमहाराज व बडोद्याचे अधिपति श्रीमंत सयाजीराव गायकवाड ह्यांनींहि आपापल्या राज्यांत अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठीं थोर प्रयत्न केले, हें येथें विसरून चालणार नाहीं.

ह्या व्यक्तींप्रमाणें आर्यसमाज, हिंदुमहासभा, कॉंग्रेस व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आदि संस्थांचे प्रयत्न अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाला अनुकूलता निर्माण करण्यास सहाय्यभूत ठरलेले आहेत. पण स्पृश्यांच्या अशा प्रयत्नांची एका दृष्टीनें संथ प्रगति होत असतांना प्रत्यक्ष मंदिरांत जाऊन देवदर्शन व पूजन करण्यापासून वंचित झालेल्या अस्पृश्यांच्या मनांत व प्रयत्नांत किती व कशीं झटपट परिवर्तनें झालीं, हेंहि पाहणें मोठें उद्बोधक ठरेल. अस्पृश्यांकडून झालेल्या ह्या चळवळीचें वा उठावाचें सर्व नेतृत्व १९२४ मध्यें 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन झाल्यापासून डॉ. भीमराव आंबेडकर ह्यांच्याकडेच होतें, असें म्हणतां येईल. जागृत अस्पृश्यांकडून चालू झालेल्या आंदोलनांत व त्यांच्या नित्याच्या प्रतिपादनांत संताप व आक्रमकता अधिक होती. त्यामुळें अस्पृश्यता हा समाजजीवनावरील कलंक आहे, अशी स्पष्ट जाणीव झालेल्या स्पृश्य नेत्यांनीं चालू केलेल्या प्रयत्नांना सर्वसामान्य स्पृश्य हिंदूंचा पाठिंबा

मिळण्यास कांहींसा अडथळाच झाला. आधींच अस्पृश्यांच्या दृष्टीनें ही पश्चात्तप्त स्पृश्यांनीं चालविलेली सुधारणा घडविणारी चळवळ कूर्मगतीची होती आणि त्यांतहि अडथळा निर्माण झाल्यानें, अस्पृश्यांनीं समाजावर केलेल्या आघातांत अधिक त्वेष व कटुता संचारली.

मद्रास प्रांतांत १९२६ मध्यें मुर्गेसान नांवाचा अस्पृश्य मंदिरांत शिरल्यानें मोठी खळबळ माजली. त्यानंतर अमरावती, नाशिक, गुरुवायुर आदि ठिकाणच्या मंदिरांत सत्याग्रहपूर्वक प्रवेश करण्याचें आंदोलन डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखालीं केलें गेलें. त्या आंदोलनांत देवपूजा करण्याचा अधिकार मिळविण्याचा प्रधान हेतु नव्हता; तर अस्पृश्यांच्या उपस्थितीमुळें देवालय भ्रष्ट होत नाहीं व मूर्तीचें पावित्र्य भंगत नाहीं, हें तत्त्व प्रस्थापित करण्याचा उद्देश डॉ. आंबेडकरांनीं घोषित केला होता. त्या वेळच्या मंदिरप्रवेश-आंदोलनांत त्यांना यश आलें नसलें, तरी त्यामुळें तो दलितवर्ग जागृत व संघटित होण्यास प्रारंभ झाला. ह्या आंदोलनांतील अपयशामुळें खिस्ताब्द १९२९ मध्यें अस्पृश्यांसाठीं 'चोखामेळा' ह्या संताचें स्वतंत्र मंदिर बांधण्याची कल्पना पुढें आली. पण 'अशा मंदिरानें अस्पृश्यता दूर होणार नाहीं, तेव्हां अस्पृश्यतेचा कलंक व्यवहारांतून दूर करणें हेंच त्या महान् संताचें खरें स्मारक ठरेल,' असा विचार करून स्वतंत्र मंदिराची कल्पना सोडून देण्यांत आली. ह्यासंबंधींच्या डॉ. आंबेडकरांच्या प्रतिपादनांत ज्याप्रमाणें देवदर्शनापेक्षां समानतेचा अधिकार प्रस्थापित करण्याच्या विचाराला प्राधान्य होतें, त्याचप्रमाणें मंदिरप्रवेशापेक्षां अस्पृश्यांच्या अत्यंत दयनीय आर्थिक स्थितींत पालट करून घेणें, हें त्याहूनहि अधिक आवश्यक व महत्त्वपूर्ण आहे, असें त्यांनीं स्पष्ट केलें होतें. सप्टेंबर १९३२ मध्यें वरळींच्या एका सभेंत ते म्हणाले, "मंदिरप्रवेश आंदोलनाचा हेतु उत्तम आहे. पण आपण आध्यात्मिक अन्नापेक्षां ऐहिक उत्कर्षासाठीं अधिक दक्ष असलें पाहिजे." ( The object of temple entry movement is good. But you should care more or your material good than for spiritual food.) 'उपाशी पोटीं वेदान्त सुचत नाहीं!' हा स्वामी रामतीर्थांनीं मांडलेला अचूक सिद्धान्तच त्या वेळीं असा प्रत्ययास येत होता. -

आर्थिक स्थितीचें हृदयविदारक चित्र, अस्पृश्यांच्या अज्ञानाची जाणीव व

हरघडीं येणारे सामाजिक विषमतेचे अनुभव अशा गोष्टींनीं भडकून उठलेल्या अस्पृश्यांना ह्या सर्व क्षेत्रांत त्वरित आमूलाग्र परिवर्तन वा क्रांति हवी होती. त्यांच्या ह्या ज्वालाग्राही मनःस्थितीची कल्पना समरसतेमुळें कांहीं जाणत्या पुढाऱ्यांना परिपूर्ण आलेली असूनहि सर्व स्पृश्यांच्या गळीं हें नवें परिवर्तन पूर्णांशानें उतरविणें हें त्यांच्याकडून झटपट व सहज घडण्यासारखें नव्हतें. त्याचा परिणाम म्हणजे आपण हिंदु असलों तरी त्या समाजापासून आपण दूर गेलेलें चांगलें, असें अस्पृश्यांना वाटूं लागलें. एवढेंच नव्हे, तर "चातुर्वर्ण्याची (दुष्ट) रूढी यापुढेंहि चालूच राहणार असली तर मंदिरप्रवेशांत मला मुळींच राम वाटत नाहीं," असें डॉ. आंबेडकर व त्यांचे अनुयायी उघड बोलूं लागले.

("If that system was to continue he had no use of the benefits of the temple entry.") ह्याहि पुढें जाऊन स्पृश्य हिंदूंना त्यांनीं निक्षून सांगितलें कीं, "मंदिरें सर्वांना खुलीं करावयाचीं कीं नाहींत ह्याचा विचार आतां तुमचा तुम्हीच करा. मला त्यासाठीं आतां प्रचार करण्याची इच्छा नाहीं. माणसांसारख्या माणसांच्या पावित्र्याची प्रतिष्ठा न राखणें ही अशिष्ट पद्धति आहे, असें आपणांस वाटत असलें तर आपलीं देवळें खुलीं करा व सभ्य मनुष्य बना. पण शिष्ट बनण्याऐवजीं जर तुम्ही हिंदूच राहणार असाल तर खत्रुडांनो, आपल्या मंदिरांचीं कवाडें खुशाल बंद करून घ्या. कारण मग त्यांच्याकडे मी ढुंकूनहि पाहूं इच्छीत नाहीं !" ह्या जळजळीत उद्गारांतून व्यक्त होणारी भावना १९३५ च्या सुमारास इतकी तीव्र झाली कीं, दहा सहस्र अस्पृश्य प्रतिनिधींनीं येवले येथील परिषदेंत एकमुखानें 'धर्मांतराचा निर्णय' घोषित केला. आणि पुढल्याच वर्षी झालेल्या परिषदेंत 'हिंदु देवदेवतांचें पूजन न करण्याचा व हिंदूंचे सणवार यापुढें न पाळण्याचा' आदेश सर्वांना देण्यांत आला. अशा रीतीनें १९२४ ते १९३६ ह्या बारा वर्षांच्या कालखंडांत अस्पृश्यांच्या आंदोलनाचें स्वरूप मंदिरप्रवेशाच्या न्याय्य मागणीपासून हिंदुमंदिरांवर संपूर्ण बहिष्कार घालण्यापर्यंत पालटत गेलें.

असें त्यांच्या आंदोलनाचें कडवें व उग्र रूप दिसूं लागतांच धीरे धीरे चाललेल्या मंदिरप्रवेशाला भारतांत चांगलीच चालना मिळाली. त्रावणकोर संस्थानाधिपतींनीं डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांच्या विचारानें आपल्या राज्यांतील १६०० मंदिरें अस्पृश्यांना तत्काळ खुलीं केलीं. त्याचप्रमाणें

म्हैसूरच्या महाराजांनीं तेथील विख्यात दसरा महोत्सवांत सर्व अस्पृश्यांना भाग घेण्यास मोकळीक दिल्याचें घोषित करून, काळाची अचूक चाहूल घेतल्याचें सिद्ध केलें. इतरहि अनेक ठिकाणच्या लोकांना जाग येऊन अस्पृश्यांसाठीं मंदिरें धडाधड मोकळीं होऊं लागलीं. ही येऊं लागलेली जाग म्हणजे अस्पृश्यांनीं केलेले प्रभावी प्रहार आणि इतर नेत्यांचे कळवळ्याचे प्रयत्न यांचा संमिश्र परिणाम होता. पण एवढ्यानेंहि अस्पृश्यांचें समाधान होण्यासारखें नव्हतें. त्यामुळें १९३६ पासून हिंदूंपासून दूर होण्याच्या विचाराला जी चालना मिळाली ती १९५६ मध्यें दसऱ्याच्या दिवशीं नागपूर येथें डॉ. आंबेडकरांनीं लक्षावधि अनुयायांसह हिंदुधर्माचा त्याग करून, प्रकटपणें बौद्धधर्माचा स्वीकार करीपर्यंत कोणत्याहि प्रयत्नानें म्हणावी तशी रोखतां आलेली नाहीं. वास्तविक सर्व सार्वजनिक मंदिरें हीं राज्यशासनाकडून सर्व हिंदूंना मोकळीं झालीं असलीं तरी, त्याचा लाभ घ्यावा व द्यावा, अशा सहकाराच्या मनःस्थितींत सर्व पूर्वास्पृश्य व स्पृश्य असलेले दिसले नाहींत. अस्पृश्यांच्या तथाकथित धर्मांतरानंतर तर राम–कृष्ण–मारुती ह्यांच्या मूर्तींचें उच्चाटन करून त्या ठिकाणीं भगवान् बुद्धाची प्रतिष्ठापना करण्यापर्यंत त्यांच्या संतापाची मजल गेलेली दुर्दैवानें दिसत आहे. अर्थात् सर्वच पूर्वास्पृश्य असे बौद्ध बनलेले नसल्यानें त्यांतील अनेक जण मंदिरांत सुखासमाधानानें जाऊं लागले आहेत हेंहि खरें. थोडक्यांत आजची स्थिति सांगावयाची तर ज्यांना पूर्वीं मंदिरांत येण्यास प्रतिबंध होता, त्यांना आतां निर्बंधदृष्ट्या तरी तशी आडकाठी उरलेली नाहीं. पण असें असलें तरी सर्वच मंदिरांतून पाण्यांत पाणी मिसळून जावें–तशी स्थिति स्पृश्य व पूर्वास्पृश्य ह्यांत निर्माण झाली आहे, असें म्हणणें युक्त होणार नाहीं. अस्पृश्यांच्या प्रवेशानें मंदिर भ्रष्ट झालें, असें मानणारे लोक अजूनहि सर्वत्र आढळतात आणि बौद्धिक दृष्टीनें मंदिरप्रवेशाची युक्तता पटलेले लोकहि, जनांत नाहीं तरी मनांत, कांहीं प्रमाणांत ह्यासंबंधीं मोठेसे उत्सुक असत नाहींत.

सर्व ठिकाणच्या 'वैदिक सनातनधर्माभिमानी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वर्गाचा मंदिरप्रवेशाला आजहि कडवा विरोध आहे. पंढरपूरच्या सुप्रसिद्ध विठोबाच्या मंदिरांत पूर्वास्पृश्यांनीं प्रवेश केल्यापासून संतोजीमहाराज कुकुरमुंडेकर, अमळनेरकर महाराज, पं. धारूरकर शास्त्री, भानुदासमहाराज

व अनेक मठाधिपति ह्यांनीं त्या मंदिरांत प्रवेश करण्याचें सोडून दिलें आहे. जणूं अशा लोकांचें दर्शन नको म्हणूनच पांडुरंगानें त्यांना ही प्रेरणा दिली असावी ! एकूण आजची स्थिति ही अशी असली तरी थोड्याच कालावधींत निर्बंधानें मंदिरप्रवेशाला दिलेली मोकळीक ही सर्व हिंदु समाजाच्या अगदीं अंगवळणीं पडलेली दिसेल. एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानांत हिंदु व बौद्ध असें आजच्या घटकेला जें द्वैत निर्माण झालेलें दिसत आहे, त्याच्या अंतरंगीं वसत असलेलें सांस्कृतिक ' अद्वैत ' हेंहि लवकरच उफाळून वर येईल व पुन्हां ' हिंदुजातिची गंगा आम्ही तिचे सकल बिंदू ' ह्या गोष्टीचा साक्षात्कार आपण सर्वच जण करून घेऊं शकूं, अशी निश्चिति वाटते.

ही वाटणारी निश्चिति एका महत्त्वपूर्ण आधारावर निर्भर आहे. तो आधार म्हणजे ज्यांनीं आपल्या अनुयायांना बौद्धधर्म स्वीकारण्याचा आदेश दिला त्या स्वर्गीय डॉ. आंबेडकर ह्यांच्या राष्ट्रनिष्ठ मनोभूमिकेचा. १९३५ मध्यें अस्पृश्यांनीं धर्मांतराचा विचार घोषित करतांच, हिंदुस्थानांत राजकीय वर्चस्वासाठीं टपून बसलेल्या मुसलमान व खिश्चन ह्या गटांना, ती मोठी पर्वणी चालून आल्यासारखें वाटलें व त्यांनीं ह्या पांच-सहा कोटी लोकांना आपल्या धर्मांत ओढण्यासाठीं खटपट चालू केली. डॉ. आंबेडकरांना वरील समाजांतील पुढाऱ्यांचीं, विविध विलोभनें दाखविणारीं पत्रें येऊं लागलीं. त्या समाजांचीं शिष्टमंडळें डॉ. आंबेडकरांचे उंबरठे झिजवून ' आमच्यामध्यें समाविष्ट व्हा, आम्ही सर्व शक्तीसह तुमचा पाठपुरावा करण्यासाठीं उत्सुक आहोंत, सिद्ध आहोंत, ' अशी आराधना करूं लागलीं. त्या वेळीं बगळ्याप्रमाणें पांढरे दिसणारे रेव्हरंडसाहेब जसे त्यांच्या सभोंवतीं प्रदक्षिणा घालूं लागले, तसेच मौलवी-मौलनाहि ! निजामानें तर कांहीं कोटी रुपये व मुसलमानांच्या नेतृत्वाचा मुकुट आंबेडकरांना देऊं केला. पण ते त्या वेळीं स्पृश्य हिंदूंवर सामाजिक विषमतेमुळें संतप्त असूनहि अंतःकरणांतून राष्ट्रनिष्ठेच्या किती उच्च भूमिकेवर विराजमान झालेले होते, हें खरोखर पाहण्यासारखें आहे. त्यांनीं राष्ट्रभ्रष्ट गटांच्या मायावी अनुनयाला ठोकरून लावलें आणि हिंदु संस्कृतीच्या कक्षेबाहेर जाण्याला, राष्ट्रीयत्वाची लक्ष्मणरेषा ओलांडून जाण्याला स्पष्ट शब्दांत नकार दिला. जून १९३६ मधील एका सुप्रसिद्ध पत्रकांत ते म्हणतात कीं, " दलित वर्गांनीं इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करण्यांत ते केवळ

हिंदुधर्माच्या बाहेर जात नाहींत, तर ते हिंदु संस्कृतीलाहि आंचवतात. उलट ते जर शीख ( संप्रदायी ) बनले तर त्यांचा हिंदु संस्कृतींतच अंतर्भाव होतो. ” (“ If the depressed class join Islam or Cristianity, they not only go out of the Hindu religion, but they also go out of the Hindu culture. On the other hand, if they become Sikhs they remain within Hindu culture. ”) एवढेंच सांगून ते थांबलेले नाहींत. ते निःसंदिग्ध शब्दांत म्हणतात कीं, “ इस्लाम व ख्रिश्चन धर्मांचा स्वीकार करणें म्हणजे दलितवर्गांना राष्ट्रविन्मुख करणें होय. दलितांनीं मुसल्मान होण्याचें ठरविलें तर त्यांची लोकसंख्या दुपटीवर जाईल व मुसल्मानांच्या वर्चस्वाचें संकट खरोखरच ओढवेल. दलितवर्ग जर ईसाई बनतील तर ख्रिश्चनांची संख्या पांच-सहा कोटींवर जाईल व त्यामुळें इंग्लंडची आपल्या देशावरील असलेली मगरमिठी अधिक दृढ केल्यासारखें होईल. ” (“ Conversion to Islam or Christiaity will denationalise the depressed classes. If they go over to Islam the number of Muslims would be doubled; and their danger of Muslim domination also becomes real. If they go over to Christianity, the numerical strength of the Christians becomes five to six crores. It will strengthen the hold of Britain on the country.”)

मनःस्थितीनें संतप्त असतांनाहि, ह्या पत्रकांतून डॉ. भीमराव आंबेडकर ह्यांनीं १९३६ मध्यें ही जी ज्वलंत राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रीय हिंदु संस्कृतीविषयींचें ममत्व प्रकट केलें, तेंच त्यांच्या अंतरंगाची साक्ष देण्यास समर्थ आहे. हिंदूंचें ‘ धर्मान्तर म्हणजे राष्ट्रान्तर ’ ह्या तत्त्वाची उमज त्यांच्या अंतःकरणांत त्यांच्या निधनापर्यंत जशीच्या तशी टिकून होती, असा काळानें निर्वाळा दिला आहे. वरील पत्रकाच्या वेळीं त्यांच्या मनांत सर्व दलितांनीं शीख-संप्रदायी बनावें असें होतें. पण पुढें अधिक अभ्यासांतून त्यांनीं बौद्ध पंथ स्वीकारण्याचा निश्चय केला. हा निर्णय करतांनाहि, शीख होण्याच्या कल्पनेमागें जी राष्ट्रनिष्ठा होती, तीच प्रभावी निष्ठा त्यांना प्रेरक ठरलेली आहे. कारण बौद्ध होण्यानें व्यवहारतः ते हिंदुत्वाच्या वा हिंदु संस्कृतीच्या कक्षेंतून बाहेर जात नाहींत व ईसाई वा मुसलमान होण्यांत राष्ट्रविन्मुख होण्याचें जें संकट आहे, तेंहि

संभवत नाहीं. कारण भगवान् गौतम बुद्धाच्या रूपानें प्रकट झालेलें दिव्यत्व, हें हिंदु संस्कृतीचेंच दिव्यत्व होतें हें कोणीच नाकारणार नाहीं. " हिंदु व बौद्ध हे भिन्न धर्मीय दिसले तरी दोघांचीहि संस्कृति आणि आध्यात्मिक पार्श्वभूमि एकच आहे, " असे उद्गार ब्रह्मदेशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति उ चान टून ह्यांनीं वारंवार काढले आहेत. एवढेंच नव्हे तर बौद्ध-पंथाचा दलित वर्गानें केलेला स्वीकार हाच कसा योग्य आहे हें सांगतांना, डॉ. आंबेडकरांनीं राष्ट्रीय दृष्टीनें एक धोका टाळला आहे हें त्यांनीं स्पष्ट केलें आहे. ते म्हणतात कीं, " ... ब्रह्मदेशांतील आमचा अनुभव असा आहे कीं, ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केल्यावर मनुष्य अराष्ट्रीय, राष्ट्रविन्मुख होऊन पाश्चात्त्य देशांकडे पाहूं लागतो. " स्वातंत्र्यवीर सावरकर 'भगवान् बुद्धदेवांचे जीवन हें हिंदु संस्कृतीचें भूषण आहे' असा भाव व्यक्त करतांना 'हिंदुत्व' ह्या ग्रंथांत म्हणतात कीं, " अलौकिक प्रेमानें आर्द्र व दैवी दयामयतेनें मूर्तिमंत दयेलाहि लाजविणाऱ्या ज्यांच्या हृदयानें आत्मवत् सर्व भूतें जाणून जगांतील अखिल मानवजातीलाच नव्हे तर यच्चयावत् प्राणिमात्राला आलिंगन देण्या-करितां आपले बाहू उभारावे असे अतुल प्रेममय व अलौकिक दयाशील महात्मा गौतम बुद्ध-जैनाचार्य महावीर इत्यादि महात्मे जिच्या कुसव्यांत उत्पन्न होऊन, हिंदु जातीचें हृदय विश्वव्यापी प्रेमरसानें कसें ओथंबलेलें व म्हणून सत्त्वगुणो-त्कर्षानें कसें विभूषित झालेलें आहे हें सिद्ध केलें. " अशी वस्तुस्थिति असल्यानें हें खरें धर्मांतर नव्हे व राष्ट्रांतर तर नव्हेच नव्हे. सध्यांच्या संक्रमणावस्थेंत जरी बौद्धसंप्रदायी पूर्वास्पृश्य कांहींसें अंतर ठेवून वागतांना दिसत असले तरी त्या दूर राहण्याचा अंतःस्थ हेतु, ज्यांनीं त्यांना आजवर दूर ठेविलें त्यांनीं त्यांना लवकर जवळ करावें हाच आहे. त्यामुळें कांहीं काळानंतर ह्या दोन्ही गटांत सुयोग्य असा विवेक जागा होईल व एकसंध आणि प्रगत असा हिंदु समाज देशांत सुखासमाधानानें नांदूं लागेल. अर्थात् हें घडण्यास जसा कांहीं काळ जावा लागेल, त्याचप्रमाणें जाणत्या लोकांचे जनजागृतीचे प्रयत्नहि अव्याहत चालू असावे लागतील.

मंदिरांत सर्व हिंदूंना येण्यास मुक्तद्वार असावें, हें तत्त्व विचारांत व आचारांत किती प्रमाणांत उतरलें आहे व त्यावरून भविष्यकाळासंबंधीं कोणती अटकळ बांधतां येते, हें आपण आतांपर्यंत पाहिलें. पण एवढ्यानें हा विषय

पूर्ण होत नाहीं. कारण केवळ सर्व हिंदूंनाच काय पण अहिंदूंनाहि आपलीं मंदिरें दर्शनासाठीं खुलीं असलीं पाहिजेत, असें आग्रहानें सांगणारे कांहीं जण पुढें आलेले दिसत आहेत सर्वसंग्राहक व सहिष्णु हिंदुपणाला हें एकूण धरूनच आहे.

पण ह्यासंबंधीं अगदीं प्रारंभींच सांगितलें पाहिजे कीं, ' आम्हांला मंदिरांत प्रवेश पाहिजे ' अशी मागणी भारतांतील मुसल्मान, ख्रिश्चन, यहुदी आदि अहिंदु समाजांनीं आजवर मुळींच केलेली नाहीं. कारण निराकार परमेश्वराची उपासनाच त्यांच्या धर्माला संमत असून त्यांना ' मूर्तिपूजा ' हें शुद्ध थोतांड वाटतें. एवढेंच नव्हे तर तें थोतांड असल्यानें मूर्ति नष्टभ्रष्ट करणें, हें जणू आपल्या धर्माचें प्रमुख अंगच असल्याप्रमाणें ते आजवर आक्रमण करीत आले आहेत. अगदीं चार-पांच वर्षांपूर्वीच केरळमधील ख्रिश्चनांनीं अनेक हिंदु-मंदिरें उद्ध्वस्त केलीं आणि ह्या क्षेत्रांतील मुसल्मानांचे गेल्या शेंकडों वर्षांतील विक्रम हे तर त्यांच्यासंबंधीं आपलें मन संतप्त व्हावें अशा स्वरूपाचे आहेत. अशी वस्तुस्थिति असल्यानें ते दर्शनासाठीं भक्तिपूर्वक मंदिरांत येण्यास उत्सुक नाहींत, हें न सांगतांहि समजण्यासारखें आहे. मात्र त्या समाजांतील कांहीं जणांना, हिंदुमंदिरांची बांधणी कशी असते, आंत चालणारे पूजाविधि कसे असतात. वगैरे गोष्टी समजावून घेण्याची जिज्ञासा असणें सहज संभवतें. कारण माणसाच्या स्वभावांतच ती गोष्ट आहे. आपणांलाहि चर्च व मशीद ह्यांचें अंतरंग पाहण्याची इच्छा होत असते व ती इच्छा आपण कांहीं मर्यादेपर्यंत आंत जाऊन पूर्णहि करूं शकतो. असें असतां इतर धर्मांतील जिज्ञासूंना आपल्या मंदिरांत येण्यास कांहीं अटींवर व कांहीं मर्यादेपर्यंत मोकळीक असावी, असेंच कोणीहि म्हणेल.

पण तत्वतः मान्य होऊं शकणाऱ्या ह्या गोष्टीला आज व्यवहारतः अनुकूलता दिसून येत नाहीं. ह्याचें कारण अगदीं उघड आहे. ख्रिश्चन व मुसल्मान ह्या दोन्ही समाजांचे गेल्या शेंकडों वर्षांत आपल्या समाजाशीं जे घृणास्पद व संतापजनक संबंध आले, त्याचा हा स्वाभाविक परिपाक आहे. वरील दोन्ही समाजांनीं अगदीं ह्या क्षणापर्यंत मूर्तिपूजेची टर उडविण्यांत धन्यता मानली असून मूर्तिभंजनांत स्वर्गीय आनंद मानलेला आहे. त्यामुळें अशा समाजांतील व्यक्ति मंदिरांत याव्यात, असें कोणाला व कां वाटावें ? उलट कोणताहि हिंदु हा मूर्ति

असणाऱ्या मंदिरांत जसा उजळ माथ्यानें व भक्तिभावानें पदार्पण करील, तसाच व तितक्याच निर्मळ भावनेनें तो इतरांच्या प्रार्थनामंदिरांत जाईल. ह्याचें कारण परमेश्वर हा जसा निराकार आहे तसा भक्तांसाठीं तो साकारहि होऊं शकतो, अशी दृढ धारणा असल्यानें मंदिराप्रमाणेंच प्रार्थनामंदिरांत जाऊन भक्तिपूर्वक देवाची आराधना करण्यास त्याला कोणत्याहि स्वरूपाचा संकोच वाटत नाहीं. अशी दृढ धारणा असल्यामुळें, श्रीरामकृष्ण परमहंस हे जगांतील सर्व धर्मांच्या सगुण व निर्गुण उपासनांच्या द्वारें विश्वव्यापी दयामय चैतन्याचा साक्षात्कार करून घेण्यास उद्युक्त झाले आणि निर्गुण-सगुण अशा कोणत्याहि मार्गानें गेलें तरी अंततोगत्वा एका दिव्य आनंदसागरांत आपणांस समरसून जातां येतें, हें त्यांनीं स्वानुभवानें सिद्ध केलें. मनुष्याच्या मनाची आजची पायरी ध्यानीं घेतां निराकाराच्या आराधनेपेक्षां साकार परमेश्वराची उपासना करणें हें अधिक सुलभ व सुखकर होत असतें, असें हिंदु मन ग्वाही देत आलें आहे. असें असलें तरी निराकाराची उपासना ही अशक्य असून तें एक थोतांड आहे, असें त्याच्या मनांत कधींच येत नाहीं. कारण दोन्ही मार्गांनीं गेलें तरी गंतव्य एकच आहे, असा प्रत्यक्ष अनुभव घेऊन आपल्या समाजांतील साधुसंतांनीं साक्षात्काराला अनुरूप असें सहिष्णुतेचें वळण हिंदुमनाला आणून दिलेलें आहे. अशा सहिष्णुतेमुळेंच इतरांचीं चर्चें व मशिदी पाडून टाकाव्यात आणि त्यांचे बायबल-कुराणादि पवित्र ग्रंथ भस्मसात् करावेत, अशीं घृणास्पद व निंद्य कृत्यें हिंदूंनीं सहसा केलेलीं नाहींत. त्यामुळें एखादा हिंदु जिज्ञासेनें वा भक्तिभावनेनें प्रेरित होऊन इतरांच्या प्रार्थनामंदिरांत जाऊं लागला, तर त्याच्या प्रवेशाची भीति अन्यधर्मीयांना वाटत नाहीं. ह्याच्या उलट जिज्ञासा-पूर्तीसाठीं म्हणून अहिंदूंना मंदिरप्रवेश दिल्यास त्यांतून मूर्तिभंजनाचे व प्रत्यक्ष मंदिरांत गेल्यावर मूर्तिपूजेची अवहेलना व उपहास करण्याचे प्रकार होणारच नाहींत, असें निश्चयपूर्वक सांगणें कठीण आहे. विरोध वा उपहास ह्यांची ज्या अहिंदूंच्या मनांत छटाहि उमटत नसेल व केवळ मंदिरांतील वातावरण कसें असतें व पूजाविधि कसे चालतात हें समजून घेण्याच्या सोवळ्या जिज्ञासें-तून जे हिंदूंच्या मंदिरांत येण्यास उत्सुक असतील असे अहिंदू थोडे-बहुत असूं शकतील व अशा निवडक लोकांना प्रवेश देण्यास काय आडकाठी आहे, असाहि प्रश्न कोणी सहज विचारील. पण आजच्या देशांतर्गत गढूळ बनलेल्या

परिस्थितींत असे उडदांमाजीं काळे-गोरे निवडणें हें अत्यंत अवघड आहे. कारण शुद्ध जिज्ञासा कोणाची व अंतरंगांत द्वेष व विरोधी भाव असूनहि जिज्ञासेचा सोज्ज्वळ मुखवटा कोणीं चढविला आहे, हें हुडकून काढणें शक्य आहे काय ? जेथें शेर-ए-काश्मीर शेख अब्दुल्लासारखा पं. जवाहरलाल नेहरूंच्या गळ्यांतील ताईत व राष्ट्रीय मुसलमानांचा मेरुमणि हा शेवटीं राष्ट्रद्रोही म्हणून कारागृहांत डांबला जातो व कालच्या पाकिस्ताननिर्मितीच्या हिंसक आंदोलनांत रक्तानें हात रंगवून घेतलेले लीगी पुढारी हे आज अंगावर खादीचे डगले चढवून कॉंग्रेसच्या अहिंसक कळपांत देशभक्त म्हणून मिरवतांना आढळतात, तेथें कोणत्या अहिंदूंच्या अंतरंगाची नेमकी परीक्षा आपण करूं शकणार ? तेव्हां खरोखरच अहिंदूंतील प्रामाणिक जिज्ञासूंना त्यांच्या समाजाच्या आक्रमक प्रवृत्तीला विटून गेलेल्या हिंदूंकडून मंदिरांत येण्यास प्रतिबंध करण्यांत आला, तर त्याचा दोष रोमरोमीं सहिष्णुता बाणलेल्या पण मंदिरांच्या सुरक्षिततेसाठीं दक्ष असणाऱ्या हिंदूंच्या माथीं मारतां येणार नाहीं.

असें असतां आचार्य विनोबा भावे ‘ भूदान-गंगें ’ त म्हणतात कीं, “ इतर धर्मांचे लोक येथपर्यंत पुढें जातात कीं, आपले धर्मांतील गोष्टी दुसऱ्यावर जबरदस्तीनें लादतात. तसें तर आम्हांला करावयाचें नाहीं. परंतु आमचीं देवळें, आमचे ग्रंथ सर्व जिज्ञासूंना खुले असावयास पाहिजेत. आमचें हृदय सर्वांकरितां उघडें असलें पाहिजे. तें मोकळें असलें पाहिजे. आमच्या धर्मस्थानांना तुरुंग बनविणें आम्हांला फार हानिकारक होईल. आणि सज्जनांना तेथें प्रवेश देण्यांत जर कांकूं करण्यांत आली तर देवळासंबंधीं जी थोडीबहुत श्रद्धा आज आहे तीहि नष्ट होईल. ” अर्थात् त्यांनीं हे विचार अहिंदूंनाहि मंदिरें खुलीं असावींत असें आग्रही प्रतिपादन करतांना मांडलेले आहेत. ह्यांतील अहिंदूंतील ‘ सज्जनांना ’ प्रवेश न मिळाल्यास, मंदिरांसंबंधींची उरली-सुरली श्रद्धाहि उडून जाईल, हें जें त्यांचें म्हणणें आहे हें तर एखाद्या लहानशा ओढ्याला समुद्रांत जाऊन मिसळण्यास प्रतिबंध करण्यांत आला तर सारा समुद्रच आटून जाईल, असें म्हणण्याइतकें पोंचट आहे ! कारण ३८ कोटी हिंदु समाजांतील मंदिरासंबंधींची आस्था वा श्रद्धा, हिंदु समाजाच्या श्रद्धास्थानांचा विध्वंस करण्याचा विडा उचलणाऱ्या अहिंदु समाजांतील भांगेंत तुळशीप्रमाणें असणाऱ्या मूठभर सज्जनांच्या मंदिरांत येण्यावर वा न येण्यावर

मुळींच अवलंबून नाहीं. त्यांतूनहि अशा सज्जनांना प्रवेश मिळावा असें वाटत असेल तर, त्यांच्या समाजांची मूर्तिपूजेसंबंधींची विरोधी वृत्ति पालटली असल्याची साक्ष त्या समाजांनीं प्रत्यक्ष व्यवहारांतून हिंदूंना पटवून दिली पाहिजे. आचार्यांनीं वर म्हटल्याप्रमाणें (धर्मकारणापासून तों राजकारणापर्यंत) हे अहिंदु समाज जबरदस्तीनें आपल्या सर्व गोष्टी हिंदु समाजावर लादण्याचा पद्धतशीर प्रयत्न करीत राहतील तोंपर्यंत केवळ हिंदूंनीं आपलीं हृदयें व मंदिरें उघडीं व मोकळीं ठेवून चालणार नाहीं. तसें करणें हें आत्मनाशक ठरेल, यांत लवमात्र शंका नाहीं. त्याचप्रमाणें " धर्मस्थानांना तुरुंग बनविणें आम्हांला फार हानिकारक होईल " हें विधानहि फसवें आहे. कारण अहिंदूंना ते मूर्तिपूजेच्या विरोधी असल्यानें मंदिरांत येण्यास प्रतिबंध करणें, म्हणजे खरें पाहतां, मंदिरांचे तुरुंग बनविणें नसून त्यांचे संरक्षक कोट बनविणें आहे. कारण तुरुंगांत अपराध्यांला ठेवावयाचें असतें व दुष्ट आक्रमकाला गडाच्या दगडी तटाबाहेर थटवावयाचें असतें. तेव्हां मंदिरांच्या सुरक्षिततेसाठीं आजच्या विशिष्ट परिस्थितींत असें संरक्षक धोरण आंखावें लागलें आहे.

पण त्या धोरणांतहि कांहीं विवेक आहे; - लवचिकपणा आहे. मुंबईच्या व इतर कांहीं ठिकाणच्या मंदिरांतून पारशी समाजांतील स्त्री-पुरुष हातांत हार–नारळ–उदबत्त्या घेऊन इतर हिंदूंसमवेत मंदिरांत मोकळेपणानें जातांना आढळतील. आजपर्यंत त्या समाजानें, त्यांना आसरा देणाऱ्या हिंदु समाजाशीं कृतज्ञतेचा व्यवहार ठेवून हिंदूंच्या भावभावनांशीं सुसंवादित्व राखलें आहे, त्याचा हा परिणाम होय. वास्तविक पाहतां पारश्यांच्या आग्यारीमध्यें म्हणजे त्यांच्या पवित्र अग्निशाळेंत हिंदूंना वा अन्य धर्मीयांना प्रवेश मिळत नाहीं. तशा अर्थाच्या ठळक पाट्या तेथील प्रवेशद्वारावर लावलेल्या आढळतील; पण त्यांनीं असा हिंदूंना प्रतिबंध केलेला असूनहि मुंबईतील अनेक मंदिरांतून मूर्तीला नमस्कार करतांना व शनिवारीं मारुतीला तेल--हार चढवून त्याच्यापुढें नारळ फोडतांना आपण त्यांना पाहूं शकाल. तेव्हां इतका समंजसपणा व उदारता दाखविणाऱ्या हिंदु समाजाला 'आपलें हृदय सर्वांसाठीं उघडें असलें पाहिजे, मोकळें असलें पाहिजे' असें सांगणें हें खरोखरच हास्यास्पद होय. वेद, गीता, कुराण, बायबल ह्यांतील उत्तमोत्तम वेंचे सारख्याच भक्तीनें म्हणणाऱ्या विनोबांना काश्मिरांतील मुसलमानांनीं 'कुराण पढण्याचा तुम्हांला

अधिकार नाहीं ' असें खडसावून सांगतांच कलमे पढणें बंद करावें लागलें ! त्या वेळीं ' सत्याग्रहपूर्वक कुराणवाचन ' चालू न ठेवणारे विनोबा जेव्हां जगन्नाथ-पुरीच्या मंदिरांत एका पाश्चात्य ख्रिश्चन युवतीला आपणांसमवेत अट्टाहासानें नेण्याचा प्रयत्न करतात, तेव्हां त्यांच्या सत्यनिष्ठेची बेगड निघून त्यांच्या आत्मघातकी व पक्षपाती दुराग्रहाचें पितळ उघडें पडल्यावांचून राहत नाहीं !

खरें म्हणजे सध्यांच्या एकूण मानवी मनाची धांव मूर्तिपूजेच्या पलीकडे गेलेली नाहीं, पण प्रचलित धर्मपंथांत त्या मूर्तिपूजेलाच स्थान नसल्यानें व अमूर्ताची उपासना करणें हें सर्वसामान्यांना जमणारें नसल्यानें मानवी मनाचा एक प्रकारें कोंडमाराच होत आहे. मूर्तिपूजेचा उपहास करणाऱ्या एकूण एक धर्मपंथांत, ह्या ना त्या रूपानें मूर्तिपूजा शिरलेली पाहिली कीं ह्या गोष्टीची साक्ष पटते. अशा स्थितींत भारतीय मूर्तिपूजेचा व मूर्तांतून अमूर्ताकडे नेणाऱ्या उपासनापद्धतीचा सर्वत्र प्रसार व्हावा, असेंच कोणत्याहि स्वाभिमानी हिंदूला वाटतें. पण संघटना व अद्ययावत् शस्त्रास्त्रें ह्यांनीं सुसज्ज बनून त्यांच्या पाशवी बळावर जगाची लूट करून कुबेर बनलेल्या राष्ट्रांच्या सत्तेपुढें हिंदु समाजाचें शहाणपण चालत नाहीं, अशी आजची स्थिति आहे. ज्या वेळीं ' शापादपि शरादपि ' जगाशीं संघर्ष करण्याची षडैश्वर्यसंपन्नता उपभोगण्याची आमची पात्रता होती, तेव्हां शक–हूण आदि आक्रमक समाजांनाहि आम्हीं आत्मसात् केलें होतें व त्यांना आमच्या मंदिरांच्या थेट गाभाऱ्यापर्यंत पोहोंचण्याची मोकळीक दिली होती. ' सक्सेना ' ह्यासारखीं उत्तर भारतांत आढळून येणारीं उपनांवें, हीं शकांच्या सेनेला हिंदु समाजानें आत्मसात् केल्याची साक्ष देतात. त्या बलसंपन्न सुसंघटित अवस्थेंत आपण केवळ आलेल्या आक्रमकांनाच मूर्तिपूजेची दीक्षा दिली नव्हती; तर रशियापासून जपान–चीन–कंबोडिया–जावा–सुमात्रा आदि देशांपर्यंत आमच्या शिव, गणपति, सरस्वती आदि देवतांचा व त्यांच्या पूजापद्धतीचा आम्हीं प्रसार केला होता.

बलाच्या–राष्ट्रीय सामर्थ्याच्या आधारावर संस्कृति नि कला प्रसारित होतात आणि बळ कमी पडलें कीं, संस्कृतीची पीछेहाट होऊन कलांनाहि अवकळा येते. अहिंदूंना केवळ जिज्ञासापूर्तीसाठीं वा मंदिरांतील शिल्पकला अवलोकिण्यासाठीं आम्हीं पाचारण करून थांबावें असें नाहीं; तर आमच्यासमवेतच पवित्र मूर्तींचें स्वहस्तें पूजन करून शक-हूणांप्रमाणेंच त्यांनीं भावभावनांनीं हिंदु समाजाशीं

समरसून जावें, म्हणूनहि आम्हीं प्रेमानें पाचारण केलें पहिजे. पण विज्ञान, अन्नधान्य, कला, शस्त्रास्त्रें, औषधें नि सुवर्ण या गोष्टींसाठीं दारोदारीं भिकेची चौपदरी घेऊन हिंडणाऱ्या दुर्बळ, पराभूत नि पडखाऊ समाजाचें आमंत्रण आज कोण स्वीकारणार ? आमचें दौर्बल्य नि दैन्य ह्यामुळें आमच्याशीं मनापासून मैत्री करण्याची इच्छा जेथें इतरांना होत नाहीं, उलट आमचे लचके तोडण्याचीच भूक आमच्याकडे पाहिल्यानें इतरांच्या मनांत प्रदीप्त होते, तेथें शक-हूणांप्रमाणें त्यांनीं आमच्या जीवनांतील सुसंस्कृतता, उदारता, सहिष्णुता आदि गुणैश्वर्यांचे समसमान वाटेकरी व्हावें, असें आजच्या घटकेला म्हणतां येणें कसें शक्य आहे ? ह्यासाठीं अंथरूण पाहून पाय पसरले पाहिजेत. आजची आपल्या समाजाची आत्म-विस्मृत व असंघटित अवस्था नीट ध्यानीं घेऊन, ती दूर करण्यासाठीं सावध-पणें व सातत्यानें प्रयत्न केले पाहिजेत. त्या प्रयत्नांतून राष्ट्रीय सामर्थ्य जागृत झालें कीं, आपल्या राष्ट्रीय संस्कृतीचा नि उदात्त तत्त्वज्ञानाचा सर्वत्र प्रसार करण्याची आकांक्षा समाजांत बळावूं लागेल. सर्वांना भारतीय परंपरेच्या दिव्यत्वांत समाविष्ट करून घेण्याची शक्ति राष्ट्रांत निर्माण करीपर्यंत आजच्या विशिष्ट परिस्थितींत आपण जें पथ्य पाळूं, त्याला भले कोणी संकुचितपणा म्हणोत !


☆ ☆ ☆

प्रकरण १२


# कांहीं जिव्हाळ्याचे प्रश्न

पवित्र मंदिरसंस्थेच्या उदयापासून तिचा झालेला विकास व त्यानंतरच्या पारतंत्र्याच्या विपरीत काळांत तिला येऊं लागलेली अवकळा ह्यांचा धांवता आढावा आपण घेतला. मंदिरांच्या अंतरंगांतील अनेक गोष्टींचें परीक्षण करून त्यांतील टिकाऊ नि टाकाऊ भागांची आपण निवडानिवड केली. त्यांतील टिकाऊ भाग सुरक्षित राखण्यासाठीं व मंदिरांची परिणामकारकता वाढविण्यासाठीं कोणत्या नव्या गोष्टींचा व उपक्रमांचा आपण अंगीकार केला पाहिजे, हेंहि पाहिलें. ह्या परीक्षणांत आपण अनेक गोष्टी हेरल्या असल्या तरी आपल्या दृष्टींतून कांहीं गुणदोष सुटले नसतील, असें म्हणणें सयुक्तिक होणार नाहीं. तेव्हां ही मंदिरांची व्यथित करणारी कुलकथा संपविण्यापूर्वी तिच्या भवितव्यासंबंधीं व उपयुक्ततेसंबंधीं कांहीं सारभूत विचार सर्वांसमोर ठेवणें हें मी माझें कर्तव्य समजतों.

मंदिरांची म्हणजेच तेथील मूर्तिपूजेची ज्यास ओढ आहे, असा वर्ग आपल्या समाजांत बराच मोठा आहे. खेड्यांतील अशिक्षित आणि नगरांतील अर्धशिक्षित व शिक्षित वर्गांतून मंदिरांत जाणाऱ्यांची संख्या प्रचंड आढळते. पण तथाकथित सुशिक्षित पुढारलेल्या वर्गांत देवाच्या अस्तित्वाविषयीं साशंक



भूवैकुंठ 'पंढरपूर'



म्हाळसा – नारायणीचें मंदिर, म्हार्दोळ (गोवा)

असणाऱ्यांपासून तों ' देवबीव कोणी नाहीं ' असा ठाम निर्वाळा देणाऱ्यां-पर्यंत चढत्या क्रमानें नास्तिकता आढळते. देवाविषयीं संशयी वृत्ति धारण करणाऱ्या लोकांपासून तों ' देव नाहींच ' अशा निःशंक असणाऱ्या लोकांपर्यंत आपण दृष्टि टाकली तर हे लोक संख्येनें अल्प व वृत्तीनें सामान्यतः सहिष्णु व समंजस आहेत, असें आढळून येईल. स्वतःला पटत नसणाऱ्या गोष्टी इतरांनाहि पटूं नयेत म्हणून आग्रही प्रचार करण्यास उद्युक्त होणारे त्यांत विशेषसे आढळणार नाहींत. प्रौढ मनुष्य जसा लहान मुलांच्या पांगुळगाड्या-कडे, स्वतःला अनावश्यक पण मुलाला तो आवश्यक आहे, ह्या विवेकी दृष्टीनें पाहतो, त्याचप्रमाणें त्यांतील कांहींची मंदिरांकडे पाहण्याची उदार दृष्टि असते. इतिहासाचार्य राजवाडे ' अद्वैतवेदांती व भौतिकशास्त्रज्ञ ' ह्यांचा अपवाद सोडून उर्वरित समाज हा मंदिरासारख्या भ्रांत कल्पनेंतच गुरफटलेला असतो, अशा मताचे होते. ते लिहितात कीं, "......अद्याप जग बाल्यावस्थेंत कसलें, शैशवावस्थेंतच आहे. " लहानग्या बोबडकांद्यांनीं बाहुल्याबोळक्यांनीं भातुकलींतील संसार मांडावेत त्याच कोटींतील अज्ञानी समाजाचे हे शैशवावस्थें-तील " भ्रांत कल्पनेचे खेळ आहेत " आणि " शुद्ध शास्त्रज्ञान जसजसें वाढत जाईल तसतसा ह्याचा लोप कालांतरानें झालाच पाहिजे, " असें भाकीत त्यांनीं वर्तवून ठेविलें आहे. अर्थात् व्यक्तीचें शैशव हें जरी आठ दहा वर्षांच्या अल्पावधींत संपणारें असलें तरी कोट्यवधि अज्ञ लोकांनीं बनलेल्या समाजाचें शैशव हेंहि त्याच्या भव्यतेला साजेसेंच प्रदीर्घ असलें तर त्यांत आश्चर्य कसलें ? तेव्हां अद्वैतवेदान्ताच्या अत्युच्च शिखरावर सारा समाज आरूढ होण्यासाठीं लागणारी प्रौढता येण्याला अजून किती कालावधि लागेल, हें ' युगें अठ्ठावीस ' विटेवर उभें राहून तटस्थतेनें जगरहाटी पाहणाऱ्या पांडुरंगालाच माहीत ! तात्पर्य, मंदिराची आवश्यकता भासणार नाहीं अशी उन्नत समाजस्थिति दृष्टीच्या कक्षेंत तरी अजून येत नाहीं.

रशियासारख्या साम्यवादी देशानें मंदिरसंस्थेचें उच्चाटन करण्याचा जो प्रयत्न केला तो सफल होऊं शकला नाहीं. तेथील लाल जडवादी क्रांतीपूर्वी त्या देशांत ४६००० प्रार्थनामंदिरें व ५०००० धर्मोपदेशक होते. त्यांची संख्या १९३५ मध्यें अनुक्रमें ४ सहस्र व ५ सहस्र इतकी रोडावली. पण दुसऱ्या महायुद्धाच्या महाभयंकर राष्ट्रीय आपत्तींत जनसाधारणाचा स्वाभिमान,

धैर्य व उत्साह टिकवून धरण्यासाठीं प्रार्थनामंदिरांचीं दारें पुन्हां खोलावीं लागलीं. हें तेथील राजसत्तेनें कां केलें, ह्याचें इंगीत स्पष्ट करतांना जॉन गुंथर 'इन्साईड रशिया टुडे' या ग्रंथांत म्हणतो कीं, "साम्यवादी राजसत्ता असूनहि 'जनतेंतील अनेक लोक अजून पराकोटीचे धर्मनिष्ठ असल्यानें त्यांच्यावरील आपली पकड दृढ करण्यासाठीं' त्यांना हें करावें लागलें." [....... to extend its hold on the people, many of whom are still profoundly religious.] अशा धोरणाचा परिणाम असा झाला कीं, १९५६ मध्यें तेथील प्रार्थनामंदिरांची संख्या २० सहस्र व पाद्री ३५ सहस्र असल्याचें आढळून आलें. इतकेंच नव्हे, तर दुसऱ्या महायुद्धांतील व त्यानंतरच्या काळांतील अनुभव ध्यानीं घेऊन रशियाचा सर्वाधिकारी क्रुश्चेव एका पत्रकांत निःसंदिग्धपणें म्हणतो कीं, "......plenty of good sound, religious belivers are also good, sound Russian patriots, & should not be attacked on religious grounds." म्हणजे "किती तरी चांगले व कट्टर धार्मिक प्रवृत्तीचे लोक हे उत्तम व कट्टर असे रशियन देशभक्त आहेत. आणि म्हणून, धर्मनिष्ठ आहेत ह्यासाठीं त्यांच्यावर आघात होतां कामा नयेत." (पृष्ठ २६७)

क्रांतीनंतरच्या काळांतच रशियांत लेनिन व कांहीं काळ स्टालिन ह्या रूपानें नवे देव उदयाला येऊं लागले व त्यांचे देव्हारे पुजण्यांत लोक दंग झाले. लेनिन व स्टालिन ह्यांचीं कलेवरें पाहण्यासाठीं लक्षावधि रशियनांच्या जत्रा कशा भरतात व मंदिरांप्रमाणेंच त्या दोघांच्या समाध्यांवर फुलांच्या राशी कशा अर्पण केल्या जातात, हें पाहिलें म्हणजे जुन्या देवांना खो देऊन नवे देव त्यांची जागा घेऊं लागतात, असें म्हणणें क्रमप्राप्त होतें. आज तिबेट गिळंकृत करून बसलेल्या साम्यवादी चिनी लोकांनीं दयाघन भगवान् बुद्धाच्या अनेक मूर्ति वितळवून त्या धातूपासून बंदुकीच्या गोळ्या कशा बनविल्या व त्या गोळ्यांनींच तिबेटी लोकांची त्यांनीं कशी ससेहोलपट केली, ह्याच्या हृदयविदारक कथा आपण ऐकत आहोंत! पण उद्यां भगवान् बुद्धाच्या जागीं कोणा चाऊमावोच्या मूर्ति प्रचलित होणारच नाहींत, असें सांगणें कठीण आहे. तेव्हां अद्वैत-वेदान्ताच्या दृष्टीनें मनुष्यजातीनें अजून शैशवांतील भातुकलींत रमण्याचा काळ खरें पाहतां ओलांडलेला नसल्यानें मूर्तिपूजेचें कार्य अजून संपलें असें

म्हणतां येणार नाहीं.

रशिया–चीनचीच गोष्ट कशाला ? आपल्या देशांत तरी दुसरें काय दिसतें ? पं. जवाहरलाल नेहरू व आचार्य विनोबा भावे ह्यांच्यासारखी मंडळी ‘ पूजामय ’ भक्तिमार्गापासून ‘ सेवामय ’ कर्ममार्गाकडे लोकांना खेचण्याचा कालानुरूप प्रयत्न करीत आहेत. “ मनुष्यमात्राच्या हितासाठीं जेथें मनुष्य कष्ट करीत असेल तें स्थान म्हणजे सर्वश्रेष्ठ मंदिर होय. ” (The biggest temple is the place where man works for the good of mankind.) अशी नव्या मंदिराची कल्पना पुढें ठेवून भाकडा, हिराकूड व हेळवाक येथें नवीं तीर्थक्षेत्रें व यात्रास्थानें निर्माण होत असल्याची ग्वाही पंडित नेहरू ह्यांनीं दिली आहे. आचार्य विनोबा सांगतात कीं, “ पुष्कळ वेळां असें दिसून येतें कीं, हिंदुस्थानचा भक्तिमार्ग सेवापरायण नाहीं. आजपर्यंत तो मूर्ति आणि ध्यानधारणा होता. परंतु आतां वेळ आली आहे कीं, भक्तिमार्गाला आपलें मुख्य स्वरूप सेवापरायणता हेंच करावें लागेल. ” वास्तविक गेल्या शतकांतील लोकहितवादी व श्रीरामकृष्ण परमहंस ह्यांच्याहि प्रतिपादनाचा कल सेवाधर्माकडेच झुकता असलेला दिसतो. लोकहितवादी म्हणत कीं, “ कांहीं देणें असल्यास देवास देऊं नये; कारण देव उणा व उघडा नाहीं. यास्तव मनुष्यास दिलें तर देवास दिल्याहून अधिक आहे. ” भगवान् श्रीरामकृष्ण व त्यांचे शिष्योत्तम स्वामी विवेकानंद ह्यांनींहि जनता हाच जनार्दन समजून नराच्या रूपानेंच वावरणाऱ्या ‘ दरिद्र-नारायणा ’ ची मनोभावें सेवा करण्याचा उपदेश केलेला आहे. कविश्रेष्ठ रवीन्द्रनाथ ठाकूर आपल्या सुविख्यात ‘ गीतांजलीं ’त म्हणतात कीं, “ देव देवळांतील अंधाऱ्या गाभाऱ्यांत नसून तो खडकाळ भूमि नांगरणाऱ्या शेतकऱ्यांत व रस्त्यासाठीं खडी फोडणाऱ्या मजुरांत उन्हातान्हांत वावरत आहे; तेव्हां हें तुझें भजनपूजन नि नामस्मरण थांबवून व सोवळें बाजूला ठेवून त्याच्या समवेत धुळकट भूमींत कष्ट कर. ” सहस्रावधि देशबांधवांची विपन्नावस्था दिसत असतांहि ती दूर करण्यासाठीं प्रयत्न न करतां, ध्यान-धारणेंत निमग्न असणाऱ्यांना लोकमान्य टिळकांनीं ‘ ढोंगी ’ म्हणून संबोधिलें आहे. पण अशा पुरुषांनीं विमल सेवेचा, निःस्वार्थ कर्ममार्गाचा व कर्तव्य-परायणतेचा केलेला हा उपदेश बुद्धीनें आकलन करणारा व तो व्यवहारांत

आचरून दाखवणारा वर्ग अजूनहि क्षितिजावर डोकावतांना विशेषसा दिसत नाहीं. स्वतःचा स्वार्थ धडपणानें व स्वकष्टानें साधण्याची उभारी व पात्रता असण्याची जेथें मारमार तेथें जनता-जनार्दनाच्या निःस्वार्थ सेवेची दीक्षा घेतलेले लोक पुढें आलेले कोठून दिसणार ? उलट महात्मा गांधी व महामात्य पंडित नेहरू ह्या दोघांवरहि त्यांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या भगतांनीं त्यांच्या प्रत्यक्ष मूर्ति बसवून, तिन्ही त्रिकाळ पूजा नि धूपारती चालू केल्याच्या सुरस वार्ता वाचण्याचा दुर्धर प्रसंग ओढवला, हें कटु सत्य आहे ! एकूण मनुष्य-स्वभाव इथून तिथून सारखाच असतो ! ! थोडक्यांत म्हणजे आजच्या मनुष्याच्या मनःस्थितीचा नीट विचार करतां मंदिरसंस्थेला अजून प्रदीर्घ भविष्यकाळ आहे, असेंच म्हणावें लागतें. ही वस्तुस्थिति ध्यानीं घेऊन हें समाजावर संस्कार करण्याचें केंद्र वा साधन डोळसपणानें हाताळलें गेलें तर क्रमाक्रमानें समाजाच्या भक्तीला ज्ञानाची बैठक आणून देतां येईल आणि मूर्तिपूजेच्या रूपानें आज प्रकट होणाऱ्या भक्तीला समाजाच्या निःस्वार्थ सेवेचें स्वरूप देणेंहि शक्य होईल. पण त्यासाठीं देशकालपरिस्थितीचें योग्य ज्ञान असणाऱ्या लोकांनीं मंदिरांतील प्रत्येक गोष्ट निर्दोष बनविण्यासाठीं पुढाकार घेतला पाहिजे. असें करतांना जुनें तें सोनें असा आग्रह जसा नसावा, त्याचप्रमाणें नवें तेवढें चांगलें अशी धारणा असणेंहि योग्य नाहीं. लोकांच्या भावभावना विशुद्ध व्हाव्यात, दिवसेंदिवस त्यांच्या अंतःकरणांत जीवनोद्देशाचा उलगडा होत जावा व त्याचें प्रत्यंतर त्यांच्या दैनंदिन सहकारयुक्त व सेवामय व्यवहारांतून आपणांस मिळावें, ह्या दृष्टीनें मंदिरांतील सर्व गोष्टींची व उपक्रमांची मांडणी केली पाहिजे.

असें करतांना मंदिरांतील सामान्य वाटणाऱ्या उपचारांतहि, शास्त्रीय दृष्टीनें ज्या गोष्टी समाजधारणेला व चित्तशुद्धीला विशेष पोषक ठरल्या असतील, त्यांचें रहस्य लोकांसमोर विशद करून मांडण्याचा उपक्रम झाला पाहिजे. उदाहरणच सांगावयाचें झालें तर शंखध्वनि व घंटानाद ह्यांचें देतां येईल. एका सेकंदाला २७ घनफूट वायुशक्तीच्या वेगानें फुंकलेल्या शंखानें १२०० फुटांतील रोगजंतू मरतात व २६०० फुटांतील रोगजंतू मूर्च्छित होतात, असा निष्कर्ष १९२८ मध्यें बर्लिन विद्यापीठानें संमत केलेल्या प्रबंधांत प्रसिद्ध झालेला आहे. तसेंच घंटेच्या ठोक्यानें उत्पन्न होणाऱ्या लहरींचें विद्युन्मापक

यंत्रानें परीक्षण केल्यावर १३ ते ३६ इतकी अश्वशक्ति त्या लहरींत असते व त्या लहरींनीं माणसाचा शारीरिक शीण कमी होऊन मानसिक शक्ति विकसित होतात, असें परीक्षण न्यूयॉर्कचे प्रा. पी. डब्ल्यू. रॅले ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. मंदिरांतील चरणामृत, धूप-दीप आदि गोष्टींचे मानवी शरीरावर व मनावर होणारे इष्ट परिणाम अभ्यासण्याकडेहि शास्त्रज्ञांचें लक्ष वेधूं लागलें आहे, ही समाधानाची गोष्ट होय. तुलसी, बेल, केशर, मंत्रोपचार, गंगाजल, तांब्याचें भांडें आदि गोष्टींच्या संपर्कानें चरणामृतांत मकरध्वजाहून अधिक पुष्टिदायक द्रव्यें आढळतात, असेंहि अभिमत एकदां वाचनांत आलें होतें. शास्त्रीय दृष्टीनें मंदिरांतील उपचारांचा व वातावरणाचा, सर्व लोकांना सहज समजेल असा उलगडा झाल्यास तो केव्हांहि हितकर ठरेल. नुसत्या भाविकतेनें केलेले उपचारहि सात्त्विकतेला परिपुष्ट करीत असतात. त्याच्या जोडीनें शास्त्रीय दृष्टिकोनांतून त्यांचें रहस्य मांडलें गेल्यास ‘ अधिकस्याधिकं फलम् ’ असाच अनुभव येईल.

मंदिरांतील आणखीहि एक-दोन गोष्टींचा अधिक अभ्यास झाला पाहिजे. मंत्रोच्चारानें मूर्तींत प्राणप्रतिष्ठा होते व एखाद्या प्राणप्रतिष्ठित मूर्तीच्या दर्शनानें होणारे लाभ ध्यानीं घेऊन ‘ हें दैवत जागृत आहे ’ असें म्हटलें जातें. अनन्य भक्तांच्या पुण्यमय तपश्चर्येतून हें चैतन्य जागृत होतें व पापी अभक्तांच्या संपर्कानें ह्या जागृत शक्तींत न्यूनता येते. म्हणूनच सद्भक्तांच्या संजीवक मंत्रानें जागृत केलेल्या प्रतिमेची शुचिता व चैतन्य टिकविण्यासाठीं मूर्तीला कोणी व कोणत्या स्थितींत स्पर्श करावा व कोणी दुरूनच दर्शन घ्यावें, ह्याचे नियम ठरविण्यांत आले असल्याचें सांगण्यांत येतें. लोकशाहीनें समान संधीचें तत्त्व नसांनसांतून खेळूं लागलेल्या समाजाला ह्या गोष्टीचा शास्त्रीय बोध करून दिल्यावांचून मंदिरांतील ‘ पक्षपात ’ मुळींच रुचणार नाहीं, असें स्पष्ट दिसतें. दर्शनास आलेल्या केंद्रीय सरकारांतील मंत्र्याच्या हातांत, सोवळें नेसलेल्या पुजाऱ्यानें गाभाऱ्यांतून दुरूनच प्रसाद दिला. ह्या घटनेनें १९६० च्या जानेवारींत मद्रास प्रांतांत मोठेंच वादंग माजलें होतें, तें अशा असंतोषांतूनच. अर्थात् ह्या ठिकाणीं माणसाला ‘ अज्ञेय ’ असणाऱ्या क्षेत्रांतील जटिल प्रश्नाची उकल करून त्याचें समाधान करणें, ही गोष्ट अत्यंत अवघड असली तरी कांहीं प्रमाणांत आवश्यक आहे. दृष्टिगोचर नसणाऱ्या सूक्ष्म अणूची सुप्त शक्ति

जागृत करण्याची प्रक्रिया, हाताच्या बोटांवर मोजतां येईल इतक्याच शास्त्रज्ञांना नीट अवगत आहे. पण त्या अद्‌भुत प्रक्रियेची सर्वसामान्य माणसाला ढोबळ मानानें कल्पना आणून देण्याचा जसा प्रयत्न केला जातो, तसा प्रयत्न प्राणप्रतिष्ठेचें रहस्य सुलभ करून सांगण्यासाठीं मंत्रशास्त्रांतील जाणकारांनीं केला पाहिजे. तसें घडल्यास शास्त्रानें श्रद्धा बळकट केली असाच अनुभव येईल.

मंत्रशास्त्राच्या दृष्टीनें प्राणप्रतिष्ठेचा उलगडा जसा योजनापूर्वक केला जावा, त्याचप्रमाणें एक अमोलिक पारंपरिक ठेवा म्हणून, आपल्या भारतीय मंदिरांच्या शिल्पाची जपणूकहि प्रयत्नपूर्वक केली जावी. शिल्प हा समाजाच्या आंतरिक ऐश्वर्याचा बाह्याविष्कार असतो. त्यांतून त्या समाजाची आकांक्षा, प्रतिभा आणि सौंदर्यदृष्टि ह्यांची कल्पना येऊं शकते. दुर्दैवानें मध्यंतरींच्या पारतंत्र्याच्या काळांत आपल्या समाजाला आत्मविश्वासहीनतेनें झपाटलें व तो परानुकरणानें उसनें जीवन जगण्यांत धन्यता मानूं लागला. त्याचा परिणाम म्हणजे आपल्या समाज-जीवनांतील स्वाभाविकता वा सहजता ह्यांना उतरती कळा लागली. शिल्पाच्या दृष्टीनें पाहूं जातां राहत्या घरांचें शिल्प जवळ जवळ पालटलें आहे व त्याचें स्वरूप पाश्चात्त्य वळणाचें होण्याच्या मार्गावर आहे. पेशवेकाळांतील चौसोपी भव्य वाडे अजून कोठें कोठें आढळत असले, तरी थोड्याच काळांत चौसोपी वाडा ही एक प्रदर्शनीय गोष्ट ठरेल. सुदैवानें अनेक प्राचीन मंदिरांचें दगडी शिल्प आघात व उपेक्षा ह्यांना पचवून अजूनपर्यंत टिकून राहिलें आहे. पण कालांतरानें त्यांचीहि पडझड होणें हें निसर्गसिद्ध आहे. ह्यासाठीं आपल्या मंदिरांच्या शिल्पाचा पाश्चात्त्यांनीं जो अभ्यास केला आहे त्याहून सखोल अभ्यास स्वतंत्रपणें झाला पाहिजे व त्यांत नवनवीन सुधारणा करण्याचा व भर घालण्याचा हव्यास आतां स्वातंत्र्यांत तरी अवश्य दिसला पाहिजे. घरांचें शिल्प जरी आमूलाग्र पालटत असलें तरी सोमनाथासारख्या अगदीं नवीन बांधलेल्या मंदिरांत भारतीय वळण टिकविण्याकडे शिल्पकारांचा कल दिसतो, ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. ज्याप्रमाणें भाषा, वेष व चालीरीति ह्यांत भारतीयता ओतप्रोत भरून राहिलेली असावी, तशीच ती आपल्या देवळांच्या व घरांच्या शिल्पांतहि असावी. इतरांच्या शिल्पकलांतील कांहीं उपयुक्त गोष्टींची जोड आपल्या शिल्पाला मिळवून देण्यांत वावगें नाहीं. पण आपल्या पूर्वजांनीं विकसित केलेल्या शिल्पशास्त्रांतील टिकाऊ व सौंदर्यपूर्ण

वैशिष्ट्यांवर उपेक्षेची तिलांजलि सोडून केलेली परक्यांची उसनवारी ही मात्र भ्रष्ट व आत्मनाशक म्हणून त्याज्यच समजली पाहिजे. ह्याच दृष्टीनें आपल्या शिल्पकलेची मध्यंतरीं खंडित होऊं लागलेली परंपरा पुन्हा प्रभावानें प्रचलित करण्यासाठीं आत्मीयतेनें प्रयत्न झाले पाहिजेत. असो.

मंदिरांतर्गत मंत्रशास्त्र व शिल्पशास्त्र यासंबंधांत प्रयत्नांची काय दिशा असावी, हें आपण पाहिलें. आतां मंदिरसंस्थेवर कोणाचें नियंत्रण असावें, ह्याचाहि विचार करणें क्रमप्राप्त आहे. सध्यांच्या सरकारी दंडकानुसार मंदिरांतील धनाच्या विनियोगावर राजसत्तेचें कांहीं प्रमाणांत नियंत्रण आलें आहे. त्यांत वावगें असें कांहीं नाहीं. पण सरकारी नियंत्रणाचा चंचुप्रवेश हा क्रमाक्रमानें मुसलप्रवेश ठरूं नये व मंदिरांच्या सर्व नाडया राजसत्तेच्या हातांत जाऊं नयेत, म्हणून समाजानें दक्ष असलें पाहिजे. एक तर समाजांतील सर्व क्षेत्रें राज्यशासनाच्या मुठींत असणें युक्त व इष्ट नसतें व दुसरें असें कीं, मंदिरासारख्या संस्कार करणाऱ्या संस्था तर राजकीय पक्षांच्या लाथाळीपासून अलिप्त राहतील तितकें चांगलें असतें. केरळ प्रांतामध्यें मंदिरांच्या सार्वजनिक निधींवर व मालमत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठीं 'देवस्वम् बोर्ड' स्थापन केलेलें आहे. त्या प्रातांत कम्युनिस्ट पक्ष मध्यंतरीं अधिकारावर येतांच, त्या नियंत्रक मंडळावर त्यांनीं आपल्या हस्तकांची नियुक्ति केली व त्या मंडळाच्या कक्षेंत येणाऱ्या लोकांना त्यांनीं आपल्या पक्षाच्या प्रचाराला जुंपलें. त्यांची त्या प्रांतांतील राजवट उलथून पाडण्यासाठीं जो सार्वत्रिक उठाव झाला, त्याला ह्या देवस्वम् बोर्डांतील त्यांच्या पक्षपाती कारवायाच कारणीभूत झालेल्या आहेत, हें आतां स्पष्ट झालें आहे. अशा क्षणाक्षणाला हेलकावे खाणाऱ्या राजकारणाच्या ओटींत मंदिरांची व्यवस्था टाकण्याचा अविवेक ह्यासाठींच करून चालणार नाहीं. पंजाबांतील 'गुरुद्वारा प्रबंधक समिती'चा अनुभवहि ह्याहून निराळा नाहीं. सर्व ठिकाणच्या गुरुद्वारांची व्यवस्था पाहण्यासाठीं सरकारच्या निर्बंधानें निर्माण झालेल्या त्या समितीनें तिच्या हातीं आलेल्या लक्षावधि रुपयांतून व तिच्या नियंत्रणाखालीं काम करणाऱ्या सहस्रावधि कर्मचाऱ्यांकडून 'पंजाबी सुभा' हा सवता सुभा निर्माण करण्याचें राजकारण उभें केलें आणि त्यांतून आधींच दुभंगलेला पंजाब आणखी दुभंगून टाकण्याचा तिनें अट्टाहास चालविला आहे. पंजाबांतील शीखांचे गुरुद्वारे हे आज उघड

उघड राजकीय प्रचाराचे प्रक्षोभक अड्डे बनले आहेत, ही वस्तुस्थिति विसरून चालणार नाहीं. मंदिरांतील धनाचा अपव्यय व अपहार होऊं नये म्हणून राजशासनाची करडी दृष्टि असणें हितकर असलें तरी त्यामुळें वरीलप्रमाणें मंदिरसंस्था हीच राजकीय पुढाऱ्यांच्या हातांतील बाहुलें बनूं देणें हें सर्वथैव त्याज्य ! ह्यासाठीं लोकांनीं पुढाकार घेऊन ठिकठिकाणच्या मंदिरांतील व्यवस्था स्वतः होऊन आदर्श व चोख ठेवण्याचा चंग बांधावा आणि सरकारी व राजकीय उपसर्ग मंदिरांतील शांत, प्रसन्न व पवित्र वातावरणाला पोहोंचणार नाहीं अशी दक्षता घ्यावी. नाहीं तर लोकशाहीचा मंत्रोच्चार करीत झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतींतून नेपोलियनची एकमुखी राजसत्ता बोकांडी बसावी त्याप्रमाणें मंदिरांच्या निधिसंरक्षणाची घोषणा करून उठलेल्या सरकारकडून तेथील व्यवहाराचीं सर्व सूत्रें पुढेंमागें बळकाविलीं जाणें हेंहि अशक्य नाहीं. हिंदुस्थानांतील प्रमुख मंदिरांची संपत्ति साधारणतः तीनशें कोटींच्या घरांत जाईल. डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांच्या नेमस्त तर्काप्रमाणें ती १ अब्ज रुपयांहून तरी कमी नाहीं. ह्या संपत्तींतून रुग्णालयें, शाळा, वाचनालयें इत्यादि समाजोपयोगी कार्यें करावींत असा सूर आजकाल उमटूं लागला आहे व तोच सूर प्रभावी झाल्यास आजच्या लोकशाहींत तसें घडणें अशक्य नाहीं. पण ह्यावर कोणी असें सहज विचारील कीं, मंदिरांचा पैसा रुग्णालयें, शाळा आदि संस्थांसाठीं वापरला तर तो ‘ अपव्यय ’ कसा ? वरवर पाहूं जातां त्याला अपव्यय म्हणतां येणार नाहीं. पंण मंदिरसंस्थेकडून समाजधारणेसाठीं जें कार्य व्हावें असें अभिप्रेत आहे त्याकडे दुर्लक्ष करून अन्य गोष्टींवर जर मंदिरांच्या संपत्तीचा व्यय केला तर तो अयोग्यच म्हटला पाहिजे. एखाद्यानें औषधासाठीं मिळालेला पैसा औषध घेण्याची आवश्यकता असतांनाहि जर छानछोकीच्या कपड्यांसाठीं खर्च केला तर तो सद्व्यय कसा म्हणतां येईल ? सद्भाव व सात्त्विकता जागविणारें वातावरण व विचार देऊन व्यक्तीव्यक्तीला आत्मोन्नतीला उपकारक असा सदाचार करण्यास उद्युक्त करणें हेंच मंदिराचें नेमकें उद्दिष्ट. त्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठीं मानवी जीवनाचा स्पष्ट उलगडा करून देणाऱ्या वेदान्ततत्त्वज्ञानाची आणि भक्ति, ज्ञान, कर्म ह्या त्रिविध मार्गांची शिकवण मंदिरांच्या प्राकारांत योजनापूर्वक दिली पाहिजे. मंदिरांचा पैसा पडून राहाणें वा तेथील कारभाऱ्यांनीं त्याची उधळपट्टी करणें ह्या दोन्ही गोष्टी टाळून प्रमुख तीर्थक्षेत्रें हीं धार्मिक शिक्षणाचीं

प्रभावी केंद्रें बनविलीं पाहिजेत. तरच मंदिरांच्या निधीचा सद्व्यय झाला असें म्हणतां येईल. दुसरें असें कीं, रुग्णालयें, शाळा इत्यादि संस्थांसाठीं प्रतिवर्षी अक्षरशः कोट्यवधि रुपये खर्च केले जात असून त्यासाठीं अमेरिका, इंग्लंड, जर्मनी वगैरे देश व युनेस्कोसारख्या आंतरराष्ट्रीय संस्था ह्यांच्याकडून भारताला अमाप संपत्ति अनुदान म्हणून मिळत आहे. अशा स्थितींत धार्मिक उपेक्षित कार्यांच्या हातांत मंदिरांची तुटपुंजी संपत्तीहि जर दिली नाहीं तर तो धडधडीत अन्यायच ठरेल. मनुष्याला संयमी व सत्प्रवृत्त बनविण्याचें सामर्थ्य धार्मिक शिक्षणांत आहे व नेमकें त्याच शिक्षणाला निधर्मीपणाच्या विकृत धोरणानुसार सरकारनें वाळीत टाकलें आहे ! म्हणूनच मंदिरांचे निधि हे तेथील वातावरण प्रभावी करण्याच्या उपक्रमासाठीं व धार्मिक शिक्षणाच्या प्रसारासाठीं खर्च होतील अशी दक्षता घेतली पाहिजे. मंदिरांतील उर्वरित निधींतून धार्मिक शिक्षणासाठीं पाठशाळांची उभारणी झाली पाहिजे. उपेक्षित मंदिरांचा योगक्षेम, शिल्प-गायन-नृत्य आदि कलांना प्रोत्साहन, धार्मिक वाङ्मयाचें प्रकाशन, यात्रेकरूंच्या वाढत्या सुखसोयी, पुष्पवाटिका व गोशाळा ह्यांची जोपासना अशा गोष्टींची उभारणी त्या निधींतून क्रमशः केली पाहिजे. विशेषतः जाणते, सुशील व संतोषी पुजारी आणि कर्तव्यदक्ष व निःस्वार्थी संचालक व सेवक उभे करण्याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. कांहींच्या मतें मंदिरांच्या पैशांतून अनाथालयें, कुष्ठरोगाश्रम, अ गालयें, रुग्णालयें काढावींत व जीवनोपयोगी शिक्षणासाठीं प्रशाळा नि महाविद्यालयें खोलावींत. खरें पाहिलें तर 'पूर्तांत' ह्या गोष्टींचा अंतर्भाव होत असल्यानें अशा गोष्टींना कोणाचा तत्त्वतः विरोध असण्याचें कारण नाहीं. पण मंदिरांच्या दृष्टीनें वर उल्लेखिलेल्या उपक्रमांना प्राधान्य देऊन निधीचा विनियोग केल्यावर जर पैसे उरतील तर ते अशा गोष्टींवर सुखेनैव खर्च करावेत; त्याला मुळींच प्रत्यवाय नसावा. अस्तु.

मंदिरांशीं राजसत्ता व राजकीय पक्ष ह्यांचे नेमके संबंध कसे असावेत हें आपण पाहिलें. आतां 'हिंदु' ह्या राष्ट्रीय व सहिष्णु धर्माच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व धार्मिक पंथोपपंथांचा मंदिरांच्या दृष्टीनें परस्पर संबंध कसा असावा हें पाहणें अत्यावश्यक आहे. वैदिक संप्रदायी, आर्यसमाजी, शीख, जैन, बौद्ध व समंजसपणानें आपणांजवळ येऊं लागलेले पारशी अशा सर्वांचा विचार येथें कर्तव्य आहे. वैदिकांतील कट्टर अद्वैतवादी, आर्यसमाजी व शीख ह्या तिघांना

मूर्तिपूजा संमत नाहीं. ह्यांतील अद्वैतवादी हा सुदैवानें सहसा असहिष्णु असत नाहीं. श्रीतुकाराममहाराजांनीं म्हटल्याप्रमाणें ' दोन्ही टिपरीं एकचि नाद। सगुण निर्गुण नाहीं भेद रे ॥ ' असें मधुर सामंजस्य त्याच्या व्यवहारांत असतें. आद्य श्रीशंकराचार्यांसारख्या कट्टर अद्वैतवेदान्ती जगद्‌गुरूंचीं ' दामोदर गुणमन्दिर सुन्दर वदनारविन्द गोविंद ' अशा धर्तीचीं विविध देवतांचीं भक्तिरसपूर्ण प्रासादिक स्तोत्रें ह्या विधानाची सत्यता पटविण्यास समर्थ आहेत. आर्यसमाजाचा मूर्तिपूजेसंबंधींचा दृष्टिकोनहि क्रमाक्रमानें निवळत चालला असून त्यांतील कांहीं जण सत्संगाप्रमाणेंच मंदिरांतहि जाऊं लागले आहेत, तर कांहीं जणांच्या घरांत पुन्हां देव्हारे दिसूं लागले आहेत. पंजाबी सुभ्याच्या राजकीय आंदोलनाचें वारें शीख संप्रदायांत शिरल्यापासून त्यांच्यामध्यें ' आपण हिंदु नाहीं ' असें अट्टाहासानें सांगण्याची वृत्ति दिवसेंदिवस बळावली. नाहीं तर दोन भावांत एक शंकरोपासक व दुसरा वैष्णव असूनहि त्या दोघांचा घरांतील व्यवहार हा अत्यंत प्रेमाचा असतो, त्याप्रमाणें एकाच कुटुंबांत वैदिक, आर्यसमाजी व शीख असूनहि त्यांचें चांगलेंच रहस्य असे. एवढेंच नव्हे तर पंजाबमधील अनेक गुरुद्वारांच्या प्राकारांतच मोठ्या प्रतिष्ठेनें हिंदूंच्या मूर्तींचें भजन-पूजन चाले. ही एकात्मता किंवा हा सलोखा अगदीं कालपरवांपर्यंत टिकून होता. पण ' पंजाबी सुभ्या ' चें स्वप्न शिखांना दिसूं लागल्यापासून दुर्दैवानें द्वैत वाढूं लागलें व त्याचा परिणाम म्हणजे गुरुद्वारांतील मूर्ति काढून टाकण्यांत आल्या. यापुढील कांहीं काळ तरी तिकडील वातावरण असेंच गढूळ राहणार असा एकूण रंग आहे. पण पंजाबी सुभ्याची बावटळ थांबली म्हणजे शीखांचें स्वाभाविक हिंदुपण हें त्यांच्यांतील दडलेली सहिष्णुता लवकरच प्रकट केल्यावांचून राहाणर नाहीं. आजहि पंजाबांतील लक्षावधि वैदिक संप्रदायी हिंदु हे गुरुद्वारांत भक्तिभावनेनें जातात व नवरात्रांतील रामलीलांत लक्षावधि शीख लोक सहकुटुंब-सहपरिवार येऊन मोठ्या प्रेमानें रंगून जातात. ही स्थिति ध्यानीं घेतां शिखांमध्यें आज दिसणारी तुटक वृत्ति उद्यां राहणार नाहीं असा विश्वास वाटतो. तेव्हां प्रामुख्यानें मूर्तिपूजा न मानणाऱ्या वर्गांची स्थिति ही आज तरी थोडीशी घोटाळ्याची आहे.

जैन व बौद्ध हे दोघेहि मूर्तिपूजक आहेत. पण इंग्रजांच्या कुटिल प्रचारानें व धोरणानें फुटीरतेचा कलि त्यांच्यांतहि शिरला आहे. ' आपण हिंदु नाहीं ' हें ठसवून देण्याचा त्यांच्याकडून होणारा प्रयत्न मनाला व्यथित करतो. जैन नि

सनातनी हिंदु ह्यांची परस्परांच्या मंदिरांत अगदीं सहजपणानें जा-ये असते आणि परस्परांच्या उत्सवांना सढळ हातानें वर्गणी देण्याइतकी आत्मीयता आढळून येते. देलवाडा, राणकपूर येथील जैन संप्रदायी मंदिरांतून वैदिक मूर्ति आहेत तर तिरुपतीच्या बालाजीपुढें दहा-दहा सहस्र रुपये दक्षिणा समर्पण करणारे जैन भक्त असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. पण कांहीं ठिकाणीं हीं शतकानुशतकाचीं नातीं दुरावत आहेत व 'आपण हिंदु नाहीं' हें आग्रहानें सांगण्याकडे जैनांतील नव्या पिढीचा ओढा दिसूं लागला आहे. बौद्ध संप्रदाय पांच-सहा हा वर्षांपूर्वीच डॉ. आंबेडकरांच्या प्रयत्नानें पुन्हां प्रचलित झाला. पण त्या संप्रदायाचा हा नवा अवतार वा प्रवेश म्हणजे हिंदूच्या विषमतेवर आधारलेल्या समाजरचनेवर बुद्धिपुरस्सर केलेला प्रहार होय. असें असल्यानें त्या दोघांतील संबंध अजून कडवट आहेत. तो कडवटपणा नाहींसा होण्यास कांहीं काळ जाऊं द्यावा लागेल व तेवढ्या काळांत जाणत्या समाजधुरीणांनीं परस्परांना जवळ आणण्याचे प्रयत्न करावे लागतील. त्यासंबंधींचा अधिक विचार आपण 'मंदिरप्रवेश' ह्या प्रकरणांत केलेलाच आहे. ह्या एकूण परीक्षणावरून, हिंदूंच्या विविध संप्रदायांतील मंदिरांविषयींचे परस्पर संबंध हे आज समाधानकारक नाहींत, असेंच मोठ्या दुःखानें म्हणावें लागेल. वास्तविक सामूहिक जीवनाला व सामाजिक एकात्मतेला उजळा देण्याचें काम मंदिरसंस्थेकडून झालें पाहिजे. त्यासाठीं भिन्न भिन्न संप्रदायांनीं परस्परांच्या मंदिरांत जाण्याला व तेथील उत्सवांत नि मिरवणुकांत भाग घेण्याला उत्साहानें चालना दिली पाहिजे. असें वारंवार एकत्र येऊन परस्परांच्या भक्तिभावनेंत समरस झाल्यानें सामाजिक ऐक्याला दृढता आणण्याचा कार्यभाग साधणार आहे. सुदैवानें श्रीकृष्णाष्टमी, महावीर-जयंती, बुद्धजयंती व गुरुनानकजयंती अशा उत्सवांसाठीं शाळांना व विविध कार्यालयांना सार्वजनिक सुट्टी मिळत असते. त्या सुट्ट्यांचा उपयोग त्या त्या दिवशींच्या उत्सवांत संमीलित होण्यासाठीं केला गेला, तर त्या सुट्ट्या देण्याचें सार्थक झाल्यासारखें होईल. आज राज्यशासन व समाजरचना ह्या दृष्टीनें संपूर्ण मतभिन्नता असणाऱ्या भिन्न प्रवृत्तींच्या राष्ट्रांचे परस्परांतील संबंध 'सहअस्तित्वा'वर आधारले जावेत, म्हणून प्रयत्न चालू आहेत. त्या प्रयत्नांना किती यश येईल हें सांगणें अत्यंत अवघड असलें, तरी सहस्रावधि वर्षांच्या एकाच उज्ज्वल इतिहासाचा राष्ट्रीय वारसा मिळालेल्या व माणसाला

देवत्वाकडे नेणाऱ्या आध्यात्मिक जीवनदृष्टीचा अंगीकार केलेल्या हिंदुराष्ट्रांतर्गत भिन्न भिन्न संप्रदायांना ' सह-अस्तित्व ' सहज जमावें. स्वतः जगावें व इतरांना आपल्या पद्धतीनें जगूं द्यावें, ही भारताच्या स्वभावाची विशेषता आहे. ही विशेषता असणाऱ्या समाजांतील विविध गटांना सह-अस्तित्व शक्य झालेंच पाहिजे. एवढेंच नव्हे तर सध्यां परस्परांतील दुरावलेले संबंध पुन्हां जुळवून घेऊन, उपासनांतील विविधतेंतहि उत्कट भक्तीनें आणि अद्वैतसिद्धान्तावरील निष्ठेनें कसें अलौकिक सामंजस्य राहूं शकतें, ह्याचा एक आदर्श असहिष्णु जगासमोर त्या संप्रदायांना ठेवतां यावा. उद्यांचा काळ ह्यासाठींच आहे अशा विश्वासानें सर्वांनीं प्रयत्न केले म्हणजे यश मुळींच दूर नाहीं.

हिंदुराष्ट्रांतर्गत संप्रदायांचा मंदिरसंस्थेंतील सहकार नि एकात्मता ह्यांचा विचार करतांना मीं वर ' पारशी ' समाजाचाहि सहेतुक उल्लेख केला आहे. मागें ' मंदिर-प्रवेश ' ह्या प्रकरणांत अनेक पारशी लोक आपल्या मंदिरांत येऊन किती भक्तिपूर्वक दर्शन घेतात ह्यासंबंधींची दिलेली माहिती सर्वांना आठवत असेलच. पण त्या ठिकाणीं ह्याहि गोष्टीचा उल्लेख करावा लागला होता कीं, पारश्यांच्या ' अग्यारी 'मध्यें हिंदूंना प्रवेश मिळत नाहीं. हिंदूंतील संप्रदायांनीं जसें परस्परांच्या मंदिरांत जाऊन गुण्यागोविन्दानें दर्शन घ्यावें त्याचप्रमाणें हिंदूंच्या मंदिरांत येणाऱ्या पारश्यांच्या अग्निशाळेंत शुचिर्भूतपणें जाण्याला व तेथील पवित्र हुताशनाला चंदनाच्या समिधा अर्पण करण्याला हिंदूंना मोकळीक मिळावी. परस्पर स्नेहांतून व सहकार्यांतून जागृत हिंदु व पारशी ह्यांनीं परस्परांत समरसून जाणें शक्य व इष्ट आहे. हिंदु व पारशी हे दोघेहि ' अग्निपूजक ' असल्यानें त्यांची ही उपासनेंतील जवळीक राष्ट्रीय जीवनालाहि अत्यंत पोषक ठरेल असा विश्वास वाटतो.

हें परस्परांतील सहकार्य व सामंजस्य वृद्धिंगत होण्यासाठीं, सर्व देवता म्हणजे ' जळ-स्थळ व्यापुनि दशांगुळें ' उरलेल्या परमात्म्याचींच रूपें आहेत, ही धारणा समाजाच्या सर्व थरांतून मुरविली पाहिजे. आज बऱ्याच जणांच्या कानावरून हा सिद्धान्त गेलेला असतो. पण तो अंगवळणीं पडलेला आढळत नाहीं. कोणत्याहि देवतेला केलेला नमस्कार हा एकाच परमेश्वराला पोहोंचतो, अशी जनमनांत जागती जाणीव राहूं लागली, तर विविध संप्रदायांच्या भिन्न देवता असतांहि, परस्परांच्या देवळांत व तेथील उत्सवांत रंगून जाण्यास मुळींच

अडचण पडणार नाहीं. तसेंच देव हा देवळांतील मूर्तींत तर आहेच; पण तो आपण असूं त्या त्या ठिकाणच्या अणुरेणूंतूनहि आपल्या बऱ्यावाईट सर्व लहानमोठ्या कर्मांची पाहणी करीत असतो व त्याची दृष्टि चुकवून आपणांला साऱ्या त्रिभुवनांत एकहि गोष्ट करतां येणें शक्य नसतें, ही वास्तव जाणीव सर्वांच्या अंतःकरणांत निर्माण करण्याची आवश्यकता आहे. ह्या जाणिवेचा जागता पहारा समाजाला सदाचारप्रवण करीत असतो. एकदां लोकमान्य टिळकांजवळ, त्यांच्यामागें असणाऱ्या सरकारी गुप्तचरांच्या ससेमिऱ्याचा विषय काढला जातांच ते म्हणाले कीं, "मला सरकारी हेरांची मुळींच भीति वाटत नाहीं. पण मला प्रत्यक्ष न दिसणारे, पण माझी शारीरिक व मानसिक प्रत्येक हालचाल डोळ्यांत तेल घालून पाहणारे असे जे सर्वत्र देवदूत आहेत, त्यांना मी भितों." हा आंतरिक पहारा जो तो आपल्या मनोमंदिरांत बसवून घेण्यास उद्युक्त होईल, असें प्रतिपादन कीर्तन-प्रवचनांतून सातत्यानें झालें पाहिजे हीच अपेक्षा आहे.

मंदिरांतील परिणामकारकता वाढविण्याच्या दृष्टीनें ज्या गोष्टींवर सर्वांचें लक्ष वेधलें पाहिजे अशा गोष्टी बहुतेक सांगून झाल्या. पण यापुढें आपण सर्वांनीं आपली गाडी विचाराशीं अडूं न देतां उमजलेल्या गोष्टी प्रत्यक्ष व्यवहारांत उतरवून दाखविण्याचा हव्यास धरला पाहिजे. चिकाटीनें व सातत्यानें केलेली कृति हीच नियतीचा प्रवाह पालटवूं शकते, अशा विश्वासानें प्रयत्न होणें आवश्यक आहे. पण मंदिरांच्या संस्कारक्षमतेची अशी जोपासना करूनहि केवळ भागणार नाहीं. तर त्यांच्या संरक्षणाचाहि विचार आपणांला तितक्याच दक्षतेनें करावा लागेल. कारण उत्साहानें उभारलेल्या भव्य-दिव्य शिल्पकृति संरक्षणाभावीं कशा धुळीला मिळतात, ह्याची करुण कथा आपला गेल्या कांहीं शतकांचा इतिहास अगदीं कंठरवानें सांगत नाहीं काय ?

☆ ☆ ☆

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम 36307 ........ वि: निबंध.
स्थान ...९७८... नों दि २०।७।६२

## प्रकरण १३

# मूर्तिभंजन केव्हां थांबेल ?

हिंदुस्थानांत बौद्ध, मुसल्मान व ख्रिश्चन ह्या तिघांनींहि हिंदूंचीं मंदिरें उद्ध्वस्त केलेलीं आहेत. त्या तिघांमध्यें बौद्धांनीं केलेल्या विनाशाच्या स्मृति अगदीं तुरळक प्रमाणांत इतिहासानें जतन करून ठेविल्या आहेत. प्रारंभीं एकूण देशांतच मंदिरें थोडीं असल्यानें त्यांना मूर्तिभंजनाला कमी अवसर होता; व पुढें तर मूर्तिपूजेच्या विरुद्ध असणाऱ्या बौद्धांनींच भगवान् बुद्धाला देव बनवून, त्याच्या ठिकठिकाणीं असंख्य मूर्ति स्थापन केल्यावर त्यांच्या मूर्तिभंजनाच्या वृत्तीला कांहीं प्रमाणांत आपोआपच आळा बसला. कारण वैदिकांच्या मूर्तींचें आपण उच्चाटन केलें तर त्याची प्रतिक्रिया म्हणून भगवान् बुद्धाच्या मूर्तींवर आघात होतील अशी भीति त्यांना वाटणें स्वाभाविक होतें. मात्र जेथें बौद्धांचा वरचष्मा होता तेथें हा उपद्रव झालेला आहे. सुविख्यात श्रीबदरीनारायणाच्या प्राचीन मूर्ति बौद्धांनीं तेथील नारदकुंडांत फेकून दिल्या होत्या. त्या मूर्ति पुढें जगद्गुरु आद्य श्रीशंकराचार्य ह्यांनीं पुन्हां बाहेर काढून त्यांची प्रस्थापना केली, असें इतिहास सांगतो. खिस्ताब्द ३० मध्यें शुंगकाल संपला. त्यानंतर साधारणतः अडीचशें वर्षें बौद्धधर्मीय कुषाण राजांनीं राज्य केलें. त्यांनीं शुंगकालीन वैदिकांनीं उभारलेलीं मंदिरें

नष्ट केलीं, असें निश्चित अनुमान 'भारतीय मूर्ति-कला' ह्या ग्रंथांत रामकृष्णदासांनीं काढलें आहे. त्यांनीं हा निष्कर्ष महाभारतांतील वनपर्वाच्या अध्याय १८८ व १९० मधील वर्णनांवरून काढलेला आहे.

पुढें कांहीं काळानें बौद्धमतानुयायांची पीछेहाट होऊन वैदिक धर्माचा इतका प्रभाव वाढला कीं, त्याच्यापुढें बौद्धांनीं केलेल्या मंदिर-विनाशाच्या कडवट स्मृति नष्ट व पुसट झाल्या. पण भारतांत पीछेहाट करावी लागली ह्याचा राग त्यांनीं भारताच्या सीमांपलीकडे-रशियापासून थेट जपानपर्यंत असणाऱ्या शिव, गणपति, देवी आदि देवतांच्या मंदिरांवर निश्चित काढलेला आहे. आपल्याकडे राक्षसाची शेंडी धरून 'ध्वजाग्रीं उचली बाहो' अशा पवित्र्यांत बलभीम हनुमंत त्याच्यावर उभा आहे, अशी मूर्ति प्रचलित आहे. त्याच धर्तीची गणपतीच्या उरावर बुद्धदेव बसला आहे अशी तिबेटांत उपलब्ध झालेली मूर्ति ही देखील वैदिकांना चिरडून टाकून आपण विजयी झालों आहोंत, ह्या प्रभुत्वाच्या भावनेंतूनच निर्माण झाली हें सांगावयास नकोच. अजूनहि भारताशेजारच्या देशांतून शिव, गणपति ह्यांच्या भंगलेल्या मूर्ति ठिकठिकाणीं आढळतात. त्यांतील कांहींचें भंजन नि उच्चाटन बौद्धांकडून झालेलें आहे.

पण पुढें इतरांच्या मूर्तींचा विनाश करण्याची विद्या 'गुरूची विद्या गुरूस फळली' ह्या न्यायानें बाहेरील बौद्धांना व त्यांच्यामागोमाग हिंदूंना चांगलीच फळलेली आहे. अरबस्थानांत ज्या वेळीं महंमद पैगंबराचा उदय झाला तेव्हां त्या भागांत बुद्धाचीं अनेक देवळें होतीं. वैदिक मतानुयायांचींहि मंदिरें तेथें नव्हतीं असें नाहीं; पण त्यांची संख्या अल्पच उरली होती. त्यामुळें त्या भागांत 'बुद्खाना' हा मंदिराला प्रतिशब्द म्हणून रूढ झालेला होता. 'बुद्ध' शब्दावरूनच आरबी व फारशी भाषेंत 'बुद्' हा मूर्तिवाचक शब्द बनलेला आहे, हें सांगावयास नकोच. हे ठायीं ठायीं असणारे बुद्खाने, केवळ निराकाराची उपासना संमत असणाऱ्या पैगंबराला व त्याच्या अनुयायांना सलूं लागले व त्यांनीं त्यांचा सरसकट विध्वंस आरंभिला. मूर्तिपूजा हें पाप मानणाऱ्या पैगंबरानुयायांना बौद्धिक प्रचारांतून आणि आपल्या चारित्र्यपूर्ण व सोज्ज्वल वर्तनांतून धर्मप्रसार करण्याची शिकवण मिळाली नव्हती. कदाचित् तेथील कंगाल व अडाणी लोकांचें हृदय वा मत-परिवर्तन अशा सोवळ्या मार्गानें

होणार नाहीं अशी निश्चिति वाटूनच, लोकांना खड्गाच्या धारेवर धरून आपल्या पंथांत ओढण्याचा सुलभ मार्ग सुचला असावा. झंझावाती झपाट्यानें बुद्धांच्या व इतर देवतांच्या मूर्तींचीं शकलें करून त्याच 'बुद्खान्यां'च्या मशिदी बनविण्यांत आल्या. असा मूर्तींचा नाश केल्यावर मंदिरांतील मखरें स्वाभाविकच रिकामी झालीं. तर तीं रितीं मखरें म्हणजेच आज मशिदींत समोर दिसणाऱ्या 'महिराबी' होत! दुसऱ्याचें कांहीं छिनून वा बळकावून घेतल्यावर त्याचा वापर करून मिरवण्यांत माणसाला एक प्रकारचा तामस आनंद होतो. अशा मनःस्थितींतूनच मंदिरांच्या मशिदी बनविण्यांत आल्या. इस्लामच्या आक्रमणांत मूर्तींची विलक्षण मोडतोड झाली. गांधार शिल्प-शैलीच्या सुमारें पन्नास सहस्र भग्न मूर्ति त्या भागांत इतस्ततः धूळ खात पडलेल्या आढळल्या आहेत! श्रीकृष्णाला त्याच्या अलौकिक पराक्रमांतून 'कंसांतक' हें सार्थ अभिधान प्राप्त झालें, पण ह्या आडमुठ्या मूर्तिभंजकांनीं स्वतःला 'बुद्-शिकन' अशी उपाधि स्वतःच लावून मिरवण्यास प्रारंभ केला! पण कोठें श्रीकृष्णाचें शौर्य नि कोठें या निर्बुद्धांचें क्रौर्य!

हीच मूर्तिभंजनाची लाट पुढें खैबर खिंडींतून आलेल्या मुसलमानी आक्रमणासमवेत भारतांत आली व तिनें हिंदूंच्या असंख्य मंदिरांतील पवित्र मूर्तींची विटंबना करून, जगांतील भव्य मंदिर-शिल्पाचा नाश केला. भारताच्या वायव्य सीमेकडील देशांच्या वाळवंटांत काय गुण आहे तो न कळे! पण नेमकी त्याच भागांत लाल टोळांची पैदास होते व त्याच्या येणाऱ्या धाडींनीं सुजला, व सस्यशामला अशा भारतभूमीवरील सोनेरी कणसांनीं सजलेल्या शेतांचा नि फळांफुलांनीं ओथंबलेल्या उद्यानांचा अक्षरशः सत्यनाश होतो! असाच प्रकार रुक्ष व वैराण वाळवंटांतून आलेल्या आक्रमकांकडून भारताच्या सांस्कृतिक क्षेत्रांत नेमका घडलेला आहे!

मुसलमानांप्रमाणेंच ख्रिश्चनांनींहि मंदिरांचा विध्वंस केला. मात्र त्याचें प्रमाण मुसल्मानांच्या तुलनेनें बरेंच कमी ठरेल. असें प्रमाण अल्प असण्याचें कारण त्यांच्या आक्रमणाला पायबंद घालणाऱ्या शक्ति वेळींच व बऱ्याच प्रमाणांत उभ्या राहिल्या हें होय. ख्रिश्चनांनीं विशेषतः गोमंतक, केरळ व कोंकण अशा समुद्रकिनारपट्टींत अनन्वित अत्याचार व मूर्तिविध्वंसन केलें. ती त्यांची विध्वंसक लाट, विजयनगरचें साम्राज्य व महाराष्ट्रांत उदित झालेली छत्रपतींची

सत्ता ह्यांच्या प्रभावानें रोखली गेली. असें ' शठं प्रति शाठ्यम् ' अशा धोरणानें अनुसरण्याचें सामर्थ्य जवळील भागांत जागृत नसतें तर गोव्यांत घुसलेल्या कांट्याचा नायटा होऊन तो दूरवर सहज चरला असता. अविवेक व दुष्टपणा ह्या दृष्टीनें पाहूं जातां मुसलमान व ख्रिस्ती फिरंगी ह्यांत डावे-उजवे ठरविणें हें खरोखरच अशक्य आहे. सोरटी सोमनाथाच्या विध्वंसांत जी निर्बुद्धता तीच घारापुरीच्या लेण्याच्या मोडतोडींत ! घारापुरीच्या कठोर काळ्या खडकांत भारतीय शिल्पकारांनीं जी दैवी प्रतिभा शिल्परूपांत साकार केली, तिच्या फिरंग्यांनीं केलेल्या विटंबनेची कहाणी ऐकून, कोणाहि अभिमानी व्यक्तीचें मन संतप्त झाल्यावांचून राहणार नाहीं. त्यांनीं तेथील रेखीव भव्य मूर्तींची व शिल्पांतील अलंकरणाची नासधूस करून तेथील कलापूर्ण गुंफांचें घोडयांसाठीं तबेले केले ! एवढेंच नव्हे तर त्यांच्यांतील हिडाल्गो नांवाच्या एका सेनापतीनें तर तेथील गुंफांत तोफांच्या घुमणाऱ्या आवाजावर प्रसन्न होऊन, केवळ करमणुकीसाठीं समोरच्या पटांगणांत तोफ बसवून लेण्याच्या मुख्य सभामंडपांत गोळे सोडले ! पोर्तुगिजांच्या धार्मिक क्षेत्रांतील दुष्ट आक्रमणाचें स्वरूप स्पष्ट करतांना ' श्रीमंगेश ' ह्या पुस्तिकेंत श्री. वा. ल. वझे म्हणतात कीं, " गोमंतकांतील कोणत्याहि देवस्थानाचा इतिहास लिहावयाचा झाला तर तो बाटाबाटीच्या काळ्या रंगाशिवाय लिहितां येणार नाहीं. हा प्रचंड बाटाबाटीचा डोंब महाप्रलयालासुद्धां आपल्या पोटीं लपवितां येणार नाहीं. " तेथील बाटया किरिस्तावांची संख्या व गोव्यांतील संत कॅथरीनच्या कॅथेड्रलजवळील ' पुराणवस्तुसंग्रहालय ' ह्या नांवाखालीं हिंदूंच्या देवळांतील पिंड्या, साळुंका, मूर्तींचीं शिरें व धडें, तुटके पाय, शिलालेख आदि गोष्टींचें मांडलेलें नागडें अभद्र प्रदर्शन ह्या गोष्टी कोणालाहि वरील विधानाची सत्यता पटवून देऊं शकतील.

ह्या परक्या मूर्तिभंजकांनीं गेल्या शेकडों वर्षांत जीं कृष्णकृत्यें केलीं, त्यांचें साग्र वर्णन करणें हें आमच्या स्वाभिमानाला मानवणारें नसल्यानें त्या करुण कथेची प्रस्तुत स्थळीं लांबण लावीत नाहीं. पण आज उभ्या असणाऱ्या सहस्रावधि मशिदी म्हणजे पूर्वींचीं हिंदूंचीं मंदिरें होतीं व तेथील फोडून फेकून दिलेल्या मूर्तीच आज ठिकठिकाणच्या प्राचीन वस्तुसंग्रहालयांत व भग्न मंदिरांच्या आसपास रानोमाळ पडलेल्या आहेत, हें कटु सत्य आहे. तक्षशीला,

लाहोर, मथुरा, लखनौ, प्रयाग, काशी, सारनाथ, पाटणा, नालन्दा, कलकत्ता, मुंबई, मद्रास, कोलंबो, लंडन, बोस्टन आदि अनेक ठिकाणीं भारतीय प्राचीन मूर्तींचीं संग्रहालयें आहेत. हीं संग्रहालयें पाहात असतां हिंद्वेतर प्रेक्षक हे भारतीय मूर्तिशिल्पविषयींची आपली जिज्ञासा तृप्त करूं शकत असले तरी तीं पाहून भारतीय राष्ट्रभक्तहृदयाचा त्या भग्न मूर्तींप्रमाणेंच तेजोभंग झाल्यावांचून राहात नाहीं. हीं संग्रहालयें म्हणजे परक्यांच्या असहिष्णुतेचें व त्यांनीं हिंदूं-वर केलेल्या आघातांचें निर्लज्ज प्रदर्शन होय. स्वाभिमानी माणसाला एक एक भग्न मूर्ति म्हणजे हिंदुहृदयावर दिलेला चरचरीत डागच वाटतो. इंग्रजी सत्तेचें उच्चाटन झाल्यावरहि ठिकठिकाणीं त्यांचे उभे असणारे पुतळे पाहिले कीं, मन जसें अस्वस्थ होतें तसेंच ह्या स्थानभ्रष्ट केल्या गेलेल्या भग्नमूर्ति पाहून! दोन्ही गोष्टी अन्यायाची, अपमानाची आणि परक्यांच्या प्रभुत्वाची आठवण करून देत असल्यामुळें त्यांचें प्रदर्शन मनानें मेलेलीं माणसेंच अजूनहि मांडूं शकतील नि डोळे भरून पाहूं शकतील!

पूर्वीं मूर्तिपूजक असणाऱ्या व सध्यां ईसाई वा मुसल्मान बनून मूर्तिभंजक बनलेल्या देशांत, जुन्या मागासलेल्या रूढीचे अवशेष म्हणून, परकेपणानें व थंडया जिज्ञासेनें अशीं भग्नावशेषांचीं प्रदर्शनें मांडलीं जाऊं लागलीं. धर्मांतरानें त्यांच्या मूळच्या राष्ट्रीय परंपरेशीं त्यांचें असणारें ममत्वाचें नातें संपल्याचें हें द्योतक होतें. ह्यासंबंधीं डॉ. सौ. सावित्रीदेवी मुखर्जी ह्यांनीं "हिंदूंनो! सावधान!" ह्या ग्रंथांत केलेलें विवेचन मननीय आहे. त्या ग्रीस, इटली व मिसर येथील मूर्तींच्या अवशेषांची स्थिति वर्णन करतांना म्हणतात कीं, "त्या (देशांत) मूर्तिपूजा हा कांहीं केवळ देखावा नव्हता. त्यांत त्याव्यतिरिक्त विलोभनीय असें दुसरें कांहीं होतें. आजच्या इटलींतून आणि ग्रीसमधून हें 'दुसरें कांहीं' पूर्णपणें नाहींसें झालें आहे. हें दुसरें कांहीं म्हणजे पुरातन ग्रीक आणि रोमन मूर्तिपूजक जनतेची राष्ट्रीयत्वाची जाणीव." अशी राष्ट्रीयतेची मूळची जाणीव नष्ट झालेले इजिप्तमधील लोक तेथील प्राचीन वैभवशाली अवशेष दाखवीत असले तरी परकेपणानेंच! त्यासंबंधीं सौ. सावित्रीदेवींनीं आपलें मार्मिक निरीक्षण वरील ग्रंथांतच ग्रथित केलें आहे. त्या लिहितात कीं, "त्यांच्या पूर्वजांचें तें ऐश्वर्य त्यांचें स्वतःचें आहे असें त्यांना म्हणतां येत नाहीं! त्या पुराण राष्ट्राच्या समाधीवर उभारलेल्या दुसऱ्याच कोणत्या

तरी राष्ट्राचे आपण संतान आहोंत असें त्यांचें मन त्यांना सांगतें. भूमि तीच; पण राष्ट्र दुसरें ! तेच प्रस्तर पण त्यांचा अर्थ निराळा !"

सुदैवानें शेंकडों वर्षांच्या परकीय आक्रमणांनंतरहि हा विशाल नि पवित्र भारत आपला आहे, हिंदु धर्म नि हिंदु संस्कृति आपली आहे, ही येथील राष्ट्रीय जाणीव जिवंत आहे. अशा जिवंत राष्ट्रीय आत्मीयतेमुळें छत्रपति शिवाजी, राणा प्रताप व त्यांचे पराक्रमी वंशज ह्यांनीं परक्यांनीं मोडलेलीं-फोडलेलीं तीर्थक्षेत्रें पुन्हां वसविलीं; पण पाश्चात्यांप्रमाणें भग्नावशेषांचें प्रदर्शन मांडून ठेविलें नाहीं. बरेच दिवस पूजेंत नसणाऱ्या व भग्न झालेल्या मूर्तींचें विसर्जन करावें, असा आपल्या शास्त्रांनीं घालून दिलेला दंडक आहे. त्यांतहि त्या मूर्ति जर परक्यांनीं दुष्टपणानें फोडल्या असतील, तर त्या परक्यांचें परिपूर्ण निर्दालन केल्यावर तरी हा दंडक लगेच व कटाक्षपूर्वक पाळला गेला पाहिजे. कारण त्या भग्न मूर्ति हृदयाला अधिक वेदना देतात. आपल्या मत्स्य पुराणांत तर असें स्पष्ट सांगितलेलें आहे कीं, "कोणत्याहि अवयवानें न्यून अशी मूर्ति यजमानास दुःखदायक होते." ह्यासाठीं इंग्रजांच्या काळांत जीं आपल्या खंडित मूर्तींचीं संग्रहालयें झालीं असतील त्यांचें विसर्जन अवश्य केलें पाहिजे. अर्थात् असें केल्यानें आपल्या प्राचीन शिल्पकलेची परंपरा व विकासक्रम लक्षांत आणून देणारे हे दुवे आपण नष्ट करीत नाहीं काय, अशी कोणी शंका काढील. त्या त्यांच्या व्यवहारी शंकेंत कांहीं तथ्यांश असल्यानें त्यासंबंधीं एक गोष्ट येथें सुचवून ठेवणें युक्त दिसतें. ती अशी कीं, ठिकठिकाणीं असणाऱ्या अशा भग्न मूर्तींचें कालानुक्रमानें व शिल्पाच्या प्रकारांनुसार वर्गीकरण करून त्यांतील निवडक मूर्तींना 'वज्रलेप' करावा व त्यांना मूळच्या अखंड रूपांत उभें करावें. अर्थात् हें काम राज्यशासकांनीं पडद्याआड इतिहासज्ञ, शिल्पकार व कलाकार ह्यांच्याकडून करून घेतलें पाहिजे. पण सर्वसामान्य जनतेसमोर हें भग्नमूर्तींचें प्रदर्शन मांडून ठेवणें आतां लांच्छनास्पद होय.

संग्रहालयांसंबंधीं राजसत्तेनें जी दक्षता घ्यावयाची, तीच दक्षता समाजांतील जाणत्या तरुणांनीं पुढाकार घेऊन ठिकठिकाणच्या खंडित मूर्तींच्या संबंधांत घेतली पाहिजे. ज्या भग्न मूर्ति जुन्या गांवांतून, पिंपळाच्या पाराजवळ, नदीच्या कांठावर आणि पडक्या उपेक्षित देवळांतून केविलवाण्या अवस्थेंत पडून असतील, त्या सर्व नदींत विसर्जित केल्या पाहिजेत. ज्या दृश्यानें मनाला वेदना

होतात, ज्या गोष्टी वातावरणांत औदासीन्याची भर घालतात, तीं दृश्यें व त्या गोष्टी दृष्टीआड करण्यांतच हित आहे.

भग्न मूर्तींसंबंधीं विचार झाल्यावर आतां राष्ट्रीय दृष्टीनें आणखी एका महत्त्वपूर्ण गोष्टीकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. मध्यंतरींच्या पारतंत्र्याच्या काळांत अखिल भारतांतील हिंदुसमाजाच्या भक्तीचीं व श्रद्धेचीं कांहीं विख्यात केंद्रें अन्य धर्मीयांनीं बलात्कारानें बळकाविलीं आहेत. त्या स्थानांजवळून जातां येतां स्वाभिमानी व्यक्तीला दुःख झाल्यावांचून राहात नाहीं. अशीं पवित्र स्थानें स्वाधीन करून घेऊन तेथील मंदिरांचा जीर्णोद्धार करणें हेंहि आवश्यक आहे. पण आजकाल ही कल्पना कांहीं जणांना रुचत नाहीं, पचत नाहीं. अशा लोकांना राष्ट्राचें बळ व मनाचा पीळ ह्या गोष्टी श्रद्धास्थानांच्या सुस्थितीनें व गौरवानें प्रभावी होत असतात ह्याची जाणीव नसावी. किंवा इतरांची आक्रमकता आपल्या केवळ सौजन्यानें थोपवितां येईल अशी भाबडी आशा त्यांना वाटत असावी. त्यामुळेंच 'झालें गेलें विसरून जा, जुनीं मढीं उकरूं नका,' अशासारखा हितोपदेश त्यांच्याकडून केला जातो. 'गीताप्रवचनां'त पूर्वस्मरणानें विकार वाढतो, म्हणून विस्मरणाची कास धरा, असें सांगतांना विनोबा म्हणतात, "विस्मरण पडणें चांगलें. हिंदु-मुस्लीम-ऐक्यासाठीं भूतकाळाचें विस्मरण हाच उपाय आहे. औरंगजेबानें जुल्म केला. किती दिवस घोकीत बसणार हें?" (पान १३४) ही विचाराची पद्धति अशा वर्गाची प्रातिनिधिक म्हणून सांगतां येईल. या वर्गांतील कांहीं जण, इतिहास विसरा म्हणून सांगणें सोपें असलें, तरी इतिहास विसरणें शक्य नसतें, हें ओळखून तो इतिहास विपरीत करून मांडण्यास प्रवृत्त होतात. भारतांत जें असंख्य मंदिरांचें विध्वंसन झालें तें मुसलमान व ख्रिश्चन ह्यांनीं केलें नसून लुटारू पेंढाऱ्यांनीं केलें, असें सांगण्यापर्यंत त्यांची मजल जाते. एक तर इतिहास विसरतां येत नाहीं व प्रचारासाठीं इतिहास विपरीत करून मांडला तरी तो सत्यान्वेषी व स्वाभिमानी लोकांना फसवूं शकत नाहीं. अशा खोट्या इतिहासकथनानें, पूर्वींचे अन्याय व अपमान दडवून ठेविले तरी त्यामुळें आजच्या काळांत त्यांची पुनरावृत्ति होण्याचें टळत नाहीं. उलट इतिहासावर झगझगीत प्रकाशझोत टाकून त्याचें दर्शन घेण्यानें यांतील अपमानास्पद गोष्टींचे अवशेष निखंदून टाकण्याची व 'पुन्हां अशा

अन्याय्य गोष्टी होऊं देणार नाहीं ' असा निर्धार करण्याची प्रेरणा जनमनांत उदित होते. ही प्रेरणाच राष्ट्राचें पौरुष जागें करते व असें जागृत झालेलें डोळस व स्वाभिमानी राष्ट्रच वैभवसंपन्न भविष्यकाळ निर्माण करीत असतें.

अशा सुयोग्य धारणेंतूनच गेल्या शेंकडों वर्षांत भ्रष्ट व खंडित झालेल्या मंदिरांचा पुनरुद्धार व जीर्णोद्धार करण्याचें सत्र अखंड चालू असलेलें दिसतें. ज्या ठिकाणीं परक्यांच्या सतत होणाऱ्या स्वाऱ्यांमुळें आणि अन्यायी व निर्दय दंडसत्तेमुळें असें करण्यास हिंदूंना अवसर मिळाला नाहीं, तेथील मंदिरांचें अस्तित्वच जवळ जवळ संपुष्टांत आलें. काश्मीर, पुष्पपूर (वायव्य सीमाप्रांत) पंजाब व सिंध ह्या प्रांतांत तर नांव घेण्यासारखें सुंदर शिल्प असलेलें प्राचीन मंदिर आढळणें शक्य नाहीं. कारण तीं पाडलीं जाऊन त्यांतून मशिदी उभारल्या गेल्या. पानिपतासारख्या २५।३० सहस्र वस्तीच्या गांवांत ३६५ मशिदी असलेल्या पाहिल्या म्हणजे त्यांच्या आक्रमणाचें स्वरूप ध्यानीं येतें ! अशी परक्या सत्तेपुढें शहाणपण न चालण्यासारखी स्थिति असतांहि अनेक धर्मनिष्ठांनीं व राज्यधुरंधरांनीं थोडी सवड मिळतांच कांहीं खंडित मंदिरें पुन्हां उभारलीं व आपल्या भागांतून तुटूं लागलेला परंपरेचा धागा वर्तमानकाळाशीं जोडून दिला. सौराष्ट्रांतील सोमनाथाच्या सुविख्यात ज्योतिर्लिंगाचा खिस्ताब्द ११२५ मध्यें गझनीच्या महंमदानें नाश केला. त्यानंतर जयसिंग, कुमारपाळ, भीम, भोज आदि राजांनीं तेथें पुन्हां मंदिर उभारलें. पण त्यानंतर सहा-सात वेळां तें मंदिर मुसल्मानांनीं पाडलें व तितक्या वेळां पराक्रमानें कोणी ना कोणी पुढें येऊन तें मंदिर पुन्हां निर्माण केलें, अशी इतिहासाची साक्ष आहे.

भारतांतील सर्व प्रांतांतील विशेषतः महाराष्ट्रापासून उत्तरेकडील अनेक प्रमुख मंदिरांना परक्यांचा उपद्रव वारंवार झालेला आहे व त्या वेळच्या परिस्थितीचा रागरंग ओळखून तेथील मूर्तींना कधीं विहिरींत तर कधीं तळघरांत दडविण्याचा प्रसंग गुदरलेला आहे. काशीच्या सुविख्यात विश्वनाथाची मूर्ति तेथील पुजाऱ्यांनीं ज्ञानवापींत दडविली होती, तर प्रसिद्ध सोमनाथाची एका वेळची मूर्ति महाराष्ट्रांत आणून शिंगणापूरच्या शिखरावर स्थापण्यांत आली. आपल्या बारा ज्योतिर्लिंगांपैकीं सोमनाथ, महाकाळ, ओंकार, नागेश, काशी-विश्वेश्वर ह्या मंदिरांना आक्रमणांच्या महान् दिव्यांतून जावें लागलें आहे. मथुरा, अयोध्या, देवगिरी, अजमेर, विजयनगर आदि असंख्य ठिकाणच्या

मंदिरांना मुसलमानांच्या आततायीपणानें अनेकदां ग्रासलेलें आहे. पण बहुतेक वेळीं संधि साधून हिंदूंनीं डोकें वर काढावें व मंदिरांचा जीर्णोद्धार करावा, असें घडलें आहे.

अक्षय्य वटवृक्षाप्रमाणें हिंदुत्वाच्या चिवटपणालाहि खरोखर सीमा नाहीं ! मोठमोठ्या प्राचीन परंपरा असलेलीं राष्ट्रें मुसलमानांच्या एकेका तडाख्यानें नष्ट झालीं. पण भारतानें मात्र गेल्या बाराशें वर्षांत अनेक आक्रमकांना पुरून उरून, विलक्षण चिकाटीनें आपली परंपरा अखंडित राखण्याची पराकाष्ठा चालविली आहे. हा आपला जीवनमरणाच्या संघर्षांतील विक्रम अलौकिक असला तरी तो विक्रम अखंड भारतावरील परक्यांच्या प्रभुत्वाच्या सर्व खाणाखुणा पूर्णपणें पुसल्या जाईपर्यंत पूर्ण झाला आहे, असें मात्र म्हणतां येणार नाहीं.

अजूनहि अयोध्या, काशी आदि ठिकाणच्या देवस्थानांच्या पुनरुद्धाराचें काम करतां आलेलें नाहीं. महाराष्ट्रापासून उत्तरेला बहुतेक प्रत्येक जिल्ह्यांत कांहीं पवित्र स्थानें अहिंदूंच्या हातांत असल्याचें व त्याची बोच जनमनांत जागृत असल्याचें आढळून येईल. पण सरकारी धोरण व जनतेची आत्मविश्वासहीनता ह्यामुळें अशा स्थानांची मुक्तता व पुनरुद्धार करतां आला नाहीं. ह्यासाठीं काय करावें लागेल, हें पाहिलें पाहिजे.

सौराष्ट्रांतील सोमनाथाचें मंदिर हें खंडित होतें व त्याच्या पडक्या अवशेषांवर एक लहानशी मशीदहि उभी होती. तें दृश्य पाहून सरदार वल्लभभाई पटेल ह्यांचें मन व्यथित झालें आणि त्यांनीं त्या राष्ट्रीय अपमानाची खूण पुसून टाकण्यासाठीं तेथें नवें मंदिर उभारण्याचा संकल्प सोडला. सरदार पटेलांसारख्या निश्चयी व्यक्तीच्या रूपानें त्या वेळची राजसत्ताच जणूं त्या संकल्पामागें उभी राहिली व तो सत्संकल्प सिद्धीस गेला. राजसत्तेचा असा पाठिंबा मिळणें ही गोष्ट असल्या प्रकारच्या पुनरुद्धाराच्या कार्यांत अत्यावश्यक आहे. पण सर्वच ठिकाणीं असा दृढ निश्चय व सहकार दिसून येणें आजच्यासारख्या वैचारिक दृष्टीनें गढूळलेल्या कालखंडांत संभवनीय नाहीं, असा ठिकठिकाणचा अनुभव आहे. मशीद बनविलेलें काशीचें श्रीविश्वेश्वराचें देवालय हिंदूंना परत मिळावें, अशी जागृत हिंदूंकडून सत्याग्रहपूर्वक मागणी सुरू झाली. तेव्हां त्या वेळचे उत्तरप्रदेशाचे मुख्य मंत्री डॉ. संपूर्णानन्द कडाडले कीं,

"...सरकार तीन-चारशें वर्षांपूर्वीचा हा जुना अन्याय दूर करण्याचा ठेका घेऊं शकत नाहीं. श्रीसोमनाथाचा जीर्णोद्धार सरदार पटेलांनीं केला हें खरें आहे; पण त्या ठिकाणीं कोणताहि वादग्रस्त प्रश्न नव्हता हें लक्षांत घेतलें पाहिजे...आपणच मुसलमानांकडून समझोत्यानें जागेसंबंधींचा निर्णय करून घ्यावा. या झगड्यांत पडण्याची सरकारची इच्छा नाहीं."

वरील उत्तरावरून निधर्मी राज्यशासनाचें कंकण बांधून बसलेल्या हिंदु सत्ताधाऱ्यांना आपल्या मंदिराची मशीद झाली आहे हा अन्याय वाटतो, हेंहि कांहीं कमी नाहीं ! त्यांचें म्हणणें एवढेंच आहे कीं, हा अन्याय जुना असून तो दूर करावयाचा तर संघर्ष अटळ आहे व असा संघर्ष करण्याची सरकारची इच्छा नाहीं; किंवा सरकारला शक्यता नाहीं. एक तर अन्याय 'जुना' होण्याचें कारण, आपण वेळींच अन्यायी लोकांचें पारिपत्य करण्यांत यशस्वी ठरलों नाहीं व आतां स्वातंत्र्य मिळाल्यावर अन्याय दूर करण्याचें प्राप्त कर्तव्य पार पाडावयाचें तर दोन हात करावे लागतील या भीतीनें, डोळ्यांवर कातडें ओढून तो सहन करीत बसणें हेंहि न्यायाला धरून नाहीं. अशा अन्यायाला अधिक 'जुना' होऊं देणें कसें घातक ठरेल हें सांगतांना श्री. पु. भा. भावे लिहितात कीं, "अन्यायाला किंवा अपहाराला दुर्दैवानें दीर्घ आयुष्य लाभलें म्हणून त्या अन्यायाचा कांहीं न्याय होत नाहीं, किंवा त्या अपहाराला कांहीं वैध अधिकाराचें स्वरूप प्राप्त होत नाहीं. उलट अपराध जितका दीर्घ-कालीन, तितकें त्यावर साचणारें प्रायश्चित्ताचें व्याजहि भारी ! त्यामुळें निर्माण होणारी कटुताहि भयानक !"

वास्तविक सज्जनाला कटीची लंगोटी देण्यास जितकी उत्सुकता पाहिजे, तितकीच नाठाळाच्या उन्मत्त शिरावर काठीचा तडाखा देण्याचीहि तत्परता हवी आहे. तेव्हांच सामाजिक दृष्टीनें समतोल अवस्था होऊं शकेल. आज एखादी गोष्ट अन्याय्य दिसत असतांहि तिचें निराकरण करण्यासाठीं सत्ताधीश कचरतात, ह्याचें कारण जुना अन्याय करणाऱ्याचे आजचे वंशज अजून त्या अन्यायाला न्यायाचें रूप देण्याच्या दुराग्रहानें पेटलेले आहेत व पक्षहिताच्या दृष्टीनें त्यांना दुखवून चालणार नाहीं, असें निधर्मी सत्ताधाऱ्यांना वाटत आहे. विधर्मीयांनीं केलेला अन्याय तथाकथित निधर्मी वृत्तीनें सहन करणें हा शुद्ध अधर्म आहे ! पण अशी जाणीव होऊन असले अन्याय दूर करण्या-

साठीं लागणाऱ्या मनोधैर्याची साक्ष सरकार पटवील तो सुदिन. तोंवर ठणकणारे अन्याय असे ठणकतच राहणार !

हिंदु व मुसलमान ह्यांनीं आपापसांत विचारविनिमय करून समजुतीनें हा प्रश्न मिटवावा, असा दुसरा मार्ग दाखविला जातो. पण समाजाच्या सामर्थ्याचें केंद्र असणारें सरकार जेथें पुढाकार घेण्यास कचरतें, तेथें जुन्या अन्यायाचे आजचे वहिवाटदार, सरकारी पाठिंबा नसणाऱ्या हिंदूंजवळ सामोपचारानें बोलणीं करण्यास सिद्ध होतील, ही गोष्ट अशक्य आहे. भारतांतील इस्लामी नीतींत व व्यवहारांत सामोपचार व समजूतदारपणा या गोष्टी अभावानेंच दिसतात. हा अनुभव ध्यानीं घेऊन, अन्य धर्मीयांच्या हातीं असलेलीं मंदिरें व क्षेत्रें, अन्याय जुना कीं नवा याचा विचार न करतां त्याचें निवारण करण्याचा संकल्प सोडूं शकतील अशा राज्यकर्त्यांची खरोखरच वाट पाहत असतील. कारण मुसलमानांची चढाई व बढाई ही न्यूनगंडानें वा आत्मविश्वासहीनतेनें पछाडलेल्या बुळबुळीत व निसरड्या वृत्तीच्या लोकांसमोर चालते. पण थोर स्वाभिमानी व निश्चयी शक्तींचें दर्शन घडलें कीं, ते न्यायाच्या वाटेवर येण्यास आपसुख सिद्ध होतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. के. ब. हेडगेवार ह्यांनीं त्यांच्या अशा वृत्तीचें वर्णन एका पत्रांत अत्यंत मार्मिक शब्दांत केलेलें आहे. ते दि. ६ मे १९३१ च्या पत्रांत म्हणतात कीं, " मुसलमानांचा हडेलहप्पीपणा, प्रसंग आला असतांना पहिल्यानें धमकी, नंतर मुजोरी, त्यानंतर विनवणी व शेवटीं शरणागति " ह्या क्रमानें नरमतो. तेव्हां जागृत जनतेच्या रूपानें हिंदु समाजानें सुसंघटित शक्ति उभी करण्याचा ध्यास घेऊन प्रयत्न करणें, हाच वास्तविक आपल्यापुढील बिकट प्रश्न सोडविण्याचा परिणामकारक उपाय आहे. श्रीसोमनाथाची प्राणप्रतिष्ठा केल्यावर भाषण करतांना पहिले राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांनींहि हेंच सत्य ठसठशीत शब्दांत मांडलें होतें. ते म्हणाले कीं, " भारताच्या दौर्बल्यामुळेंच पूर्वी अनेकवार सोमनाथाचा विध्वंस झाला, ही गोष्ट लक्षांत घेऊन सर्वत्रांनीं आपलें बळ व तेज वाढविलें पाहिजे." अर्थात् अशी जागृति होऊन समाज बलशाली होण्यापूर्वींच सर्वोदयी हृदय-परिवर्तनाच्या मार्गानें हा धडधडीत दिसणारा अन्याय कोणा महाभागाकडून दूर केला गेला व अन्य धर्मीयांनीं आपण होऊन सहिष्णुता व न्यायप्रियता प्रकट केली, तर 'सुंठीवांचून खोकला गेला' असा सुटकेचा सुस्कारा

टाकण्यास आपली सिद्धता ठेवली म्हणजे झालें! अजून आपला समाज जागृत व सुसंघटित झालेला नाहीं, ही गोष्ट केरळसारख्या राज्यांत व इतरत्रहि नव्यानें खंडित व विटंबित झालेलीं मंदिरें आपणांला कंठरवानें सांगत आहेत. खरें सांगावयाचें म्हणजे, आपला समाज बळ व तेज ह्या गुणांनीं मंडित होऊन सदैव जागरूक असण्यावरच आपल्या श्रद्धास्थानांचें झालेलें पावित्र्य-विडंबन धुऊन टाकणें व पुढें अशी विटंबना न होईल अशी शाश्वती निर्माण करणें अवलंबून आहे. अपमान होतांच मन संतप्त होणें ही जिवंतपणाची खूण आहे; तर अशा खवळलेल्या मनाला संयमित करून, धूर्तपणानें आणि कौशल्यानें, आपल्याशीं औद्धत्याचा व्यवहार करणाऱ्याला पूर्ण पराभूत करणें हें बलशालित्वाचें द्योतक होय. पण अशा जिवंत सामर्थ्याची प्रचीति येत नसल्यानेंच हे अन्याय्य प्रकार अधिक 'जुने' होत आहेत. तें पाहून प्रा. माधवराव पटवर्धन आपल्या 'भाषाशुद्धि-विवेक' ह्या ग्रंथांत म्हणतात कीं, "पावित्र्याची विटंबना होत आहे म्हणून ज्या दिवशीं हिंदु लोक आततायी होतील, त्या दिवशीं त्यांच्या चेष्टा थांबतील."

एखाद्याजवळ पैसा व दानशूरता असेल तर तो एखाद्या खंडित मंदिराचा जीर्णोद्धार करूं शकेल; पण अशा दातृत्वांतून उभें राहणारें मंदिर पुन्हां सुरक्षित राहील, अशी शाश्वती आजच्या घटकेला देतां येणार नाहीं. ह्यासाठीं समाजाच्या वाढत्या सुसंघटित बळाच्या आधारावर हें दानशूरत्व प्रकट झालें पाहिजे. नाहीं तर अशा जीर्णोद्धाराचा विशेष लाभ काय? तेव्हां समाजांतील आत्मविश्वासहीनत्व आणि स्वाभिमान्यशून्यत्व निपटून काढणें ही गोष्ट राष्ट्रीय पुनरुद्धाराच्या कोणत्याहि कार्यांत आपण पायाभूत मानली पाहिजे. असें आज घडत नाहीं असें पाहून सरसंघचालक श्री. मा. स. गोळवलकर तथा श्रीगुरुजी एकदां म्हणाले कीं, "आपण बांधलेल्या मंदिरांची पाडापाडी अगदीं ह्या घटकेपर्यंत होत असतां, अशा पाडणाऱ्यांचें कंबरडें मोडण्याकडे दुर्लक्ष करून आणखी नवीं मंदिरें उभारणाऱ्या लोकांच्या बुद्धीचाच प्रथम जीर्णोद्धार केला पाहिजे!" गेल्या बाराशें वर्षांत आपण मंदिरें बांधावींत व मुसल्मानांनीं उद्ध्वस्त करावींत; पुन्हां आपण जीर्णोद्धार करावा व पुन्हां त्यांनीं आघात करावा, अशा अनेकदां आवृत्त्या निघाल्या आहेत. ही गोष्ट आपल्या चिवट वृत्तीची निदर्शक असली तरी आक्रमकांच्या वृत्तींत आमूलाग्र पालट घडविणारा

उपाय अजून आपण योजूं शकलों नाहीं, असा स्पष्ट निर्वाळा देणारी आहे. तेव्हां शांतपणें विवेक जागा करून अहिंदूंची असहिष्णुता व आक्रमकता अटकेपार पिटाळून लावण्याचा उपक्रम भविष्यकाळांत झाला पाहिजे. ऋणशेष, अग्निशेष व रोगशेष हे जसे उरूं देऊं नयेत त्याप्रमाणें संधि साधून आपल्या समाजावर आघात करणाऱ्या असहिष्णु वृत्तीचाहि अवशेष भारताच्या चतुः-सीमांतून खणून काढण्याचा चंग तरुणांनीं बांधला पाहिजे. नाहीं तर रोगाप्रमाणें पुन्हां पुन्हां डोकें वर काढणारी ही घातकी वृत्ति शेवटीं राष्ट्राचा पुरा ग्रास घेतल्यावांचून राहणार नाहीं. या बलसंपन्न, आत्मनिर्भर व निर्भय मनोवृत्तीमुळें शकहूणादि असहिष्णु आक्रमकांना आपण भारतीय समाजाच्या उज्ज्वल परंपरेंत समरसून टाकलें, त्याच जयिष्णु मनोवृत्तीचें अलौकिक रसायन आज हवें आहे. अन्य समाजांना नष्ट करणें हा राक्षसी मार्ग आपला नाहीं. बलसंपन्न होऊन त्यांच्या विपरीत मनोवृत्तींत परिवर्तन घडवून आणण्याच्या कसोटीवरच आपल्या संस्कृतीचें श्रेष्ठत्व आपण सिद्ध करीत आलों आहोंत. आपणांला माणसें नष्ट करावयाचीं नसून त्यांची मनोवृत्ति आमूलाग्र पालटवून दाखवावयाची आहे. "कोणाच्या धर्मास विरोध करणें हें आपलें धर्मापासून सुटणें व ईश्वराचें लिहिलें रद्द करून त्याजवर दोष ठेवणें आहे," ही छत्रपति शिवरायांची सहिष्णु मनोधारणा ज्या पराक्रमी जीवनाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसली त्याच पार्श्वभूमीची निर्मिति भावी काळासाठीं करून ठेवण्याचें अत्यंत महत्त्वपूर्ण दायित्व आपल्या पिढीनें स्वीकारलें पाहिजे. हें कर्तव्य ओळखून आपण सर्व जण पुढें सरूं लागलों तर बराच काळ अडखळलेले व तुंबून पडलेले सर्व बिकट प्रश्न मार्गी लागतील. असा पूर्ण विश्वास वाटतो.

* * *

REFBK-0013101

मराठा ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 36307 वि: निबंध.
स्थल ९१८६ नों दि 10/7/62.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 93969

## — शुद्धिपत्र —

| पृष्ठ | ओळवरून | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | ३ | मन | मन. |
| ९ | ३ | देवा यतन | देवायतन |
| १६ | १ | बहालें | बहाल |
| २२ | १८ | ध्यानीं घालून | ध्यानीं घेऊन |
| २२ | २३ | सत्यत्वाचा | सत्तत्वाचा |
| २३ | ४ | शक्तीच्या | शक्तींच्या |
| ३० | ७ | म्हणाऱ्या | म्हणणाऱ्या |
| ३१ | २७ | सगुणा-साकार | सगुण-साकार |
| ४२ | २६ | छळवाद | छळवाद, |
| ५३ | १४ | का | कां |
| ५७ | १ | गांवाशिवेवर | गांवशिवेवर |
| ५८ | २६ | पालिठाणा | पालिताणा |
| ६१ | २४ | काम बसतें | काम बसतें. |
| ६७ | २७ | चालतात, | चालतात. |
| ६८ | २७ | लाभते | लभते |
| ६९ | २८ | Dupois | Dubois |
| ७१ | २३ | व्यवथेसाठीं | व्यवस्थेसाठीं |
| ७५ | २९ | room. | room, |
| ७६ | २२ | सांगत होतों | सांगत होतों. |
| ९० | २३ | होत असते, | होत असते. |
| १०७ | २४ | पाहिजे | पाहिजे. |
| १११ | १ | ह्याच्या | ह्यांच्या |

ना. ह. पालकर यांचीं

आगामी प्रकाशनें

- तळपायाची आग
- ज्यूंचें पुनरुत्थान
- भगवा ध्वज